म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ७५१३

RFIBK-0001121

१९७५
म. ग्रं. सं. ठाणे
ग्र - चरित्र
२५३

"न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते"—गीता.

# काव्हूर

ऊर्फ

# इटलीचा रामदास

किंमत बारा आणे

मुंबई व मध्यप्रांत येथील विद्याखात्यांनीं मंजूर केलेलें

# बीजगणित

[ आवृत्ति दुसरी; पृष्ठें ३७५ वर; किं. २ रु;
व्ही. पी. नें रु. २८३ ]

पाश्चात्य व पौर्वात्य पद्धतींचा सुंदर मिलाफ.
उत्कृष्ट परिभाषा.
ठिकठिकाणीं सुलभ व सविस्तर उपपत्ति.
व्यावहारिक दृष्टीनें विषयाची मांडणी व उदाहरणांची निवड.
आलेखा (Graphs) चें प्रकरण आकृतीसह.
ट्रेनिंग कॉलेजें, मॅट्रिक्युलेशन व स्कूलफायनल परीक्षांना
लागणारा सर्व भाग यांत आला आहे.
मराठींत असा ग्रंथ पहिलाच आहे.
रँगलर परांजपे, प्रिं. गोखले ( ट्रेनिंग स्कूल, उमरावती )
वगैरेंचे उत्कृष्ट अभिप्राय.

व्यवस्थापक 'लोकशिक्षण'
सदाशिवपेठ, पुणें.

प्रभाकर मधुर ज्योर भ०, भाव परिचय

"न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते"—गीता

# काव्हूर

उर्फ

# इटलीचा रामदास

सं. ग्रा. ... नं. १३५ ... ता. ...


लेखक

वासुदेव दामोदर मुंडले

(इस्लामपूर, जि. सातारा)


क्र. ११२९


प्रकाशक

जनार्दन विनायक ओक, एम्. ए.

संपादक लोकशिक्षण पुणें


श RLFBK-0001121

किंमत बारा आणे

हें पुस्तक रा.रा.शंकर नरहर जोशी यांनीं घ.नं.८१८ सदाशिव पेठ पुणें शहर येथें आपल्या चित्रशाळा छापखान्यांत व्यवस्थापक धि प्रिंटिंग एजन्सी,पुणें यांचेंकरितां छापिलें व रा. रा. जनार्दन विनायक ओक संपादक लोकशिक्षण यांनीं घ. नं. ७१२ सदाशिव पेठ पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें.

( सर्व हक्क प्रकाशकाकडे )



कामिलो काव्हूर

जन्म इ. स. १८१० ]

[ मृत्यु इ. स. १८६१

The Bombay Art Printing Works, Fort.

# प्रकाशकाचे दोन शब्द

१ इटलीचा पुनरुद्धार म्हणजे एकोणिसाव्या शतकांतील एक मोठाच चमत्कार होय. त्या देशांत प्राचीन काळीं म्हणजे सुमारें दीड हजार वर्षांपूर्वी रोमन लोकांचें एक मोठें साम्राज्य होऊन गेलें. त्यानंतर तेथील रहिवाश्यांचीं अनेक स्थित्यंतरें झालीं. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभाला तेथें अनेक छोटीं संस्थानें होतीं व तीं कमीअधिक प्रमाणानें आस्ट्रियाच्या वर्चस्वाखालीं होतीं. त्यांच्यांतील परस्पर भेदभावामुळें एकंदर इटलियन लोकांत इतका विस्कळितपणा आला होता कीं, या सर्व संस्थानांची एकी होऊन इटली हें राष्ट्र युरोपांतील प्रमुख राष्ट्रांच्या मालिकेंत पुन्हां येऊन बसेल असें भविष्य कोणीं त्या वेळीं केलें असतें तर त्याची वेड्यांतच गणना झाली असती. पण आज ही गोष्ट खरोखरच घडून आली आहे. युरोपियन महायुद्धामध्यें इटली कोणत्या बाजूला मिळतो या प्रश्नाकडे सर्व जगाचें लक्ष पर्वापर्यंत एकसारखें वेधून राहिलें होतें, यावरूनच त्या राष्ट्राचें सामर्थ्य आतांपर्यंत किती वाढलें आहे व चालू युद्धांतील प्रत्येक पक्षाला इटलीच्या साहाय्याचें किती महत्त्व वाटत होतें हें ध्यानांत येईल.

२ इटलीचें पुनरुज्जीवन ही सकृद्दर्शनीं अशक्य गोष्ट ज्या इटलियन अग्रणींनीं घडवून आणून इतर युरोपियन राष्ट्रांतील मुत्सद्द्यांना तोंडांत बोटें घालण्यास लाविलें, त्यांपैकींच प्रस्तुत चरित्राचा नायक काव्हूर हा होय. माझिनी, ग्यारिबाल्डी वगैरे थोर माणसेंहि या कामीं उपयोगी पडलींच; पण राजकारण—मुत्सद्देगिरी—या दृष्टीनें काव्हूरचें चरित्र विशेष महत्त्वाचें आहे. हें चरित्र लिहितांना अर्थातच इटलीचा अर्वाचीन काळचा इतिहास सांगणें जरूर होतें व त्याप्रमाणें प्रसंगोपात्त त्या राष्ट्राची जरूर तेवढी माहिती प्रस्तुत पुस्तकांत गोवण्यांत आली आहे.

३ "जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति" अशी तुकाराम महाराजांची उक्ति आहे. मोठमोठे मुत्सद्दी हे राजकीय दृष्टीनें लहान प्रमाणा-

वरील संतच होत. त्यांचा देह राष्ट्राचें राजकीय हित साधण्यांत खर्ची पडत असतो. महाराष्ट्राच्या इतिहासांत संतांनीं मोठी कामगिरी केली आहे, त्यांत श्रीसमर्थ रामदास यांची कामगिरी विशेषच आहे. समर्थांच्या मानानें काव्हूरचा दर्जा बराच खालीं लागेल यांत संशय नाहीं. तथापि काव्हूरनें सर्व संसारपाशापासून आजन्म मोकळें राहून राष्ट्राकरितां तन-मनधन अर्पण केलें व सर्व राष्ट्राचें मोठ्या मुत्सद्देगिरीनें एकीकरण केलें या गोष्टीकडे नजर देऊनच त्यास आम्हीं समर्थांची उपमा दिली आहे.

४ तरुणपिढीमध्यें राष्ट्रीय गुणांचा परिपोष होण्यास इतिहासाच्या वाचनासारखें दुसरें उत्तम साधन नाहीं. सनतारखांची नुसती जंत्री ही केव्हांहि कंटाळवाणीच व्हावयाची. संगतवार इतिहास व तोहि मनोरंजक व बोधपर होईल अशा रीतीनें लिहिणें हें काम कठिणच असतें. अशा पुस्तकांच्या अभावीं निरनिराळ्या राष्ट्रांतील थोर पुरुषांचीं चरित्रें मनोरंजन व स्फूर्ति या दोन्हींचा लाभ करून देण्यास उपयोगीं पडतात. हीं चरित्रें वाचून त्या त्या व्यक्तींचे वैयक्तिक व राष्ट्रीय गुण अंशत: तरी अंगीं आणण्याची महत्त्वाकांक्षा वाचकांनीं धरली तरच तीं वाचल्याचें खरें चीज होणार आहे. प्रस्तुत चरित्र-नायकामध्यें अलौकिक स्वार्थत्याग, उत्कट स्वदेशप्रीति, अंगीकृत कार्याबद्दल चिकाटी, सतत दीर्घोद्योग व राष्ट्रहितास्तव जरूर तें आत्मसंयमन इत्यादि अनेक गुण विलसत होते. त्या सर्व गुणांचें चित्र रा. रा. मुंडले यांनीं उत्तम रीतीनें काढलें आहे.※ कोणत्याहि एका पुस्तकाचें तें भाषांतर नाहीं.

---

※ इटलीप्रमाणेंच जर्मनींतील निरानराळीं संस्थानें एकत्र करून हल्लींचें प्रबळ जर्मन राष्ट्र बनविण्याचा मान प्रिन्स बिस्मार्क या असामान्य मुत्सद्द्याकडे आहे. सदर मुत्सद्द्याचें चित्तवेधक व मार्मिक चरित्र रा. रा. मुंडले यांचेकडून लिहवीत आहों व तें लवकरच आमच्या राष्ट्रीय शिक्षणमालेंत प्रसिद्ध होईल. रा. मुंडले यांची "जर्मन साम्राज्याचें अंतरंग" ही लेखमाला हल्लीं लोकशिक्षणामध्यें खंडश: प्रसिद्ध होत आहे. त्या लेखमालेंतील माहितीवरून व विवेचनपद्धतीवरून पुढील चरित्र कसें काय वठेल याची वाचकांना कल्पना करितां येईल.

निरनिराळीं पुस्तकें चाळून स्वतंत्र रीतीनें निवळ मराठी वाचकांकरितां आपण लिहीत आहों हें विशिष्ट धोरण लक्षांत ठेवून हें पुस्तक लिहिलेलें आहे हा यांत विशेष आहे व म्हणूनच आम्ही राष्ट्रीयशिक्षणमालेंत तें छापून प्रसिद्ध करीत आहों. ज्याप्रमाणें निरनिराळ्या विषयांचीं स्वभाषेंत व राष्ट्रीय धोरणावर लिहिलेलीं शाळांतून शिकविण्याजोगीं पुस्तकें आपल्याकडे व्हावयास पाहिजेत त्याचप्रमाणें सामान्य वाचनाला उपयोगीं पडतील अशीं वाङ्मयात्मक, ऐतिहासिक वगैरे अनेक राष्ट्रीयदृष्टीनें लिहिलेलीं पुस्तकेंहि झालीं पाहिजेत हें उघड आहे.

५ नकाशाशिवाय इतिहासाचें पुस्तक वाचणें हें अगदीं चुकीचें आहे व अशी चूक पुष्कळांच्या हातून अज्ञानतः घडत असते. अशानें वर्णिलेल्या गोष्टींचें यथार्थ ज्ञान होत नाहीं व इतिहासाचें मर्म मनावर ठसत नाहीं. इंग्रजीमध्यें निरनिराळ्या देशांचे नकाशे एकत्र देऊन शेवटीं गांवांची यादी अक्षांशरेखांशांसह दिलेली असते. मराठीमध्यें अशीं पुस्तकें अवश्य व्हावयास पाहिजेत तीं केव्हां होतील तेव्हां होवोत. तूर्त प्रस्तुत चरित्र वाचतांना उपयोगीं पडेल असा इटलीचा एक नकाशा मराठींत तयार करून जोडला आहे. आधारभूत इंग्रजी नकाशांत नसलेलीं पण प्रस्तुत पुस्तकांत उल्लेखिलेलीं गांवें त्यांच्या अक्षांशरेखांशांवरून ठरवून त्यांचाहि समावेश सदर नकाशांत केला आहे. पुरी माहिती न मिळाल्यानें कांहीं तुरळक स्थळें मात्र अंदाजानें भरावीं लागलीं. दोनचार स्थळें अगदीं क्षुल्लक असल्यामुळें त्यांची नक्की माहिती मिळूं शकली नाहीं.

६ प्रस्तुत पुस्तक तयार होऊन हातीं आल्यास बरेच दिवस झाले; पण मध्यंतरीं तळेगांवीं प्लेगची वावटळ येऊन गेली व तींत आम्हांस आधारभूत अशा तीन व्यक्ति प्लेगला बळी पडल्या. या संकटपरंपरेमुळें आमच्या इतर कामांप्रमाणें या कामाचाहि घोटाळा होऊन पुस्तकाच्या प्रकाशनास इतका विलंब लागला. पुस्तकाची मूळ प्रत वाचून भाषेच्या व इतर कांहीं सुधारणा सुचवून या कामीं मदत करणारे आमचे तेथील घरवाले व परम मित्र कै. श्रीनिवास नारायण ऊर्फ दत्तोपंत पाठक

हे त्या तीन व्यक्तींपैकीं एक होत. त्यांचे आभार मानण्यास त्यांना ईश्वरानें जिवंत ठेविलें नाहीं याबद्दल वाईट वाटतें. असो. प्रस्तुत पुस्तक साद्यंत बारकाईनें वाचून आमचे मित्र रा. रा. राजाराम दामोदर देसाई यांनीं ज्या अनेक सूचना केल्या त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. त्याचप्रमाणें येथील धि प्रिंटिंग एजन्सीचे व्यवस्थापकांनीं छपाईचे कामीं सर्व तसदी घेतली त्याबद्दल त्यांचेहि आभार आम्ही मोठ्या आनंदानें मानतों. या सर्वांहून प्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं छोटीच पण मार्मिक प्रस्तावना लिहून या चरित्रास शोभा आणली याबद्दल त्यांचे आभार मानणें अत्यंत अवश्य होय.

चातुर्मास्यारंभ आषाढ शु. ११ शके १८३७
लोकशिक्षणकार्यालय सदाशिव पेठ पुणें.

जं० वि० ओक.

# प्रस्तावना.


गेल्या दीडशें वर्षांत युनायटड् स्टेटस्, ग्रीस, जर्मनी, इटली, रुमेनिया, बल्गेरिया, जपान इत्यादि अनेक देशांतील लोकांनीं थोडें फार स्वातंत्र्य व स्वराज्य मिळविलें. ही मिळकत त्या त्या देशांतील बहुतेक अधिकतर लोकांच्या देशप्रीतीचें, समाजप्रीतीचें व स्वतःवरील प्रेमाचें फळ आहे. अधिकतर लोकांनीं आपल्या वैयक्तिक हितसंबंधावर थोडें फार पाणी सोडिलें नसतें, तर त्या त्या देशांतील स्वार्थत्यागी लोकांना मिळालेलें दिसतें तेवढेंहि स्वातंत्र्य व स्वराज्य खचित मिळालें नसतें. पण नुसत्या एकट्या स्वार्थत्यागानेंच स्वराज्याची व स्वातंत्र्याची उपलब्धि होते, अशी समजूत करून घेण्यांत हांशील नाहीं. स्वार्थत्यागाचा योग्य परामर्ष घेणारें कौशल्य जर देशांत निपजलें नाहीं, तर त्याग गाभटतो व जिवंत स्वातंत्र्याला प्रसवण्यास असमर्थ ठरतो. ईश्वराच्या कृपेनें व समाजाच्या पुण्याईनें त्या त्या देशांत योग्य वेळीं कर्मकुशल असे राजकारणधुरंधर खंदे पुरुष निर्माण झाले आणि लोकांच्या स्वार्थत्यागाला त्यांनीं स्वराज्याचें रूप आणिलें. असले जे थोडे पुरुष त्या त्या देशांत गेल्या दीडशें वर्षांत उदयास आले त्यांपैकींच प्रस्तुत चरित्राचा नायक **काव्हूर** होय.

मिळविलेलें स्वातंत्र्य व उभारलेलें स्वराज्य चालविण्याचा एक धोपट मार्ग गेल्या दीडशें वर्षांत युरोपांत व अमेरिकेंत सररहा स्वीकारिलेला दिसतो. हा मार्ग म्हणजे प्रतिनिधिसत्ताक पद्धतीनें राज्य चालविणें. ह्याहून उच्चतर व फलप्रदतर मार्ग अद्याप युरोपीयन व अमेरिकन राष्ट्रांनीं अमलांत आणितां येण्यासारखे असून क्वचित् अमलांत आणिलेले दिसतात. वस्तुतः पहातां सत्ता तज्ज्ञ अशा निस्पृह कार्यकर्त्या लोकांच्या हातीं ठेविली, तर स्वातंत्र्य व सुराज्य ह्यांचा अवतार राष्ट्रांत उत्तमोत्तम तऱ्हेनें होईल. प्रतिनिधिसत्तेंत जसे लोक, तसे त्यांनीं निवडून दिलेले प्रतिनिधि असतात. लोक अज्ञ, दारूबाज, हक्कांची जाणीव नसणारे व अशास्त्रज्ञ असले, तर त्यांनीं निवडलेले प्रतिनिधि तज्ज्ञ,

सद्गुणी व शास्त्रज्ञ असूं शकणें प्राय: असंभवनीय असतें. अशी स्थिति असल्यामुळें, युरोपीयन व अमेरिकन राज्यसत्ता व्हाव्या तितक्या कार्यक्षम व प्रगामी झालेल्या दिसत नाहींत. सर्वाधिकारी राज्ययंत्रासुद्धां सर्व खातीं जर तज्ज्ञांच्या हातीं जातील व खात्यांतील थोरापासून लहानापर्यंत सर्व लोक जर आपापल्या कामांत आपापल्या पुरते तज्ज्ञ असतील, तर राष्ट्रांत जें एक अलौकिक सामर्थ्य उद्भूत होतें तें सामर्थ्य युरोपांत एकाद्या देशांत थोडें बहुत दिसूं लागलें असेल नसेल. तात्पर्य, राजसत्ता, महाजनसत्ता, व्यापारीसत्ता, प्रतिनिधिसत्ता इत्यादि सर्व सत्तांहून तज्ज्ञसत्ता ही श्रेष्ठतर आहे व ही उत्पन्न करण्याकडे जो मुत्सद्दी आपली करामत खर्चितो त्याला उत्तम राष्ट्रकार्यधुरंधर म्हणतां येईल. काव्हूरनें इटलींतील तुटक भाग एकत्र केले ही तर मोठी कामगिरी खरीच. पण प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति इटलींत प्रचलित करण्यांत इतर सामान्य राष्ट्रांचेंच अनुकरण करण्यास आपल्या राष्ट्रास त्यानें लावलें, यांत मोठा अजब पुरुषार्थ होता, असें उपरिष्ट दृष्ट्या पहातां म्हणवत नाहीं. तत्रापि इटलीचे पंचवीस तुकडे एकत्र करण्यांत ह्या मुत्सद्द्याची चतुराई दिसून येते, ही बाब कांहीं लहानसहान नव्हे. आणि ह्या एकाच बाबीकरितां सुद्धां काहूरचें चरित्र मनन करण्यासारखें आहे.

राजश्री मुंडले यांनीं तरी प्रस्तुत चरित्र ह्या एका बाबीवरच नजर देऊन लिहिलेलें आढळेल. कित्येक इंग्रजी पुस्तकांचा आधार घेऊन स्वतंत्रपणें चरित्र लिहिलेलें आहे. अलीकडे बऱ्याच इंग्रजी पुस्तकांची गचाळ भाषांतरें झालेलीं पहाण्यांत येतात; तशांतला हा छोटेखानी ग्रंथ नाहीं. इटलींत स्वत: प्रवास करून, ग्रंथकार जर ग्रंथ लिहिते, तर ग्रंथाला निराळेंच रूप आलें असतें, हें सांगणें नको. तत्रापि स्वदेशांतील राजकीय प्रश्नांचा अभ्यास करण्याचा संवय रा. मुंडले यांना फार वर्षांपासूनची असल्यामुळें, सामान्यत: इटालियन राष्ट्राचें हृद्गत व विशेषत: काव्हूरचें मनोगत त्यांच्या लिहिण्यांत प्रतिबिंबित झालें आहे, असें दिसतें.

वि० का० राजवाडे.



इटली
१८७४
इंग्लिश मैल
० २० ४० ६० ८० १०० १२०
व्हेनिस
वेनिसचें आखात
पादुआ
व्हेरोना
विसेंझा
फेरेरा
मोडेना
बोलोग्ना
रावेना
पिसा
फ्लॉरेन्स
आरेझो
सिना
अनकोना
पेरुगिया
अस्कोली
ट्रेन्टो
आर्बेटेलो
व्हिटर्बो
सिवीटा व्हिक्षिया
रोम
टेरासिना
गेटा
गेटाचें आखात
कॅप्यूआ
नेपल्स
बेनीव्हेंटो
ॲव्हेलिनो
नेपल्सचें आ०
सालेर्नो
सालेर्नोचें आ०
पोटेंझा
ब्रिंडिसी
टारेन्टो
ओट्रान्टो
टारेन्टोचें आखात
गॅलिपोली
आरवात
के. डी ल्यूका
कोसेंझो
४४
४२
४०

[library stamps, illegible]

# काव्हूर
## ऊर्फ
# इटलीचा रामदास

## प्रकरण १ लें

### परिस्थिति

काव्हूरचें चरित्र म्हणजे १९ व्या शतकांतील इटलीच्या पुनरुज्जीवनाचा इतिहासच होय. अर्थात् ह्या चरित्राचें अनुसंधान नीट लक्षांत येण्याकरितां त्या देशाच्या पूर्वापार स्थितीसंबंधानें प्रथम थोडीशी माहिती देणें जरूर आहे. इटली हा देश युरोपखंडाच्या दक्षिणेस असून त्याचा आकार बुटाच्या तळव्याप्रमाणें आहे. ह्या देशाची संस्कृति सुमारें दोन हजार वर्षांपूर्वींची जुनी असून रोमन साम्राज्याच्या वेळीं तो वैभवाच्या शिखरास जाऊन पोंचलेला होता. परंतु कालवशात् रोमन साम्राज्य लयास गेल्यावर ह्या देशाची दुर्दशा होऊन तो अनेक निरनिराळ्या परकीय राजसत्तांखालीं वांकून गेला. रोमन साम्राज्याचा नाश झाल्यानंतर ह्या देशावर परकीयांचे हल्ले येऊन त्याचे तुकडे पडत चालले. इ० स० ५६८ च्या सुमारास लांबार्ड्स् लोकांनीं त्याचा उत्तरभाग पादाक्रांत केला व त्याच्या दक्षिणभागांत अनेक लहानलहान स्वतंत्र राज्यें स्थापन झालीं. त्यानंतर १६ व्या शतकांत स्पॅनिश लोकांनीं हा देश आपल्या साम्राज्यसत्तेखालीं आणिला व पुढें १८ व्या शतकांत स्पेनचें साम्राज्य मोडकळीस आल्यावर ऑस्ट्रियानें त्यावर झडप घातली. परंतु ऑस्ट्रियानें हा सर्व देश आपल्या राज्यास जोडिला

नाहीं. त्यानें फक्त त्याच्या उत्तरेकडील एक परगणा (लांबर्डी) आपणाकडे ठेवून बाकीच्या प्रांतांतील अधिकाऱ्यांवर आपलें राजकीय वर्चस्व प्रस्थापित केलें. लांबर्डीखेरीज इतर प्रदेशांत ह्या वेळीं आठ मुख्य छोटीं संस्थानें होतीं. पैकीं **नेपल्स** व **सिसिली** हीं दोन सुमारें ६० लक्ष लोकसंख्येचीं संस्थानें **बोरबोन** राजघराण्याच्या सत्तेखालीं होतीं. **सार्डिनिया** ऊर्फ **पीडमॉन्टचें** राज्य (लोकसंख्या ३५ लक्ष) **सॅव्हायच्या** राजघराण्याकडे होतें. ह्या दोन्ही घराण्यांची सत्ता सर्वस्वीं एकतंत्री होती. सरदार व धर्मगुरु हेच काय ते त्यांच्या सत्तेचे आधारस्तंभ होते. सामान्य जनता त्यांच्या खिसगणतींतहि नसे! देशाच्या मध्यभागीं **पोपचीं** छोटीं छोटीं संस्थानें असून त्यांचा सर्व कारभार **पोप** व त्याचे हस्तक यांचेकडून चालत असे. **व्हेनिस** व **जिनोआ** हीं बड्या लोकांचीं स्वसत्तात्मक राज्यें होतीं. **टस्कनी**, **पार्मा** व **मोडेना** ह्या तीन छोट्या जहागिरी होत्या. यांखेरीज दोन अगदीं लहान लोकसत्ताक राज्यें व तीन अगदीं छोट्या जहागिरी होत्या. फ्रान्सची राज्यक्रांति (सन १७८९) होण्यापूर्वीं इटलीचे इतके तुकडे झालेले होते!

वरील सर्व संस्थानें एकमेकांपासून अलग असून त्यांच्यामध्यें परस्पर मत्सर व कलह वारंवार उपस्थित होत असत. ह्या सर्व ठिकाणची देशस्थिति व राहणी परस्परांहून कांहींशी भिन्न असल्यामुळें त्यांच्यांत एकोपा होण्याचा संभव कमी असे. धर्म व भाषा हीं दोन बरींच महत्त्वाचीं अशीं एकोप्याचीं साधनें त्यांच्या मध्यें अस्तित्वांत होतीं; परंतु त्या वेळीं दळणवळणाचे मार्ग हल्लींइतके सुकर नसल्यामुळें एका संस्थानांतील लोकांचा दुसऱ्या संस्थानांतील लोकांशीं फारसा संबंध येत नसे. अर्थात् वरील साधनांचा कांहीं विशेष उपयोग होऊं शकत नसे. प्रत्येक संस्थानांतील सामान्य जनता अगदीं अज्ञानावस्थेंत असे. अर्थात् तिला आपलें संस्थान हेंच काय तें सारें जग आहे असें वाटे. वरिष्ठ प्रतीचे जे लोक—सरदार व धर्मगुरु—त्यांना अनेक राजकीय सवलती व यथास्थित मानपान असल्यामुळें ते आपल्याच तोऱ्यांत राहून ऐषआरामांत चूर असत. राजेलोकहि परस्परांविषयीं उदासीन—किंबहुना मत्सरग्रस्त—असत.

अशा स्थितींत ऐक्याची भावना ह्या देशांत कशी रुजावी? १६ व्या शतकांत मॅकव्हेली यानें आपल्या ग्रंथांतून ह्या भावनेचें दिग्दर्शन केलें होतें; परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. त्याच्यानंतर झालेल्या कित्येक कवींनीं व ग्रंथकारांनीं ह्या भावनेचा आपल्या ग्रंथांतून उडत उडत उल्लेख केलेला आहे; परंतु पुष्कळ दिवसांची जुनी पद्धति मोडणें त्यांस अशक्य वाटत असल्यामुळें त्यांनीं त्यासंबंधानें विशेष विचार केलेला नाहीं. तथापि १८ व्या शतकांत व्हिटोरियो आलफेरी (सन १७४९–१८०३) नामक जो एक प्रतिभासंपन्न कवि होऊन गेला त्यानें मात्र आपल्या काव्यांतून भावी इटली राष्ट्राचें उज्ज्वल स्वरूप रेखाटलें. त्याचा तत्कालीन सुशिक्षित समाजावर (असे लोक त्या वेळीं अगदीं थोडे होते.) योग्य परिणाम घडून त्याच्या ठिकाणीं एक प्रकारची जागृति व तेजस्विता उत्पन्न झाली. ह्याच सुमारास इटलीच्या उत्तरभागांत व टस्कनींत व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ होऊन सधन असा एक मध्यम वर्ग तेथें तयार झाला होता. ह्या लोकांत द्रव्याच्या वाढीबरोबर शिक्षणाचीहि वाढ होत चालली होती. संपत्ति व शिक्षण यांच्या लाभामुळें त्यांचा सरदारलोकांशीं अनेक बाबतींत संबंध येऊं लागला होता व त्यांना सरदार वर्गाच्या अंगचे गुणदोष कळूं लागले होते, याच वेळीं सामाजिक, राजकीय व धार्मिक बाबतींत समतेचें समर्थन करणारीं मतें कांहीं प्रख्यात फ्रेंच ग्रंथकार प्रतिपादूं लागले होते. त्यांचाहि ह्या नवीन मध्यम वर्गावर परिणाम होऊं लागला होता. ह्या मतांचें पुरस्करण करणारा जोसेफ पारिनी (सन १७२९–१७९९) नामक एक मिलानमधील कवि ह्या सुमारास होऊन गेला. त्याच्या काव्यांनीं वरील मध्यम वर्गांत–विशेषतः मिलान व नेपल्स येथील लोकांत–चालू स्थितीबद्दल असंतोष उत्पन्न करून ती बदलून टाकणाऱ्या आकांक्षा व भावना उत्पन्न केल्या. इटलीच्या दक्षिणभागांत अद्याप वरील प्रकारचा मध्यम वर्ग उत्पन्न झालेला नसल्यामुळें तेथें मात्र वरील प्रकारच्या आकांक्षा व भावना यांचा उदय होऊं शकला नाहीं. तेथें फक्त सरदार व पाद्री लोकांचा एक वरिष्ठ वर्ग व दुसरा सामान्य

जनतेचा कंगाल वर्ग असे दोनच वर्ग असून दुसरा वर्ग पहिल्या वर्गावर सर्वस्वीं अवलंबून होता; अर्थात् तो त्याचा दास बनलेला होता. ह्या प्रदेशांत उद्योगधंद्याची वाढहि (उत्तरेकडील प्रदेशाप्रमाणें) फारशी झालेली नसल्यामुळें तेथें स्वास्थ्यसंपन्न असा मध्यम वर्ग अद्याप निर्माण झालेला नव्हता व त्यामुळें शिक्षणाचा प्रसारहि तेथील सामान्य जनतेंत फारसा होऊं शकला नाहीं. त्यांचें दारिद्र्य व अज्ञान हीं त्यांच्या उन्नतीच्या मार्गांत आडवीं येऊन त्यांना अधिकाधिक हीनावस्थेस नेऊन पोंचवीत होतीं. याप्रमाणें दक्षिण **इटलीची** स्थिति होती. परंतु उत्तरेकडील भागाची स्थिति वर सांगितल्याप्रमाणें याच्या अगदीं उलट होती. तेथील लोक आपली स्थिति बदलून टाकण्यास उत्सुक झालेले होते. इतक्यांत फ्रेंच राज्यक्रांति सुरू होऊन फ्रान्सच्या वतीनें पहिल्या **नेपोलियननें** इटलीवर स्वारी केली. ह्या संधीचा फायदा घेऊन उत्तरेकडील कांहीं संस्थानांतल्या लोकांनीं **नेपोलियनच्या** साहाय्यानें लोकसत्ताक राज्यें स्थापन केलीं. पुढें कांहीं दिवसांनीं बहुतेक सर्व **इटली** देश **नेपोलियनच्या** ताब्यांत येऊन तेथें कमजास्त प्रमाणानें लोकसत्ताक राज्यपद्धति अंमलांत येऊं लागली. **नेपोलियननें** ह्या देशांत फ्रेंच अधिसत्तेखालीं निरनिराळीं मांडलिक राज्यें निर्माण केलीं होतीं; व **फ्रान्सांत** असलेल्या ज्या राज्यकारभाराच्या संस्था ( institutions ) त्यांचेंहि त्यानें तेथें बीजारोपण केलें होतें. त्यायोगानें तेथील लोकांस राज्यकारभाराचें शिक्षण मिळत गेलें व त्याचा पुढें त्यांना फार चांगला उपयोग झाला. **नेपोलियनच्या** युद्धाचें सत्र इ० स० १८१४–१५ त संपलें. त्या वेळीं युरोपांतील प्रमुख राष्ट्रांच्या संमतीनें जी **इटलीची पुनर्घटना** झाली तींत **सार्डिनिया** ऊर्फ **पीडमॉन्टचें** राज्य पुनः **सॅव्हाय** राजघराण्यांतील राजपुत्रास मिळालें. याच राज्यांत पूर्वींचें **जिनोआ** येथील लोकसत्ताक राज्यहि सामील करण्यांत आलें. **ऑस्ट्रियानें लांबर्डी** व **व्हेनिशिया** हे प्रांत आपल्या राज्यास जोडिले व **इटलीच्या** इतर प्रदेशांत जीं निरनिराळीं राज्यें ह्या वेळीं स्थापन झालीं त्यांपैकीं **पोपचीं** संस्थानें सोडून इतर ठिकाणीं **आस्ट्रियांतील** राजघरा-

ण्याचे आतइष्टच गादीवर बसविण्यांत आले. अर्थात् **पीडमॉन्ट**खेरीज इतर बहुतेक सर्व प्रदेशावर **ऑस्ट्रियाचें** वर्चस्व स्थापन झालें. **पीडमॉन्ट** हें मात्र त्याच्या संसर्गापासून अलिप्त होतें. परंतु त्याचा राजा जो **व्हिक्टर इमॅन्युअल दि फर्स्ट** हा वृद्ध व एकतंत्री राज्यपद्धतीचा भोक्ता असल्यामुळें, फ्रेंच लोकांच्या संसर्गानें लोकसत्ताक राज्यपद्धतीची आवड उत्पन्न झालेल्या त्याच्या प्रजेला तो अप्रिय होऊन बसला. तथापि त्याला पोरवाळ नसल्यामुळें आणि त्याच्या भावाचा तरुण व उदार राज्यपद्धतीचा चहाता असलेला **चार्लस आल्बर्ट** नांवाचा मुलगा लवकरच गादीवर येण्याचा संभव दिसत असल्यामुळें, लोकांनीं **व्हिक्टर इमॅन्युअल** यास फारसा त्रास दिला नाहीं. पण इ० स० १८२०–२१च्या दरम्यान **इटलींतील** बहुतेक संस्थानांत लष्करी सत्ताधारी लोकांनीं बंडं व क्रांत्या सुरू केल्या. तेव्हां **पीडमॉन्टच्या** राज्यासहि त्यांचा थोडाबहुत स्पर्श झाल्याकारणानें **व्हिक्टर इमॅन्युअल दि फर्स्ट** यानें गादीस कंटाळून राजीनामा दिला. त्यानें आपला भाऊ **चार्लस फेलिक्स** यास गादीचा वारस व अधिकारी नेमिलें. तो या वेळीं **मोडेना** येथें असल्यामुळें त्यानें आपल्या वतीनें **चार्लस आल्बर्ट** यास तात्पुरती मुखत्यारी दिली. **चार्लस आल्बर्टचीं** मतें सुधारणावादी लोकांशीं जुळणारीं असल्याकारणानें त्याला अधिकार मिळतांच त्यानें **स्पेनच्या** शासनपद्धतीच्या धोरणावर तयार केलेली शासनपत्रिका (Constitution) जाहीर केली. परंतु त्याचें हें कृत्य **चार्लस फेलिक्स** यास बिलकूल आवडलें नाहीं. सबब **मोडेना** येथून त्यानें ती शासनपत्रिका रद्द केली व पुढें तो स्वतः जेव्हां **ट्यूरिन** येथें आला तेव्हां त्यानें **चार्लस आल्बर्ट** याचा निषेध करून त्यास तेथून निघून जाण्यास सांगितलें. त्या वेळीं पुरोगामी (सुधारणावादी) पक्षाच्या लोकांनीं त्याचें रक्षण करून त्यास पाठिंबा देण्याचा बेत केला; पण **ऑस्ट्रियन** सैन्याच्या मदतीनें **फेलिक्स** हा आपलें व आपल्या देशाचें कायमचें नुकसान करण्यास कमी करणार नाहीं असें वाटून त्यानें मुकाट्यानें तेथून पळ काढला. तो गुप्त रीतीनें तेथून निघून गेल्यावर

पुरोगामी व अनियंत्रित सत्तावादी यांच्यांत रणें माजलीं व त्यांत पुरोगाम्यांचा पूर्ण पराभव झाल्यामुळें त्यांच्या पुढाऱ्यास प्राणरक्षणाकरितां देशोधडीस जावें लागलें! इटलीच्या इतर प्रांतांतील लष्करी लोकांनीं केलेलीं बंडेंहि ऑस्ट्रियाच्या मदतीनें मोडण्यांत येऊन जिकडे तिकडे फिरून अनियंत्रित राज्यकारभार सुरू झाला. याप्रमाणें अधिकारी व लष्करी लोक यांच्यांतील पुरोगाम्यांचे राजकीय सुधारणेविषयीं प्रयत्न जरी विफल झाले तरी त्या सुधारणेच्या कल्पनांचें बीज कांहीं नष्ट झालें नाहीं. फ्रेंच लोकांच्या संसर्गानें लोकस्वातंत्र्याच्या ज्या कल्पना इटलींत एकदां प्रचलित झाल्या त्यांचीं मुळें फार खोल गेलेलीं असल्यामुळें त्यांचें तेथून कायमचें उच्चाटन होणें अशक्य होतें. ह्या कल्पना तेथील सुशिक्षित समाजांत सारख्या प्रसार पावत चालल्या होत्या, व लेखनस्वातंत्र्य आणि मतस्वातंत्र्य यांचा जरी अत्यंत संकोच झालेला होता तरी तशा विपरीत परिस्थितींतहि त्यांची जोपासना चालूच होती. नेपोलियनच्या काळची पिढी जाऊन नवीन पिढी नुकतीच उदयास येत होती. ह्या पिढीनें नेपोलियननें व ऑस्ट्रियानें आपल्या देशाचा केलेला खेळखंडोबा पाहिलेला होता व तिच्या मनांत त्याबद्दल हळहळ वाटत होती. आपली विपन्न स्थिति कशी दूर करावी याबद्दलची विवंचनाहि नव्या पिढीच्या मनांत चालू होती. पण सन १८२०–२१ सालांतील लष्करी पुरोगामी पक्षाचे क्रांतिकारक प्रयत्न विफल झाल्यानंतर इटलींतील बहुतेक संस्थानांतील राज्यकारभार अत्यंत प्रतिगामी धोरणाचा बनत गेल्यामुळें या लोकांस उघडपणें राजकीय सुधारणेची चळवळ करितां येईना. म्हणून त्यांनीं गुप्तमंडळें स्थापून क्रांतिकारक विचारांचा देशांत फैलाव करण्याचा प्रयत्न सुरू केला. ह्या गुप्त चळवळवाल्यांचा मुख्य अग्रणी माझिनी हा होय. माझिनीचे प्रयत्न व त्यांचें पर्यवसान यांबद्दल येथें उद्घाटन करण्याचें प्रयोजन नाहीं. एकटें पीडमॉन्टचें राज्य काय तें राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होतें. बाकीचीं बहुतेक राज्यें परस्परांविषयीं मत्सरग्रस्त असून ऑस्ट्रियाचीं अंकित झालेलीं होतीं. पोपचीं संस्थानें बरींचशीं स्वतंत्र होतीं; पण पोपहि अनियंत्रितसत्तावादी

असल्यामुळें पुरोगाम्यांचें व त्याचें सूत कधींहि जमण्याचा संभव नव्हता. पीडमॉन्टवरहि ऑस्ट्रियाचा डोळा होताच. परंतु तें संस्थान फ्रेंच सरहद्दीला अगदीं लागून (Buffer State) असल्यामुळें फ्रेंच सरकारची इतराजी टाळण्याकरितां त्यानें तें स्वतंत्र राहूं दिलें. या संस्थानाची राज्यपद्धति जरी एकसूत्री होती तरी ती अगदीं असह्य नव्हती. तेथें प्रातिनिधिक राज्यसंस्था स्थापन झालेली होती; आणि एखादा उदार मनाचा व विवेकशील असा राजा तेथील गादीवर आल्यास त्या बाबतींत अधिक सुधारणा होण्याचा संभव होता. ह्या परिस्थितीचें नीट रीतीनें परिशीलन करून प्रथम पीडमॉन्टची व नंतर सर्व इटलीची राजकीय सुधारणा करण्याचे व तेथें पीडमॉन्टच्या राजघराण्यांतील राजपुरुषाचें एकछत्री राज्य स्थापन करण्याचे यशस्वी प्रयत्न ज्यांनीं केले त्यांत काव्हूरला श्रेष्ठ पद देणें जरूर आहे. या सर्व प्रयत्नांचा सूत्रचालक अथवा नियामक तोच होता. मुख्यत्वेंकरून त्याच्या मुत्सद्दीपणामुळेंच ही सामान्यतः अशक्य असलेली गोष्ट शक्य झाली. ती कशी हें पुढें येणाऱ्या त्याच्या चरित्रकथेवरून वाचकांस कळून येईलच. काव्हूरचे प्रयत्न यशस्वी होण्यास पीडमॉन्टचा राजा व्हिक्टर इमॅन्युअल दि सेकंड व जनरल गॅरिबाल्डी यांचेंहि अतोनात साहाय्य झालेलें आहे. अर्थात् या दोघांचाहि एतद्विषयक वृत्तान्त सदर चरित्रांत येणार आहे. ह्या त्रयीनें सुमारें १५ वर्षांच्या आंत इटलीचें नष्ट झालेलें स्वातंत्र्य परत मिळवून तेथील लहानलहान राज्यांचा पीडमॉन्टशीं एकजीव करण्याचें काम इतक्या आश्चर्यकारक रीतीनें वजाविलें कीं, त्याला जगाच्या इतिहासांत दुसरा तोड क्वचितच सांपडेल! यामुळें काव्हूरच्या चरित्रास एक प्रकारची अपूर्वता प्राप्त झालेली आहे. मुत्सद्दी पुरुष एका काडीच्या आश्रयावर आपल्या बुद्धिबलाच्या योगेंकरून केवढी भव्य व भक्कम इमारत उभारूं शकतो हें ह्या चरित्राच्या अभ्यासानें जिज्ञासूंच्या चांगलें लक्षांत येणार आहे.

# प्रकरण २ रें

## कुलवृत्तान्त व बाल्यदशा

काव्हूरचा जन्म इ० स० १८१० च्या आगष्ट महिन्याच्या १० व्या तारखेस ट्यूरिन येथील स्वत:च्या घराण्याच्या राजवाड्यांत झाला. त्याचें घराणें पूर्वापारपासून प्रसिद्ध असून त्यांतील अनेक पुरुषांनीं आपल्या देशाची लष्करी सेवा करून नांवलौकिक संपादिलेला होता. ह्या सेवेबद्दल त्याच्या एका पूर्वजास तत्कालीन पीडमॉन्टच्या राजानें 'मार्किस आफ काव्हूर' हा किताब अर्पण केला होता; आणि तेव्हांपासून त्याच्या घराण्याचा उल्लेख 'काव्हूर' या आडनांवानें होऊं लागला. तत्पूर्वी ह्या घराण्याचा उल्लेख 'बेन्सो' ह्या नांवानें होत असे. काव्हूर जन्मला तेव्हां त्याच्या कुटुंबांत—नातेवाईक व आप्त मिळून—निरनिराळ्या स्वभावाचीं पुष्कळ माणसें होतीं. त्या सर्वांमध्यें एकोपा राखण्याचें व त्यांची बरदास्त ठेवण्याचें दुर्घट काम त्याच्या आजीकडे होतें. ही बाई फार धूर्त, सुशील, शहाणी व कर्तृत्ववान् होती. एवढें मोठें कुटुंब गुण्यागोविंदानें चालवून दाखविण्याचें अवघड काम ती सहज करीत असे. हें घराणें मूळचें चांगलें श्रीमान होतें; परंतु पहिल्या नेपोलियननें इटलीवर जे वारंवार हल्ले केले त्यांमुळें तें थोडेंसें खालावलें होतें. ह्या घराण्यांतील संपत्ति व माणसें नेपोलियनच्या लष्करी जुलमास बळी पडलेलीं होतीं. अखेरीस वरील हुशार बाईस नेपोलियनच्या बहिणीची 'दासी' होणें भाग पडलें. तिच्याबरोबर ती नेपोलियनच्या दुसऱ्या लग्नाच्या वेळीं पॅरिसला गेली होती. त्या ठिकाणीं तिनें एका फ्रेंच शिक्षकापासून अध्यापनाचें काम शिकून घेतलें. हेतु हा कीं, याचा पुढें आपल्या नातवांना शिक्षण देण्याच्या कामीं चांगला उपयोग व्हावा. काव्हूरच्या

बापाचें नांव मार्किस मायकेल बेन्सो असें होतें. व खुद्द त्याचें स्वतःचें नांव कॅमिली असें होतें. त्याला फक्त एक वडील भाऊ होता. त्याचें नांव गस्टाव्ह असें होतें. त्याच्या आईचें नांव एडेल असें होतें. तिचा बाप जिनीव्हा येथील काऊंट (सरदार) होता. त्याला तीन मुली असून त्या तिन्ही आपल्या यजमानांसह ट्यूरिन येथील 'पालाट्सो काव्हूर' (Palazzo Cavour) नामक राजवाड्यांत रहात होत्या. प्रस्तुत चरित्राचा नायक जो कॅमिली काव्हूर त्याचा जन्म याच वाड्यांत झाला. या वाड्यांत काव्हूरच्या बरोबरीचीं बरींच मुलें होतीं. तीं सर्व सरदारी थाटानें वागत; पण कॅमिलीची वागणूक मात्र पुष्कळ साधी असे. तसेंच त्याचें मनहि उदार होतें. सरदारांचा व श्रीमंत लोकांचा ताठा, उमटपणा व एककल्लीपणा त्याच्या ठिकाणीं नव्हता. त्याचा स्वभाव गोड होता; पण कधीं कधीं त्याला रागाचे झटके येत असत. त्याला अभ्यासाची फारशी गोडी नव्हती. तथापि त्याची बुद्धिमत्ता व निर्णयशक्ति हीं अल्प-वयांतच विकास पावलीं होतीं. धूर्तपणा हा जो मुत्सद्दयाच्या अंगचा मुख्य गुण तो याच्यामध्यें अगदीं बाल्यावस्थेपासून वसत होता असें दिसतें. तो सहा वर्षांचा असतांना त्यानें आपल्या खेळगड्यांपैकीं एका मुलीस लिहिलेलें एक पत्र अस्तित्वांत आहे. ती मुलगी याला सोडून गेली होती. तेव्हां तिनें पुनः आपल्या सहवासांत यावें म्हणून तो तिला या पत्रांत लिहितो:– 'तूं जरी मला टाकून गेलीस तरी तुजवर असलेलें माझें प्रेम तसेंच कायम आहे. परंतु अलीकडे एका फारच सुंदर मुलीची व माझी ओळख झाली असून तिनें मला आपल्या सोनेरी बग्गींतून दोन वेळ फिरावयास नेलें होतें.' ह्या छोट्या मुलाचा हा व्यवहारज्ञपणा पाहून कोणास गम्मत वाटणार नाहीं? ह्याच काळची त्याच्या धारिष्टाचीहि एक गोष्ट सांगण्यांत येते, ती अशी:–काव्हूरच्या कुटुंबांतील मंडळी दरवर्षी आपल्या आजोळीं जिनीवा (स्वित्सलंड) येथें जात असत. एकदां ही मंडळी त्याच्या आज्याचा एक मित्र व नातेवाईक द ला रिव्हे याच्या गांवास घोड्यांच्या गाडींतून गेली. तीं घोडीं चांगलींशीं नव्हतीं त्यामुळें वाटेंत मंडळींना थोडीशी अडचण सोसावी लागली. तेव्हां या

आमच्या छोट्या काव्हूरची मर्जी बिघडली. मुक्कामास येतांच स्वारीनें मोठ्या झोंकानें द ला रिव्हे यांच्याशीं हस्तांदोलन करून त्यास सांगितलें कीं, 'पोष्टमास्तरानें आम्हांला खराब घोडे देऊन आमचा उपमर्द केला; सबब त्याला कामावरून बडतर्फ केलेंच पाहिजे.' यावर द ला रिव्हे म्हणाले 'ती गोष्ट माझ्या हातची नाहीं. ती सर्वस्वीं ग्रामाधिकाऱ्यावर (सिंडिकवर) अवलंबून आहे.' हें ऐकतांच कॅमिली म्हणाला 'ठीक आहे. माझी व सिंडिकची भेट करून द्या.' यावर 'उद्यां' असें त्यास उत्तर मिळालें. थोड्या वेळानें मि० रिव्हे यांनीं तेथील सिंडिक (हा त्यांचा मित्र होता) यास पत्र लिहून 'उद्यां एक छोटेखानी मजेदार पाहुणा आपल्याकडे मी पाठविणार आहें' असें कळविलें. त्याप्रमाणें कॅमिलीची स्वारी डुलत डुलत दुसरे दिवशीं सिंडिकच्या भेटीस गेली. सिंडिकनें त्याचें चांगलें आगतस्वागत केलें; परंतु त्यानें केलेल्या बहुमानानें न गोंधळतां स्वारीनें आपली तक्रार शांतपणें व खुलासेवार त्याच्यापुढें मांडली व सदहू पोष्टमास्तरास बडतर्फ करण्याचें आश्वासन मिळवून स्वारी मोठ्या आनंदानें येऊन द ला रिव्हे यास म्हणाली कीं, 'बस्स; तो बडतर्फ होणार!'

पीडमॉन्टची राज्यपद्धति अनियंत्रित असून त्या राज्यांत सरदार ऊर्फ बडे लोक यांचें बरेंच महत्त्व होतें. तेथील राज्यकारभारांतहि त्यांचेंच विशेष वर्चस्व होतें व तें कांहीं अंशीं योग्यहि होतें. कारण, त्या राज्याची इभ्रत व स्वातंत्र्य यांच्या रक्षणाकरितां त्यांनीं आपलें द्रव्य व रक्त अतोनात खर्च केलेलें होतें; अर्थात् त्यांतील बहुतेक सत्ता व अधिकार हीं आपल्या हातीं असावींत अशी त्यांची साहजिकच आकांक्षा होती. सामान्य लोकांना ह्या अधिकाराचे अगर सत्तेचे अंशभागी करण्यास ते नाखुष होते. 'राजा व आपण हेच काय ते देशाचे धनी' अशी त्या सरदारांची भावना होती. प्रातिनिधिक राज्यपद्धति त्यांना कांहींशी मान्य होती; परंतु हें तत्त्व सामान्य लोकांपर्यंत नेऊन पोंचविण्यास ते तयार नव्हते. तथापि फ्रेंच राज्यक्रांतीनंतर सर्व युरोपखंडांत स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या भावनांचा सामान्य जनतेंत

उदय होत गेला आणि फ्रेंच लोकांच्या संसर्गानें इटलीमध्यें तर त्यांचें वरेंच प्रावल्य वाढत गेलें. त्यामुळें सरदार व सामान्य लोक यांच्यामध्यें तूर्त शाब्दिक द्वंद्व सुरू झालें होतें. युरोपांतील बहुतेक देशांत आतां लोकमत अनियंत्रित (despotic) राज्यपद्धतीस प्रतिकूल व नियंत्रित किंवा प्रातिनिधिक (Limited Monarchy or representative Government) राज्यपद्धतीस अनुकूल होत चाललें होतें; स्वित्सर्लंडांत तर पूर्ण लोकसत्तावाद्यांचाहि एक पक्ष तेथील वरिष्ठ वर्गांत उत्पन्न झालेला होता.

काव्हूर हा आपल्या आजोळीं वारंवार जात असे; तेव्हां या सर्व लोकांचीं संभाषणें मुकाट्यानें ऐकण्याचा त्यास हमेष प्रसंग येई. त्या भाषणांचा त्याच्या कोंवळ्या मनावर परिणाम होऊन लहानपणापासूनच त्याची विचारसरणी उदार व उदात्त स्वरूपाची बनत चालली. त्याच्या कुटुंबांतील इतर लोकांची (मुलांची सुद्धां) विचारसरणी वर सांगितलेल्या सरदार लोकांच्या विचारसरणीप्रमाणें असल्यामुळें तो त्यांच्यांत फारसा मिसळत नसे. त्यामुळें तो त्यांच्या थट्टेचा विषय होई. अशा वेळीं त्याची आजी मात्र त्याचा कैवार घेई. कुटुंबांतील इतर माणसांपेक्षां तिच्यावरच त्याला विशेष लळा लागलेला होता. ही बाईहि कांहीं अंशीं उदार विचारसरणीची चहाती असल्यामुळें काव्हूरच्या विचारसरणीचें तिला मोठें कौतुक वाटत असे. तिच्याशीं तो नेहमीं अगदीं मन मोकळें करून बोलत असे व तिलाहि त्याचे गुण आवडत असत. असो. वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत काव्हूरचें सामान्य शिक्षण घरींच झालें व नंतर त्याला ट्यूरिन येथील लष्करी विद्यापीठांत पाठविण्यांत आलें. तेथें गणितशास्त्राचा अभ्यास फार उत्तम तऱ्हेनें चालत असे. तेव्हां त्या शास्त्रांत त्यानें थोड्याच अवकाशांत चांगलें प्रावीण्य संपादन केलें. गणितशास्त्राचा हा अभ्यास कोणत्याहि विषयासंबंधानें बिनचूक अनुमान काढण्याची प्रवृत्ति आपले ठिकाणीं उत्पन्न करण्यास पुढें फार उपयोगी पडला असें तो वारंवार म्हणत असे. तसेंच मनुष्याची योग्य पारख करण्याचें सामर्थ्यहि ह्याच अभ्यासामुळें—ह्या अभ्या-

सानें प्राप्त झालेल्या बुद्धीच्या तरलतेमुळें अथवा कुशाग्रतेमुळें—आपणांस प्राप्त झालें असें तो म्हणे. ह्या पाठशाळेंत भाषाविषयाचें शिक्षण अगदीं बेताचें होत असे. त्यामुळें त्यास अभियुक्त अशी भाषा अगर प्रबंध लिहितां येत नसे. या गोष्टीचें त्याला फार वाईट वाटे व तो शिक्षण-क्रमांतील या वैगुण्याबद्दल नेहमीं तक्रार करीत असे.

इ० स० १८२४ मध्यें पीडमॉन्टचा भावी राजा **चार्लस आल्बर्ट** यानें **काव्हूर** यास आपल्या कुटुंबांतील हुजऱ्याच्या जागेवर नेमलें. अर्थात् त्याच्या भावी शिक्षणाची सर्व जबाबदारी **आल्बर्ट**कडे आली. **चार्लस आल्बर्ट** हाहि प्रथम उदार मतांचा अर्थात् सुधारणावाद्यांचा वाली होता. पण पुढें विपरीत परिस्थिति प्राप्त झाल्यामुळें त्याला आपल्या मनाचा स्वाभाविक कल बाजूस ठेवून राजघराण्यांतील व इतर वजनदार पुरुषांच्या अनुदार (प्रतिगामी) मतांचें अनुकरण करावें लागलें. त्यामुळें **काव्हूर**चें व त्याचें फारसें जमलें नाहीं. **काव्हूर**च्या मनांत लवकरच त्याच्यासंबंधानें अढी उत्पन्न झाली; व ती अखेरपर्यंत तशीच कायम होती. इ० स० १८२६ त त्याचें लष्करी विद्यापीठांतील शिक्षण पुरें होऊन तेथील अखेरच्या परीक्षेंत त्याचा पहिला नंबर आला. त्या-नंतर लष्करी खात्यांतील इंजिनियरच्या शाखेंत लेफ्टेनंटच्या हुद्द्यावर त्याची नेमणूक झाली. ही नोकरी धरिल्यावर त्यानें इंग्रजी भाषेचा अभ्यास सुरू केला. या काळचें त्याचें एक पत्र अस्तित्वांत आहे. त्यांत त्यानें इतिहास व प्रचलित भाषा यांच्या अभ्यासाची अवश्यकता प्रति-पादिली आहे. तसेंच 'एक धड ना भाराभर चिंध्या' जमा करण्यांत कालक्षेप व बुद्धिव्यय करण्यापेक्षां आपल्या आवडीच्या अशा एकदोन विषयांकडे आपल्या बुद्धीचा लय लावणें अधिक श्रेयस्कर आहे असेंहि या पत्रांत त्यानें नमूद केलें आहे. तो जसजसा मोठा होत चालला तस-

---

१ **ट्यूरिन**च्या लष्करी विद्यापीठांत जे सरदारपुत्र असत, त्यांतून राजघराण्यांतील हुजऱ्यांची नेमणूक करीत व पुढें त्यांचें शिक्षण पुरें होईपर्यंत त्यांना त्या विद्यापीठांत राजाच्या खर्चानें ठेवीत असत.

तसा तो आपल्या प्रागतिक विचारांमुळें स्वकुटुंबांतील मंडळीस व आप्तवर्गास कांहींसा अप्रिय होत चालला. चार्लस आल्बर्ट यानें काव्हू-रच्या आप्तांस लिहिलेल्या एका पत्रांत त्याच्यासंबंधानें 'हा उमदा व होतकरू परंतु असंतुष्ट वृत्तीचा तरुण सद्यःकालीं त्रासदायक व भावी कालांत अपायकारक होण्याचा संभव आहे' असे उद्गार काढिले आहेत. काव्हूरनें लष्करी शाळेंत असतांना एक निबंध लिहिला होता. त्या नि-बंधांत त्यानें चार्लस आल्बर्टचा (हा प्रारंभीं उदारमतवादी होता. प्रकरण १ लें पहा.) जुना मित्र सँटोरी डी सँटा रोजा याच्या उदार राज-कीय मतांचा अनुवाद केला होता. व त्यानें ज्या ग्रंथांत अमेरिकेला स्वातंत्र्य प्राप्त करून देणाऱ्या वाशिंगटनचा इटलीमध्यें अवतार व्हावा अशी उत्कट इच्छा प्रगट केली होती त्या ग्रंथांतील एक अवतरणहि त्यांत सामील केलें होतें. त्या निबंधामुळें सदर विद्यापीठांतील अधिकारीवर्गांत बरीच चळवळ उडाली; परंतु त्याबद्दल विशेष गवगवा न करितां त्यांनीं त्यास रागें भरून तो निबंध गुप्त ठेविला. तथापि तेवढ्यानें त्याच्या वृत्तींत फरक पडला नाहीं. मात्र यापुढें तो स्वमतप्रतिपादनाच्या कामीं शक्य तितका सावधपणा ठेवूं लागला. त्याच्या मनामध्यें स्वदेशासंबंधानें कोणते विचार घोळत होते याचें दिग्दर्शन त्या काळच्या त्याच्या एकदोन खासगी पत्रांत मात्र झालेलें आढळून येतें. आपल्या वयाच्या २१ व्या वर्षी लिहिलेल्या एका पत्रांत तो म्हणतोः—

"इटॅलियन लोकांचा पुनरुद्धार करणें जरूर आहे. स्पॅनिश व ऑस्ट्रियन लोकांच्या तिरस्करणीय जुलमी अंमलामुळें त्यांच्या अंगचें सत्त्व एकदां जें खालावलें त्यास फ्रेंचांच्या अंमलांत थोडेंसें चालन मिळालें असून देशांतील उत्साही तरुण इटलीच्या एकराष्ट्रीयत्वाकरितां तळमळत आहेत; परंतु पूर्वीच्या स्थितीचें दडपण पार झुगारून देऊन इटलीचें नूतन राष्ट्र तयार करावयाचें असेल तर त्याकरितां दीर्घ प्रयत्न करणें जरूर असून त्याप्रीत्यर्थ इटॅलियन लोकांचें शीलहि सर्व तऱ्हेच्या स्वार्थत्यागाच्या भट्टींतून तावून सुलाखून निघणें अवश्यक आहे."

ह्या पत्रावरून इटलींतील तुटक संस्थानें मोडून टाकून त्यांचें एकराष्ट्र

वनविण्याची कल्पना अगदीं तरुणपणापासून त्याच्या मनांत घोळत होती असें उघड दिसून येतें. काव्हूरनें हें पत्र इ० स० १८३१ त आल्प्स् पर्वतानजीकच्या बार्ड नामक किल्ल्यांतून काउंट द् सेलाँ यास लिहिलेलें आहे. ह्या एकान्त स्थलीं काव्हूरची नेमणूक त्याच्या बापाच्या सूचनेवरून चार्लस आल्बर्ट (हा या वळीं पीडमॉन्टचा राजा झाला होता.) यानें मुद्दाम केली होती. हेतु हा कीं, तेथील वातावरणामुळें तरी त्याच्या प्रागतिक विचारांची वाढ खुंटावी. परंतु त्याच्या बापाचा हा हेतु साध्य झाला नाहीं. ह्या किल्ल्यांतील लष्करी इंजिनियरिंग खात्यांत नोकरी करीत असतां काव्हूरला जो स्वस्थपणा मिळाला त्याचा त्यानें फारच चांगला उपयोग करून घेतला. या काळांत त्यानें बेंथॅम व ॲडाम स्मिथ या इंग्रज ग्रंथकारांचे राजनीति व अर्थशास्त्र या विषयांवरील ग्रंथ वाचले व इंग्रजी राजकारणाचा अभ्यास चालविला. सुदैवानें तेथें एका इंग्रज चितान्याची व त्याची ओळख झाली आणि त्यामुळें इंग्रजी राजकारण आणि तेथील सामाजिक स्थिति यासंबंधीं मोकळेपणानें चर्चा करण्यास त्याला आयतीच सवड सांपडली. इंग्लंडमध्यें या वेळीं (सन १८३२) पहिल्या रिफार्म बिलाची (पार्लमेंटसभेचे सभासद निवडण्याकरितां राष्ट्रांतील सामान्य जनतेला मताचा हक्क देण्याची) चळवळ चालू होती. त्यासंबंधींची सर्व माहिती समजून घेण्यांत तो या वेळीं गर्क झालेला होता. इंग्रजांची सामाजिक व राजकीय स्थिति, तसेंच त्यांचा सामान्य स्वभाव हीं त्याला विशेष आवडत असत. या लोकांबद्दल त्याचा या वेळीं जो अनुकूल ग्रह झाला तो अखेरपर्यंत तसाच कायम राहिला. आपल्या मनांतील विचार व आकांक्षा खुल्या दिलानें प्रकट करण्यास जर कोणतें एखादें स्थान असेल तर तें इंग्रजी मनुष्याचें अंतःकरण हेंच होय अशी त्याची सामान्यतः कल्पना होऊन बसली होती. आणि त्यामुळें त्याच्या भावी आयुष्यांत जेव्हां जेव्हां त्याचा व एखाद्या इंग्रजाचा संबंध जडे तेव्हां तो त्याच्याशीं अगदीं खुल्या दिलानें वागत असे. तत्कालीन इटॅलियन स्वजनापेक्षां आपलें मनोगत जाणण्याची पात्रता इंग्रज लोकांत विशेष आहे असा त्याचा

ग्रह झाला होता व तो कांहीं अंशीं खरा होता. कारण, पीडमॉन्टमध्यें त्याच्या वर्गातील बहुतेक लोकांचे विचार अनुदार व अनियंत्रित सत्तेस पोषक असे होते. तसेंच पीडमॉन्ट हेंच काय तें आपलें जग, असें त्यास वाटत होतें. प्रागतिक विचारांच्या तरुणांचा एक पक्ष तेथलि मध्यम वर्गात उत्पन्न झालेला होता; परंतु त्याचें ध्येयहि फक्त पीडमॉन्टची सुधारणा करणें हेंच होतें. सर्व इटलीचें ऐक्य घडवून आणण्याची कल्पना त्यांच्या मनाला रुचत नव्हती. व ती गोष्ट त्यांना शक्य कोटींतली वाटत नव्हती.[1] काव्हूरचे विचार याहून निराळे होते, हें मागें दिलेल्या त्याच्या पत्रांतील उताऱ्यावरून कळून येईल. आपल्या देशांतील लोकांचे वरील प्रकारचे विचार पाहून काव्हूरचें मन वारंवार उद्विग्न होत असे. ह्या उद्विग्नतेचे द्योतक असलेले कांहीं उद्गार त्याच्या एका खासगी पत्रांत सांपडतात. हें पत्र त्यानें इ० स० १८३२ त (वय २२) लिहिलेलें आहे. त्यांत तो म्हणतोः—"असा एक काल होता कीं, तेव्हां एखादे दिवशीं आपण इटलीच्या राज्याचा पहिला मुख्य प्रधान होणें अगदीं स्वाभाविक आहे, असा विचार माझ्या मनांत सहज उद्भवता." या उताऱ्यावरून काव्हूरच्या महत्त्वाकांक्षेची व अंतिम साध्याची वाचकांस बरीच कल्पना होण्यासारखी आहे. त्याची ही महत्त्वाकांक्षा त्याच्या भावी आयुष्यक्रमांत पूर्ण झालेली आहे.

काव्हूरला जरी त्याच्या वडिलांच्या इच्छेवरून लष्करी शिक्षण देण्यांत आलें होतें तरी खुद्द त्याच्या मनाची आवड त्या पेशाकडे नव्हती. त्याचा कल राजकारणाकडेच विशेष होता. ह्या विषयाचा सशास्त्र अभ्यासहि त्यानें चालविलेला होता. कांहीं दिवस लष्करी खात्यांत नोकरी केल्यानंतर त्यानें परिस्थितीचें पूर्ण निरीक्षण करून आयुष्यांतील स्वतःच्या कार्याची पूर्व तयारी करण्याकरितां आपल्या

---

१ ह्या तरुण पुरोगामी (सुधारणावादी) पक्षाशिवाय क्रांतिकारक चळवळ करणारा माझिनीचा पक्ष होता. पण त्या पक्षाचीं मतें व मार्ग काव्हूरला पसंत नव्हतीं.

जागेचा राजीनामा दिला (इ. स. १८३१ नोव्हेंबर). तो दिल्यानंतर त्यानें कांहीं चळवळ करूं नये म्हणून त्याच्या बापानें लेरी येथील आपल्या वडिलार्जित मिळकतीनजीक एक नवीन मिळकत विकत घेऊन ती संभाळण्याचें काम त्याजकडे सोंपविलें. अशा प्रकारें एका मिळकतीची व्यवस्था स्वतंत्रपणें त्याजकडे दिल्यास तो ऐदी व उधळ्या बनेल अशा समजुतीनें त्याच्या आईनें प्रथम ह्या गोष्टीस हरकत केली. पण "पंचविशीच्या सुमारास जर मनुष्यास स्वतःचें हिताहित कळण्याची ऐपत न येईल तर ती त्याला पुढें केव्हांच येणार नाहीं" असें त्याच्या बापानें सांगून तिचा आक्षेप दूर केला. याच सुमारास पीडमॉन्टचा राजा चार्लस आलबर्ट याच्या आग्रहावरून काव्हूरच्या बापानें ट्यूरिन येथील व्हिकारिओची (पोलिस खात्याचा मुख्य अधिकारी) जागा पत्करिली. यामुळें त्याला लेरी येथील आपल्या मिळकतीची व्यवस्था नीट राखतां येईना. कांहीं काल अशा स्थितींत गेल्यावर तिची अवास्था होऊन नुकसान होऊं लागलें. तेव्हां काव्हूरनें ती आपल्या ताब्यांत घेण्याचें मनांत आणून त्या कामीं त्यानें आपला वडील भाऊ (तेथील कायद्याप्रमाणें हाच तिचा वारस होता.) व बाप यांची अनुमति मिळविली. लेरी येथील ही मिळकत बरीच मोठी होती. ती स्वाधीन होतांच तो एक बराच मोठा जमीनदार बनला. लष्करी खात्यांतील नोकरी सोडीपर्यंत त्याला शेतकीची बिलकूल माहिती नव्हती. परंतु तें काम त्याच्या अंगावर पडल्यानंतर त्या विषयाचा त्यानें इतका उत्तम अभ्यास केला कीं, थोड्याच काळांत तो आपल्या जमिनींतून शक्य तितकें अधिक उत्पन्न पैदा करूं लागला. शेतकीच्या सुधारणेसंबंधीं जें जें नवीन शास्त्रीय ज्ञान उत्पन्न झालेलें होतें तें सर्व त्यानें संपादिलें व त्याचे प्रयोग तो आपल्या जमिनींत वारंवार करीत असे. ह्या प्रयोगांच्याद्वारें तेथील अज्ञान शेतकऱ्यांनाहि तो शेतकीच्या सुधारणेचें शिक्षण देत असे. काव्हूरची महत्त्वाकांक्षा काय होती हें मागें सांगितलेंच आहे. ती सफळ होण्यासारखी अनुकूल परिस्थिति अद्याप प्राप्त झालेली नव्हती. माझिनीच्या चळवळीमुळें देशांत एकीकडे बंडखोर-

पणा व एकीकडे अधिकारीवर्गाचें दडपशाहीचें धोरण अशी स्थिति होऊन बसली होती. माझिनीच्या पक्षांतील लोकांच्या आकांक्षेबद्दल काव्हूरच्या मनांत सहानुभूति होती; पण त्या आकांक्षा सफळ करण्या-करितां त्यांनीं योजलेले उपाय मात्र त्यास बिलकुल पसंत नव्हते. दोन्ही पक्षांच्या बलाबलांचा विचार करितां इटलीच्या पुनरुज्जीवनाचें काम गुप्त मंडळ्यांच्या गुप्त कटानें साधणें शक्य नाहीं असें त्याचें ठाम मत बनलें होतें. पीडमॉन्टसारख्या स्वतंत्र संस्थानाच्या साहाय्यानेंच हें कार्य सिद्धीस जाण्याचा संभव आहे असा त्याचा समज बनला होता. परंतु देशांत जी गुप्त अनिष्ट चळवळ चालू होती तिची भीति दूर झाल्या-खेरीज पीडमॉन्टच्या अधिकारीमंडळाची वरील कार्यास सहानुभूति मिळविणें दुरापास्त होतें. तसेंच जोंपर्यंत त्यांचें दडपशाहीचें धोरण चालू आहे तोंपर्यंत त्यांच्याशीं संबंध ठेवणेंहि इष्ट नाहीं असें त्यास वाटत होतें. दोहोंकडून अशी अडचणीची स्थिति असल्यामुळें व भावी कालासंबंधीं त्याला आशा वाटत असल्यामुळें त्यानें हें वातावरण निव-ळेपर्यंत राजकारणांत प्रत्यक्षपणें न पडण्याचा निश्चय केला. या कार-णामुळें लेरी येथील वतनवाडीवर त्याला सुमारें १५ वर्षें काढावीं लागलीं. मात्र हीं पंधरा वर्षें त्यानें फुकट आळसांत किंवा चैनींत घालविलीं नाहींत. तर इटलीचें राष्ट्र बनवून त्याचा पहिला मुख्य प्रधान होण्याची जी त्याची सात्त्विक महत्त्वाकांक्षा होती ती पूर्ण करण्याची तयारी करण्यांत त्यानें हा काल घालविला. तो कसा याचें वर्णन पुढील भागांत येईलच. आतां, येथें फक्त लेरी येथील त्याचा आयुष्यक्रम व एकदोन किरकोळ गोष्टी सांगून हें प्रकरण पुरें करूं.

लेरी येथें त्याची रहाणी अगदीं साधी असे. तो सकाळीं चार वाजतां निजून उठे. आपल्या जनावरांची व्यवस्था स्वतः पाही आणि मग शेतांतून फिरून कामकरी लोकांकडून नेमलेलीं कामें करून घेई. कधीं-कधीं तो स्वतःहि काम करीत असे. स्वतःचा वसूल तो स्वतःच करीत असे. संध्याकाळच्या वेळीं अनेक स्नेहीसोबती बरोबर घेऊन तो जेवण करीत असे, व नंतर सामान्य लोकांत मिसळून त्यांच्याशीं

मोकळ्या मनानें थट्टामस्करी व गप्पागोष्टी करण्यांत कांहीं वेळ घालवीत असे. कोणत्याहि दर्जाच्या लोकसमाजांत मिसळून जाण्याची कला त्याला फार चांगली साधली होती. यामुळें तो लेरी व आसपासचीं खेडीं येथील लोकांस फार प्रिय होऊन बसला. तो आपल्या नोकरांसहि फार ममताळूपणानें वागवीत असे. अर्थात् त्याला प्रामाणिक व विश्वासूक नोकरांची वाण पडत नसे. त्यांना व आसपासच्या इतर शेतकऱ्यांनाहि तो आपल्या आईबापांसारखा वाटे. काव्हूर हा गंभीर वृत्तीचा मनुष्य होता. त्याची मनोरचना काव्य अगर अद्भुतरस (Romance) यांत रमणारी नव्हती. ती चिकित्साप्रिय होती. अर्थात् रसिकता व प्रेम (प्रणयी प्रेम) ह्या भावनांचा त्याचे ठायीं बहुतेक अभाव होता. काव्य-ग्रंथांपैकीं एकट्या शेक्सपीयरचे ग्रंथ त्याला आवडत असत. कारण, त्यांत मानवी स्वभावाचें व निरनिराळ्या मनोवृत्तीचीं माणसें निरनिराळ्या परिस्थितींत कशीं वागतात याचें मार्मिक ज्ञान प्रदर्शित झालेलें आहे व तेंच मुख्यतः त्यास हवें असे. रसिकतेच्या अभावामुळें लेरी येथील सृष्टिसौंदर्यापासून होणाऱ्या आनंदाचा अनुभव त्याच्या वांट्यास येत नसे. तथापि तेथील रहाणींतील साधेपणा, शांतपणा, अकृत्रिमता आणि तेथें मिळणारें व्यावहारिक शहाणपणाचें शिक्षण याचें त्यास फार महत्त्व वाटत असे.

काव्हूरचा थोरला भाऊ गस्टाव्ह हा धर्मशास्त्र व तत्त्वज्ञान यांत निष्णात होता. काव्हूरनें आपल्या भावी आयुष्यांतील बहुतेक दिवस याच्याच घरीं घालविले, व त्या उभयतांमध्यें अखेरपर्यंत चांगलें सख्यहि होतें. परंतु तरुणपणीं एकवेळ त्यांचें क्षुल्लक बाबीवरून भांडण होऊन गस्टाव्ह यानें काव्हूरच्या डोक्यावर एक खुर्ची फेंकली होती. त्या वेळीं गस्टाव्ह याचें वर्तनहि विशेष ताठ्याचें असे. परंतु काव्हूरनें या वेळीं विलक्षण आत्मसंयमन केल्याचें आढळून येतें.

काव्हूरची लष्करी इंजिनियर खात्यांतील प्रथम नेमणूक जिनोआ येथें झाली होती. या ठिकाणीं असतांना तेथील आरोग्यरक्षण-खात्याच्या अध्यक्षाच्या बायकोचें त्याजवर निस्सीम प्रेम जडलें. ही बाई फार सुसंस्कृत व

सुंदर असून काव्हूरची पूर्ण भक्त बनली होती. त्याच्या भावी थोर योग्यतेची कल्पना तिच्या मनांत येऊन ती तिला पटल्यामुळेंच की काय कोण जाणे तिचें त्याच्यावर इतकें निश्चल प्रेम बसलें कीं, त्याकरितां ती खंगत चालली व सुमारें दहा वर्षांच्या दुःखातिशयानें मरण पावली! तिचे राजकीय विचार लोकसत्ताक राज्यपद्धतीस अनकूल असे होते. काव्हूर हा जरी पूर्ण लोकसत्तावादी नव्हता तरी प्रातिनिधिक व नियंत्रित शासनसंस्थेचा तो भोक्ता असल्यामुळें ह्या उभयतांचा लवकर स्नेह जमला. काव्हूरचेंहि या स्त्रीवर प्रेम होतें; परंतु त्याला तिच्याबरोबर लग्न करितां येणें शक्य नसल्यामुळें तिची कींव करण्यापलीकडे त्यास दुसरें कांहीं करितां आलें नाहीं. प्रेमविषयक संबंधाचा प्रकार त्याच्या आयुष्यांत एवढाच काय तो घडून आलेला आहे. यापुढें तो स्त्रीवर्गाशीं फार जपून वागत असे. त्यानें आपला जन्म अविवाहित राहून इटलीच्या पुनरुद्धारार्थ खर्च करण्याचा निश्चय केला व तो त्यानें मरेपर्यंत झटून शेवटास नेला. उपर्युक्त बाईच्या सहवासांत असतांना तिच्या उत्तेजक विचारांचा त्याच्या मनावर पुष्कळ संस्कार घडत असे. त्यामुळें व फ्रान्सांतील क्रांतिकारक चळवळींच्या बातम्या सतत कानावर येत असल्यामुळें त्याच्या तोंडूनहि उच्छृंखलपणाचे कांहीं शब्द एकदां बाहेर पडले व तेव्हांपासून त्याच्या हालचालींवर गुप्त पोलिसांची नजर राहूं लागली. त्याला स्वतःला ही गोष्ट कळून चुकली होती व त्या कारणानें त्याच्या भावी वर्तनांत व बोलण्यांत फारच सावधपणा दिसून येऊं लागला. काव्हूर जेव्हां जिनोआ येथें होता त्याच वेळीं माझिनीहि तेथें होता. दोघांच्याहि मनांत तेव्हां एकाच प्रकारचे (इटलीच्या पुनरुज्जीवनाचे) विचार घोळत होते. परंतु दोघांच्या मनोवृत्तींची रचना परस्परांहून अगदीं भिन्न असल्यामुळें त्यांची तेथें कधीं मुलाखत नव्हे तर परस्पर ओळखहि होऊं शकली नाहीं! त्यांची जर एकमेकांशीं गांठ पडती तर पुष्कळ गैरसमज दूर होऊन माझिनीच्या एककल्लीपणास आळा पडून ते परस्परांचे सहायक बनले असते, असा एका इतिहासज्ञाचा अभिप्राय आहे. परंतु तो योग जुळून न आल्यामुळें काव्हूरला अखेरपर्यंत माझिनीच्या

धोरणाचा—निदान जाहीर भाषणांत तरी—निषेधच करणें भाग पडलें; व त्यामुळें कधींकधीं त्याच्यावर लोकांना अप्रिय होण्याचे प्रसंग आले; परंतु विकारापेक्षां विचाराकडे त्याच्या मनाचा नेहमीं विशेष ओढा असल्यामुळें आणि त्याचे हेतु शुद्ध व निरपेक्ष असल्यामुळें लोकप्रियतेसारख्या कांहीं अंशीं चंचल वस्तूस तो कमी महत्त्व देई व स्वतःच्या कर्तृत्वशक्तीच्या जोरावर इष्ट कार्य पार पाडीत असे; त्याचें ध्येय ठरलेलें होतें व तें ज्या उपायांनीं सिद्ध होईल ते उपाय तो निर्भयपणें योजण्यास कधींहि मागें सरत नसे.

---

# प्रकरण ३ रें

## प्रवास व पूर्वतयारी

लेरी येथील वतनवाडीवर काव्हूरला सुमारें १५ वर्षे वालवावीं लागलीं हें पूर्वींच सांगितलें आहे. या कालांत त्यानें राजनीतीचा सूक्ष्म रीतीनें अभ्यास केला, व फ्रान्स आणि इंग्लंड येथें वारंवार जाऊन तेथील समाजस्थिति व राजकीय संस्था यांचें परिशीलन केलें. त्याविषयीं लिहितांना तो एका खासगी पत्रांत म्हणतोः–" माझीं मतें हीं माझ्या शीलाचा एक भाग आहे; त्यांत केव्हांहि बदल होणार नाहीं. भावी कालांतील सन्मान्य कामगिरी करण्याची तयारी करण्याचा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे ज्या संस्थांची स्वदेशांत स्थापना करण्याची माझी इच्छा आहे, तसल्या इतर देशांतील संस्थांचा प्रथम अभ्यास करणें हा होय." आणि ह्या हेतूनेंच तो फ्रान्स व इंग्लंड या देशांत जात असे. ह्या दोन्ही देशांतील तत्कालीन राज्यपद्धति प्रागतिक स्वरूपाची होती. म्हणूनं त्या देशांतील राजकीय संस्थांचें निरीक्षण करणें हें फायद्याचें होईल असा त्याचा समज होता व तो खराहि ठरला, हें त्याच्याच एका पत्रांतील उद्गारावरून दिसून येतें.

फ्रान्समध्यें काव्हूरची नातलग मंडळी बरीच होती. यामुळें तेथील वरिष्ठ वर्गाच्या समाजांत त्याची जानपछान होण्यास फारसा वेळ लागला नाहीं. या वेळेस फ्रान्समध्यें तिसरा नेपोलियन अध्यक्ष या नात्यानें राज्य करीत होता. याच्या कारकीर्दींत फ्रान्स देशाची चांगली भरभराट झालेली होती. हा काळ शांततेचा असल्यामुळें विद्या, कला व शास्त्र यांचा तेथें पुनः नवीन उदय होत होता; आणि त्यामुळें पॅरिस शहर हें अनेक प्रकारच्या बौद्धिक चळवळींचें केंद्र बनलेलें होतें. ह्या उच्च वातावरणांत काव्हूरनें बराच काल घालविला. पॅरिस येथील तत्कालीन बहुतेक विद्वान व थोर पुरुष यांच्याशीं त्याचा परिचय झाला

होता; व त्यांच्या सहवासांत त्याचा काल फार मजेनें जात असे असें त्याच्या पत्रावरून दिसतें.* या ठिकाणीं असतांना मॅडम द किरकोर्ट नामक एका रशियन सभ्य स्त्रीशीं त्याचा विशेष परिचय झालेला होता. ही स्त्री मोठी हुषार, करारी बाण्याची व धारिष्टवान होती. तिनें अनेक प्रकारच्या संकटांस तोंड दिलेलें होतें. मनुष्यस्वभावाची पारख करण्यांत तर ती फार कुशल होती. कान्हूरची वागणूक व त्याच्या अंगचे अनेक सद्गुण पाहून तिच्या मनांत त्याच्याविषयीं बराच आदर उत्पन्न झालेला होता. त्याला योग्य संधि मिळाल्यास तो मोठा कर्तृत्ववान पुरुष होईल असें त्याच्याविषयीं तिनें भाकित केलें होतें. कान्हूरच्या तोंडून पीडमॉन्टच्या शोचनीय स्थितीचें वर्णन जेव्हां तिनें ऐकलें, तेव्हां असल्या देशांत आपली बुद्धिमत्ता कुजवून फुकट घालविण्यापेक्षां पॅरिस येथें कायमची वस्ती केल्यास त्याच्या बौद्धिक गुणांचें चीज होऊन तो चांगला उदयास येईल असें समजून तिनें त्यास तशा प्रकारची सूचना केली–किंबहुना आग्रहहि केला. तेव्हां कान्हूरनें तिला जें उत्तर दिलें तें विपन्न देशांतील देशभक्तांनीं आपल्या हृत्पटलावर खोदून ठेविण्यासारखें आहे. तो म्हणतो:—

"मीं आपलें घरदार सोडून आईबापांच्या सहवासास मुकावें असें त्यांनीं माझें काय केलें आहे? त्यांच्या उतारवयांत त्यांचा त्याग करून जाण्यापेक्षां मरेपर्यंत त्यांच्या सन्निध असणें हें माझें पवित्र कर्तव्यकर्म आहे. पॅरिसमध्यें राहून मी काय करूं शकेन? इटलींतील अनेक लोक आपला देश सोडून सध्यां परदेशांत जाऊन राहिले आहेत. त्यांच्या हातून कोणतें शतकृत्य झालें आहे? आपला देश दुःस्थितींत आहे

---

* फ्रेंच लोकांसंबंधानें लिहितांना कान्हूरनें "फ्रेंच लोकांचा विशेष गुण म्हटला म्हणजे त्यांची सदोदित आनंदी व उल्हासी वृत्ति हा होय. शास्त्र व साहित्य, गांभीर्य व प्रेमळपणा, Substance and form यांचा हृदयंगम संगम पॅरिसमधील कित्येक गृहांतच झालेला पहाण्यास सांपडतो; तो इतरत्र कोठेंहि आढळत नाहीं" असें म्हटलें आहे.

म्हणून तेथून पळ काढून दुसरीकडे गेल्यानें कोणासहि वैभवाचें शिखर गांठतां येणें शक्य नाहीं; आणि यद्यपि तसें होणें शक्य असलें तरी मी तसें करण्यास कधींहि तयार होणार नाहीं. माझा देश सुखी अगर दुःखी कसाहि असो; माझें सर्व आयुष्य मी त्याला अर्पण करणार! दुसरीकडे आपला विशेष भाग्योदय होईल अशी जरी माझी खात्री झाली तरीहि मी स्वदेशाशीं बेइमान होणार नाहीं."

या पत्रांत त्याचें स्वदेशावरील निस्सीम प्रेम तर व्यक्त होत आहेच; पण त्याखेरीज आणखी आईबापांसंबंधीं त्याचा असलेला पूज्यभावहि स्पष्ट दिसून येत आहे. त्याच्या प्रागतिक विचारांमुळें तो आपल्या कुटुंबांतील माणसांस फारसा आवडत नसे. अर्थात् त्याचें कौटुंबिक सुख यथायथाच होतें. असें असूनहि मातापित्यांसंबंधानें इतका आदर त्याच्या मनांत वसत होता ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. असो; काव्हूर पॅरिस तेथें असतां टॉकव्हलचा 'डिमॉक्रसी इन अमेरिका' हा सर्वमान्य ग्रंथ प्रसिद्ध झाला व त्यामुळें त्या ग्रंथकाराची सर्व युरोपामध्यें लवकरच ख्याति झाली. काव्हूरच्याहि तो पहाण्यांत आला. त्यापासून त्याला नवीन असें जरी फारसें कांहीं शिकावयास सांपडलें नाहीं तरी त्याच्या स्वतःच्या कित्येक मतांचें व्यवस्थित रीतीनें त्यांत प्रतिपादन केलेलें त्यास आढळून आल्यामुळें त्याला मोठा आनंद वाटला. तत्कालीन प्रचलित मानवसमाजाचा लोकसत्ताक राज्यपद्धती-कडे वहात असलेला कल व राजसत्ता आणि धर्मसत्ता परस्परांपासून अगदीं अलिप्त ठेवण्याकडे त्यांचा असलेला ओढा यांविषयीं काव्हूरच्या मनांत कांहीं ठराविक सिद्धान्त बनून राहिले होते. त्यांचेंच उद्घाटन सदर प्रख्यात ग्रंथांत झालेलें होतें. पॅरिस येथील विद्वान् लोकांपैकीं सेंत ब्यूव्हे व कुसिन हे त्याचे मित्र बनले होते. रूयर, कोलार्द, बिक्झो, गुझो, जुल्स, सिमाँ, मिचिलेत, ओझानम, किनेत व पोलिश कवि अडॅम मिकेविक्झ् इत्यादि पंडिताग्रणींचा व त्याचा परिचय झाला असून त्यांच्या व्याख्यानमालांनाहि तो हजर होता असें दिसतें. तसेंच रॅचेल नांवाच्या तत्कालीन प्रख्यात नटीचाहि

तो चहाता बनला होता. काव्हूरची मनोवृत्ति काव्य-नाट्यादिकांत रममाण होणाऱ्यांपैकीं नव्हती. तथापि रॅचेलच्या अंगचें अत्युत्तम कलानैपुण्य पाहून तो तिजवर बराच खुष झाला होता. कोणत्याहि बाबतींत सामान्य गुण पाहून त्याचें केव्हांहि समाधान होत नसे. प्रत्येक विषयांतील उत्कट गुणाकडेच (प्रतिभेकडेच) त्याचें लक्ष असे; आणि जेथें त्याला तो आढळून येई तेथें तो मोठ्या संतोषानें त्याशीं रममाण होत असे. रॅचेलचें नाट्यनैपुण्य अगदीं पहिल्या प्रतीचें होतें, त्यामुळें तें आपलें मन वेधून घेण्यास समर्थ होई, असे खुद्द त्याचेच उद्गार आहेत. पॅरिस येथें असतांना काव्हूरला जुगार खेळण्याचा व सट्टे करण्याचा नाद कांहीं दिवस लागला होता; व त्या बाबतींत पैशाची हानि झाल्यामुळें त्याला एकदां आपल्या वडिलांकडे मागणी करावी लागली. वडिलांनीं त्यास पैसे पाठवून दिले; परंतु त्याबरोबरच सौम्य रीतीनें कानउघाडणी करणारें असें एक पत्रहि लिहिलें. तें पत्र येण्या-पूर्वींच काव्हूरला आपल्या कृतीबद्दल लज्जा वाटून पश्चात्ताप झाला होता. त्यांतच वडिलांच्या उपदेशाची भर पडल्यामुळें ह्या अनिष्ट प्रकारापासून परावृत्त होण्याचा त्याचा निश्चय अधिक दृढ झाला. व पुढें तो ह्या व्यसनाच्या अधीन झालेला केव्हांहि आढळून येत नाहीं.*

इंग्लंडमध्यें काव्हूरचे कोणी नातलग नव्हते; तथापि तेथेंहि लव-करच वरिष्ठ वर्गांतील प्रमुख लोकांशीं त्याचा परिचय होऊन तो त्यांना प्रिय होत गेला. डइल्यम ब्रोकडन् नामक एका चितारी मित्रानें त्याला एकदां रॉयल जिऑग्रफिकल सोसायटीच्या भोजनसमारंभास नेलें. तेथें अचानकपणें त्या सोसायटीच्या सेक्रेटरीनें त्याचें आरोग्य चिंतण्याचा ठराव पुढें आणिला, तेव्हां नाइलाजास्तव त्याला आभार-

---

* ही हकीकत त्याच्या खासगी रोजनिशीवरून काउंतेस मार्तिनेंगो सिजारेस्को नांवाच्या त्याच्या इटालियन चरित्रकर्त्रीनें दिलेली आहे. या रोजनिशींत सदर व्यसनाधीनतेबद्दल त्यानें वरचेवर आत्मनिषेध केल्याचा उल्लेख आहे असें या बाईचें म्हणणें आहे.

प्रदर्शनानिमित्त एक भाषण करावें लागलें. त्याचें हें पहिलेंच सार्वजनिक भाषण होय. या भाषणाचा तेथील मंडळींवर इतका उत्तम परिणाम झाला कीं, त्यांच्यापैकीं लॉर्ड रिपन यानें हंसत हंसत असें बोलून दाखविलें कीं, "ह्या भाषणानें त्याच्या कर्तृत्वशाली अशा दीर्घ आयुष्यक्रमास प्रारंभ होवो असें मी इच्छितों." जॉन मुरे, प्रख्यात गणिती बॅबेज, हालॅम, टॉक्वव्हिल, वायरन व शेरिडनच्या मुली यांच्याशींहि त्याचा चांगला परिचय झाला होता. ट्रिनिटी कॉलेजचा लायब्ररियन एडवर्ड रोमिले याच्या मार्फत डॅव्हनपोर्ट नामक एका इंग्रज जमीनदाराशीं त्याची ओळख झाली. या जमीनदारानें त्याला इंग्रजी शेतकीपद्धतीची माहिती करून घेण्याची संधि मिळावी म्हणून आपली प्रयोगशाळा व त्याच्या भोंवतालची जमीन कांहीं दिवस त्याच्या स्वाधीन केली. तेथें त्यानें त्या पद्धतीचें ज्ञान सूक्ष्म रीतीनें करून घेतलें. तेथील भूमिगत नाल्याची पद्धति (Subsoil drainage) त्यास फार पसंत पडली. इंग्रज लोकांचीं नमुनेदार प्रयोग करण्याचीं शेतें पाहून तो जरी संतुष्ट झाला तरी त्यांचा तो भोक्ता बनला नाहीं. असलीं शेतें व्यवहारांत लहान शेतकऱ्यांना किफायतशीर होत नसल्यामुळें त्यांची तो थट्टाच करीत असे. शेतकीमध्यें ज्या सुधारणा करावयाच्या त्या शेतकऱ्यांस किफायतशीर होतील कीं नाहीं व त्या कितपत आणि कशा रीतीनें किफायतशीर होतील हें अशा सुधारणा करणारानें प्रत्यक्ष अनुभवास आणून दिलें पाहिजे असें त्याचें मत असे.

सामाजिक व आर्थिक सुधारणेकडेहि काव्हूरचें विशेष लक्ष असल्यामुळें त्यानें इंग्लंडांतील तत्कालीन नूतन Poor Laws (बेकारव्यवस्था) चा अभ्यास केला. तसेंच तेथील धुराचे कारखाने, दवाखाने व तुरुंग यांचेंहि त्यानें निरीक्षण केलें. तेथील तुरुंगांतील कैद्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था त्याला पसंत पडली. परंतु त्या ठिकाणचें दळणाचें काम मात्र त्यास आवडलें नाहीं. ह्या कामामुळें कैद्यांच्या नैतिक मनोवृत्ति भ्रष्ट होण्याचा संभव आहे असें तो म्हणे. उपयुक्त व थोडाबहुत फायदा करून देणारें असेंच काम कैद्यांची खरी सुधारणा

करूं शकतें असें त्याचें मत होतें. या प्रवासांत त्यानें शेक्सपियरचें प्रख्यात थडगेंहि पाहिलें. इंग्रजी राजकारणाचा तर त्यानें फारच आस्थापूर्वक अभ्यास केला व तत्संबंधीं त्यानें फ्रेंच व स्विस् मासिकांतून कांहीं महत्त्वाचे लेखहि लिहिले. (इ० स० १८४३–४६). हे लेख त्यानें आपल्या **जिनोआ** येथील मित्रांच्या आग्रहावरून लिहिले. या लेखांतील स्वतंत्र विचारपद्धति व बिनचूक आणि परिपूर्ण माहिती हे दोन गुण विशेष महत्त्वाचे असून त्यामुळें **फ्रान्स** व **इंग्लंड** येथें त्याची ख्याति होऊन तेथील लोक त्याची गणना विचारवंत (Thinker) पुरुषांत करूं लागले. या लेखांमधून त्यानें **पिट्** व **पील** यांच्या राजकारणांची मार्मिक चिकित्सा केलेली आहे. पीलच्या धोरणाचा त्यानें पुढें कांहीं प्रसंगीं स्वतः अनुवाद केलेला आहे; व **पील**च्या हातून होणाऱ्या एका महत्त्वाच्या गोष्टीचें भाकित त्यानें इतरांच्या अगोदर करून ठेविलें.* आयर्लंडच्या व तत्कालीन भावी स्थितीबद्दल त्यानें केलेलें विवेचनहि अपूर्व ठरलेलें आहे. या लेखांत त्यानें केलेल्या कित्येक सूचना पुढें अंमलांत येऊन गेल्या आहेत. या एकदोन उदाहरणांवरून त्याच्या बौद्धिक सामर्थ्याचा बराच अंदाज होण्यासारखा आहे. साम्राज्यवादी मनुष्याच्या दृष्टीनें त्यानें **आयर्लंडच्या** प्रश्नाचा विचार केलेला आहे. वस्तुतः त्या वेळीं आजच्याइतकें **इंग्लंडमध्यें** साम्राज्यवादित्वाचें फारसें महत्त्व नव्हतें. पण पुढें तें वाढणार असें गृहीत धरून त्यानें त्या स्थितींत दोन्ही देशांस (**इंग्लंड** व **आयर्लंड**) हितावह असें विवेचन केलेलें

---

* Peel's abolition of corn laws ही ती गोष्ट होय. या वेळीं **कान्हूरनें** लिहिलेल्या लेखांत पुढील लेख विशेष प्रसिद्ध आहेतः—

(1) Thoughts on the Condition of Ireland and its future.

(2) The English corn laws.

(3) Pauperism and the official Report of the Commission on the Administration of the Poor law in England.

आहे. यावरून त्याच्या दूरदर्शी बुद्धीची चांगली साक्ष पटते. त्यानें ज्या दृष्टीनें इंग्लंड व आयर्लंड यांच्या परस्पर संबंधाचा विचार केला आहे त्या दृष्टीनें ह्या विषयाचा विचार त्याच्यापूर्वी व त्याच्यामागून आजपर्यंत कोणत्याहि परदेशस्थानें केलेला नाहीं इतका तो अपूर्व आहे असें त्याच्या एका चरित्रकाराचें म्हणणें आहे. याप्रमाणें परदेशांमध्यें काव्हूरचा लौकिक वाढत होता. परंतु त्याच्या स्वदेशाकडे पाहिलें तर तेथील स्थिति अगदींच उत्साहभंग करणारी होती. भाषणस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य यांस त्याच्या देशांत पूर्ण प्रतिबंध होता. इतर देशांतील पत्रें व मासिकेंहि त्या देशांत आणण्याची मनाई होती. पॅरिसचें एक अगदीं साधें वर्तमानपत्र त्याच्या मावशीस पाहिजे होतें. तें मिळविण्याकरितां फ्रेंच वकिलामार्फत पीडमॉन्टच्या सरकाराशीं वाटाघाट करून मोठ्या प्रयत्नानें तिनें परवानगी मिळविली! रेलवे, तारा वगैरे दळणवळणाचीं नवीन सुधारलेलीं साधनेंहि आपल्या देशांत आणण्यास पीडमॉन्टचे सत्ताधारी व सरदार तयार नव्हते. या विषयांची नुसती माहितीहि ते आपल्या जनतेंत पसरूं देत नसत. 'रेलवे, तारा' वगैरे रूपानें व्यक्त होणारी शक्ति सैतानाची (Powers of Drakness) आहे असें तेथील बहुतेक लोकांचें व विशेषतः पोपचें मत होतें. यामुळें काउंट पेटिटि नामक एका ग्रंथकारानें रेलवेसंबंधीं याच सुमारास लिहिलेलें पुस्तक पीडमॉन्टमध्यें आणण्यास मनाई करण्यांत आली. या पुस्तकाचें समालोचन काव्हूरनें एका फ्रेंच मासिकांत केलें, तेंहि मना करण्यांत आलें होतें. पण त्याच्या कांहीं किरकोळ प्रती कशा तरी इटलींत आल्या व त्यांपैकीं एक खुद्द पीडमॉन्टचा राजा चार्लस आल्बर्ट याच्याहि हातीं गेली! मूळ पुस्तकांत राजकीय वार्तांचा बिलकुल गंध नव्हता. परंतु काव्हूरच्या समालोचनांत राजकीयदृष्ट्या रेलवेचें असलेलें महत्त्व वर्णिलेलें होतें. रेलवेंची वाढ झाल्यास इटलीमध्यें नैतिक (मानसिक) ऐक्य होण्याचा मार्ग सुलभ होईल व त्याच्या पुढील पायरी जी राष्ट्रीय ऐक्याची भावना, तिचा प्रसार होण्यासहि त्याच्या योगानें चांगली मदत होईल असें त्यानें प्रतिपादिलें होतें.

" स्थानिक मत्सर व संकुचित बुद्धि हीं रेलवेच्या प्रसारानें दूर होऊन लोकांचे विचार व आचार जास्त उन्नत स्वरूपाचे होतील आणि त्यांची दृष्टि व मन यांचा विकास होऊन त्यांच्या पुनरुद्धाराचें कार्य फार सुलभ होईल; तसेंच देशामध्यें माजत असलेला खासगी व व्यक्ति-विषयक कलह व राजकीय मतभेद हीं त्याच्या योगानें लयास जाऊन त्यांच्या ठिकाणीं सर्वत्र एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उदय होईल. आणि तसें झाल्यास 'इटलीचें राष्ट्रीय स्वातंत्र्य' ही आपणां सर्वांस प्रिय असलेली गोष्ट सहज होईल." वगैरे विचारहि त्यानें सदर समालोचनात्मक लेखांत गोंवून दिले होते. काव्हूरच्या राजकीय लेखांत अगर संभाषणांत स्वदेशासंबंधानें नेहमीं 'इटली' हा शब्द येत असे. अशा लेखांत पीडमॉन्ट, व्हेनिशिया वगैरे प्रांतिक भागांचा तो चुकूनसुद्धां कधीं उल्लेख करीत नसे. 'इटलीचें ऐक्य' करून 'इटलीचें राज्य' स्थापन करणें ही त्याची महत्त्वाकांक्षा असल्यामुळें राष्ट्रीयत्वासंबंधीं बोलणें अगर लिहिणें झाल्यास तो 'इटली' हाच शब्द वापरी हें उघड आहे. इटलीमध्यें रेलवेचा प्रसार सर्वत्र झाल्यास इटलीच्या गळ्याभोंवतीं असलेला ऑस्ट्रियन सत्तेचा फांस अधिक घट्ट होईल असें जेव्हां तत्कालीन कित्येक प्रामाणिक इटॅलियन देशभक्तांचें म्हणणें पडूं लागलें, तेव्हां त्यांस काव्हूरनें असें उत्तर दिलें कीं, रेलवेच्या प्रसारामुळें अंतस्थ ऐक्य-संवर्धनास जी मदत होईल तिचा विचार केल्यास ऑस्ट्रियन बागुलबोवाचें भय बाळगण्याचें कारण रहाणार नाहीं. शिवाय ह्या प्रसारामुळें देशांतील उद्योगधंद्यास चांगलें उत्तेजन मिळून जर्मनी-सारख्या गंभीर व हुषार राष्ट्राशीं दळणवळण ठेवणें आपणांस फार सोपें जाईल. याप्रमाणें बुद्धिवाद करून त्यानें उपर्युक्त अस्सल देश-भक्तांची निष्कारण असलेली भीति दूर करण्याचा व त्यांचा विरोध नाहींसा करण्याचा प्रयत्न केला. ह्या लेखांत त्यानें सहज जातां जातां आल्प्स पर्वत फोडून तेथून रेलवे नेण्यासंबंधीं व जर्मनीशीं स्नेह संपादन करण्यासंबंधीं (त्याच्या मनांत घोळत असलेल्या) योजनेचा उडत उडत उल्लेख केला. ह्या दोन्ही योजना त्या वेळीं अगदीं अशक्य

कोर्टांत गणल्या जात होत्या. 'इटलीचें ऐक्य' ही गोष्ट तरी त्या वेळीं कोणास शक्य वाटत होती? एका इटॅलियन तत्त्ववेत्त्यानें तर त्या काळापासून पुढें एक शतकपर्यंत तरी ही गोष्ट घडून येणें शक्य नाहीं म्हणून डांगोरा पिटला होता. परंतु काव्हूरच्या डोक्यामध्यें ह्या तिन्ही गोष्टी घडवून आणण्याचें सामर्थ्य एकवटून राहिलेलें होतें. तें बाहेर पडण्यास मात्र अद्याप अवकाश होता. कारण, त्यास अनुकूल अशी परिस्थिति अद्याप निर्माण झाली नव्हती; तथापि ती उत्पन्न होण्याचीं चिन्हें मात्र दिसूं लागलीं होतीं.

---

# प्रकरण ४ थें

## पंधरा वर्षांतील स्थित्यंतर

राजकारणापासून अलिप्त राहून काव्हूरनें जीं १५ वर्षें चालविलीं तेवढ्या अवधींत इटलींतील बहुतेक प्रांतांत बरेंच उत्साहजनक स्थित्यंतर घडून आलेलें होतें. हा काल एकंदरींत शांततेचा असल्यामुळें देशामध्यें औद्योगिक (आर्थिक) प्रगति झपाट्यानें होत होती. माझिनीच्या क्रांतिकारक तत्त्वज्ञानाच्या प्रसारामुळें देशांत उद्भवलेली बंडाळी व अस्वस्थता यांचा आतां बहुतेक बीमोड झालेला होता व तो बीमोड करण्याकरितां तेथील अधिकाऱ्यांनीं धारण केलेलें उग्र स्वरूप आतां बरेंच सौम्य झालें होतें. तसेंच आपापल्या संस्थानची भौतिक सुधारणा करण्याची प्रवृत्तीहि तेथील निरनिराळ्या संस्थानांतील वरिष्ठ वर्गाच्या मनांत उत्पन्न होत चालली होती. राजकीय सुधारणा करूं इच्छिणाऱ्या लोकांमध्येंहि माझिनीचे विचार व त्याचे मार्ग नापसंत ठरत चालले होते. गुप्त मंडळ्या, गुप्त कट असल्या मार्गापेक्षां राजरोस रीतीनें सनदशीर चळवळ करण्याचा मार्गच अधिक श्रेयस्कर आहे असें बहुतेक एकराष्ट्रीयत्ववाद्यांस आतां वाटूं लागलें होतें. * त्यामुळें त्यांच्यांत आणि

---

* माझिनीच्या उत्तेजक व मनोविकारोद्दीपक विचारांनीं इटलींतील देशभक्तांत मोठी जागृति झाली ही गोष्ट खरी; परंतु त्याचें राजकीय ध्येय व तें साध्य करण्याचे मार्ग त्या देशांतील लोकांच्या पूर्वपरंपरेस अनुसरून नसल्यामुळें त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले व तसें होणें अगदीं स्वाभाविक होतें. अनियंत्रित राजसत्तेच्या जुलमी अंमलाखालीं ज्या राष्ट्राचीं शतकेंच्या शतकें गेलीं तेथें परकीयांचें राजकीय वर्चस्व असतांना एकदम लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापन करण्याची हांव बाळगणें हें काल्पनिकदृष्ट्या अथवा बौद्धिकदृष्ट्या किती जरी श्रेष्ठ असलें तरी तशी गोष्ट घडून येणें बहुतेक अशक्यच आहे. इटलींतील राष्ट्रोद्धारक पक्षानें पुष्कळसें मनुष्यबळ व द्रव्यबळ खर्चीं घालून ही अशक्यता अगदीं उघडपणें सिद्ध

[ पुढें चालू ]

अधिकारीवर्गांत जी भयंकर तेढ उत्पन्न झाली होती ती पुष्कळ अंशानें कमी होत चालली होती. त्या कारणानें रेलवेंची वाढ, उद्योगधंद्यांची अभिवृद्धि इत्यादि गोष्टी सुलभ रीतीनें घडून येत होत्या. इ० स० १८४० पासून १८४६ पर्यंत इटलींतील बहुतेक मोठमोठ्या प्रमुख भागांतून रेलवे रस्ते बांधण्यांत आले व खुद्द **पीडमॉन्ट** संस्थानांतहि सर्वत्र रेलवे करण्याचें काम सुरू झालें होतें. इ० स० १८४६ त **काव्हूरनें** ह्या रेलवेपासून कोणकोणते महत्त्वाचे फायदे होतील हें, "Nouvelte Revue" नामक एका मासिकांत एक लेख प्रसिद्ध करून लोकांच्या नजरेस आणलें होतें. त्यांत तो म्हणतोः—

दळणवळणाच्या ह्या सुलभ मार्गामुळें लोकांच्या हरएक बाबतींतील हालचालीस विशेष उत्तेजन मिळेल. व आजपर्यंत एका भागांतले लोक दुसऱ्या भागांतील लोकांस जे परक्यासारखे वाटतात तोहि प्रकार यापुढें बंद होऊन त्यांच्या वारंवार गांठी पडण्यास व त्यांच्या मनांतील विकल्प, स्थानिक मत्सर आणि क्षुद्र भावना नष्ट होण्यास ह्या लोहमार्गांचा विशेष उपयोग होईल. × × × × असें व्हावें अशी आमची उत्कट इच्छा आहे. तसें झाल्यास इटॅलियन स्वातंत्र्याप्रीत्यर्थ तो एक आपण विजयच मिळविला असें होईल." वगैरे.

---

करून ठेविली आहे. **माझिनीं**चे मार्ग खुद्द त्याच्याच देशांत निष्फळ ठरले व त्याचें राजकीय ध्येयहि अव्यवहार्य ठरल्यामुळें **इटलीचें** पुनरुज्जीवन होण्याचे वेळींहि तें साध्य होऊं शकलें नाहीं, हें लक्षांत घेतलें असतां, हिंदुस्थानांतील लोकांनीं त्या मार्गांचें अवलंबन करणें व त्या ध्येयाचें चिंतन करणें किती धोक्याचें व निरर्थक आहे, हें वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. कोणत्याहि देशांत कसलीहि सुधारणा करणें झाल्यास ती त्याच्या पूर्वपरंपरेस धरूनच केली पाहिजे. तसें न करितां दुसऱ्या देशांतील नवीन व दिसण्यांत मोहक अशा संस्था व चळवळी आपल्या परंपरेचा व परिस्थितीचा विचार न करितां जर येथील लोक येथें आणूं लागतील तर त्यांच्या सामर्थ्याची निष्कारण हानि होऊन कालाचा अपव्यय मात्र होईल हें उघड आहे. **इटलीप्रमाणेंच हिंदुस्थानच्या** पूर्वपीठिकेचा विचार केल्यास येथेंहि लोकसत्ताक राज्यपद्धति (Republic) स्थापन करण्याची हांव बाळगणें वेडे-

[ पुढें चालू ]

वरीलप्रमाणें रेलवे व औद्योगिक प्रगति झाल्यामुळें मध्यम वर्गातील लोकांची भौतिक स्थिति फार सुधारली. संपत्तीच्या वाढीबरोबरच विद्येची व कलांचीहि अभिवृद्धि होऊं लागली. राजकीय विषयांची चर्चा करण्यास जरी अद्याप सवलत मिळाली नव्हती तरी इतर प्रकारचें वाङ्मय उत्पन्न करण्यास सरकाराकडून उत्तेजन मिळूं लागलें होतें. लोकांची वाचनाची हौसहि सारखी वाढत चालली होती. अर्थात् कित्येक सुंदर व सचित्र वाङ्मयात्मक मासिकेंहि सुरू झालीं होतीं. ह्या मासिकांतून प्रतिभासंपन्न लेखकांकडून मधूनमधून राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करणारे गर्भित विचार प्रदर्शित होत होते. लोकांनाहि त्यांच्या ह्या विचारप्रदर्शनांतून इष्टार्थ ओळखून काढण्याची संवय झालेली असल्यामुळें राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेचें जनतेंत हळुहळु संवर्धन होत चाललें होतें. इ० स० १८४० पासून पोपच्या अंमलाखालची संस्थानें खेरीज करून इतर सर्व संस्थानांतील मुख्य शहरीं दरसाल शास्त्रीय व औद्योगिक परिषदा भरूं लागल्या होत्या. त्यामुळें तर उपर्युक्त राष्ट्रीय भावनेच्या संवर्धनास फारच मदत होत होती. ह्या परिषदांच्या द्वारानें देशांतील बहुतेक विद्वान् व कर्त्या पुरुषांच्या संमेलनाचा व विचारविनिमयाचा योग येत असे. या सर्वांच्या मनामध्यें या वेळीं (इ० स० १८४३–४६) राजकीय सुधारणा घडवून आणण्याचे विचार घोळूं लागले होते. माझिनीप्रमाणेंच त्या काळीं दुसरा एक प्रतिभासंपन्न लेखक उत्पन्न झाला होता; त्याचें नांव गोबर्ती असें असून तो पीडमॉन्टच्या संस्थानचा रहिवाशी होता. परंतु इ० स० १८३३ त तो ब्रुसेल्स येथें पळून जाऊन राहिला होता. त्यानें इ० स० १८४३ त एक पुस्तक (Il Primato morale e

---

पणाचें आहे. येथील परिस्थिति व पूर्वपरंपरा यांचा विचार करितां येथें नियंत्रित राजसत्ता (Constitutional Monarchy) अथवा फार झालें तर एका बलाढ्य मध्यवर्ती सत्तेच्या अनुरोधानें चालणारा अनेक भागांचा एक संघ स्थापन करणेंच योग्य व शक्य आहे.

civile degli Italiani " प्रसिद्ध करून त्यांत इटलीची राजकीय सुधारणा तेथील पूर्वपरंपरेस अनुसरून कशी करितां येईल याची त्यानें सविस्तर चर्चा केली. " पोपच्या अधिसत्तेखालीं इटलींतील सर्व संस्थानांचा संघ (Federation) बनविल्यास राजकीयदृष्ट्या त्या देशास विशेष बळकटी येऊन राजकीय सुधारणेचा मार्ग विशेष सुकर होईल " असें ह्या लेखकाचें मुख्य प्रतिपादन होतें. ह्या पुस्तकांतील विचारसरणी नेमस्तपणाची असल्यामुळें तें इटलींत येण्यास मनाई झाली नाहीं. तें पुष्कळांच्या हातीं पडलें व त्यांतील विचारहि पुष्कळांना आवडले. या पुस्तकांत पोपचें वर्चस्व कबूल करण्याची व इतर संस्थानांचें अंतःस्वातंत्र्य कायम राखण्याची कल्पना प्रतिपादलेली असल्यामुळें तें कोणत्याहि संस्थानांतील अधिकाऱ्यांस फारसें अप्रिय होण्याजोगें नव्हतें. यामुळें त्याच्या प्रसारास कोणाकडूनहि मनाई झाली नाहीं. त्यांतील विचारांच्या अनुरोधानें राजकीय प्रगति घडवून आणणारा एक नेमस्त राजकीय पक्ष लवकरच निर्माण झाला व त्यानें उघडपणें सनदशीररीतीनें राजकीय चळवळ सुरू केली. राष्ट्रीयऐक्यसंवर्धनासंबंधानें माझिनी व गोवर्ती ह्या दोघांच्याहि मनांत सारखीच तळमळ असल्याचें दिसून येतें. परंतु राजकीय सुधारणेचें अंतिम साध्य व तें साधण्याचे मार्ग यासंबंधानें मात्र उभयतांत बराच मोठा भेद होता. गोबर्तीचा प्रयत्न वर्तमानस्थितीस धरून भावी स्थितीची रचना करण्याचा असल्यामुळें व्यवहार्य व शक्य कोटींतील होता; उलटपक्षीं माझिनीचा प्रयत्न प्रचलित राजसंस्थांचा नाश करून त्या जागीं राष्ट्राच्या पूर्वपरंपरेस अननुभूत अशा नवीन राजसंस्थेची स्थापना करण्याचा—अर्थात् अव्यवहार्य व अत्यंत दुर्घट—असा होता. गोवर्ती उघड सनदशीर चळवळीचा पुरस्कर्ता होय व माझिनी हा गुप्त व क्रांतिकारक चळवळीचा पुरस्कर्ता होय. याप्रमाणें ह्या दोन विचारवंत तत्त्वज्ञांत मोठा भेद असल्यामुळें व दोघेहि प्रतिभासंपन्न लेखक असल्यामुळें दोघांच्या अनुयायांची संख्याहि बरीच मोठी होती. तथापि माझिनीच्या मार्गाचें निष्फलत्व लोकांच्या नजरेस नुकतेंच येऊन चुकल्यामुळें

जनतेचा कल दिवसानुदिवस गोबर्तीनें प्रस्थापिलेल्या नेमस्त पक्षाकडे विशेष झुकूं लागला होता. पोपच्या अधिसत्तेखालीं इटलीचें राष्ट्रीय ऐक्य घडवून आणण्याचा ह्या पक्षाचा बाणा असल्यामुळें त्यास 'New Guelfs' असें नांव मिळालें. ( Guelf म्हणजे बादशहाच्या उलट पोपची बाजू उचलून धरणारा सभासद).

गोबर्तीचें वरील पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर लवकरच बाल्बो नामक दुसऱ्या एका पीडमॉन्टवासीय लेखकानें याच विषयावर आणखी एक पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत त्यानें पोपच्या अधिसत्तेसंबंधीं गोबर्तीच्या कल्पनेचें अभिनंदन केलें. परंतु 'इटलीमध्यें राष्ट्रीय-ऐक्य घडवून आणणें असेल तर त्याच्यावरील ऑस्ट्रियाचें वर्चस्व प्रथम नाहींसें केलें पाहिजे' अशी सूचना मोठ्या कळकळीनें केली, व तीहि लोकांस पसंत पडूं लागली.

गोबर्ती यानें पोपच्या अधिसत्तेखालीं सर्व इटॅलियन संस्थानांचें संघीकरण करण्याची कांहीं अंशीं व्यवहार्य व सुंदर कल्पना तत्कालीन पुरोगामी पक्षापुढें मांडली खरी. परंतु ती अंमलांत आणणें त्या वेळीं फार दुर्घट दिसत होतें. पोपच्या गादीवर त्या वेळीं असलेला पुरुष पूर्णपणें एककल्ली व अनियंत्रित राजसत्तेचा भक्त होता. यामुळें त्याचीं संस्थानें भौतिक सुधारणेंतहि प्रतिगामी धोरण स्वीकारणारीं बनलीं होतीं. ह्या संस्थानचा राज्यकारभारहि अव्यवस्थित व जुलमी असा होता.* अशा स्थितीमुळें पुरोगामी पक्षाच्या इच्छेप्रमाणें पोपच्या अधिसत्तेखालीं इटॅलियन

---

* इंग्रज इतिहासकार मेकाले यानें ह्या स्थितीचें चित्र स्वानुभवावरून पुढीलप्रमाणें रेखाटलें आहे:—" The states of the Pope are, I suppose, the worst governed in the civilized world; and in the imbecility of the Police, the venality of the public servants, the desolation of the country, and the wretchedness of the peopple, force themselves on the observation of the most heedless traveller—*Macaulay's Letters from Rome*.

[ पुढें चालू ]

राष्ट्र तयार करण्याचा पाया घालणें बहुतेक अशक्य होऊन बसलें होतें. तथापि पुरोगामींनीं त्या दिशेनें प्रयत्न सुरू ठेवले होते. त्यांची ही चळवळ पाहून पोपनें त्यांचा छल करण्यास सुरुवात केली; तरीहि त्यांनीं आपलें काम चालू ठेवलेंच. त्यांचा पुढारी फारिनी यानें आपल्या पक्षातर्फे एक जाहिरनामा काढून त्यांत त्या पक्षाच्या मागण्या लोकांपुढें मांडल्या. त्यांचा सारांश असाः—

(१) राजकीय कैद्यांना पूर्ण माफी मिळावी.

(२) स्वदेशांतील दिवाणी व फौजदारी कायदे युरोपांतील इतर सुधारलेल्या देशांच्या कायद्यांच्या तोडीचे करावेत.

(३) म्युनिसिपल कौन्सिलच्या सभासदांची निवडणूक लोकमतानें व्हावी व ती पोपनें पसंत करावी.

(४) म्युनिसिपल कौन्सिलनें सुचविलेल्या तीन सभासदांतून कोणातरी एकाची पोपनें प्रांतिक सल्लागारमंडळांत नेमणूक करावी, व प्रांतिक सल्लागारमंडळानें सुचविलेल्या तीन सभासदांपैकीं एकाची वरिष्ट प्रतीच्या सल्लागारमंडळाकरितां नेमणूक करावी.

(५) ह्या सर्व मंडळांना जमाखर्चावर ताबा ठेवतां यावा व इतर सर्व बाबतींत त्यांना सल्लामसलत देण्याचे अधिकार असावेत.

(६) कोणत्याहि मनुष्याला सर्व प्रकारच्या सरकारी नोकरींत शिरण्याचा समान हक्क असावा.

(७) लेखन व भाषण स्वातंत्र्याची मुस्कटदाबी करणारे कायदे रद्द व्हावेत.

---

याचा भावार्थः—पोपच्या अंमलाखालील संस्थानांइतकी खराब राज्यव्यवस्था माझ्या मतें सुधारलेल्या जगांत दुसऱ्या कोठेंहि नाहीं. पोलिसांचा नेभळपणा, सरकारी नोकरांचा लांचखाऊपणा, देशांतील उध्वस्तपणा व प्रजेची हीनदशा ह्या गोष्टी अगदीं वरवर पहाणाऱ्या प्रवाशाच्यादेखील नजरेस आल्यावांचून रहात नाहींत.

(८) परकीय लष्करास रजा देऊन स्वदेशी लष्कर बनविण्यांत यावें.

(९) कालाला व परिस्थितीला अनुसरून युरोपांतील इतर सुधारलेल्या राष्ट्रांतील सर्व सामाजिक सुधारणा येथेंहि होऊं द्याव्यात. त्यांस उत्तेजन मिळत असावें. वगैरे.

ह्या मागण्या अर्थातच तत्कालीन पोपला मान्य होण्याजोग्या नव्हत्या. तेव्हां साहजिकच त्या मागणारांचीं तोंडें बंद करण्याचे जुलमजबरदस्तीचे प्रयत्न त्याच्याकडून झाले. त्यावरून त्याच्या संस्थानांतील कांहीं लोकांनीं चिडून जाऊन दंगाधोपा केला (इ० स० १८४५). तो दंडुक्याच्या जोरावर मोडून टाकण्यांत आला. परंतु त्यामुळें पुरोगामी पक्षाची चळवळ मात्र बंद पडली नाहीं. उलट त्यांच्या मागण्यांना सर्वत्र जाहीररीतीनें प्रोत्साहन मिळूं लागलें. तेव्हां त्यांनीं आपली चळवळ एकसारखी चिकाटीनें चालू ठेविली. अखेरीस त्यांच्या ह्या चळवळीचा परिणाम पीडमॉन्टचा राजा चार्लस आल्बर्ट याच्या मनावर झाला व त्याला स्वतःच्या तरुणपणच्या उदार मतांची आठवण होऊन त्याचें अंतःकरण पुरोगामींकडे वळूं लागलें. इ० स० १८४६ त त्यानें जकातीसंबंधाच्या एका प्रकरणांत ऑस्ट्रियाशीं स्वतंत्र राष्ट्रास साजेसें बाणेदार वर्तन ठेवलें व ऑस्ट्रियाच्या वर्चस्वापासून आपला देश मुक्त करण्याची इच्छा उघडपणें प्रकट केली. इटलींतील इतर संस्थानांच्या स्थितीचा विचार करितां चार्लस आल्बर्टचें वरील कृत्य पुरोगामींचा उत्साह वाढविण्यास विशेष कारणीभूत होण्यासारखें होतें. अर्थात् या वेळेपासून ते त्याला आपला नियंता मानूं लागले.

इ० स० १८४६ च्या जून महिन्यांत पुरोगामींना अनुकूल अशी आणखी एक गोष्ट घडून आली. या वेळीं पायस दी टेन्थ नामक नवीन पोप रोमच्या गादीवर बसला. हा मोठा दयाळु, उदार बुद्धीचा व दिलदार स्वभावाचा माणूस होता. पुरोगामींच्या चळवळीबद्दल त्याच्या मनांत सहानुभूति वसत होती. म्हणून गादीवर येतांच त्यानें त्यांची पहिली मागणी मान्य करून सर्व राजकीय कैद्यांना पूर्ण माफी

दिली. त्याचें हें कृत्य पाहून, गोबर्तीनें सुचविल्याप्रमाणें हा पोप इटलीचें राष्ट्रीय ऐक्य घडवून आणणार अशा प्रकारची आशा लोकांच्या मनांत उत्पन्न झाली. आणि त्या कारणानें पोप राजवाड्याचे बाहेर पडतांच लोक त्याचा रोज जयजयकार करूं लागले. ह्या पोपच्या मनांत जरी पुरोगामी पक्षाचा कार्यक्रम स्वीकारावा अशी इच्छा होती तरी 'रोमन क्युरिया' प्रांतांतील बहुतेक ठळक लोक ह्या कार्यक्रमास विरूद्ध असल्यामुळें व ते त्याच्या मनावर सारखें दडपण घालीत असल्यामुळें त्याचा बराच काल विचार करण्यांत निघून गेला. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन त्याच्या संस्थानांतील पुरोगामींनीं रोम व बोलोग्ना येथें इ० स० १८४७ त आपलीं राजकीय मतें प्रदर्शित करण्याकरितां दोन स्वतंत्र वर्तमानपत्रें काढलीं. तीं सुरू झाल्यावर लवकरच त्यांनीं एक मंडळ (क्लब) हि स्थापलें. लोकमताची ही वाढती लाट पाहून अखेर पोपनें लोकनियुक्त सभेची संस्था स्थापन करण्याचा आपला ठराव जाहीर केला. त्याला 'क्युरिया' प्रांतांतील लोकांनीं पुष्कळ विरोध केला. परंतु अखेर ह्याच सालच्या नोव्हेंबर महिन्यांत त्या मंडळाचें पहिलें अधिवेशन झालें. ह्यानंतर सुमारें वर्ष दीड वर्ष तसेंच गेलें. पण तेवढ्या काळांत पोपचें उदाहरण पाहून इतर संस्थानांतील लोकहि जास्त जोरानें चळवळ करूं लागले. सॅक्सनीमध्यें पोपच्या धर्तीवर (राजकीय) सुधारणा होऊं लागल्या. पीडमॉन्टचा राजा चार्लस आल्बर्ट यानें तर सर्व लोकांच्या पुढें 'इटालियन स्वातंत्र्याचें' ध्येय उघडपणें ठेवलें व तें साध्य करण्याच्या प्रयत्नास तो प्रोत्साहन देऊं लागला. इ०स० १८४६ त जिनोआ येथें एक मोठी शास्त्रीय परिषद भरली. त्या वेळीं त्यानें अनेक देशभक्तांना आपली जिह्वा मोकळी सोडण्यास पूर्ण सवलत दिली होती. तथापि त्यानें आपल्या राज्यपद्धतींत अद्याप बिलकुल सुधारणा केली नव्हती. त्याच्या विचारांतील व आचारांतील विरोध पाहून एका तद्देशीय कवीनें त्याजवर एक व्याजोक्तिपर काव्य रचिलें व त्यांत सौम्यपणें त्यानें त्याची कानउघाडणी केली. याच सुमारास ब्रिटिश वकील लॉर्ड मिंटो याची व

चार्लस आल्बर्टची एक मुलाखत झाली; व त्या मुलाखतींत पीडमॉन्ट-मध्यें राजकीय सुधारणा करण्याबद्दल मिंटोनें इंग्रज सरकारातर्फे त्यास आग्रहाची सूचना केली. चार्लस आल्बर्टची बुद्धि कांहीं अंशीं अनिश्चित होती. त्या कारणानें त्याच्या मनांत असलेल्या योजना अंमलांत आणण्याचें काम त्याच्या हातून झटकन् होत नसे. 'करूं कीं नको' या विचारांतच तो बहुधा घुटमळत असे. पण उपर्युक्त काव्य आणि मिंटोची भेट या दोन गोष्टींमुळें त्याचा एतद्विषयक निश्चय कायम ठरला, व त्यानें इ० स० १८४७ च्या आक्टोबर महिन्याच्या अखेरीस इच्छित सुधारणा जाहीर करणारा खलिता प्रसिद्ध केला. त्याअन्वयें लोकांना प्रांतिक व स्थानिक सभांचे सभासद निवडून देण्याचा हक्क मिळाला. आणि पोलिस व न्याय खात्यांतहि अवश्य त्या सुधारणा होऊन लेखनस्वातंत्र्यासहि बरीच सवलत मिळाली. पीडमॉन्टचें उदाहरण पाहून टस्कनीच्या राजानेंहि त्याचें अनुकरण केलें. तात्पर्य, काव्हूर ज्या अनुकूल परिस्थितीची वाट पहात होता ती वरीलप्रमाणें तयार होत आली होती. ही परिस्थिति उत्पन्न होत असतांना काव्हूर मोठमोठ्या औद्योगिक कारखान्यांच्या घडामोडींत गुंतलेला होता. तें कार्य करीत असतांना त्याचें लक्ष वरील परिस्थितीकडेहि होतेंच. अर्थात् पीडमॉन्टच्या राजानें राजकीय सुधारणांचा उपर्युक्त खलिता जाहीर करितांच त्यानें राजकारणांत प्रत्यक्ष पडण्याची तयारी केली. त्यानें कोणता पेशा स्वीकारला व त्या पेशांत असतांना त्यानें काय काय कामगिरी केली हें पुढील प्रकरणांत सांगूं.

# प्रकरण ५ वें

## काव्हूर वर्तमानपत्र काढतो

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें पीडमॉन्टच्या राजाकडून लेखनस्वातंत्र्यास सवलत मिळतांच **काव्हूरनें ट्यूरिन** येथें एक वर्तमानपत्र काढण्याचा निश्चय केला. ह्या वर्तमानपत्राची स्थापना करण्याकरितां तो लवकरच (इ० स० १८४७) **ट्यूरिन** शहरीं येऊन दाखल झाला. तेथें **काऊंट केसरे बाल्बो** नामक एका विद्वान् गृहस्थाचें त्यास साहाय्य मिळालें. **काव्हूरला** वर्तमानपत्राच्या धंद्याची कांहींच माहिती नव्हती. तथापि वर्तमानपत्र चालविण्याची कला शिकण्याचा निश्चय करून त्यानें उपर्युक्त विद्वानांच्या साहाय्यानें "*It Risorgimento*" नामक एक लहानसें वर्तमानपत्र सुरू केलें. या पत्राबरोबरच **रोम** येथें व **टस्कनी** प्रांतांतहि नवीन राजकीय वर्तमानपत्रें सुरू झालीं.

**काव्हूरनें** जेव्हां वरील पत्र काढलें त्या वेळीं स्वजनांमध्यें त्याची प्रसिद्धि झालेली नव्हती. फ्रेंच व स्विस मासिकांत यापूर्वी त्यानें जे चांगले लेख लिहिले होते ते **पीडमॉन्टच्या** लोकांस वाचावयास मिळालेले नव्हते. शिवाय तो सरदारपुत्र असल्यामुळें आणि तशांत त्याच्या बापानें पोलिस खात्यांतील प्रमुख अधिकाऱ्याची जागा पत्करलेली असल्यामुळें लोकांचीं मनें सामान्यतः त्याच्याविषयीं संशयग्रस्तच होतीं. पीडमॉन्टमध्यें या वेळीं स्थापितसत्तावादी (कॉन्झरव्हेटिव्ह) उदारमतवादी (लिबरल) व मूलगामी किंवा ज्वलज्जहाल (रॅडिकल) असे तीन राजकीय पक्ष होते. ह्या तिन्ही पक्षांतील लोकांचें मत त्याच्याविषयीं प्रतिकूल होतें. त्याचीं मतें सुधारणेच्या बाजूचीं असल्याचें पहिल्या वर्गांतील लोकांस ठाऊक असल्यामुळें ते त्याचा विरोध करीत असत. त्याच्या सामाजिक दर्जामुळें व त्याच्या बापाच्या वर्तनामुळें उदार

पक्षांतील लोकांचा त्याजवर विश्वास नव्हता, आणि मूलगामी (म्हणजे ज्वलज्जहाल) पक्षांतील लोकांस त्याचीं मतें फार नेमस्तपणाचीं वाटत असल्यामुळें व त्याचे मार्ग त्यांला पसंत नसल्यामुळें तेहि त्याच्याविषयीं उदासीन होते. अशा परिस्थितींत **काव्हूरनें** आपलें पत्र सुरू केलें. परंतु त्याला ह्या परिस्थितीचें कांहीं वाटलें नाहीं. त्याचें राजकीय ध्येय व तें साध्य करण्याचे मार्ग त्याच्या मनांत ठरलेले होते आणि त्या मार्गांचें निष्ठापूर्वक अवलंबन केल्यानंतर कालांतरानें लोकमत आपल्या बाजूस वळेल अशी त्यास खात्री वाटत होती. यास्तव लोकाराधन करण्याच्या नादीं न पडतां तो आपलें ठरीव कर्तव्य करण्यासच उत्साहानें तयार झाला.

**काव्हूरनें** वर्तमानपत्र काढलें त्या वेळीं नवीन राजकीय चळवळीचा प्रसार **इटलींतील** बहुतेक संस्थानांतून झालेला होता; तो पाहून **ऑस्ट्रि-यानें** त्यास आळा घालण्याचे प्रयत्न सुरू केले होते. **लांबर्डी व व्हेनि-शिया** हे प्रांत तर **ऑस्ट्रियाच्या** ताब्यांत होतेच. यांखेरीज जीं संस्थानें त्याच्या अंकित होतीं तेथेंहि सैन्य पाठवून इटॅलियन लोकांची चळवळ मोडून टाकण्यास त्यानें सुरुवात केली. यामुळें कित्येक संस्थानांतील लोकांनीं व लोकांच्या आग्रहामुळें तेथील राजांनीं **ऑस्ट्रियाचें** वर्चस्व झुगारून देऊन प्रातिनिधिक शासनपद्धति सुरू केली. ह्या संधीचा फायदा घेऊन **जिनोआ** परगण्यांतील लोकांनीं **पीडमॉन्टचा** राजा **चार्लस आल्बर्ट** याजकडे नवीन राजकीय सुधारणांची मागणी करण्याकरितां एक अर्ज तयार करून तो त्यास नजर करण्याकरितां एक प्रतिनिधिमंडळ (Deputation) **ट्यूरिन** येथें पाठविलें (जानेवारी १८४८). ह्या मंडळाच्या मागण्यांची चर्चा करण्याकरितां त्या वेळीं **इटलींतील** प्रमुख वर्तमानपत्रकारांची एक सभा बोलावण्यांत आली, व त्यांत **काव्हूरलाहि** निमंत्रण करण्यांत आलें. ह्या सभेंतच प्रथमतः **काव्हूरनें** आपल्या राजकीय मतांचा स्पष्ट रीतीनें जाहीर उल्लेख केला. जिनोईज लोकांनीं मुख्यतः जेजुइट लोकांना हद्दपार करून आपल्या शहरीं संरक्षक सैन्य (Civic Guard) ठेवण्यांत यावें अशी

मागणी केली होती. त्यावर सदर सभेंत वादविवाद चालू असतां काव्हूर म्हणाला, " जिनोईज लोकांचें मागणें अगदीं अल्प आहे. प्रस्तुत परिस्थितींत तेवढ्यानें काम भागणार नाहीं. राजकीय सुधारणेचें आपलें ध्येय साध्य होण्यास नियमबद्ध प्रातिनिधिक शासनपद्धति स्थापन करणारी शासनपत्रिकाच ( Constitution ) आपण मिळविली पाहिजे; त्यावांचून दुसरी तोड नाहीं. " काव्हूरच्या तोंडून हे शब्द निघतांच तेथें जमलेल्या सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. कारण, त्या वेळीं पीडमॉन्टमध्यें शासनपत्रिकेची भाषा तोंडांतून बाहेर काढणें हें अत्यंत धाडसाचें गणलें जात होतें. काव्हूरचें वरील म्हणणें ऐकून कित्येकांना त्याच्या हेतूविषयीं संशय उत्पन्न झाला व कांहींजणांस त्याची मागणी अप्रयोजकपणाची वाटली. यामुळें या विषयाचा अखेर निकाल लावण्याचें काम दुसऱ्या दिवसापर्यंत तहकूब ठेवण्यांत आलें. मध्यंतरीं पीडमॉन्टच्या राजानें जिनोईज प्रतिनिधिमंडळाची मुलाखत घेण्याचें नाकारलें. दुसऱ्या दिवशीं भरलेल्या वर्तमानपत्रकारांच्या सभेंतहि " Concardia " पत्राचा संपादक व पुरोगामी पुढारी व्हॅलेरियो यानें शासनपत्रिकेच्या मागणीस जोराचा विरोध केला. अखेर ज्या थोड्या पत्रकारांना काव्हूरची सूचना पसंत पडली त्यांनीं शासनपत्रिकेची मागणी करणारा एक अर्ज तयार करून तो चार्लस आल्बर्ट याजकडे पोष्टानें रवाना केला! थोड्या दिवसांनीं ह्या अर्जाविषयीं आपल्या एका मित्राजवळ बोलत असतांना चार्लस आल्बर्टनें " इटलीचें पुनरुज्जीवन करण्यास शिपाई पाहिजेत; कायदेपंडित नकोत. इटलीच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या हिताकरितांच नियंत्रित राज्यपद्धति स्थापन करणें इष्ट नाहीं असें माझें मत आहे " असे उद्गार काढले. चार्लस आल्बर्ट गादीवर बसला तेव्हां त्यानें प्रचलित राज्यसंस्था न मोडण्याचा करार केला होता. हा करार मोडण्यास एकाएकीं तयार होणें त्याच्या जिवावर आलें होतें. यामुळें तो वरील अर्जांतील मागणी मंजूर करण्यास तयार नव्हता. तथापि परिस्थिति आतां झपाट्यानें पालटत चालली होती. सिसिली व नेपल्स येथें लोकांचीं बंडें उद्भवून त्यांनीं आपापल्या राजांकडून फ्रान्सांत

१८३० सालीं मुकर झालेल्या शासनपद्धतीच्या धर्तीवर नवीन शासनपद्धति स्थापन करण्याची मंजुरी मिळविली. हें पाहून इतर ठिकाणचे लोकहि अशा प्रकारची शासनपद्धति मिळविण्याची खटपट जोरानें करूं लागले होते. अशा स्थितींत चार्लस आल्बर्टला आपला हेका फार दिवस चालवितां येणें शक्य नव्हतें. म्हणून त्यानें आपल्या कुटुंबांतील प्रमुख मंडळींस बोलावून त्यांच्याशीं ह्या विषयासंबंधानें खलबत केलें. तो म्हणाला, " जर नियमबद्ध राज्यपद्धतीस संमति देणें असेल तर तें काम आपल्या मुलानें करावें. मी आपला राजीनामा देईन. " त्याचें हें म्हणणें ऐकून त्याची राणी भीतीनें स्तिमित झाली! त्याचा नातलग असलेला जिनोआचा ड्यूक त्याची समजूत करूं लागला. ' नियमबद्ध राज्यपद्धति ' म्हणजे कांहीं भयंकर गोष्ट नाहीं हें तो वारंवार व निरनिराळ्या तऱ्हेनें त्याच्या मनावर ठसवूं लागला. त्याचा मुलगा व्हिक्टर इमॅन्युअल यानें तर त्याची राजीनाम्याची कल्पना पार मोडून काढली. तेव्हां त्यानें आपल्या धर्मगुरूची सल्ला घेतली. लोकांना ऐनप्रसंगीं सोडून जाण्याचें पातक हें पाळण्यास अशक्य झालेलें वचन मोडण्याच्या पातकापेक्षां फार मोठें आहे अशी जेव्हां त्या धर्मगुरूनें त्याची खात्री करून दिली तेव्हां अखेरीस त्यानें भीत भीत व कांपऱ्या हातानें भावी शासनपत्रिकेवर मोठ्या दुःखानें आपली सही केली! ह्या पत्रिकेंत असणारीं कलमें इ० स० १८३० मध्यें फ्रान्स देशांत प्रस्थापित झालेल्या शासनपत्रिकेंतील कलमांवरून तयार केलेलीं होतीं. त्याअन्वयें पीडमॉन्ट व जिनोआ या प्रांतातील सर्व लोकप्रतिनिधींच्या दोन मुख्य सभा (चेंबर व सेनेट) निर्माण करण्यांत आल्या; त्यांपैकीं एक बड्या लोकांच्या प्रतिनिधींची असून दुसरी सामान्य म्हणजे मध्यम वर्गातील लोकांची होती. इटलींतील कांहीं संस्थानांत याप्रमाणें राजकीय सुधारणांची चळवळ चालू असतां इकडे पोपनेंहि ' इटलीचें कल्याण असो, त्याचा विजय होवो ' अशा प्रकारचा आशीर्वाद जाहीर रीतीनें दिला; त्यामुळें लोकांचा उत्साह विशेषच वाढला. इतक्यांत फ्रान्समध्यें पुनः राज्यक्रांति झाली. तिचे परिणाम युरोपांतील

प्रत्येक देशावर थोडेफार घडत होते. खुद्द व्हिएन्ना शहरांतलि लोकांनींहि ऑस्ट्रियन बादशहाजवळ शासनपत्रिकेची (Constitution ची) मागणी केली! तें पाहून लांबर्डी व व्हेनिशिया येथील लोकांनींहि ऑस्ट्रियाविरुद्ध बंड करून आपआपल्या हद्दींत स्वतंत्र तात्पुरत्या शासनसंस्था (Provisional Governments) स्थापन केल्या. त्यांचें उदाहरण पाहून इटलींतील इतर संस्थानांतहि तेथील लोकांच्या प्रयत्नामुळें लोकसत्ताक अगर प्रातिनिधिक राज्यसंस्था स्थापन होऊं लागल्या. व ऑस्ट्रियाला इटलींतून हांकून लावण्याचे कामीं लांबर्डी आणि व्हेनिशिया प्रांतांतील लोकांस मदत करण्याची प्रवृत्ति त्यांचे ठायीं सारखी वाढत चालली. लांबर्डीची राजधानी मिलान येथील नूतन सरकारनें पीडमॉन्टच्या साहाय्याची मागणी केली. परंतु चार्लस् आल्बर्टचें मन ह्या प्रसंगीं द्विधा झाल्यामुळें ही मदत मिळण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां काव्हूरनें आपल्या वर्तमानपत्रांत या विषयासंबंधानें एक लेख प्रसिद्ध करून (मार्च २३ इ० स० १८४८) पीडमॉन्टच्या सरकारास पुढीलप्रमाणें उपदेश केला आहे:—

> सॅव्हॉयच्या राजघराण्याला ही उत्तम संधि प्राप्त झाली आहे. या वेळीं दृढनिश्चय केला पाहिजे. याच कालावर साम्राज्यांची व लोकसमाजांची भवितव्यता अवलंबून आहे. लांबर्डी व व्हेनिशियामध्यें घडलेल्या गोष्टी लक्षांत घेतां द्विधा वृत्ति, संशय, विलंब यांना थारा देणें आतां शक्य नाहीं. असलें धोरण सर्वांस अत्यंत हानिकारक होईल. आम्ही शांत डोक्याचीं माणसें असून, विकारवश न होतां नेहमीं विवेकाचीच कांस धरून चालत असलों तरी सुद्धां आपल्या मनोदेवतेस स्मरून व आपल्या प्रत्येक शब्दाचा साधकबाधक विचार करून असें सांगितल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं कीं, राष्ट्राला, प्रधानमंडळाला व राजाला फक्त एकच मार्ग खुला आहे. आणि तो मार्ग म्हटला म्हणजे एका पळाचाहि विलंब न लावितां युद्ध करणें हा होय.

काव्हूरच्या लेखांतील ह्या उताऱ्यावरून त्याची विचारसरणी किती

गंभीर, पोक्त व कुशाग्र स्वरूपाची असे याचा वाचकांस कांहींसा अंदाज करितां येण्यासारखा आहे. त्याचा सदर लेख ज्या दिवशीं प्रसिद्ध झाला त्याच दिवशीं रात्रीं **चार्लस आल्बर्ट** यानें वादविषयक प्रश्नाचा निकाल लावण्याकरितां आपल्या सल्लागार मंडळींस बोलावून यांच्याशीं बराच वेळ खलबत केलें व अखेर **ऑस्ट्रियाबरोबर** युद्ध जाहीर करण्याचा ठराव केला. हा ठराव जाहीर करतांना, **इटलीच्या** ऐक्यदर्शक तिरंगी* राष्ट्रीय निशाणाचाहि **पीडमॉन्टनें** स्वीकार केल्याचें त्यानें जाहीर केलें. हें युद्ध चालविण्याकरितां **चार्लस आल्बर्ट** स्वतः सैन्याबरोबर रणक्षेत्रावर गेला. ह्या युद्धांत प्रथम प्रथम त्यास जय मिळत गेले. परंतु कांहीं महिन्यांनंतर **ऑस्ट्रियन** सैन्यास जसजशी नवीन सैन्याची कुमक मिळत गेली तसतशी **चार्लस ऑल्बर्टच्या** सैन्यास माघार घ्यावी लागली. एकदोन ठिकाणीं त्याचा पराभवहि झाला. तेव्हां दोन्ही पक्षांच्या विचारानें कांहीं दिवस लढाई तहकूब ठेवण्याचा करार ठरला. या मुदतींत **ऑस्ट्रियानें** इतर प्रांतांतील आपलें गेलेलें वर्चस्व पुनः स्थापन करण्याचा प्रयत्न चालविला. तेव्हां देशांतील जहाल लोकांच्या चळवळीस फारच ऊत येऊं लागला. खुद्द **पीडमॉन्टमध्येंहि** त्यांचें वर्चस्व वाढूं लागलें. तेव्हां त्यांच्या स्वैर वर्तनास आळा घालण्याकरितां **काव्हूरला** आपल्या पत्रांतून त्यांच्याविरुद्ध पुष्कळ लेख लिहावे लागले. पार्लमेंटमध्येंहि त्यांना विरोध करण्याचें काम त्यासच करावें लागलें. हें अप्रिय व कटु पण पथ्यकर काम करीत असतांना पार्लमेंटमध्यें कित्येक वेळां त्याच्या प्रतिपक्षाकडून त्याच्या भाषणास अडथळा होत असे. परंतु त्यामुळें तो कधींहि कचरला नाहीं. उलट तो असें म्हणे कीं, "असल्या गडबडगुंड्याला मी भिणार नाहीं. मला जें सत्य वाटतें तें सांगण्यास मी तिळमात्रहि माघार घेणार नाहीं. जे कोणी गोंगाट करून मला अडथळा

---

* तिरंगी निशाण हें **इटलींतील** लष्करी क्रांतिकारक लोकांचें निशाण होतें, तेंच पुढें **चार्लस आल्बर्टनें** आपल्या देशास लागू केलें. त्यांत हिरवा, पांढरा व तांबडा असे तीन रंग होते.

करीत आहेत ते माझा अपमान करीत नसून ह्या सभेचा अपमान करीत आहेत."

ह्या वेळीं पीडमॉन्टची स्थिति फार शोचनीय झाली होती. तेथील सैन्याची इभ्रत पराभवामुळें कमी झालेली होती. हें सैन्य पाठीमागें हटत असतां मिलान येथें खुद्द चार्लस आल्बर्ट याचा अनेक वेळ अपमान करण्यांत आला होता. सरकारी तिजोरींत पैशाची वाण भासूं लागली होती. अशा स्थितींत तेथील राज्यकारभाराचें काम फार सावधपणानें चालविलें पाहिजे असें काव्हूरचें मत होतें; परंतु ऑस्ट्रियाच्या जुलमी वर्तनामुळें तेथील राजकीय वातावरण इतकें क्षुब्ध झालेलें होतें कीं, विचारवंतापेक्षां विकारवश लोकांचेंच राज्यकारभारांत प्राबल्य वाढूं लागलें. अखेरीस चार्लस आल्बर्टलाहि ह्या लोकांना प्रिय असलेला पुरोगामी पक्षाचा पुढारी जो गोबर्ती त्याच्या हातीं राज्यकारभाराची सूत्रें देणें भाग पडलें. परंतु थोड्याच दिवसांत त्याच्या व त्याच्या सहकारी मंडळाच्या दरम्यान तीव्र मतभेद उत्पन्न झाल्यामुळें त्यास आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. त्याच्या पश्चात् मुख्य प्रधानकीचें काम रॅटेझी नामक त्याच्या एका मदतनीस प्रधानाकडे आलें. याची कारकीर्द चालू असतां ऑस्ट्रियाशीं पुनः युद्ध सुरू झालें. हें युद्ध चार्लस आल्बर्ट यानें केवळ लोकमत शांत करण्याकरितां सुरू केलें. तसेंच ह्या खेपस आपल्या सैन्याचें आधिपत्य स्वतःकडे न घेतां तें त्यानें लोकाग्रहास्तव त्सार्नोस्कि नांवाच्या एका पोलिस सेनानीकडे दिलें; परंतु तो उपर्युक्त नाजुक स्थितींत शत्रूचा पराभव करण्यास समर्थ झाला नाहीं. ऑस्ट्रियन सेनापति रॅडेत्झी हा खुद्द पीडमॉन्टच्या हद्दींत शिरला व नोव्हेरा येथें पीडमॉन्टच्या सैन्याचा त्यानें पुरा मोड केला. ही लढाई सकाळपासून संध्याकाळपर्यंत सारखी चालू होती. त्यांत चार्लस आल्बर्ट यानें स्वतः कामास येण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण त्याच्या दुर्दैवामुळें त्यांत त्याला यश आलें नाहीं! वरील लढाईचा निर्णय झाल्यावर त्यानें ऑस्ट्रियन सेनापतीस लढाई तहकूब ठेवण्याची विनंति केली. ती विनंति मान्य करण्यास त्या सेनापतीनें जबर अटी घातल्या. तेव्हां

**चार्लस आल्बर्ट** निराश झाला व आपण गादी सोडल्यास कदाचित् आपल्या मुलाला अधिक सवलतींच्या अटींवर तह करण्याची संधि मिळेल असें त्यास वाटल्यामुळें त्यानें राजीनामा दिला. त्याच दिवशीं रात्रीं तो **पोर्तुगालला** निघून गेला व **ऑपोर्तो** येथें थोड्याच दिवसांत शोकाकुल होऊन मरण पावला ( जुलई २८ इ० स० १८४९ ).

**चार्लस आल्बर्ट** वरीलप्रमाणें निघून गेल्यावर त्याचा पुत्र **दुसरा व्हिक्टर इमॅन्युअल** हा **पीडमॉन्टच्या** गादीवर आला. परंतु तो ज्या स्थितींत गादीवर आला ती अत्यंत शोचनीय होती. गादीवर येतांच अपमानकारक अशा अटींवर युद्ध तहकूब ठेवण्याचा करार त्यास करावा लागला. **व्हिक्टर इमॅन्युअल** हा आपल्या बापापेक्षां अधिक निश्चयी व करारी स्वभावाचा पुरुष होता. राजकारणांतहि तो कांहींसा मुरलेला असल्यामुळें परिस्थितीकडे लक्ष देऊन त्यानें ऑस्ट्रियन सेनापतीच्या अटी तात्पुरत्या मान्य केल्या; परंतु आपल्या देशांत पुनः अनियंत्रित अंमल सुरू करण्यासंबंधीं **ऑस्ट्रियानें** केलेली सूचना मात्र त्यानें मान्य केली नाहीं. **पीडमॉन्टचें** सामर्थ्य प्रातिनिधिक राज्यपद्धतींतच आहे ही गोष्ट त्याला कळून चुकलेली होती. त्याचें वय * अगदीं तरुण ( २९ ) वर्षं असून त्याचा स्वभाव उमदा असल्यामुळें त्याला भावी कालासंबंधानें मोठी आशा वाटत होती. नाइलाजास्तव आज जें आपण गमावीत आहों तें लवकरच पुनः परत मिळवूं व **ऑस्ट्रियाची** चांगली खोड मोडूं अशी त्यास उमेद वाटत होती. त्याच्या मनाची

---

* ह्या राजाचा जन्म **ट्यूरिन** येथील कारिग्नानो नामक राजवाड्यांत ( येथंच पुढें पार्लमेंट सभा भरूं लागली ) ता० १८ मार्च १८२० रोजीं झाला. या वेळीं **चार्लस फेलिक्सच्या** रोषामुळें त्याचा बाप **चार्लस आल्बर्ट हा टस्कनीच्या** ड्यूकच्या दरबारीं ( आपल्या सासुरवाडीस ) सहकुटुंब येऊन राहिला होता. येथें असतांना इ० स० १८२२ च्या सप्टेंबर महिन्यांत एके दिवशीं संध्याकाळीं **व्हिक्टर इमॅन्युअलच्या** बिछान्यासभोंवारच्या पडद्यास आग लागली. त्या वेळीं तो गाढ

[ पुढें चालू ]

स्थिति जरी अशी असली तरी **नोव्हेरा** येथील पराभवानंतर **ऑस्ट्रियाच्या** प्रोत्साहनामुळें **इटलींतील** ठिकठिकाणच्या राज्यकारभारांत जी शोचनीय प्रतिक्रिया सुरू झाली होती तीमुळें **पीडमॉन्टच्या** प्रजेचीं मनें अस्वस्थ होऊन तिलाहि आपल्या राजाच्या हेतूबद्दल संशय उत्पन्न झाला होता. इतर संस्थानांतील राजे जसे ऑस्ट्रियाच्या वजनामुळें बिथरले तसेंच ह्या राजाचेंहि होतें कीं काय अशी शंका तिच्या मनांत घोळूं लागली. यामुळें प्रजेचा त्याच्यावर विश्वास बसेना. अर्थात् तो जेव्हां पार्लमेंटपुढें प्रथमतः शपथ घेण्यास आला तेव्हां त्याचें कोणीं फारसें स्वागत केलें नाहीं, व त्याच दिवशीं ( मार्च २९, १८४९ ) **जिनोआ** येथें लोकसत्तावादी लोकांनीं बंड सुरू केलें. अशा प्रतिकूल परिस्थितींत दुसरा एखादा राजा सांपडता तर तो अगदीं घाबरून गेला असता; अगर त्यानें चिडून प्रातिनिधिक राज्यपद्धति मोडून टाकली असती. परंतु **व्हिक्टर इमॅन्युअल** हा खंबीर मनाचा व विचारी स्वभावाचा असल्यामुळें त्यानें मोठ्या धैर्यानें व शांतपणें ह्या परिस्थितींतून बाहेर पडण्याचा संकल्प केला. सुदैवानें त्यानें एका प्रख्यात देशभक्त व राजनिष्ठ पुरुषाची मुख्य मंत्र्याच्या जागीं निवड केल्यामुळें त्याचा उपर्युक्त संकल्प फलद्रूप होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. या थोर पुरुषाचें नांव **मासिमो डि आझेग्लिओ** असें होतें. हा सरदारकुळांत जन्मलेला असून विद्या व कला यांचा भोक्ता होता. **इटली** देश स्वतंत्र

---

निद्रेंत होता. तेथें फक्त त्याची दाई तेवढी होती. तिनें मोठ्या धिटाईनें ज्वालांमोंत शिरून त्या राजकुलाचा बचाव केला. परंतु त्यामुळें तिच्या अंगचे कपडे पेटून ती भाजली व पुढें मरण पावली. ह्या प्रसंगीं **व्हिक्टर इमॅन्युअल** यासहि थोडीशी इजा झाली. परंतु तींतून तो पार पडला. त्याचा बाप गादीवर बसला त्या वेळीं त्याचें वय ११ वर्षांचें होतें. त्याला लष्करी खेळाची लहानपणीं फार हौस असे. त्याचा स्वभाव आनंदी, उमदा, मोकळा, दिलदारपणाचा असून शिपाईगडी व सामान्य लोक यांचा सहवास त्यास फार आवडत असे. त्याची ही वृत्ति तो मोठा झाल्यावरहि कांहीं काळ कायम होती.

व्हावा अशी त्याची भावना होती व ही भावना व्यक्त करणारी अनेक चित्रें व कादंबऱ्या त्यानें प्रसिद्ध केल्या होत्या. तो सनदशीर चळवळीचा पुरस्कर्ता असल्यामुळें आपले प्रागतिक विचार उघडपणें बोलून दाखवीत असे. यामुळें तो बराच लोकप्रियहि झालेला होता. ऑस्ट्रियाशीं लढाई सुरू होतांच स्वयंसेवक—व्हालंटियर—बनून तो रणक्षेत्रावर गेला होता व तेथें त्याला एकदां भयंकर जखमहि झाली होती. त्याच्या मनांतून मुख्य प्रधानकीची जागा पत्करावयाची नव्हती. परंतु राजाच्या आग्रहामुळें ती त्यानें पत्करिली. आणि त्यामुळें त्यानें आपल्या संस्थानचें खरोखर मोठें कल्याण केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, राजानें त्याची मुख्य प्रधानाचे जागीं नेमणूक केल्याबरोबर राजाच्या सद्हेतूसंबंधानें लोकांच्या मनांत असलेली शंका दूर होऊं लागली. अर्थात् त्यामुळें व्हिक्टर इमॅन्युअलला आपलें राजकीय धोरण सुलभ रीतीनें अंमलांत आणतां येऊं लागलें. पीडमॉन्टची त्या वेळची स्थिति अशी कांहीं विलक्षण होती कीं, राजा व प्रजा ह्यांच्यामध्यें परस्पर विश्वास जर उत्पन्न न होता तर त्या राज्याची अव्यवस्था व दुर्दशा झाल्यावांचून रहाती ना. हा विश्वास डि आझेग्लिओ याच्या प्रधानकीमुळें उत्पन्न झाला. ह्या पुरुषाचें शील व कर्तबगारी लोकांच्या आदरास पात्र झालेली होती. अर्थात् त्याच्या हातीं पीडमॉन्टची राज्यसूत्रें गेलेलीं पहातांच त्यांचा सर्व गैरसमज दूर व्हावा हें अगदीं साहजिकच आहे. डि आझेग्लिओ प्रधान झाल्यानंतर लवकरच जुनी पार्लमेंट मोडून नवी निवडणूक झाली ( जुलई १५, १८४९ ). त्या निवडणुकींत ट्यूरिन येथील कॉलेजातर्फे काव्हूर निवडून आला. पीडमॉन्टच्या पार्लमेंटमध्यें ह्यापूर्वी तो दोनदां निवडून आलेला होता. ह्या वेळेपासून मरेपर्यंत तो सारखा पार्लमेंटचा सभासद होता. त्याच्या भावी राष्ट्रीय कामगिरीला ह्या वेळेपासूनच खरी सुरवात झाली. ती कशी याचें निरूपण पुढील प्रकरणांत करूं.

# प्रकरण ६ वें

## कार्यास प्रारंभ

नवीन पार्लमेंटची बैठक सुरू झाल्यावर तिजपुढें पहिला महत्त्वाचा प्रश्न ऑस्ट्रियाशीं केलेल्या नवीन तहासंबंधानें उपस्थित झाला. ह्या तहान्वयें पीडमॉन्टचा कांहीं प्रदेश ऑस्ट्रियाच्या स्वाधीन करावयाचें ठरलें असून शिवाय त्यास ७ कोटी ५० लक्ष फ्रँक्स नुकसानीबद्दल देण्याचा ठराव झाला होता. नवीन पार्लमेंटमध्यें मूलगामी ( Radical ) पक्षाच्या लोकांचें बरेंच प्राबल्य होतें. तिचा अध्यक्ष पॅरेटो* हाहि याच पक्षाचा होता. अर्थात् ह्या विषयावर जेव्हां पार्लमेंटमध्यें वाद सुरू झाला तेव्हां ह्या तहाच्या अटीस मूलगामी पक्षाकडून पुष्कळ विरोध झाला. सरकारपक्षाचें म्हणणें तर असें होतें कीं, परिस्थिति चमत्कारिक असल्यामुळें सदरहु तह विशेष वाटाघाट न करितां मंजूर करावा; परंतु तसें होण्याचा रंग दिसेना. तह मंजूर न झाल्यास पुनः ऑस्ट्रियाशीं युद्ध सुरु होण्याचा संभव होता, व हें युद्ध तर अधिकारी मंडळास टाळावयाचें होतें. अशा स्थितींत सदर पार्लमेंट मोडून नवीन निवडणूक करण्यावांचून दुसरें गत्यन्तर नव्हतें. मासिमो डी आझेग्लिओ यानें तशा प्रकारची सल्ला दिल्यावरून व्हिक्टर इमॅन्युअलनें नवीन निवडणुकीस मंजुरी देऊन सर्व परिस्थिति लोकांपुढें मांडणारा एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. ह्या जाहीरनाम्याचा जनतेच्या मनावर विल-

---

* हा एके वेळीं चार्लस आल्बर्टचा प्रधान होता. त्यानें जिनोआ येथें नुकतेंच जें बंड झालें त्यांत प्रमुख भाग घेतल्यावरून ऑस्ट्रियानें तर त्यास कडक शासन करण्याचें ठरविलें होतें. परंतु आपल्या बापाच्या प्रधानाच्या जिवास धोका येऊ नये म्हणून व्हिक्टर इमॅन्युअलनें स्वतः मध्यस्थी करून त्यास माफी मिळवून दिली.

क्षण परिणाम घडून आला. लोकांना विश्वासांत घेऊन राज्यकारभार चालविण्याची राजाची मनापासूनची इच्छा आहे अशी त्या जाहीरनाम्यामुळें त्यांची खात्री झाली व त्याचा परिणामहि सर्वांस इष्ट असाच झाला. नवीन निवडणुकीनंतर अधिकारी वर्गास हवें असलेलें बहुमत सहज मिळालें, व ह्या नवीन सभेच्या पहिल्या बैठकींत (९ जानेवारी १८५०) वादविषयक तहाचा खर्डा फारसा वादविवाद न होतां झपाट्यानें पास झाला. हा भानगडीचा प्रश्न ह्याप्रमाणें निकालांत निघतो न निघतो तोंच पाद्री व धर्मोपदेशक यांच्यासंबंधीं एक नवीन भानगडीचा प्रश्न सदर सभेपुढें आला. राजकीय, धार्मिक व सामाजिक बाबतींत व्यक्तिस्वातंत्र्याचें व समतेचें धोरण स्वीकारण्यास पीडमॉन्टच्या सरकारनें प्रारंभ केलेला होता व या धोरणास अनुसरून प्रधानमंडळानें धर्मोपदेशकांना असलेले विशिष्ट हक्क* काढून घेणारें बिल (कायद्याचा मसुदा) तयार केलें होतें; ह्या बिलान्वयें धार्मिक सत्तेचें नियमन करण्याचा राजाचा हक्क पीडमॉन्टमध्यें प्रथमच प्रस्थापित होऊं पहात होता. अर्थात् ती गोष्ट तेथील धर्मोपदेशकांना व त्यांच्या अंधभक्तांना रुचण्याजोगी नसल्यामुळें त्यास त्यांनीं फार तीव्र विरोध करण्यास प्रारंभ केला. देशांतील प्रतिगामी पक्षाच्या लोकांनीं तर त्यास विरोध केलाच; पण पार्लमेंटमधल्या उदार (Liberal) पक्षाच्या कांहीं सभासदांकडूनहि त्यास विरोध होऊं लागला. या आणीबाणीच्या प्रसंगीं काव्हूरनें सुमारें सात दिवसपर्यंत चाललेल्या वादविवादांत

---

* हे हक्क पुढीलप्रमाणें होते:—

(१) त्यांच्यांतील अपराध्यांची चौकशी करण्याकरितां निराळीं न्यायपीठें स्थापलेलीं होतीं.

(२) देवालयांत व इतर पवित्र ठिकाणीं ते असतांना त्यांच्यावर कायद्यांचा अमल चालत नसे.

(३) त्यांच्या हिताकरितां लोकांना मुद्दाम दानधर्म करण्यास भाग पाडणारे कांहीं विशेष उत्सवप्रसंग ठरवून टाकण्यांत आले होते.

११२७



सरकारपक्षाचें फार उत्कृष्ट रीतीनें समर्थन केलें. ह्या भाषणांत त्यानें सरकार व त्याचे प्रतिपक्षी या उभयतांसहि चांगला बोध केला. **पीडमॉन्टच्या** नियंत्रित राजसत्तेस पाठिंबा देऊन ती बळकट व कार्यक्षम करण्यास सर्व देशहितेच्छूंनीं तयार झालें पाहिजे, तरच आपला तरणोपाय आहे असें त्यानें प्रधानमंडळाच्या प्रतिपक्षाच्या मनावर ठसविलें. उलटपक्षीं प्रधानमंडळासहि त्यानें इंग्लंडचे प्रख्यात मुत्सद्दी **वेलिंग्टन, ग्रे** व **पील** यांच्या प्रागतिक धोरणाचें निर्भयपणें अनुकरण करण्याची सूचना केली. **काव्हूरचें** हें भाषण पार्लमेंटमधील बहुतेक सभासदांना व गॅलरींतील प्रेक्षकगणांस फार आवडलें. त्याचें अखेरचें भाषण संपल्यावर गॅलरींतील लोकांनीं तो घरीं जात असतां त्याचा मोठा जयजयकार केला. पार्लमेंटमध्यें यशस्वी होण्याचा **काव्हूरचा** हा पहिलाच प्रसंग होय. यापूर्वीं तो बहुतेक सर्व पक्षांच्या लोकांस कांहींसा अप्रिय असल्यामुळें त्याचीं भाषणें लक्ष देऊन फारशीं कोणी ऐकत नसे. यामुळें त्याला आपल्या मतांचें प्रदर्शन मुख्यतः आपल्या पत्रांतूनच करावें लागे. परंतु तो मनु आतां पालटत चालला. वरील वादविवादानंतर त्याच्या पार्लमेंटांतील भाषणांस महत्त्व येत चाललें, व तो जें काय बोलेल तें सर्व सभासद लक्षपूर्वक ऐकूं लागले. ह्या वादविवादाच्या अखेरीस प्रधानमंडळानें आणलेलें बिल बहुमतानें पास झालें. सेनेट मध्येंहि* थोडासा विरोध झाल्यानंतर तें लवकरच बहुमतानें पास करण्यांत आलें (एप्रिल ८,१८५०), हें बिल पास झाल्यानंतर पाद्रीमंडळांत भयंकर असंतोष माजला. कित्येक ठिकाणच्या पाद्रीमंडळांनीं ह्या बिलान्वयें पास झालेला कायदा मोडण्याचा लोकांना उपदेश केला. तेव्हां

---

* **पीडमॉन्टच्या** पार्लमेंटसभेच्या **सेनेट** व **चेंबर** अशा दोन शाखा उर्फ पोटसभा होत्या. पहिली बड्या लोकांची होती व दुसरी सामान्य लोकांची होती. ह्या सामान्य लोकांच्या सभेंत कान्झरव्हेटिव्ह, लिबरल कान्झरव्हेटिव्ह, लिबरल्स व रॅडिकल्स असे ४ मुख्य पक्ष होते. रॅडिकल्स पक्षांत फूट पडून पुढें त्यांतून मॉडरेट रॅडिकल्स व रॅडिकल्स असे दोन पक्ष झाले.

त्यांजवर खटले करण्यांत आले. ह्या सुमारास सॅन्टारोजा नामक शेतकी-खात्याचा प्रधान अत्यंत आजारी पडला. त्यास मरणसमयींचे धर्मसंस्कार करण्याचें पाद्री लोकांनीं नाकारलें. पास झालेल्या कायद्याबद्दल आपला पश्चात्ताप व्यक्त करण्यास जर सदर प्रधान तयार असेल तर आपण त्यास अवश्य ते धर्मसंस्कार करूं असें ट्यूरिन येथील प्रमुख धर्मगुरूनें सांगितलें. सॅन्टारोजा यानें वरील शर्त नाकारली. अर्थात् धर्मसंस्कारां-शिवायच त्यास मरावें लागलें! सॅन्टारोजा हा काव्हूरचा मित्र असल्या-मुळें काव्हूरला ही हकीगत समजतांच त्यानें आपल्या वर्तमानपत्रांतून धर्मगुरूंच्या सदर वर्तनावर कडक टीका करणारा एक लेख लिहिला. त्या लेखाचा ट्यूरिन येथील जनतेवर इतका विलक्षण परिणाम घडला कीं, दुसरें अशा प्रकारचें उदाहरण जर त्या वेळीं घडून येतें तर तेथील पाद्री लोकांचें जीवित खास सुरक्षित राहिलें नसतें! सॅन्टारोजाच्या मृत्यूनंतर सदर कायद्यास विरोध करणाऱ्या दोनतीन प्रमुख पुढाऱ्यांस जबर शासन करण्यांत आलें, व पूर्वीं ज्या कांहीं थोर व समंजस लोकांची पाद्रीवर्गासंबंधानें सहानुभूति होती ती सर्व 'सॅन्टारोजा' प्रकरणामुळें व विशेषतः काव्हूरच्या लेखांतील तीव्र भडिमारामुळें नष्ट होत गेली. यामुळें त्यांचा पक्ष लंगडा पडून ज्या कायद्यांना ते निष्कारण विरोध करीत होते ते कायदे पूर्णपणें अंमलांत आले. ह्या यशाच्या स्मरणानि-मित्त ट्यूरिनच्या लोकांनीं वर्गणी गोळा करून एक स्मारक उभारलें! यावरून सदर कायदे किती लोकप्रिय झाले होते याची वाचकांस चांगली कल्पना होईल.

धर्मगुरूंचें हें वादळ शांत झाल्यानंतर काव्हूरनें इ० स० १८५० च्या जुलई महिन्यांत पार्लमेंटमध्यें भाषण करितांना प्रधानमंडळास इंग्लंडांतील पूर्वोक्त तीन मुत्सद्द्यांचें अनुकरण करून पीडमॉन्टच्या सुस्थितीस व बळकटीस अवश्य असणाऱ्या सुधारणा भराभर करण्याची आग्रहपूर्वक सूचना केली. आणि तसें जर त्यांच्याकडून होणार नाहीं तर आपण त्यांच्या कृत्यास पुष्टि देणार नाहीं असें त्यानें स्पष्टपणें जाहीर केलें. काव्हूरचें महत्त्व पार्लमेंटमध्यें आतां बरेंच वाढलें होतें. त्याच्या

मताला अनुसरून वागणारा असा एक कंपू त्या सभेंत तयार होत होता –किंबहुना झाला होता. अशा स्थितींत त्याच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करणें प्रधानमंडळास अशक्य होत चाललें होतें. म्हणून काव्हूरचा मित्र असलेला युद्ध-मंत्री **ला मामोंरा** यानें काव्हूरला प्रधानमंडळांत घेण्याची सूचना मुख्य प्रधानास केली. मुख्य प्रधान **मासिमो डि आझेग्लिओ** हा फार पोक्त व हुषार माणूस असून शांतताप्रिय होता. **काव्हूर** हा महत्वाकांक्षी व मोठा उलाढाल्या आहे असें त्याचें मत असल्यामुळें त्याला प्रधानमंडळांत घेतल्यास तो भराभर नवीन भानगडी उपस्थित करील असें त्यास वाटत होतें. म्हणून त्यानें प्रथम **ला मामोंराची** सूचना विचारांत घेतली नाहीं. परंतु त्याला बाहेर ठेवून आपला प्रतिपक्षी करून घेण्यापेक्षां त्यास आपल्या मंडळांत घेतल्यास तो अधिक विचारानें व नेमस्तपणानें वागेल व तें अधिक बरें असें जेव्हां **ला मामोंरानें** मुख्य प्रधानास बजावून सांगितलें तेव्हां त्यानें **काव्हूर** यास बोलावून रिकामी झालेली शेतकी व व्यापार खात्याच्या प्रधानाची जागा त्यास देऊं केली. त्यानें ही जागा पत्करण्याचें कबूल केलें; पण त्याच वेळीं शिक्षणखात्याच्या प्रधानास काढून त्या ठिकाणीं आपल्या पसंतीचा मनुष्य घेण्याची शर्त घातली. ही शर्त पाहून **डि आझेग्लिओस** अंमळ वाईट वाटलें; पण अखेर ती त्यानें कबूल केली. याप्रमाणें सर्व ठरल्यावर **डि आझेग्लिओ** यानें **काव्हूरच्या** नेमणुकीस राजाची संमति मागितली. **व्हिक्टर इमॅन्युअल** हा सामान्य राजा नव्हता. तो मोठा धूर्त व राजकारणपटु होता. त्याला मनुष्याची पारखहि चांगली असे. **काव्हूरच्या** नेमणुकीचा खर्डा पाहून **डि आझेग्लिओ** व **ला मामोंरा** यांस तो म्हणाला, " सभ्य गृहस्थहो ! हा माणूस तुम्हां सर्वांस हाकून लावील हें तुम्हांस दिसत नाहीं काय ?" असें जरी तो म्हणाला तरी त्यानें त्या नेमणुकीस हरकत न करितां ती मंजूर केली* ( ११ आक्टोबर १८५० ).

* याच वर्षी **काव्हूरचा** बाप वारला. त्याची आई चार वर्षांपूर्वींच वारली होती; त्यानें स्वतः मुळींच लग्न केलें नाहीं. यामुळें यापुढें तो आपल्या वडील भावाच्या घरींच रहात असे.

या एकंदर प्रकारावरून येवढी गोष्ट उघडपणें सिद्ध होते की, डि आझेग्लिओ व व्हिक्टर इमॅन्युअल ह्या दोघांना काव्हूर आवडत नव्हता तरी त्याच्या अंगच्या कर्तबगारीच्या गुणांमुळें त्यांना त्यास जवळ करणें भाग पडलें! काव्हूरच्या अंगच्या थोर योग्यतेची ह्याहून आणखी कोणती उत्कृष्ट साक्ष पाहिजे? आणि जर पाहिजेच असेल तर ती याच्यापुढील हकीकतींत मिळण्यासारखी आहे. असो. वरील-प्रमाणें अधिकार प्राप्त झाल्यानंतर काव्हूरनें आपले शेतकी व व्यापार-विषयक धंदे व वर्तमानपत्र हीं बंद केलीं. तो आपला सर्व वेळ आपल्या अंगीकृत कार्यास वाहूं लागला. शेतकी व व्यापारी खात्याच्या प्रधानाची जागा इतके दिवस दुय्यम दर्जाची मानली जात असे; परंतु काव्हूर त्या जागेवर आल्यापासून तिचा दर्जा वाढत चालला. शेतकीखात्याचा तसाच व्यापारासंबंधींचाहि त्याला चांगला अनुभव होता. यामुळें रोज त्याचा वेळ कांहींना कांहीं तरी नवीन योजना करण्यांत जात असे. तो खुल्या व्यापारपद्धतीचा चहाता होता. पीडमॉन्टच्या तत्कालीन स्थितींत ही पद्धत फायदेशीर होण्याचा संभव त्यास दिसत असल्यामुळें त्यानें त्या धोरणावर अनेक कायदे केले व फ्रान्स, इंग्लंड व बेल्जम ह्या राष्ट्रांशीं त्यानें व्यापारविषयक तह केले. थोड्याच दिवसांत तो दर्यावर्दी खात्याचाहि प्रधान बनला. एक, दोन, तीन प्रधानांच्या जागेचीं कामें तो एकटा करूं शकत असे. यामुळें प्रधानमंडळांत त्याचें वर्चस्व भराभर वाढत चाललें व थोड्याशा अवकाशांत तो प्रधानमंडळातर्फे बहुतेक सर्व कामें स्वतःच चालवूं लागला! डि आझेग्लिओ यास त्याचें हें धाष्टर्य पाहून अंमळ राग येत असे. परंतु त्याची स्वतःची प्रकृति फार नाजुक झालेली असल्यामुळें व काव्हूरच्या कर्तबगारीसंबंधानें त्याची खात्री होत गेल्यामुळें तो त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत असे. इ० स० १८५१ मध्यें काव्हूरनें जमाबंदीखात्याचा प्रधान निग्रा यास राजीनामा देण्यास भाग पाडलें व त्याचें काम तो स्वतः पाहूं लागला! शिक्षणखात्याची प्रधानकी त्याच्या सूचनेवरून त्याचा मित्र एल्. फारिनि यास देण्यांत आली होती. हा मनुष्य फार

विद्वान् व प्रागतिक मताचा होता. यानें आपल्या खात्याची जी उत्कृष्ट सुधारणा केली तिचा इंग्लंडांतील प्रख्यात मुत्सद्दी ग्लॅडस्टन ह्यानेंहि मोठा गौरव केला होता. यावरून काव्हूरची निर्णयशक्ति व मनुष्याची पारख किती उत्तम प्रकारची होती हें सहज कळून येणार आहे.

काव्हूरनें परराष्ट्रांशीं जे व्यापारविषयक तह केले त्यांचा फायदा त्यानें इटलींतील इतर संस्थानांसहि कमीअधिक प्रमाणानें घेऊं दिला. यामुळें जकातखात्याची उत्तम सुधारणा करणें त्यास फार सुलभ गेलें. "राजसत्ता कायम ठेवून जनतेला शक्य तितके राज्यकारभाराचे हक्क देणें व त्यांची सामाजिक आणि सांपत्तिक उन्नति करून भांडवल आणि मजुरी यांतील वैषम्य काढून टाकणें आणि कनिष्ठ वर्गाची स्थिति सुधारणें" हें काव्हूरचें मुख्य ब्रीद होतें. पीडमॉन्टला समर्थ राष्ट्र बनवून त्याच्या साहाय्यानें सबंध इटलीचें एकराष्ट्र बनविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती व त्या अनुरोधानेंच त्यानें आपला कार्यक्रम आंखलेला होता. पीडमॉन्ट सर्व तऱ्हेनें समर्थ राष्ट्र बनवावयाचें म्हणजे त्याचीं लष्करी व सांपत्तिक अंगें उत्कृष्ट असावयास पाहिजेत हें जाणून त्यानें जमाबंदीखात्याची प्रधानकी आपल्याकडे घेतली. ऑस्ट्रियाची खंडणी, सुधारणांचा वाढता खर्च व तशांत दुष्काळाचीं सालें, इत्यादि कारणांमुळें पीडमॉन्टच्या तिजोरीची फार हलाखी झालेली होती व ती दूर करण्याकरितां नवीन कर बसविणें भाग होतें. परंतु तत्कालीन लोकस्थितीचा विचार करितां कर वाढविणारें धोरण यशस्वी होण्याचा फारसा संभव नव्हता. परंतु काव्हूरनें धारिष्ट करून तें काम हातीं घेतलें व युक्तिप्रयुक्तीनें शेवटास नेलें. काव्हूरच्या वर्तनांतील एक मोठा विशेष असा आहे कीं, तो लोकप्रियतेपेक्षां कर्तव्याची चाड विशेष बाळगीत असे. आणि जेथें कर्तव्यतत्परता व लोकप्रियता यांच्यांत विरोध येई तेथें तो लोकप्रियतेचा त्याग करून कर्तव्यतत्परतेचाच अंगीकार करीत असे. स्वार्थबुद्धीचा तर त्याच्या ठायीं एक लेशहि नव्हता. त्याचीं सर्व कृत्यें 'इटलीचें एकराष्ट्र बनविणें' ह्या एकाच हेतूनें प्रेरित झालेलीं आहेत. ह्या एकाच विषयांत त्याचें मन एखाद्या

छांदिष्ट अगर नादी मनुष्याप्रमाणें अगदीं मग्न होऊन गेलें होतें. आणि त्याच्या एकंदर भावी आयुष्यक्रमाचा विचार करितां तो एवढ्याकरितांच जन्मला असावा असें वाटूं लागतें. असो. काव्हूरची धारिष्टयुक्त कर्तबगारी व डि आझेग्लिओ याचें शांत व उदार धोरण या दोहोंचा मिलाफ झाल्यामुळें व्हिक्टर इमॅन्युअलची कारकीर्द भरभराटीची व लोकप्रिय होत चालली. तो गादीवर येतांच जे लोक त्याच्या हेतूसंबंधानें साशंक बनले होते त्यांचा संशय दूर होऊन ते या राजावर पूर्ण विश्वास टाकण्यास तयार झाले. याच सुमारास माझिनीचा सोबती गोबर्ती यानें पॅरिस येथें "The civil Regeneration of Italy" या नांवाचें एक दुसरें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत त्यानें आपल्या पूर्वीच्या पुस्तकांतील 'पोपच्या अधिसत्तेखालीं इटलीचें पुनरुज्जीवन करण्याची कल्पना' सोडून देऊन पीडमॉन्टच्या साहाय्यानें सदर कार्य कसें करितां येईल याचें काल्पनिक चित्र रेखाटलें होतें. त्यांत पोपची राजकीय सत्ता नष्ट करून रोम शहर हें स्वतंत्र अशा राजसत्तेचें केंद्रस्थान बनवावें असें त्यानें म्हटलें होतें. तसेंच हें कार्य घडवून आणण्याच्या कामीं काव्हूरचा फार उपयोग होईल असेंहि भाकित त्यानें सदर पुस्तकांत करून ठेवलें होतें. काव्हूरची महत्त्वाकांक्षा, त्याची उद्योगलालसा, उत्साह व मानसिक सामर्थ्य यांचें वर्णन करून सदर कार्य सिद्धीस नेण्यास तो अगदीं योग्य माणूस आहे असा अभिप्राय त्यानें व्यक्त केला होता. त्याचा हा अंदाज अगदीं खरा होता असें पुढें घडून आलेल्या गोष्टीवरून कळून येईल. असो. याप्रमाणें काव्हूर व डि आझेग्लिओ यांचें पीडमॉन्टला सुस्थिति व स्थैर्य प्राप्त करून देण्याचे प्रयत्न चालू असतां इकडे ऑस्ट्रियाच्या उत्तेजनामुळें इतर ठिकाणच्या संस्थानांत पुनः राजकीय बाबतींत प्रतिगामी (Reactionray) धोरण सुरू झालें होतें. पुढें इ० स० १८५१ च्या डिसेंबर महिन्यांत फ्रान्सचा राजा लुई नेपोलियन यानें जेव्हां 'बादशहा' हा किताब धारण केला तेव्हां तर इटलींतील प्रतिगामी धोरणाच्या पुरस्कर्त्यांस

फारच चेव आला. कारण, यापुढें आपल्या चळवळीस **फ्रान्स**कडून देखील मदत होईल असें त्यास वाटूं लागलें. ह्या अनिष्ट स्थितीचा परिणाम खुद्द **पीडमॉन्ट** येथील पार्लमेंटवरहि होऊं लागला. **पीडमॉन्ट**च्या पार्लमेंटच्या चेंबरमध्यें (सामान्य लोकांची सभा) सध्यां चार पक्ष होते; ते असे:—(१) राइट सेंटर (२) एक्स्ट्रीम राइट (३) लेफ्ट सेंटर (४) एक्स्ट्रीम लेफ्ट. यांपैकीं पहिले दोन पक्ष सामान्यत: कॉंझरव्हेटिव्ह मताचे स्थापितसत्तावादी होते. परंतु त्यांपैकीं एक्स्ट्रीम राइटचे लोक आतां पूर्ण प्रतिगामी बनत चालले होते. दुसऱ्या दोन पक्षांपैकीं एक पुरोगामी सुधाणावादी व दुसरा मूलगामी (जहाल) किंबहुना क्रांतिकारक (पूर्ण लोकसत्तावादी) होता. कांहीं दिवसांपूर्वीं हा क्रांतिकारक पक्ष वरचढ झालेला होता. त्या वेळीं त्याच्याशीं दोन हात करून सरकारची सत्ता अबाधित ठेवण्याचें काम **काव्हूरनें** केलें होतें. आतां प्रतिगामी पक्ष वरचढ होऊं लागल्यामुळें त्याच्या आघातापासून लोकस्वातंत्र्याचें रक्षण करण्याचें काम त्यास करावयाचें होतें. हें कार्य साधण्याकरितां त्यानें उपर्युक्त दोन्ही 'सेंटर' पक्षांचें ऐक्य घडवून आणण्याची मसलत गुप्तपणें चालविली. 'राईट सेंटर' व 'लेफ्ट सेंटर' हे परस्पर विरोधी पक्ष होते. त्यांचें ऐक्य घडवून आणण्याची कल्पना मुख्य प्रधान **डि आझेग्लिओ** यास पसंत पडण्यासारखी नव्हती. परंतु ती गोष्ट घडून आल्यानंतर मात्र त्यास उघडपणें विरोध करण्यास तो तयार होणार नाहीं अशी तत्कालीन परिस्थितीवरून **काव्हूरच्या** मनाची खात्री झाली होती. म्हणून त्यानें त्यास न विचारतां स्वत:च्याच जबाबदारीवर 'लेफ्ट सेंटर'चा पुढारी **राटेझी** याच्याशीं बोलणें सुरू केलें. **राटेझी** व त्याच्या पक्षाचे लोक पूर्वीं अनेक बाबतींत 'एक्स्ट्रीम लेफ्ट' ऊर्फ मूलगामी पक्षास मदत करीत असत. परंतु **काव्हूरनें** लोकस्वातंत्र्याच्या आपल्या ध्येयास अनुरूप अशा बऱ्याच सुधारणा भराभर केल्याचें पाहून मूलगामी पक्षाच्या कार्यक्रमापासून परावृत्त होण्याकडे त्यांचा कल होऊं लागला होता. अर्थात् **काव्हूरची** इच्छा सफळ होण्यास परिस्थिति आयतीच अनुकूल झालेली होती. तेव्हां

काव्हूर व राटेझी यांची मुलाखत होऊन त्यांचें एक गुप्त खलबत झालें. परंतु राटेझीच्या राजनिष्ठेबद्दल काव्हूरच्या मनांत अद्याप थोडासा संशय होता. तो संशय काव्हूर व राटेझी या उभयतांचा मित्र कॅस्टेली (हा काव्हूरच्या वर्तमानपत्राचा दुय्यम संपादक होता) यानें दूर केल्यानंतर ह्या दोन्ही पक्षांमध्यें परस्परांनीं परस्परांस साहाय्य करण्याचा गुप्त करार ठरला. तथापि ही गोष्ट पुढील पार्लमेंटच्या बैठकींतील (फेब्रुवारी १८५२) वादविवादावरून उघडकीस आली, तेव्हां 'एक्स्ट्रीम राईट'च्या एका सभासदानें, "काव्हूरनें सभेच्या एका भागाशीं काडीमोड करून दुसऱ्या भागाशीं लग्न लावलें*" असा त्याचा उपहास केला, व त्याच्या या धोरणासंबंधीं संशय उत्पन्न करणारी टीकाहि केली. त्या टीकेस उत्तर देतांना काव्हूरनें आपल्या ह्या कृत्यासंबंधानें पुढील खुलासा केला आहे:—

> प्रधानमंडळ हें अजून स्वातंत्र्य, दूरदर्शित्व, नेमस्तपणा, विचारपूर्वक प्रगति याच तत्त्वांना धरून आहे. जर ह्या सभेचे कांहीं नामदार सभासद त्यास या तत्त्वांवर मिळाले असतील तर त्यानें त्यांस आपलें म्हटलें आहे, व त्यांच्यांशीं सख्य करण्यांत त्यास आनंद वाटेल. परंतु असें करतांना ज्या तत्त्वांचा तें आज तीन वर्षें पुरस्कार करीत आहे तीं तत्त्वें झुगारून देण्यांत येणार नाहींत. प्रधानमंडळानें आपलें तारूं निराळ्या दिशेनें वळविलें आहे असें मेनाब्रिया नांवाच्या प्रतिनिधीनें म्हटलें तें खरें नाहीं. त्यानें अशा प्रकारें आपली दिशा बदललेली नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्याला पुढें पाऊल टाकावयाचें होतें, मागें नव्हे.

काव्हूरचा हा कन्यूबिओ (लग्न) म्हणजे तत्कालीन परिस्थितीस अगदीं योग्य असा तोडगा होता. त्यामुळें पीडमॉन्टमध्यें प्रतिगामी लोकांचें वाढत चाललेलें वर्चस्व त्यास तेव्हांच कमी करितां आलें आणि या

* ह्या प्रसंगास कन्यूबिओ (लग्न) असें टोपण नांव प्राप्त झालें व त्याच नांवानें तो इतिहासांत प्रसिद्ध आहे.

कारणामुळें डि आझेग्लिओ यानेंहि त्याच्या ह्या धाडसी कृतीस विरोध केला नाहीं. किंबहुना प्रथम कांहीं दिवस ती त्यास इष्टहि वाटली; परंतु पार्लमेंटमध्यें ह्या मतैक्यामुळें जसजसें काव्हूरचें सामर्थ्य वाढत चाललें तसतसा तो नवीन सुधारणेच्या योजना वेगानें पुढें आणूं लागला. त्यामुळें डि आझेग्लिओ व तो यांच्यामधला मतभेद तीव्र-तर होत चालला. अखेर राटेझीला संतुष्ट राखण्याकरितां जेव्हां काव्हूरनें डि आझेग्लिओस न विचारतां त्याला चेंबरचा अध्यक्ष नेमल्याचें जाहीर केलें तेव्हां मात्र काव्हूरला व त्याजबरोबरच त्याचा मित्र फारिनि (शिक्षणखात्याचा प्रधान) यांस राजीनामा देणें भाग पडलें (जून १८५२). तथापि त्यामुळें त्याच्या डि आझेग्लिओशीं असलेल्या खाजगी स्नेहसंबंधांत मात्र व्यत्यय येऊं शकला नाहीं. सार्वजनिक मतभेदामुळें खाजगी स्नेह तोडण्यास तयार होण्याइतकी क्षुद्र बुद्धि डि आझेग्लिओच्या ठिकाणीं बिलकुल नव्हती; तशांत काव्हूरच्या कित्येक गुणांचा तर तो मोठा चहाता होता. यामुळें काव्हूरविषयीं तरी निदान त्याच्या मनांत द्वैतभाव येणें शक्य नव्हतें. आणि त्याच्या ह्या प्रेमळ भावनेमुळेंच पुढें लवकरच काव्हूरला मुख्य प्रधान होण्याची संधि प्राप्त झाली.

# प्रकरण ७ वें

## काव्हूर मुख्य प्रधान होतो

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें काव्हूरनें राजीनामा दिल्या-नंतर तो फ्रान्स व इंग्लंड या देशांची सफर करण्यास निघून गेला. जाण्यापूर्वी शिष्टाचारास अनुसरून तो व्हिक्टर इमॅन्युअलची भेट घेण्यास गेला होता. त्या वेळीं त्याला निरोप देतांना व्हिक्टर इमॅन्युअल हंसत हंसत म्हणाला कीं, "तुम्हांला पुनः प्रधानमंडळांत बोलावण्यास अद्याप पुष्कळ अवकाश आहे." तें ऐकून काव्हूरहि गालांतल्या गालांत हंसला, व राजाचा निरोप घेऊन निघून गेला.

या खेपेस इंग्लंडमध्यें त्याचा चांगला जयजयकार झाला. त्यानें पीडमॉन्टच्या पार्लमेंटमध्यें घडवून आणलेला 'कन्यूबिओ' चा प्रकार तेथील प्रमुख मुत्सद्द्यांस पसंत पडला. इंग्लंडचा मुख्य प्रधान लॉर्ड पाल्मर्स्टन यानें तर त्याच्या हेतूसंबंधानें सहानुभूति प्रदर्शित करून तो सिद्धीस नेण्याच्या कामीं इंग्लंडचें नैतिक पाठबळ देण्याचें कबूल केलें. लोकनियंत्रित राज्यपद्धतीचा पीडमॉन्टमध्यें चालू अस-लेला प्रयोग आपणास कौतुकास्पद वाटतो असेंहि त्यानें काव्हूरजवळ बोलून दाखविलें, व तो प्रयोग यशस्वी व्हावा म्हणून पीडमॉन्टच्या अधिकारी मंडळास शक्य तितकें साहाय्य करण्याकरितां सर जेम्स हडसन नामक एका उदारमतवादी मनुष्यास ट्यूरिन येथील ब्रिटिश वकिलाच्या जागेवर नेमिलें. याप्रमाणें लंडनच्या मुत्सद्दी व अधि-कारी मंडळाची इटॅलियन राष्ट्रीयत्वाच्या कार्यास सहानुभूति मिळ-वून काव्हूर पॅरिस येथें आला. तेथें त्यानें सर्व पक्षांच्या राजकीय पुढाऱ्यांचा परस्पर द्वेष नष्ट करून त्यांच्यामध्यें समेट करून दिला. तेथील राज्यक्रांतीचा उल्लेख करून तो त्यांस म्हणाला, "झाल्या गोष्टी

होऊन गेल्या; त्याबद्दल कीस काढण्यांत हंशील नाहीं. त्यांचा यापुढें राष्ट्राला कसा उपयोग करून घेतां येईल याचा विचार करणें हेंच मुख्यत: मुत्सद्दी लोकांचें यापुढील कर्तव्य होय." बादशाहा **नेपोलियन** * यांचीहि **काव्हूरनें** मुलाखत घेतली व आपला मित्र **राटेझी** यासहि त्यानें सदर बादशहाच्या भेटीस बोलावून नेलें. या वेळीं त्यानें **राटेझीला** जें पत्र लिहिलें त्यांत तो म्हणतो कीं, "आपणाला आवडो अगर न आवडो, **पीडमॉन्टची** भवितव्यता पुष्कळ अंशीं **फ्रान्सवर** अवलंबून आहे. तेव्हां **फ्रान्सच्या** भावी राजकीय धोरणाचे आपण भागीदार होणें जरूर आहे." **काव्हूरचा** चेहरा व त्याची बोलण्याची ऐट हीं कोणाच्याहि मनावर एकदम परिणाम करण्यासारखीं असल्यामुळें पहिल्याच भेटींत त्यानें **नेपोलियनला** गार करून टाकलें व त्याच्या मनावर आपल्या बुद्धीची छाप बसविली. **नेपोलियन** हा बाह्यत: जरी कठोर स्वभावाचा दिसत असे तरी एकंदरींत त्याचें अंत:करण कोमल (Emotional) होतें. **काव्हूरची** तरतरी, राजकारणचातुर्य व त्याची एकंदर दिलदारपणाची वागणूक पाहून तो त्याच्यावर फार प्रसन्न झाला. त्यानें **काव्हूरजवळ** अनेक राजकीय प्रश्नांची चर्चा केली व तो **पॅरिस** येथें असेपर्यंत त्यानें त्याच्या अनेक मुलाखती घेतल्या. याच सफरीमध्यें **काव्हूरनें** **पॅरिस** येथें हद्दपारी वगैरेमुळें जाऊन राहिलेल्या बहुतेक इटॅलियन देशभक्तांची ओळख करून घेतली व त्यांच्याविषयीं सहानुभूति व्यक्त केली. या सर्व मंडळींत **व्हेनिसचा** पुढारी **डानियल मॅनिन** याची विचारसरणी व वागणूक हीं त्यास विशेष आवडलीं. '**इटलीचा** पुनरुद्धार' 'The civil regeneration of Italy' (मागील प्रकरण पहा.) या पुस्तकाचा कर्ता

---

* इ० स० १८५१ मध्यें राज्यक्रांति होऊन **नेपोलियन** हा लोकमताच्या आधारावर तेथील बादशहा बनला व तेव्हांपासून तो **तिसरा नेपोलियन** या नांवानें प्रसिद्ध झाला; परंतु त्यापूर्वी तो फ्रेंच शासनसंस्थेचा अध्यक्ष असे व त्यास **प्रिन्स प्रेसिडेंट** असें म्हणत.

गोबर्ती हाहि त्यास तेथें भेटला. या उभयतांची भेट अत्यंत प्रेमळ-पणाची झाली हें सांगावयास नकोच. याप्रमाणें परदेशांत लौकिक संपादन करून व नवीन महत्त्वाच्या ओळखी करून काव्हूर लवकरच स्वदेशीं परत आला. तों इकडे पुनः पार्लमेंट व पाद्रीवर्ग यांच्यामध्यें तंटा उत्पन्न झालेला होता.* मुख्य प्रधान डि आझेग्लिओ याच्या पायाची जखम पुनः उकलली असल्यामुळें तो आजारी होता. तसेंच पाद्री-वर्गाचा पक्ष घेणाऱ्या पोपशीं मिळतें घेण्याबद्दल व्हिक्टर इमॅन्युअ-लच्या आईनें व बायकोनें त्यास आग्रह सुरू केला होता. अशा स्थितींत सरकारचा पक्ष सांवरून धरण्यास मुख्य प्रधानाच्या अंगीं विशेष प्रकारचें अवसान पाहिजे होतें. तें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें डि आझे-ग्लिओ याच्या ठिकाणीं उरलें नव्हतें. म्हणून त्यानें राजीनामा देऊन आपल्या जागीं काव्हूरची योजना करण्याची सल्ला व्हिक्टर इमॅन्यु-अल यास दिली. त्यावरून त्यानें काव्हूरला बोलावून त्याची संमति विचारली, आणि मुख्य प्रधान झाल्यावर पोपशीं तडजोड करावी अशी सूचना त्यानें त्यास केली. काव्हूरला ती सूचना पसंत नव्हती. म्हणून त्यानें आपला एक जुना मित्र काउंट बालबो यास मुख्य प्रधानाची जागा देण्याबद्दल राजास कळविलें. त्याप्रमाणें राजानें त्यास ती देऊं केली. परंतु ती त्यानें नाकारली. तेव्हां अधिक भानगड न करितां सारासार विचार करून राजानें ती जागा काव्हूरला बिनशर्त स्वीकारण्याची सूचना केली. अर्थात् त्यानें ती मान्य केली ( नोव्हेंबर, १८५२ ). मुख्य प्रधान होतांच काव्हूरनें जुन्या प्रधानमंडळांतूनच इतर बहुतेक प्रधान निवडून घेतले व आपला राजकीय दोस्त राटेझी यास पुढें लवकरच प्रधानमंडळांत जागा देण्याची आशा त्यानें लावून ठेवली; यामुळें तोहि संतुष्ट झाला. मुख्य

---

* हा तंटा सिव्हिल मॅरेज बिल ( विवाहनोंदणीचा कायदा ) यावरून उपस्थित झाला होता. चेंबरनें तें बिल पास केलें. परंतु पाद्र्यांचें वर्चस्व असलेल्या सेनेटनें तें नामंजूर केलें व पोपहि त्या बिलाविरुद्धच होता.

प्रधानकीच्या जागेखेरीज जमाबंदीखात्याच्या प्रधानाचें कामहि त्यानें आपल्याकडेच घेतलें. याप्रमाणें इटलीच्या इतिहासांत "*Gran ministero*"—मोठें प्रधानमंडळ—नांवानें प्रसिद्ध असलेल्या व आधुनिक इटॅलियन राष्ट्र बनविण्यास समर्थ झालेल्या प्रधानमंडळाची रचना झाली. काव्हूरला आपलें राजकीय ध्येय सिद्ध करून दाखविण्यास जी संधि व सत्ता पाहिजे होती ती तर मिळून चुकली. परंतु एवढ्यानें त्याचा मार्ग सुकर झाला असें मात्र नाहीं. पीडमॉन्टचें राष्ट्र अवघें ५० लक्ष लोकवस्तीचें असून नोव्हेरा येथील पराभवामुळें हतवीर्य झालेलें होतें. त्याची सांपत्तिक स्थितिहि समाधानकारक नव्हती. तसेंच त्यास कोणा बलाढ्य मित्राचा आश्रयहि नव्हता. अशा स्थितींत ह्या छोट्याशा राष्ट्राच्या द्वारें सुमारें ४ कोट लोकसंख्येच्या ऑस्ट्रियन राष्ट्राचा नक्शा उतरून—कारण, त्यावांचून इटलीला स्वातंत्र्य मिळून त्याचें एकराष्ट्र बनणें शक्य नव्हतें—इटॅलियन राष्ट्राचें एकीकरण कसें करावें हा अत्यंत बिकट प्रश्न त्यास सोडवावयाचा होता. अर्थात् त्यास मुख्यतः पुढील तीन गोष्टी अगोदर साधणें जरूर होतें. त्या अशाः—(१) पीडमॉन्टचें लष्करी सामर्थ्य वाढविणें. (२) देशाची सांपत्तिक स्थिति सुधारून सरकारी तिजोरीची सुव्यवस्था करणें. (३) कोणा तरी बलाढ्य राष्ट्राचा अगर राष्ट्रांचा स्नेह संपादन करणें व तें घडवून आणण्यासाठीं आपल्या राष्ट्राची इभ्रत वाढविणें. ह्या तीन गोष्टी साध्य केल्यावांचून इटॅलियन राष्ट्राचें एकीकरण करणें अशक्य आहे असें काव्हूरचें ठाम मत बनलें होतें व तें योग्य होतें. कारण, या वेळेपर्यंत माझिनीच्या गुप्त संस्थांनीं इटलींतील निरनिराळ्या शासनसंस्था उलथून पाडून त्या सर्वांच्या जागीं एकच लोकसत्ताक शासनसंस्था स्थापन करण्याचे क्रांतिकारक असे गुप्त व उघड अनेक प्रयत्न केले; पण ते सर्व ऑस्ट्रियाच्या लष्करी सामर्थ्यापुढें निरुपयोगी ठरले. अर्थात् असल्या उपायांनीं इष्ट कार्य केव्हांहि घडून येणार नाहीं अशी आतां इटलींतील बहुतेक नरम-गरम पुरोगाम्यांची खात्री होत चालली होती. काव्हूर तर पहिल्यापासूनच ह्या मार्गाच्या विरुद्ध होता. त्याचें धैर्य अथवा धाडस

कमी होतें असें नाहीं. परंतु राजकीय घडामोडींत प्रत्येक पक्षानें नेहमीं आपल्या व प्रतिपक्षाच्या बलाबलाचा विचार करून युक्तीनें जें काय करितां येईल तेंच केल्यास यश येतें, अशी त्याची खरीखुरी समजूत असल्यामुळें तो क्रांतिकारक चळवळीपासून अलिप्त राहिला होता. ऑस्ट्रियाचें इटलीवरील वर्चस्व नष्ट करण्यास पद्धतशीर रीतीनें व चिकाटीनें दीर्घ प्रयत्न केले पाहिजेत व त्यांकरितां युरोपांतील बलाढ्य राष्ट्रांची सहानुभूति किंबहुना मदत मिळविली पाहिजे, आणि त्या मदतीचा योग्य प्रकारें उपयोग करून घेण्याइतकें सामर्थ्य पीडमॉन्टमध्यें निर्माण केलें पाहिजे असें त्याचें मत होतें. अर्थात् पीडमॉन्टचीं सर्व राज्यसूत्रें त्याच्या हातीं येतांच तो या तयारीस लागला. पीडमॉन्टची भौतिक व नैतिक प्रगति करण्याचें काम त्यानें प्रथम हातीं घेतलें. तसेंच लष्करी खात्याचा प्रधान ला मार्मोरा यासहि त्यानें लष्कर सुधारण्याचे बाबतींत पूर्ण मोकळीक दिली. त्यानें सरकारी तिजोरीची स्थिति सुधारण्याकरितां कर वाढविण्याचें अप्रिय काम पुनः सुरू केलें. आणि त्याबरोबरच रेलवे, शेतकीस उपयुक्त असलेले कालवे व इतर सुधारणा आणि दळणवळणाचे सार्वजनिक मार्ग यांची वाढ व सुधारणा भराभर सुरू केली. या सर्व सुधारणा करण्यास अर्थातच पैसा मुबलक हवा होता, व तो उत्पन्न करण्याकरितां काव्हूरनें मुख्यतः मध्यम व बड्या वर्गातील लोकांवर विशेषतः भार पडेल असे बरेच नवीन कर बसविले होते. गरीब लोकांवर करांचा बोजा असह्य होऊं नये याबद्दल मात्र त्यानें बरीच खबरदारी घेतली होती. परंतु मध्यम वर्गांतील कांहीं लोक त्याच्या ह्या धोरणास प्रतिकूल होते. त्यांनीं त्याच्यासंबंधानें सामान्य जनतेंत गैरसमज उत्पन्न केला व त्याचा परिणाम असा झाला कीं, ते लोक चिडून काव्हूरच्या प्राणावर हल्ला करण्यास तयार झाले. अशा प्रकारचा एक प्रयत्न इ०स० १८५३ च्या आक्टोबर महिन्यांत करण्यांत आला. परंतु त्यापासून त्याच्या जिवास धोका पोंचूं शकला नाहीं. तथापि त्या वेळीं त्यास रस्त्यांतून एकटें फिरणें धोक्याचें झालें होतें.

याच सुमारास न्यायखात्यांतील प्रधानाची जागा रिकामी झाली. ती काव्हूरनें मुद्दाम नेमस्त जहाल पक्षाचा पुढारी राटेझी यास दिली. त्यामुळें लोकमत आपोआप शांत झालें व ज्या कांहीं लोकांनीं काव्हूरच्या विरुद्ध लोकांत गैरसमज उत्पन्न करण्याची खटपट चालविली होती ती लंगडी पडली. राटेझीला पुढें काव्हूरनें लवकरच अंतर्गत कारभाराच्या प्रधानकीची ( Home minister ची ) जागा दिली. काव्हूरनें आपल्या पूर्वींच्या अमदानींत राटेझी व त्याचा पक्ष यांच्याशीं सख्य ( कन्यूबिओ ) केलेलें वाचकांस माहित आहेच. राटेझीला प्रधानमंडळांत घेऊन त्यानें हें सख्य अधिक दृढ केलें, व त्यायोगानें त्याला राजा व प्रजा यांच्यावर राष्ट्रीय कामगिरीप्रीत्यर्थ आपल्या इच्छाशक्तीचा अंमल बसविणें सुकर झालें. शक्तीशिवाय मस्ती–कुस्ती व्यर्थ आहे हें तत्त्व काव्हूर चांगलें जाणत होता. म्हणून पीडमॉन्टच्या सैन्याची पुनर्घटना होईपर्यंत त्यानें ऑस्ट्रियाशीं अत्यंत स्नेहाचें व व आदराचें धोरण ठेवलें. तें इतकें कीं, तें पाहून प्रख्यात ऑस्ट्रियन मुत्सद्दी मेटर्निच हा देखील थक्क झाला! परंतु ऑस्ट्रियाशीं ठेवलेलें हें गोडीगुलाबीचें धोरण फार दिवस टिकूं शकलें नाहीं. इ० स० १८५३ त लांबर्डी प्रांतांत माझिनीच्या चिथावणीवरून तेथील लोकांनीं पुनः बंड केलें; पण मागीलप्रमाणें हेंहि बंड ऑस्ट्रियानें मोडून टाकलें. ह्या प्रांतांतले कांहीं रहिवाशी पीडमॉन्टच्या आश्रयास पूर्वींच येऊन राहिले असून ते त्या संस्थानचे नागरिक बनले होते. त्यांच्या जमीनी लांबर्डी प्रांतांत होत्या. ह्या नव्या बंडांत या लोकांचें अंग आहे अशा समजुतीनें त्यांच्या सदर जमीनी जप्त करण्याचा ठराव ऑस्ट्रियन सरकारनें जाहीर केला. येथें पीडमॉन्टच्या इभ्रतीचा नाजूक प्रश्न उपस्थित झाला. कारण, राष्ट्राराष्ट्रांतील कायद्याप्रमाणें ह्या लोकांचें वरील बंडांत अंग असल्याचें प्रत्यक्ष खात्रीत झाल्यावांचून त्यांच्या मिळकती जप्त होऊं देणें हें पीडमॉन्टला अपमानास्पद होतें. अर्थात् या वेळीं स्वस्थ बसणें काव्हूरला शक्य नव्हतें. तो मोठा धोरणी, विचारवंत व सावधपणानें वागणारा मुत्सद्दी होता हें खरें; परंतु जेथें सारासार विचार

(Prandence) म्हणजे भ्याडपणा असें मानलें जाण्याची भीति असे तेथें व राष्ट्रीय इभ्रतीच्या बाबतींत तो अंमळ धाडसानेंच वागत असे. ऑस्ट्रियाच्या सदर ठरावाचा निषेध ऊर्फ प्रतिकार करणें आपल्या छोट्याशा राष्ट्रास अशक्य आहे हें तो जाणून होता. परंतु अशा वेळीं भेकड वृत्ति स्वीकारणें हेंहि आपल्या देशाच्या भावी उत्कर्षास घातुक आहे ह्या विचारानेंहि त्याचे अंतःकरणास तळमळ लागली होती! तेव्हां त्यानें प्रथम युरोपियन राष्ट्रांकडे त्या कृत्याबद्दल तक्रार करण्याचा निश्चय केला. फ्रान्स व इंग्लंड या देशांत काव्हूरचें अनेक मित्र व गुप्त मसलतगार होते. त्यांच्यामार्फत त्या त्या राष्ट्रांतील हालचालींची व त्यांच्या पीडमॉन्टविषयक मनोवृत्तीची माहिती काव्हूरला नित्य मिळत असे. इतर महत्त्वाच्या राष्ट्रांतूनहि अशा प्रकारची उपयुक्त माहिती मिळविण्याचीं गुप्त अगर उघड साधनें त्यानें तयार करून ठेवलेलीं होतीं. या दक्षतेमुळें त्याला आपलें धोरण सिद्धीस नेण्यास फार मदत होत असे. एकंदरींत मुत्सद्द्याचें उत्कृष्ट कलानैपुण्य त्याच्या अंगीं पूर्णपणें वास करीत होतें यांत शंका नाहीं. इंग्लंड व फ्रान्स ह्या दोन्ही देशांतील मत वरील बाबतींत स्वतःला अनुकूलच होण्याचा संभव आहे असें त्याला कळून आलें. तसेंच इकडे ला मार्मोरा यानेंहि आपल्या सैन्याची तयारी असल्याचें त्यास कळविलें. तेव्हां त्यानें ऑस्ट्रियाच्या वरील ठरावाबद्दल बलिष्ठ युरोपियन राष्ट्रांकडे तक्रार करून खुद्द ऑस्ट्रियासहि त्याबद्दल जाब विचारला. या दोन्हीं राष्ट्रांनीं आपापले वकीलहि स्वदेशीं परत बोलावले. परंतु सुधारलेल्या बहुतेक युरोपियन राष्ट्रांना काव्हूरची तक्रार वाजवी वाटल्यामुळें त्यांनीं त्याच्या म्हणण्याचें समर्थन करून ऑस्ट्रियाच्या सदर कृत्याचा निषेध केल्यामुळें पीडमॉन्टशीं युद्ध जाहीर करण्याचें धार्ष्ट्य ऑस्ट्रियानें केलें नाहीं. परंतु ऑस्ट्रिया या गोष्टीचा डाव पुढेंमागें साधल्यावांचून रहाणार नाहीं हें काव्हूर जाणून होता. शिवाय इटलीचें एकीकरण करण्याकरितां तरी ऑस्ट्रियाबरोबर आपणांस केव्हां तरी युद्ध केलेंच पाहिजे हें त्यास पूर्णपणें कळून चुकलें होतें. तेव्हां अशा प्रसंगीं पीडमॉन्टला

कोणा तरी बलाढ्य राष्ट्राची मदत मिळवून ऑस्ट्रियास एकटें लढण्यास भाग पाडण्याची योजना कशी करावी या विचारांत तो गर्क होऊन गेला. इतक्यांत फ्रान्स व इंग्लंड यांनीं रशियाविरुद्ध लढाई जाहिर केली ( क्रिमियन वॉर, इसवी सन १८५५ ). रशियानें तुर्कस्थानपासून क्रिमिया प्रांत घेण्याकारितां सुरू केलेल्या लढाईत फ्रान्स व इंग्लंड यांनीं तुर्कस्तानच्या वतीनें रशियाशीं युद्ध सुरू केलें. त्या युद्धांत त्यांना विशेष अडचणी उपस्थित झाल्यामुळें त्यांनीं ऑस्ट्रियास आपल्या बाजूस वळविण्याची खटपट चालविली होती. परंतु ऑस्ट्रियन बादशहा झारच्या विरुद्ध लढण्यास कबूल नव्हता. तथापि वरील दोन राष्ट्रांचे त्यास आपल्यातर्फे युद्धांत ओढण्याचे प्रयत्न चालूच होते. त्यांचा फारसा उपयोग होण्याचा संभव नाहीं असें दिसूं लागतांच त्यांनीं पीडमॉन्टला आपल्या मदतीस बोलाविलें. काव्हूर अशा प्रसंगाची वाटच पहात होता. किंबहुना तो जुळवून आणण्याकरितां त्याचीं कारस्थानेंहि चाललीं होतीं. त्यानें वरील दोन राष्ट्रांस मदत करण्याचें कबूल केलें. परंतु त्यासंबंधींचा निश्चित करार मुक्रर होणें बरेंच कठिण होतें. काव्हूरचा परराष्ट्रीय खात्याचा प्रधान डॅबोरमिडा यानें सदर राष्ट्रांस जी यादी सादर केली त्यांत, युद्धानंतर इटॅलियन प्रश्नाचा विचार करावा व तोंपर्यंत लांबर्डी प्रांतांतील जमीनदारांच्या मिळकती जप्त करण्याचें तहकूब ठेवण्यास ऑस्ट्रियाला भाग पाडावें असें आश्वासन त्यानें मागितलें. परंतु सदर दोन्ही राष्ट्रें ऑस्ट्रियाला दुखविण्यास कबूल नसल्यामुळें त्यांनीं तशा प्रकारचें लेखी आश्वासन देण्याचें नाकारलें. तथापि काव्हूरला हा प्रसंग फुकट घालवावयाचा नव्हता. म्हणून त्यानें डॅबोरमिडास राजीनामा देण्याची सूचना केली. त्यानें तसें केल्यानंतर तो स्वतःच परराष्ट्रीय खात्याचा प्रधान बनला व त्याच दिवशीं ( जानेवारी १० इ० स० १८५५ ) संध्याकाळीं त्यानें सदर राष्ट्रांच्या तोंडी आश्वासनावर समाधान मानून त्यांच्याशीं तुल्यारिमित्रत्वाचा तह केला. त्याच्या ह्या कृतीस व्हिक्टर इमॅन्युअल याची मनापासून संमति होती. याप्रमाणें हा तह झाला खरा. परंतु तो

पार्लमेंटच्या दोन्ही सभेंत पास होणें फार मुष्किलीचें काम होतें. चेंबरमधल्या मूलगामी पक्षाच्या सभासदांकडून त्यास फार तीव्र विरोध होत होता. "तुर्कस्थानासारख्या रानटी राष्ट्राला मदत करून राजकीय स्वातंत्र्याची प्रगति करण्याचा हा मार्ग खासा आहे! ऑस्ट्रिया ज्या बाजूस असणार त्या बाजूस मदत करून राष्ट्रकार्याचें संवर्धन करण्याची ही खाशी युक्ति आहे!" अशी उपहासास्पद टीका हे लोक करूं लागले होते. ब्रोफेरियो नामक एका जहाल पुढाऱ्यानें तर "अर्थशास्त्रदृष्ट्या हा तह उधळपट्टीचा, लष्करीदृष्ट्या मूर्खपणाचा व राजकारणाच्या दृष्टीनें गुन्ह्यासारखा आहे" असें स्पष्टपणें जाहीर केलें. अर्थात् ह्या तहासंबंधानें पार्लमेंटच्या चेंबरमध्यें भयंकर वादविवाद सुरू झाला. या वादविवादांत काव्हूरनें मोठ्या गंभीरपणानें व शांतपणानें आपल्या प्रतिपक्षीयांची समजूत केली. हा तह करतांना पीडमॉन्टपेक्षां सर्व इटलीच्या भावी स्थितीचा प्रश्न आपल्या डोळ्यापुढें विशेषेंकरून होता व तो प्रश्न सोडविण्यास ह्या तहापासून आपणास पुष्कळ उपयोग होणार आहे ही गोष्ट त्यानें चेंबरमधल्या सभासदांच्या मनावर मोठ्या कळकळीनें ठसविली. * तेव्हां अखेरीस ९५ विरुद्ध ६४ मतानें सदर तह चेंबरनें पास केला. सेनेटमध्येंहि त्या तहाच्या प्रश्नावर बरींच रणें माजलीं.

---

* ह्या वेळीं त्यानें केलेल्या भाषणांतील पुढील उतारा मननीय आहे:—

"ह्या तहाचा इटलीला कधीं तरी उपयोग होईल काय व झालाच तर कसा होऊं शकेल असा प्रश्न विचारण्यांत येईल. त्याला माझें असें उत्तर आहे कीं, युरोपखंडाच्या सद्य:स्थितींत आम्हांला किंवा दुसऱ्या कोणालाहि इटलीचा उद्धार करण्याचा जो मार्ग मोकळा आहे फक्त त्याच मार्गानें उपयोग होईल. इटलीची स्थिति सुधारण्याला अत्यंत अवश्यक व महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे त्याची इभ्रत पुन: प्राप्त करून घेणें ही होय. असें केलें असतां जगांतील सर्व लोकसमाज—शास्ते व शासित हे दोघेहि—त्याच्या गुणाचें चीज करतील. यासाठीं दोन गोष्टी अवश्यक आहेत. त्यांपैकी पहिली, इटलीच्या अंगीं योग्य रीतीनें वागण्याइतकें व

[ पुढें चालू ]

पण तेथेंहि तो अखेर बहुमतानें पास झाला. लवकरच काव्हूरनें ला मार्मोरा याजबरोबर पीडमॉन्टचें सैन्य इंग्लंड व फ्रान्स यांच्या मदतीस पाठविलें. हें 'तह-प्रकरण' संपतें न संपतें तोंच दुसरा एक भानगडीचा प्रश्न उपस्थित झाला. इटलीमध्यें पोपचें वर्चस्व फार प्राचीनकाळापासून असल्यामुळें त्याची सत्ता बहुतेक ख्रिस्ती राजांवरहि चालत असे. इटलींतील निरनिराळ्या संस्थानांवर तर ती विशेषच चाले. त्याची ती सत्ता ऑस्ट्रियानेंहि कबूल केली होती. परंतु पीडमॉन्टमध्यें राजसत्ता व धर्मसत्ता ह्या परस्परांपासून अलग ठेवण्याचा व राजकीयदृष्ट्या धर्मोपदेशकांचा दर्जा इतर प्रजाजनांसारखाच ठरविण्याचा प्रयत्न सुरू होता. अर्थात् धर्मोपदेशकांच्या वर्गाला असलेल्या विशिष्ट संवलती काढून घेणारे कायदे पीडमॉन्टच्या पार्लमेंटमध्यें होऊं घातले होते. त्यांपैकीं कांहीं कायदे यापूर्वीं पास झालेले होते व कांहीं पास व्हावयाचे होते. यांपैकीं सरकारी खर्चानें चाललेल्या कांहीं विशिष्ट धर्मसंस्था बंद करण्याविषयींचा कायदा सध्यां चेंबरपुढें आला होता. या बिलास पाद्रीवर्गाकडून तीव्र विरोध होणार हें ठरल्यासारखेंच होतें, व त्याचा विचार काव्हूरनें अगोदरच केलेला होता. परंतु दुर्दैवानें त्या वेळीं व्हिक्टर

---

स्वतंत्रतेनें आपलें आपण राज्य चालविण्याइतकें राजकीय शहाणपण असून आज काल ज्या राज्यपद्धति उत्तम म्हणून गणल्या गेल्या आहेत त्या अंमलांत आणण्यास लायक आहे असें युरोपला दाखविणें ही होय. दुसरी गोष्ट, आपलें युद्धसामर्थ्य आपल्या पूर्वजांच्या तोडीचें आहे हें सिद्ध करणें ही होय. गतकालीं हें कार्य तुम्हीं करून दाखविलें आहे, त्यापेक्षां अधिक नाहीं तरी निदान तितकें कार्य तुमच्या हातून यापुढें व्हावयास पाहिजे. इटलीच्या पुत्रांना शूर योद्ध्यांना साजेल असें रणांगणावर लढतां येतें हें आमच्या देशानें युरोपच्या निदर्शनास आणून दिलें पाहिजे. आणि सद्‌गृहस्थहो ! माझी खात्री आहे कीं, पूर्वेकडील प्रदेशांत ( क्रिमिया ) आमचे सैनिक जो विजय मिळवितील तो इटलीच्या भावी उत्कर्षास—आपल्या वक्तृत्वानें व लेखांनीं इटलीचा पुनरुद्धार करीत आहों अशी ज्यांची समजूत आहे, त्यांच्या हातून जें कांहीं झालें आहे त्या सर्वांपेक्षां—अधिक पोषक होईल. ''

इमॅन्युअल याची बायको, आई व भाऊ हीं सुमारें एका महिन्याच्या आंत वारल्यामुळें त्याचें मन साहजिकच खिन्न व उदास झालें होतें. तशांत, पाद्रीवर्गाच्या साहाय्यकांनीं त्याच्या मनोदौर्बल्याचा फायदा घेऊन, पाद्रीवर्गाविरुद्ध केलेल्या कायद्यामुळें त्याजवर असा हा ईश्वरी क्षोभ झाला असें त्याच्या मनांत भरवून दिलें. व सध्यां चेंबरपुढें असलेला कायद्याचा मसुदा परत घेतल्यास त्यापासून होणारें सांपत्तिक नुकसान भरून देण्याची एक योजनाहि त्यांनीं त्याच्यापुढें मांडली. या सर्व गोष्टी जमून येण्याच्या आंत काव्हूरनें त्वरा करून सदर बिल चेंबरमध्यें पास करून घेतलें. अर्थात् आतां त्या बाबतींत माघार घेणें प्रधानमंडळास शक्य नव्हतें. व्हिक्टर इमॅन्युअलची मनःस्थिति वर सांगितल्याप्रमाणें चमत्कारिक झाल्यानें तो पाद्रीवर्गाच्या पुढाऱ्यांच्या जाळ्यांत सांपडला व त्यांची उपर्युक्त योजना त्यानें पसंत केली. परंतु या प्रश्नासंबंधानें लोकमत पूर्णपणें काव्हूरच्या बाजूचें होतें. शिवाय पीडमॉन्टमध्यें प्रातिनिधिक राज्यपद्धति सुनियंत्रितपणें चालण्यास पाद्री-वर्गाचें फाजील व राज्ययंत्रास घातुक होणारें वर्चस्व कमी करणें अत्यंत जरूरीचें होतें. यामुळें या बाबतींत व्हिक्टर इमॅन्युअलची रदबदली त्यास मान्य करितां येणें शक्य नव्हतें. परंतु त्यानें जेव्हां त्याबद्दल आग्रह धरला तेव्हां निरुपाय होऊन काव्हूरनें आपल्या जागेचा राजिनामा दिला! कारण तसें करण्यावांचून त्यास दुसरें गत्यंतरच नव्हतें.

# प्रकरण ८ वें

## पुढें !

काव्हूरचा राजीनामा पत्करल्यावर व्हिक्टर इमॅन्युअल यानें दुसरें प्रधानमंडळ बनविण्याचा प्रयत्न केला. परंतु तसल्या नाजुक स्थितींत त्याच्या इच्छेनुरूप नवीन प्रधानमंडळ बनवून राज्यकारभाराची जबाबदारी शिरावर घेणारा कोणी माणूस पुढें येईना! माजी प्रधान मासिमो डि आझेग्लिओ हाहि काव्हूरच्या मताचा असल्यामुळें त्याला पुन: अधिकारावर बोलावणें शक्य नव्हतें इतकेंच नव्हे, तर तो आपल्याला काव्हूरच्या म्हणण्यास रुकार देण्याची सल्ला देईल अशी व्हिक्टर इमॅन्युअल यास भीति वाटत असल्यामुळें तो त्याची मुलाखत करून घेण्यासहि तयार नव्हता. परंतु डि आझेग्लिओ अशा वेळीं स्वस्थ बसणारा माणूस नव्हता. राजाच्या हातून या वेळीं मोठी चूक होत आहे व त्यामुळें त्याच्या राष्ट्राचें अकल्याण होण्याचा संभव आहे अशी त्याची खरीखुरी समजूत होती. म्हणून त्यानें राजाला त्याची कानउघाडणी करणारें एक मर्यादशील पण हृदयद्रावक पत्र लिहिलें व त्यांत धर्मगुरूंच्या जाळ्यांत सांपडून प्रधानमंडळानें योजलेल्या कार्यक्रमास अडथळा न करण्याबद्दल त्यानें त्याची मनधरणी केली.* हें पत्र

---

* ह्या पत्रांतील पुढील मजकूर विशेष लक्षांत घेण्यासारखा आहे:—

महाराज! ज्यानें आपली सेवा करतांना आपल्या राजाचें हित व इभ्रत यांकडेच केवळ लक्ष दिलें आहे अशा आपल्या जुन्या व एकनिष्ठ सेवकाच्या शब्दावर विश्वास ठेवा. आपल्या चरणीं मस्तक ठेवून व अश्रुपूर्ण नयनांनीं मी आपणांस सांगतों कीं, आपण आपल्या पूर्वीच्या मार्गाकडे वळावें, पाद्र्यांच्या गुप्त कटानें आपल्या सर्व कारकीर्दीची कामगिरी एका दिवसांत नष्ट केली आहे, देशाचा गोंधळ उडविला आहे,

[ पुढें चालू ]

व्हिक्टर इमॅन्युअल यास आवडलें नाहीं. परंतु त्याचा त्याचे मनावर बराच परिणाम झाला. व त्यानें लागलींच काव्हूरला बोलावून आणून पूर्ववत् आपलें काम चालविण्याची त्यास विनंति केली. काव्हूरनें ती मान्य केली. अर्थात् ज्या बिलाबद्दल एवढा प्रकार झाला तें बिल सेनेटमध्यें पास करण्याचें काम पुनः सुरू झालें. मात्र या खेपेस त्या बिलाचा जनक राटेझी यानें राजाच्या इच्छेवरून एक विशिष्ट धर्मोपदेशकांची संस्था या बिलांतून वगळली. काव्हूर तसें करण्याच्या विरुद्धच होता. पण त्यानें अखेर त्या गोष्टीस संमति दिली. सेनेटमध्यें ह्या बिलावर चर्चा सुरू असतांना पाद्रीवर्गाकडून काव्हूरवर त्या सभेंत व तिच्याबाहेर कडक वाग्बाणांचा सारखा वर्षाव होत होता. परंतु त्यास न भितां त्यानें आळसास उत्तेजन देणाऱ्या व संस्थानाला निरर्थक भारवाहक होणाऱ्या ह्या संस्था बंद करण्याची अवश्यकता शांतपणें व स्पष्ट शब्दांनीं लोकांच्या व प्रतिपक्षाच्या मनावर ठसविण्याची शिकस्त केली. अखेर सेनेटमध्येंहि तें बिल बहुमतानें मंजूर झालें. पण तें मंजूर होईपर्यंतच्या दगदगीनें* व अतिश्रमानें काव्हूरची प्रकृति अंमळ

---

शासनपद्धति डळमळीत करून टाकली आहे व आपल्या सत्यवचनीपणाविषयींच्या लौकिकाला काळिमा आणिला आहे. आतां एक क्षणदेखील दवडतां कामा नये. पीडमॉन्टनें सर्व कांहीं सोसलें आहे. परंतु फिरून पाद्र्याच्या अंमलाखालीं जाणें—छे! ती कल्पनासुद्धां नको! अशा प्रकारच्या गुप्त कटांनीं इंग्लंडचा राजा जेम्स स्टुअर्ट, दहावा चार्लस व इतर पुष्कळांचा नाश झाला आहे. पाद्र्यांनीं उपस्थित केलेला हा प्रश्न धर्माचा नव्हे; तर त्यांच्या (पाद्र्यांच्या) स्वार्थाचा आहे. या माझ्या म्हणण्यावर विश्वास ठेवा. महाराज! आपण खंबीर रहा, म्हणजे आपणसुद्धां विजयी व्हाल. आपण मजवर रागावूं नका. हें माझें कृत्य म्हणजे एका सद्गृहस्थाचें, एकनिष्ठ प्रजाजनाचें आणि महाराजांच्या स्नेह्याचें कृत्य होय.

* ह्या वेळीं काव्हूरला किती त्रास पडला असेल याची कल्पना त्यानें तत्संबंधीं एका खासगी पत्रांत काढलेल्या पुढील उद्गारांवरून होईल:—

[ पुढें चालू ]

बिघडली म्हणून त्याचा निकाल लागतांच तो लेरी येथें विश्रांति घेण्याकरितां गेला. तेथें सुमारें एक महिनाभर विश्रांति घेतल्यानंतर तो **ट्यूरिन** येथें परत आला त्या वेळेस तेथील वातावरण शांत होत चाललें असून जनतेचें लक्ष पूर्वेकडे पाठविलेल्या सैन्याच्या खबरीकडे लागलें होतें. हें सैन्य रणक्षेत्रावर पोंचून बरेच दिवस होऊन गेले तरी त्याच्या हालचालींच्या बातम्या जेव्हां येईनात तेव्हां **काव्हूरचें** चित्तहि व्यग्र होत गेलें. तशांत तेथें पटकी सुरू होऊन त्याच्या सैन्यांतील बरेच लोक त्यास बळी पडत असल्याचें वृत्त त्यास कळलें, तेव्हां तर त्याच्या मनाची अस्वस्थता फारच वाढली. युद्ध करण्याची संधि मिळण्यापूर्वींच फुसकीवारी आपलें सैन्य जातें कीं काय अशी त्यास धास्ती वाटूं लागली. म्हणून त्यानें **ला मार्मोरा** यास आपल्या पलटणीला युद्ध करण्याची संधि मिळविण्याबद्दल सारखीं पत्रें लिहिण्याचा सपाटा चालविला. तिसऱ्या **नेपोलियनच्या** (**फ्रान्सचा** त्या वेळचा बादशहा) मनांतून हें सैन्य मागें राखून ठेवावयाचें होतें. परंतु त्यास लढण्याची संधि देण्याबद्दल **काव्हूरची** सारखी टोंचणी लागलेली पाहून त्यानें आपला बेत रहित केला व १७ आगस्टच्या सुमारास फ्रेंच व इंग्लिश सैन्याच्या बरोबरीनें शत्रूशीं लढण्याची संधि **पीडमॉन्टच्या** सैन्यास मिळाली. सुदैवानें त्या लढाईत ह्या सैन्यानें आपल्या शौर्याची शिकस्त करून जय मिळविला व इंग्रज सेनापति **सिंपसन** यानें त्यांची फार तारीफ केली.* ही बातमी त्याच दिवशीं तारेनें **काव्हूरकडे** आली व लागलीच ती जाहीर करण्यांत आली. मग काय विचारतां? लोकांचा आनंद गगनांत मावेनासा झाला! हें सैन्य पाठविल्याबद्दल

---

हा झगडा पार्लमेंटमध्यें, दिवाणखान्यांत, दरबारांत, त्याचप्रमाणें रस्त्यांतहि चालू होता व तो पुष्कळ क्लेशदायक गोष्टींनीं अधिकच कष्टप्रद झाला होता.

* त्यानें आपल्या सरकारी रिपोर्टांत ह्यासंबंधीं पुढील उल्लेख केला आहे:—

ह्या लढाईमध्यें **सार्डिनियन** सैन्यानें आपण **युरोपांतील** मोठमोठ्या लष्करी राष्ट्रांच्या खांद्यास खांदा लावून लढण्यास लायक आहों असें दाखविलें आहे.

जे **काव्हूरला** दोष देण्यास प्रवृत्त झाले होते ते सुद्धां ह्या बातमीनें आनंदित होऊन त्याची मनापासून तारीफ करूं लागले! या विजयामुळें **काव्हूरची** व त्याबरोबरच **पीडमॉन्टची** इभ्रत **युरोप-** मध्यें एकदम वाढली. त्यामुळें ह्या (१८५५) वर्षाच्या अखेरीस **व्हिक्टर इमॅन्युअल** जेव्हां **इंग्लंड** व **फ्रान्स** येथें गेला तेव्हां त्याचा तेथें मोठा जयजयकार झाला. या सफरींत त्याच्याबरोबर **मासिमो डि आझेग्लिओ** व **काव्हूर** हे दोघेहि गेले होते. **मासिमो डि आझेग्लिओ** हा नेमस्त पुरोगामी होता व युरोपांतील मुत्सद्दीवर्गांत त्याचें चांगलें वजन होतें. **काव्हूरला** ते लोक जहाल (Fire-brand) समजत असत. तेव्हां केवळ त्याच्याच तंत्रानें आपण चालतों असें ह्या लोकांस वाटूं नये म्हणून मुद्दाम **डि आझेग्लिओ** यास **व्हिक्टर इमॅन्युअलनें** बरोबर नेलें होतें. **काव्हूरची** इच्छा प्रथम राजाबरोबर जाण्याची नव्हती. पण **डि आझेग्लिओच्या** सूच-नेवरून त्यानें त्याच्याबरोबर जाण्याचें ठरविलें. **लंडन** येथें गेल्यावर **व्हिक्टर इमॅन्युअलचा** सार्वजनिक रीतीनें मोठा सत्कार करण्यांत आला. राणी **व्हिक्टोरिया** व **प्रिन्स आल्बर्ट** यांनींहि त्याचें प्रेम-ळपणें स्वागत केलें. **काव्हूरनें** आपल्या संभाषणानें ह्या उभयतांस इतकें खुष केलें कीं, त्यांनीं **पीडमॉन्टबद्दल** आपली पूर्ण सहानुभूति असल्याचें त्यास कळविलें. **लंडन** शहरांतील **मेअरनें (नगराध्यक्षानें)** तर **व्हिक्टर इमॅन्युअलचें** अत्युत्तम आगतस्वागत केलें व त्याच्या सन्मा-नाप्रीत्यर्थ एक सार्वजनिक मेजवानीहि दिली. त्या वेळीं **व्हिक्टर इमॅन्युअलनें** पुढील आशयाचें भाषण केलें:—

"**लंडन** शहरांतील नगराधिकारी व सभ्य गृहस्थहो! तुमच्या राणीची व राष्ट्राची भेट घेण्याकरितां मी आलेला पाहून तुम्हीं माझें जें अभि-नंदन व स्वागत केलें त्याबद्दल मी तुमचा अत्यंत आभारी आहें. तुम्हीं माझें जें स्वागत केलें त्यावरून माझ्या देशांत मीं सुरू केलेल्या व पुढें तशीच चालू ठेवण्याबद्दल माझी इच्छा असलेल्या नवीन राज्यपद्धती-बद्दल तुमची पूर्ण सहानुभूति असल्याचें व्यक्त होत आहे.

" जगांतील अत्यंत बलाढ्य अशा ज्या दोन राष्ट्रांमध्यें मी सफर करीत आहें त्यांच्यामध्यें जडलेला स्नेहसंबंध हा दोन्ही देशांच्या राज्यकर्त्यांच्या शहाणपणास शोभेसा असून सन्माननीय आहे; हा स्नेहसंबंध म्हणजे संस्कृतीचा विजयच होय. माझ्या कारकीर्दीचीं पहिलीं कांहीं वर्षें जरी संकटांत गेलीं तरी स्वातंत्र्य व न्याय यांच्या रक्षणाकरितां तरवार उपसणें हे आपलें कर्तव्य आहे असें समजून मीहि ह्या स्नेहसंबंधाचा अंशभागी झालो आहें. माझ्या स्नेह्याच्या मदतीकरितां दिलेलें माझें सैन्य जरी थोडें असलें तरी तें अत्यंत एकनिष्ठ व कार्यतत्पर असें असून, आपल्या राजाच्या निशाणाखालीं तें पाहिजे तेथें उडी घालण्यास तयार आहे. आपणा सर्वांच्या इभ्रतीस साजेसा व कायम टिकणारा तह झाल्यावांचून आपण हत्यार खालीं ठेवतां कामा नये. परमेश्वराच्या कृपेनें हा हेतु, आपण प्रत्येक राष्ट्राच्या न्याय्य आकांक्षा व खरे हक्क एकविचारानें संपादन करून, शेवटास नेऊं. "

यापुढें त्यानें आणखी एकवार इंग्लंडच्या लोकांचे व राणीचे आभार मानून आपलें भाषण पुरें केलें.

पॅरिसमध्येंहि ह्या पाहुणेमंडळीचा असाच सत्कार करण्यांत आला. मात्र योग्य काळापूर्वी चालू लढाईचा शेवट करून तह करण्याची प्रवृत्ति नेपोलियनच्या ठायीं उद्भवलेली पाहून व्हिक्टर इमॅन्युअलचें मन थोडेंसें खट्टू झालें. तथापि नेपोलियननें पीडमॉन्टला मदत करण्याची आपली उत्कट इच्छा काव्हूरजवळ व्यक्त केली व तत्संबंधीं सूचनेचा एक खर्डा त्यास सादर करण्यास सांगितलें. काव्हूर हा असली संधि फुकट घालविणारांपैकीं नव्हता. त्यानें लागलीच ऑस्ट्रियाचें व पोपचें इटलींत असलेलें वर्चस्व कमी करणाऱ्या कांहीं सुधारणेच्या योजना त्याच्यापुढें मांडल्या. नेपोलियननें त्यांचा विचार करण्याचें आश्वासन दिलें. ह्या सुमारास इटलींतील इतर संस्थानांतलें लोकमतहि पीडमॉन्टच्या शासनपद्धतीस अनुकूल होत चाललें होतें व कित्येक संस्थानांचे पुढारी तर ह्या शासनपद्धतीस मदत करून पीडमॉन्टच्या राज्यछत्राखालीं जाण्यास उत्सुक बनले होते.

ह्या प्रवृत्तीचा द्योतक असा एक लेख लोकसत्तावाद्यांचा पुढारी व **व्हेनिस**चा माजी अध्यक्ष **डॅनियल मॅनिन** यानें **पॅरिस**मध्यें प्रसिद्ध केला. त्याचा सारांश असा:—

" दडपशाहीमुळें त्रस्त झालेला लोकसत्तावाद्यांचा पक्ष राष्ट्रकार्याकरितां आणखी माघार घेऊन स्वार्थत्याग करण्यास तयार आहे. सर्व गोष्टीच्यापूर्वी **इटलीचें** ऐक्य होणें—आणि हाच सध्यां अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे—ही गोष्ट अगोदर घडून आली पाहिजे, अशी पूर्ण खात्री झाल्यामुळें हा पक्ष **पीडमॉन्ट**च्या राजास असें म्हणत आहे कीं, " **इटलीचें** एकीकरण करा म्हणजे आम्ही तुम्हांस येऊन मिळालोंच समजा." आणि नियंत्रित राजसत्तावाद्यांस ह्या पक्षाचें असें सांगणें आहे कीं, "**इटलीचें** एकराष्ट्र बनविण्याकडे तुम्ही आपलें लक्ष द्या. नुसत्या **पीडमॉन्ट**ची वढाई वाढविण्यांत गर्क होऊं नका. तुम्ही इटॅलियन बना; प्रांतिक दृष्टि ठेवूं नका; आणि तसें कराल तर आम्ही तुमच्या सेवेस सादर आहों." लहान लहान पक्षभेद व त्यांच्यामध्यें लहान गोष्टींवरून माजणारीं रणें हीं विसरून जाण्याचा समय सध्यां प्राप्त झालेला आहे. सध्यां एकच प्रश्न महत्त्वाचा आहे व तो इटॅलियन राष्ट्राचें ऐक्य करणें हा होय. सांप्रत **इटलींत** दोनच पक्ष मुख्य आहेत. एक ऐक्यवादी व दुसरा सवता-सुभावादी. मी लोकसत्तावाद्यांच्या तर्फे ऐक्याचें निशाण उभारतों; **इटलीचें** एकराष्ट्र बनावें अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं ह्या निशाणाभोंवतीं एकत्र जमणें जरूर आहे."

वरील विचार प्रदर्शित करणारा **डॅनियल मॅनिन** हा **व्हेनिस** येथें ऑस्ट्रियाचें वर्चस्व पुनश्च स्थापित झाल्यामुळें देशत्याग करून **पॅरिस** येथें जाऊन राहिला होता. त्यानें **व्हिक्टर इमॅन्युअल**च्या भेटीच्या वेळीं फ्रान्सच्या निशाणाशेजारीं इटॅलियन राष्ट्राचें **ऐक्यसंवर्धक** असें **तिरंगी** (हिरवा, पांढरा व तांबडा) **निशाण** जेव्हां पाहिलें तेव्हां त्याला मोठा संतोष वाटला, व भावी काळांत आपली राजकीय भावना व आकांक्षा खास सफळ होणार असें वाटल्यामुळें त्याच्या आयुष्याचे अखेरचे दिवस सुखासमाधानांत गेले.

इटलीचा दुसरा थोर पुरुष जोसेफ गॅरिबाल्डी* याचें मतहि आतां वरील डॅनियल मॅनिनच्या मताप्रमाणेंच बनत चाललें होतें. यापूर्वी तो माझिनीच्या विचारानें भारलेला होता व त्यामुळें त्यानें निरनिराळ्या संस्थानांतील क्रांतिकारक चळवळीचा पुरस्कार करण्यांत बराच काल घालविला. गॅरिबाल्डी हा मोठा धाडसी, काटक व शूर सेनानी होता. त्याचेजवळ सुमारें एक हजार स्वयंसैनिक नेहमीं असत. त्यास त्यानें उत्तम प्रकारचें लष्करी शिक्षण दिलेलें असल्यामुळें ह्या छोट्याशा सैन्य-बलावर तो अनेक मोठमोठीं धाडसाचीं लष्करी कृत्यें करीत असे. इ० स० १८४८ पासून इटलींतील संस्थानांत जी क्रांतिकारक चळवळ चालू होती तींत त्याने वेळोवेळीं बराच भाग घेतलेला होता. पण तेव्हां त्यास माघार घ्यावी लागल्यामुळें तो अमेरिका, इंग्लंड, आफ्रिका, चीन वगैरे देशांत निरनिराळे उद्योग करून कालक्रमण करीत होता. इ० स० १८५४ च्या मे महिन्यांत तो जिनोआ येथें आला व तेथून तो आपली जन्मभूमि नीस येथें जाऊन राहिला. त्या ठिकाणीं त्याचीं मुलेंमाणसें होतीं. येथें आल्यावर त्याच्या भावाच्या मालमत्तेंतून त्याला कांहीं रक्कम मिळाली व तिच्यायोगानें त्यानें कॅपरेरा बेटांतील कांहीं जमीनजुमला विकत घेऊन तेथें कायमची वस्ती केली. ह्या ठिकाणीं वास्तव्य केल्यापासून त्याचें लक्ष पुनः आपल्या देशोद्धाराच्या चळवळी-कडे लागून राहिलें व तो आपणास फिरून रणक्षेत्रावर जाण्याची संधि केव्हां येते याची वाट पहात बसला. पीडमॉन्टमध्यें चाललेलीं राजकारणें व राजकीय सुधारणा यांचें मनन केल्यावर त्याचें मनहि त्या संस्थानाची लष्करी सेवा करण्याकडे वाहूं लागलें. परंतु तशा प्रकारची संधि काव्हू-रकडून त्यास मिळण्यास अद्याप अवकाश होता.

पॅरिसहून व्हिक्टर इमॅन्युअलची स्वारी परत स्वदेशीं आल्यावर

---

* केसरीचे विद्वान् संपादक रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं लिहिलेलें गॅरीबाल्डीचें चरित्र बऱ्याच वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालें आहे, तें वाचकांनीं अवश्य वाचावें.

काव्हूर आपलें धोरण अधिक धैर्यानें व नेटानें अंमलांत आणण्याच्या उद्योगास लागला. लष्करची सुधारणा व तिजोरीची बळकटी या गोष्टीं-कडे तो विशेष लक्ष पुरवूं लागला. तसेंच त्याचें परराष्ट्रीय धोरणहि अधिक जोमदार होत चाललें. लोकमत त्याच्या धोरणास आतां बरेंच अनुकूल झालें होतें. जे लोक त्याच्या धोरणास विरुद्ध होते ते आतां स्वस्थ बसून पीडमॉन्टच्या राजकीय पटावर त्यास हवा तसा खेळ खेळूं देण्यास मोकळीक देऊं लागले होते. त्याचीं कांहीं कृत्यें त्यांस मनापासून आवडत नसत. परंतु त्या बाबतींत विरोध करण्याचें त्यांनीं सोडून दिलें. त्याला मोकळेपणानें वावरूं दिल्यास तो इष्ट अशीच रचना करील असा विश्वास त्याच्या प्रतिपक्षामध्येंहि कांहीं अंशीं उत्पन्न झाला होता. इटॅलि-यन लोकांचें एकीकरण हेंच त्याच्या राज्यकारभाराचें मुख्य धोरण आहे असें आतां सर्वांना स्पष्टपणें कळून चुकलें होतें. परंतु तशा प्रकारची अधिकार-युक्त वाणी मात्र काव्हूर अगर त्याचें प्रधानमंडळ यांच्या मुखांतून अद्याप बाहेर पडलेली नव्हती. त्यास ती उच्चारणें भाग पाडावें म्हणून त्याच्या एका प्रतिपक्षानें पार्लमेंटमध्यें त्याच्या धोरणाचें आविष्करण करून तें मूर्खपणाचें व अशक्य कोटींतलें आहे असें मोठ्या आवेशानें प्रतिपादिलें. परंतु काव्हूर हा मुत्सद्दीपणाचा केवळ अर्क असल्यामुळें त्याच्या प्रति-पक्षाचा हेतु सफळ झाला नाहीं. अशा वेळीं एखादा सामान्य मनुष्य असता तर प्रतिपक्षाच्या तीव्र वाग्बाणांमुळें चिडून जाता व आपल्या धोरणाचें स्पष्टीकरण करून त्यानें त्याचें समर्थन तरी केलें असतें किंवा आरोप मिथ्या आहे म्हणून तरी सांगितलें असतें. परंतु काव्हूरनें हे दोन्ही मार्ग न स्वीकारितां आपल्या क्षुब्ध प्रतिपक्षास उत्तर देतांना शांत-पणें एवढेंच सांगितलें कीं, "पीडमॉन्टच्या प्रधानाला इटॅलियन राष्ट्रीयत्वासारख्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतां येणें शक्य नाहीं. तथापि यासंबंधानें प्रधानमंडळाची इच्छा व धोरण हीं काय आहेत तीं व्यक्त करण्याचा समय अद्याप प्राप्त झालेला नसल्यामुळें त्याविष-यींच्या वादविवादांत निर्णयात्मक असा कांहींच जबाब आम्हांस देतां येणार नाहीं. हा प्रश्न अद्याप गर्भावस्थेंत आहे. अर्थात् तो पूर्णदशेस

येईपर्यंत त्यासंबंधानें ठाम मत व्यक्त न करण्याची जी सवलत प्रातिनिधिक राज्यसंस्थेच्या प्रधानास असते तिचा आम्हांस पूर्ण फायदा घेऊं द्याल अशी मला दृढ आशा आहे. '' काव्हूरनें गंभीरपणानें उच्चारलेले हे शब्द ऐकतांच त्याच्या प्रतिपक्षाच्या तोंडास एकदम कुलपें पडलीं !

# प्रकरण ९ वें

## पॅरिसची परिषद

व्हिक्टर इमॅन्युअल व काव्हूर यांचें लक्ष सध्यां क्रिमियांतील लढाईकडे विशेष लागलेलें होतें. ही लढाई आणखी बरेच दिवस लांबून पीडमॉन्टच्या सैन्यास आपली कर्तबगारी दाखविण्यास आणखी एखादी संधि मिळेल अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु त्यांची ही अपेक्षा सफळ होऊं नये म्हणूनच ऑस्ट्रियानें मध्यस्थी करून रशियास तह करण्याचा आग्रह सुरू केला होता. फ्रान्स व इंग्लंड ह्यांच्याशींहि मध्यस्थी करण्याचें काम त्यानें चालूच ठेवलें. अखेर रशिया व फ्रान्स यांनीं त्याची मध्यस्थी कबूल करून तह करण्याची इच्छा दर्शविली. इंग्लंडचें मत या योजनेस फारसें अनुकूल नव्हतें. परंतु फ्रान्सची तहाविषयींची उत्सुकता पाहून त्यास त्या योजनेस संमति देणें भाग पडलें. तेव्हां सर्वानुमतें तहाच्या अटींची वाटाघाट करण्याकरितां पॅरिस येथें एक परिषद भरविण्याचें ठरलें. ह्या परिषदेमध्यें ऑस्ट्रियाचा प्रतिनिधि मध्यस्थाच्या नात्यानें प्रमुख भाग घेणारा असल्यामुळें त्यांत पीडमॉन्टच्या हितासंबंधीं फारसें कांहीं निष्पन्न होण्याचा संभव नाहीं हें काव्हूर जाणून होता. तसेंच पीडमॉन्टच्या प्रतिनिधीस सारखेपणाच्या नात्यानें वागविण्यास इतर राष्ट्रें तयार नसल्याचेंहि त्यास कळलें होतें. यामुळे सदर परिषदेस जाण्याचा निश्चय त्यानें मोठ्या कष्टानें केला. परंतु तो पॅरिसमध्यें गेल्यावर थोड्याच दिवसांनीं इंग्लंडची संमति घेऊन नेपोलियननें त्यास इतर प्रतिनिधींच्या बरोबरीनें वागविण्याचा आपला विचार असल्याचें कळविलें. अर्थात् इतर राष्ट्रांच्या प्रतिनिधींसहि ती गोष्ट मान्य करावी लागली. हा मुख्यतः काव्हूरच्या वैयक्तिक गुणांचाच ( Personality चा ) परिणाम होय. ह्या गोष्टीवरून युरोपियन मुत्सद्दीवर्गांत काव्हूरचें वजन कसें वाढत चाललें होतें याची चांगली

साक्ष पटण्यासारखी आहे. याप्रमाणें सारखेपणाचें नातें तर प्राप्त झालें खरें; पण तेवढ्यावरून पीडमॉन्टचा प्रश्न परिषदेच्या पुढें प्रमुखत्वानें आणतां येईलच असें मानण्यास फारशी जागा नव्हती. यामुळें सदर परिषदेच्या बैठकींत काव्हूरनें अगदीं मित भाषण करण्याचा परिपाठ ठेवला. ह्या बैठकींत जरी त्याला संकुचित वृत्ति पत्करावी लागली तरी खासगी रीतीनें परिषदेच्या प्रतिनिधींशीं व इतर प्रमुख राजकारस्थानी मंडळींशीं संभाषणें करून त्यानें इटलीच्या राष्ट्रीय ध्येयासंबंधीं त्यांची सहानुभूति मिळविली. आपल्या कार्याची प्रगति होण्यास जेणेंकरून मदत होईल अशा प्रकारच्या ओळखी व गुप्त कारस्थानें त्यानें या वेळे-पासून सररहा सुरू केलीं. नेपोलियनच्या राणीचीहि सहानुभूति मिळविण्याचा त्यानें प्रयत्न केला व त्याकरितां त्यानें तिची जिवलग मैत्रीण मॉर्शनेस ऑफ एले हिचा स्नेह मोठ्या युक्तीनें संपादन केला. फ्रेंच दरबारांत त्याचें कार्य साधण्याचें काम प्रिन्स नेपोलियन नामक राजघराण्यांतील एका पुरुषानें कबूल केलें. तसेंच तिसऱ्या नेपोलि-यनचें मन आपल्या कार्याकडे वेधून घेण्याचा प्रयत्न करण्याकरितां त्यांच्या अत्यंत विश्वासांतील मनुष्य डॉ० कॉन्यु (हा नेपोलियनचा गृहवैद्य होता) याचाहि त्यानें स्नेह संपादन केला. हा स्नेहसंबंध अखेरपर्यंत गुप्त होता; व अनेक महत्त्वाच्या राजकारणांत काव्हूरला त्याचा अत्यंत उपयोग झालेला आहे.* इंग्रज प्रतिनिधि लॉर्ड क्लॅरेंडन याचें मनहि त्यानें आपल्या बाजूस वळवून घेतलें. खुद्द परिषदेच्या बैठकींत मात्र त्याच्या कार्याची कांहीं प्रगति होऊं शकली नाहीं. अखेरीस इटलीसंबंधींच्या प्रश्नाची चर्चा करण्यास परिषदेस भाग पडावें म्हणून नेपोलियनच्या सूचनेवरून त्यानें एक यादी इंग्रज व फ्रेंच प्रतिनिधींस उद्देशून लिहिली. या यादींत त्यानें पार्मा व मोडेना हीं संस्थानें पीडमॉन्टला मिळावींत व रोमाग्ना येथें असलेलें ऑस्ट्रियन

* ह्या सर्व प्रसंगीं काव्हूर व नेपोलियन यांच्यामध्यें गुप्त मसलती चालविण्याचें काम डॉ०, कॉन्यु यानें केलेलें आहे.

सैन्य परत नेण्यांत यावें या मागण्या प्रमुखत्वानें केलेल्या होत्या. त्यांचा विचार करण्याची सूचना परिषदेच्या शेवटच्या बैठकींत फ्रेंच प्रतिनिधि व परिषदेचा अध्यक्ष वेल्वेस्की यानें केली, तेव्हां ऑस्ट्रियन प्रतिनिधीनें अशा तक्रार केली कीं, सदर यादींतील मुद्द्यांचा विचार करणें हें ह्या परिषदेच्या ठराविक कार्यक्रमाच्या बाहेरचें काम आहे. सबब त्याचा विचार करण्याच्या भानगडींत परिषदेनें पडूं नये. शिवाय त्यासंबंधीं निश्चित मत देण्यास आपल्या सरकारचें आपणास अधिकारपत्रहि मिळालेलें नाहीं. ऑस्ट्रियन वकिलाची ही तक्रार कायदेशीर दृष्टीनें खरी असल्यामुळें काव्हूरच्या मागण्यांबद्दल शाब्दिक सहानुभूति व्यक्त करण्यापलीकडे सदर परिषदेला विशेष कांहीं करितां येणें शक्य नव्हतें. काव्हूर हें जाणूनच होता. परंतु युरोपांतील प्रमुख राष्ट्रांच्या प्रतिनिधींपुढें ऑस्ट्रियाचें जुलमी धोरण व त्यामुळें इटलीची झालेली दुर्दशा यांची कहाणी सांगून त्यांच्या मनांत इटलीसंबंधीं सहानुभूति व ऑस्ट्रियासंबंधीं तिटकारा उत्पन्न करावा एवढ्याच हेतूनें त्यानें सदर प्रश्न परिषदेपुढें आणण्याची खटपट केली होती. त्याचा तो हेतु बऱ्याच अंशानें सफळहि झाला. इंग्रज प्रतिनिधि लॉर्ड क्लॅरेंडन यानें या विषयासंबंधानें जें भाषण केलें त्यांत ऑस्ट्रिया व पोप यांच्या इटलींतील राज्यपद्धतीवर अत्यंत कडक टीका केली व या दोघांच्या प्रतिगामी धोरणामुळें इटलीच्या व विशेषतः पीडमॉन्टच्या प्रगतीस अडथळा होत असल्यानें तो अडथळा दूर करण्याचा प्रयत्न करणें हें युरोपांतील प्रमुख राष्ट्रांचें कर्तव्य आहे असेंहि त्यानें सांगितलें. इटलीवर उपकार करण्याच्या बुद्धीनेंच केवळ नव्हे, तर स्वतःच्या हितैकदृष्टीनेंहि हें कर्तव्य बजावणें त्या राष्ट्रांना जरूर पडेल असेंहि तो बोलून गेला. फ्रेंच प्रतिनिधीनेंहि ऑस्ट्रियाच्या वर्तनासंबंधीं अशीच प्रतिकूल टीका केली; पण ती अंमळ सौम्य शब्दांनीं केली. अशा रीतीनें नैतिक विजय संपादून काव्हूरनें आपल्या कार्यास अप्रत्यक्ष रीतीचा पुष्कळच फायदा करून घेतला. परिषदेचें

काम पूर्ण झाल्यावर त्यानें लॉर्ड क्लॅरेंडन व बादशहा नेपोलियन यांच्या खासगी मुलाखती घेऊन ऑस्ट्रियाशीं युद्ध केल्यावांचून आपल्या देशाचा तरणोपाय नाहीं ही गोष्ट त्यांच्या मनावर ठसवून दिली. त्यांनींहि तसा प्रसंग आल्यास मदत करण्याचें त्यास आश्वासन दिलें. लॉर्ड क्लॅरेंडनच्या प्रस्तुत मनोवृत्तीचा फायदा घेऊन वरीलसारख्या प्रसंगीं इंग्लंडची मदत मिळणें कितपत शक्य आहे हें पहाण्याकरितां तो नेपोलियन बादशहाच्या सूचनेवरून इंग्लंडला गेला. तेथें गेल्यावर तेथील मुत्सद्दी मंडळानें त्याच्या कार्याविषयीं आपली सहानुभूति दर्शविली. परंतु लॉर्ड क्लॅरेंडननें त्यासंबंधानें जितका उत्साह दर्शविला तितका लॉर्ड पालमर्स्टन वगैरे इतर मुत्सद्द्यांनीं दर्शविला नाहीं इतकेंच नव्हे, तर त्यांच्या सान्निध्यानें लॉर्ड क्लॅरेंडनचाहि उत्साह थोडासा शिथिल झाला! काव्हूरनें इंग्लंडपासून प्रत्यक्ष मदत मिळविण्याची फारशी अपेक्षा केलेली नव्हती. त्याला फक्त त्या राष्ट्राचें नैतिक पाठबळ पाहिजे होतें व तें त्यास मिळण्याचा संभव होता. कारण, तशा प्रकारचें वातावरण उत्पन्न करून तें सतत कायम ठेवण्याची योजना त्यानें आपल्या मित्रमंडळीमार्फत केलेली होती. इंग्लंडच्या राणीचें त्याजविषयीं फार अनुकूल मत झालेलें होतें. म्हणून ह्या खेपेसहि त्यानें तिची भेट घेऊन तिचें आपल्याविषयींचें अनुकूल मत जास्त दृढ करून घेतलें. इतकी कामगिरी करून तो ट्यूरिनला परत आला. परत आल्यावर त्यानें पार्लमेंटच्या चेंबरपुढें जें भाषण केलें त्यांत त्यानें ह्या विषयाचा समारोप पुढीलप्रमाणें केला आहे:—

"मोठमोठ्या महत्त्वाच्या प्रश्नांचा निकाल लेखणीच्या फटकाऱ्यानें होत नसतो. तसेंच लोकांची एकंदर परिस्थिति क्षणांत बदलून टाकण्यास नुसत्या मुत्सद्देगिरीचा विशेष उपयोग होत नाहीं. इटॅलियन राष्ट्राच्या हितासंबंधीं सदर परिषदेंत प्रत्यक्ष फायद्याचें असें कांहीं कार्य घडून आलें नाहीं हें खरें आहे. तथापि माझ्या मतें त्यापासून आपले दोन फायदे झाले आहेत. पहिला फायदा हा कीं, ह्या परिषदेमुळें इटलीची दुर्धर अवस्था जगांतील प्रमुख राष्ट्रांच्या विचारशील मुत्सद्द्यां-

पुढें आपणांस मांडतां आली आणि ही गोष्ट सद्य:स्थितींत आपणांस फार महत्त्वाची आहे; निदान मी तरी ती तशी मानतों. दुसरा फायदा असा कीं, **इटली**च्या दु:खाची कहाणी ऐकून त्या राष्ट्रांनीं **इटली**करितांच केवळ नव्हे, तर **युरोप**च्या हिताकरितांहि त्या स्थितीची सुधारणा करणें जरूर असल्याबद्दल जो आपला अभिप्राय व्यक्त केला तो परिणामीं आपल्यास पथ्यकर होण्याचा पुष्कळ संभव आहे. **इंग्लंड व फ्रान्स** ह्यांसारख्या बलाढ्य राष्ट्रांनीं व्यक्त केलेलें मत आणि दिलेली सल्ला फुकट जाईल असें मला वाटत नाहीं. ह्या परिणामाबद्दल आपण आपलें अभिनंदन करून घेणें जरी इष्ट असले तरी त्यांत अनिष्टपणाचीहि थोडीशी झांक आहे हें विसरतां कामा नये. सदर परिषदेच्या निमित्तानें ऑस्ट्रियन प्रतिनिधीशीं सहकारित्वाच्या नात्यानें दोन महिनेपर्यंत माझा जो सारखा सहवास घडला–व ज्यांत त्या प्रतिनिधीचें सौजन्य व शिष्टपणा उत्कृष्टपणें माझ्या नजरेस आला–त्यांत मला असें स्पष्टपणें कळून चुकलें कीं, त्यांच्या व आपल्या राष्ट्रांत समजूत होण्याचा तिळमात्रहि संभव नाहीं. उभयतांच्या इच्छा व मार्ग हीं परस्परांशीं इतकीं विरुद्ध आहेत कीं, त्यांच्यांत तडजोड होणे कदापि शक्य नाहीं."

वरील उताऱ्यांतील शेवटचे शब्द तत्कालीन परिस्थितींत अत्यंत महत्त्वाचे होते. त्या शब्दांच्या द्वारें इटॅलियन राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा पुरस्कार काव्हूरनें उघडपणें केल्यासारखें झालें. अर्थात् ऑस्ट्रियानें त्याच्या उद्गारांस हरकत घेतली. "पीडमॉन्टच्या प्रधानास सर्व इटलीच्या राजकारणासंबंधीं असे जाहीर उद्गार काढण्याचा अखत्यार नाहीं; असले उद्गार काढणें म्हणजे ऑस्ट्रियाच्या वर्चस्वाखालीं असलेल्या प्रांतांतील लोकांस बंडाची फूस देणें होय," वगैरे प्रकारच्या तक्रारी ऑस्ट्रियानें केल्या; परंतु त्या तक्रारींचा त्या वेळीं कोणीं फारसा विचार केला नाहीं. काव्हूरनें ते उद्गार या वेळीं मुद्दामच काढले होते. कारण, आतां यापुढें त्याला जो डाव खेळावयाचा होता तो यशस्वी होण्यास इटलींतील इतर संस्थानांतील लोकांची सहानुभूति व मदत मिळाल्यास

त्यास पाहिजे होती. ती मिळणें कितपत शक्य आहे हें अजमावून पहाण्याकरितांच त्यानें वरील अंमळ धाडसीपणाचे उद्गार काढले होते, व त्यांचा परिणाम त्यास हवा होता तसाच झाला. त्याचें हें भाषण झाल्यानंतर इटलींतील इतर कांहीं संस्थानांतील पुरोगामी लोक—सत्ताधारी व बिनसत्ताधारी—ऑस्ट्रियाच्या कांचांतून आपली सुटका करून घेण्यास आर्त बुद्धीनें पीडमॉन्टकडे पाहूं लागले व पीडमॉन्टच्या पुढारीपणाखालीं इटलीचें एकराष्ट्र बनविण्याची भावना त्यांच्याहि मनांत रुजूं लागली. काव्हूरच्या धोरणाबद्दल पसंती व्यक्त करण्याकरितां टस्कनी संस्थानच्या लोकांनीं त्याची एक अर्धमूर्ति (Bust) त्यास आदरपूर्वक नजर केली.[1] पोपच्या संस्थानाकडून त्यास एक सोन्याचें पदक[2] अर्पण करण्यांत आलें व ट्यूरिन येथें पीडमॉन्टच्या सैन्याच्या विजयाचें स्मारक उभारण्याकरितां लांबर्डी संस्थानच्या लोकांनीं आपसांत वर्गणी जमा केली. इटॅलियन संस्थानांतील लोकमताचा हा ओघ पाहून काव्हूरला जास्तच अवसान आलें. त्यानें इतःपर ऑस्ट्रियाच्या डुरकावणीस भीक न घालतां आपलें धोरण नेटानें अंमलांत आणण्याचा निश्चय केला. तो मोठा कार्यकर्ता व धूर्त माणूस होता. एकाच पक्षास अगर विवक्षित मताच्या माणसास तो चिकटून रहात नसे. त्याच्या कार्याला उपयोगी पडणारी शक्ति ज्या ठिकाणीं त्यास आढळून येई तेथून ती तो मोठ्या युक्तीनें संपादन करीत असे. परंतु असें करितांना स्वतः त्या शक्तीच्या अधीन न होतां तिचें नियमन करण्याचें सामर्थ्य मात्र तो आपल्या हातांत राखून ठेवीत असे. त्याच्या ह्या वर्तनामुळें नाना मतांचे व नाना पंथांचे लोक त्याच्या कक्षेंत येऊं शकत व त्यांच्यापासून घेण्याजोगें असें कांहीं असल्यास त्याचें तो आनंदानें ग्रहण करीत असे. मात्र अशा प्र-

---

१ यावर, " Colui che la difese a viso aperto (धैर्यानें आपल्या देशाचें रक्षण करणारा मनुष्य)" असे शब्द खोदले होते.

२ यावर, " Che fan qui tante peregrine spade ! (इतक्या परकीय तरवारी येथें काय करीत आहेत ?)" असे शब्द होते.

कारचीं कामें तो आपल्या अधिकारी वृत्तीस बाध न येईल अशा रीतीनें—अर्थात् कधीं कधीं गुप्तपणें—करीत असे. अशा गुप्त प्रकारची एक व्यवस्था उघडकीस आलेली आहे. ती अशीः—काव्हूर पॅरिसच्या परिषदेहून परत आल्यानंतर कांहीं दिवसांनीं ट्यूरिन येथें कांहीं इटॅलियन राष्ट्रभक्तांनीं ‘ राष्ट्रीयमंडळ ’ (National Society ) या नांवाची एक नवीन संस्था काढली. या संस्थेचा उद्देश, सर्व इटॅलियन संस्थानें पीडमॉन्टमध्यें सामील करून इटलीचें स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचा होता, व तशा हेतूनें काम करणारे तिचे दूत व प्रतिनिधि प्रत्येक संस्थानांत पसरलेले होते. या संस्थेचा प्रमुख सूत्रधार ला—फारिना ह्या नांवाचा (हा सिसिलीचा रहिवाशी ) एक हुषार देशभक्त होता. त्याच्या मनांतून काव्हूरचा आश्रय आपल्या संस्थेस मिळवावयाचा होता म्हणून एका स्नेह्याच्याद्वारें त्यानें काव्हूरची मुलाखत घेतली व त्यास आपले हेतु विदित केले. त्याच्या संस्थेच्या कार्यक्रमापासून काव्हूरच्या हेतुसिद्धीस अनायासें पुष्कळ फायदा होण्यासारखा होता म्हणून काव्हूरनें त्याच्याशीं संबंध ठेवण्याचें कबूल केलें. मात्र त्यानें उजाडण्यापूर्वीं पहाटेस येऊन गुप्तपणें काव्हूरशीं खलबत करून निघून जावें व जर कदाचित् पार्लमेंट अथवा मुत्सद्दीमंडळ यांस ह्या संबंधाचा वास आला तर काव्हूरनें स्पष्टपणें आपल्या कानावर हात ठेवावेत असें उभयतांमध्यें ठरलें होतें! त्यांचा हा व्यवहार सुदैवानें योग्य कालापूर्वीं कोणासही कळला नाहीं. इ० स० १८५६ च्या सप्टेंबरपासून पुढील चार वर्षांत बहुधा रोज पहाटें या दोघांच्या भेटी होत असत, असें पुढें पुष्कळ काळानें कळून आलें. ला—फारिनाप्रमाणें काव्हूरनें आणखी एका थोर माणसाचा या वेळेपासूनच उपयोग करून घेण्यास सुरुवात केली. तो पुरुष प्रख्यात गॅरिबाल्डी हा होय. याचा त्रोटक वृत्तान्त मागें सांगितलाच आहे. इ० स० १८५६ च्या आगष्ट महिन्यांत काव्हूरनें त्याची पहिली मुलाखत घेतली व लवकरच त्याचा उपयोग करून घेण्याचें त्यास आश्वासन दिलें. यानंतर तो पीडमॉन्टचे लष्कराची जय्यत तयारी करण्याच्या उद्योगास लागला व सैन्याच्या हालचाली सुलभ रीतीनें करितां येण्या-

करितां त्यानें महत्त्वाचीं बांधकामें सुरू केलीं. या कामास लागणारा पैसा त्यानें पार्लमेंटकडून आपल्या वजनाच्या जोरावर मंजूर करून घेतला. एकंदरींत त्यानें आपल्या कारभाराचें काम आतां फार धिटाईनें चालविलें होतें. मध्यंतरीं फ्रान्स व इंग्लंड यांनीं नेपल्सचा राजा व रोमचा पोप यांस आपआपल्या संस्थानांतील बेबंदशाही बंद करून राज्यकारभारांत योग्य प्रकारें सुधारणा करण्याची सल्ला दिली. परंतु त्याचा कांहीं फारसा उपयोग झाला नाहीं. उलटपक्षीं ऑस्ट्रियानें मात्र आपल्या ताब्यांतील लांबर्डी–व्हेनिशिया प्रांतांतील लोकांस पुष्कळ सवलती देऊन त्यांचें अनुरंजन करण्याचा प्रयत्न चालविला होता. पीडमॉन्टमध्यें जाऊन राहिलेल्या तेथील रहिवाशांच्या मिळकतीवर त्यानें बसविलेली जप्ती आपो-आप उठविली. तेथील पूर्वीचा अप्रिय गव्हर्नर बदलून त्याच्या जागीं एका गोड पण मतलबी माणसाची नेमणूक केली. त्यानें राजकीय कैद्यांना माफी दिली व स्थानिक लोकसभांचें बरेंचसें कर्ज त्यांस माफ केलें. ऑस्ट्रियन बादशाहा फ्रान्सिस जोसेफ यानें स्वतः मिलान व व्हेनिस येथें जाऊन तेथील लोकांचीं मनें प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला. परंतु हे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. तो ज्या दिवशीं सरकारी रीतीनें मिलान शहरीं आला (जानेवारी १५, १८५७) त्याच दिवशीं तेथील लोकांनीं पीडमॉन्टच्या सैन्याच्या विजयाप्रीत्यर्थ स्मारक उभारण्याकरितां दिलेल्या देणगीची हकीकत ट्यूरिन येथील वर्तमानपत्रांनीं प्रसिद्ध केली. त्याबरोबरच त्यांनीं ऑस्ट्रियाच्या गतकालीन क्रूर व अमानुष कृत्यांची यादीहि प्रसिद्ध करून वरील बादशहाच्या राज्यपद्धतीसंबंधानें कडक टीका केली. त्यानंतर लवकरच ट्यूरिनच्या म्युनिसिपालिटीनें मिला-नीज लोकांच्या उपर्युक्त देणगीचा जाहीररीतीनें व अभिनंदनपुरःसर स्वीकार केला. या दोन गोष्टींचा ऑस्ट्रियास मोठा राग आला व त्यानें आपला तात्पुरतें हितसंबंध पहाणारा वकील अथवा अधिकारी (Charg,ed' affaires) याच्या मार्फत काव्हूरकडे त्याबद्दल जोराची तक्रार केली. काव्हूर आतां या बाबतींत फारच धीट बनला होता. यानें सदर वकिलास असें साफ उत्तर दिलें कीं,—

“ **पीडमॉन्टनें पॅरिस**च्या परिषदेंत **इटली**तर्फे जी कामगिरी केली त्याचें उतराई होण्याकरितां म्हणून त्यास देणगी देण्याची इच्छा **इटलीं**-तील निरनिराळ्या प्रांतांस होणें अगदीं स्वाभाविक आहे व त्यांत कांहीं गैरहि नाहीं. आतां, वर्तमानपत्रांसंबंधानें म्हणाल तर त्यांना **पीडमॉन्ट**च्या हद्दींत कायद्यानें पूर्ण स्वातंत्र्य दिलेलें आहे. कायद्या-च्या दृष्टीनें जेथें ह्या स्वातंत्र्याचा अतिरेक झाल्याचें आढळून येईल तेवढ्याचा प्रतिकार अथवा बंदोबस्त करणें हें आमचें कर्तव्य असून तें बजावण्यास केव्हांहि आम्ही मागें सरणार नाहीं. आमच्या पुष्कळ अंशीं स्वतंत्र असणाऱ्या पत्रांच्या वर्तनाबद्दल जर तुम्ही आमची इतकी कान-उघाडणी करितां तर सर्वस्वीं तुमच्या मुठींत असणाऱ्या तुमच्या देशां-तील पत्रांतून आमचे राजेसाहेब व आमचा देश यांबद्दल उघड उघड होत असलेल्या नालस्तीकडे तुम्ही कशी डोळेझांक करितां हें समजत नाहीं.”

ह्या धीट जबाबानंतर **ऑस्ट्रियानें पीडमॉन्टशीं** राजकारणव्यवहार अगदीं बंद केला. **काव्हूरनें**हि त्याबद्दल फारशी पर्वा बाळगिली नाहीं. त्याला कसें तरी करून **ऑस्ट्रियाला** युद्धास प्रवृत्त करावयाचेंच होतें. कारण, इटलींतून त्यास कायमचा हांकून दिल्यावांचून इटॅलियन राष्ट्राची उभारणी करणें अशक्य आहे असें त्याचें मत बनलें होतें. **पीडमॉन्टशीं** संबंध तोडल्यानंतर **ऑस्ट्रियानें लांबर्डी–व्हेनिशिया** प्रांतांतील प्रजेचें आराधन विशेष नेटानें चालू केलें. परंतु गतकालचा अनुभव अत्यंत कटु असल्यामुळें त्याच्या मोहक जाळ्यांत माशाप्रमाणें सांपडण्यास तेथील लोक तयार झाले नाहींत. त्यांनीं **डॅनियल मॅनि-नच्या** मागील जाहीरपत्रकांतील सूचनेस अनुसरून **पीडमॉन्टच्या** साहाय्यानें इटलीचें पुनरुज्जीवन करण्याचें ध्येय आपल्या डोळ्यांपुढें ठेवलें होतें. त्यामुळें ते असें म्हणत कीं, “ **ऑस्ट्रियानें** अधिक दयाळुत्व दाखविण्याची अपेक्षा आम्ही करीत नसून त्यानें येथून अजीबाद निघून जावें अशी आमची इच्छा आहे.” **ट्यूरिन** येथें स्थापन झालेल्या राष्ट्रीयमंडळाचीहि अशीच इच्छा होती. अर्थात् तिच्या कार्यक्रमास इटलींतील इतर प्रांतांतून आतां चांगलें प्रोत्साहन

मिळूं लागलें होतें. तथापि माझिनीला अद्याप हा कार्यक्रम पसंत नव्हता. लोकसमूहास बंडास प्रवृत्त करून इटलींत लोकसत्ताक राज्य स्थापन करणें शक्य आहे, ही कल्पना अद्यापहि त्याच्या डोक्यांतून निघाली नव्हती. म्हणून या सुमारास तो इंग्लंडहून गुप्तपणें जिनोआ येथें आला व तेथील क्रांतिकारक पक्षाच्या साहाय्यानें त्यानें इटॅलियन लोकसत्ताक राज्यस्थापनेचा शेवटचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या मागल्या सर्व प्रयत्नांप्रमाणें हाहि प्रयत्न फसला व त्यांत त्याच्या अनुयायांची भयंकर हानि झाली. 'Sapri expedition' या नांवानें हा प्रसंग इतिहासांत प्रसिद्ध आहे. ह्या अपयशानंतर माझिनीचा कार्यक्रम सर्वत्र अगदीं नापसंत ठरून नेमस्त व मूलगामी (Radical) या दोन्ही सुधारणावादी पक्षांच्या शाखांनीं एकमतानें काव्हूरच्या कार्यक्रमाचाच स्वीकार केला. अद्यापहि मूलगामी असे कांहीं लोक ह्या कार्यक्रमापासून अलिप्त होते; तसेच कांहीं अनियंत्रितसत्तावादी व प्रतिगामी धोरणाचे (Reactionaries) लोकहि त्याच्याविरुद्ध होते. परंतु काव्हूर यांपैकीं कोणासच भीक घालणारा नसल्यामुळें त्याच्या कार्याची झपाट्यानें प्रगति होत चालली होती. तो स्वतः मोठा सुस्वभावी व अत्यंत उद्योगी आणि दक्ष असल्यामुळें त्याला अपयश येण्याचा संभव फारच कमी होता. त्याचें काम करण्याचें सामर्थ्यहि फार विलक्षण होतें. मोठमोठ्या महत्त्वाच्या राजकारणांत गढून गेला असतांहि त्याचें बारिकसारिक गोष्टींकडे दुर्लक्ष होत नसे. तो सकाळीं पांच वाजण्यापूर्वीं उठून आठ वाजेपर्यंतचा वेळ पत्रव्यवहारांत, खासगी कामांत अगर गुप्त खलबत करण्यांत घालवी व नंतर अल्पसा उपाहार करीत असे. त्यानंतर सर्वांचे सलाम घेत व त्यांना प्रेमाच्या शब्दांनीं संतुष्ट करीत तो आपल्या दरबारच्या कचेरींत जात असे. तेथें दिवसाचा बहुतेक भाग सरकारी काम करण्यांत व दरबारी लोकांच्या अथवा सरकारकामासंबंधीं इतरांच्या भेटी घेण्यांत घालवून तिसरे प्रहरीं निरनिराळ्या खात्यांच्या कचेरींत जाऊन तेथील अधिकारीमंडळास योग्य त्या सूचना व हुकूम करून नंतर तो राजाच्या

भेटीस जात असे. तेथून संध्याकाळचे सुमारास घरीं येऊन कांहीं वेळ आपल्या पुतणीशीं गप्पागोष्टी करण्यांत घालविल्यावर बरोबर सहा वाजतां तो आपल्या वडील भावाबरोबर भोजन करीत असे. नंतर आपल्या अभ्यासाच्या खोलींत जाऊन एक विडी ओढल्यानंतर थोडा वेळ वामकुक्षी घेऊन तो फिरून सरकारी कागदपत्र पहाण्याचे कामास लागे. सुमारें १२ वाजेपर्यंत हें काम करून तो झोंपी जाई. त्याच्या ह्या रात्रीच्या कार्यक्रमांत क्वचित् प्रसंगीं—कोठें मेजवानीला अगर नाटक वगैरे करमणुकीचा प्रकार पहाण्याला गेल्यास—व्यत्यय येत असे. परंतु त्याखेरीज बाकीचा कार्यक्रम कसा अगदीं रेखीव पद्धतीप्रमाणें चालत असे. रात्रीं बाराच्यापुढें मात्र तो सहसा कधीं जागत नसे. या नियमित वागणुकीमुळें त्याला आपल्या मनाची त्रेधा न उडूं देतां अत्यंत जोखमीचीं व महत्त्वाचीं अशीं अनेक निरनिराळ्या प्रकारचीं व गुंतागुंतीचीं कामें अगदीं सहज रीतीनें करितां येत असत. एक काम चालू असतां मधेंच दुसरें नडीचें काम आलें तर तेंहि त्याच वेळेस उरकून टाकण्याची कला त्याला चांगली साधली होती. तसेंच इतकीं कामें संभाळून महत्त्वाचा पत्रव्यवहार स्वतः करण्यासहि त्यास जड जात नसे. त्यानें निरनिराळ्या बाबींसंबंधानें लिहिलेलीं सुमारें तीन हजारांवर पत्रें हल्लीं छापून निघालीं आहेत! त्यांवरून त्याचे मज्जातंतु किती बळकट असतील याचा वाचकांनींच विचार करावा! ह्या पत्रांमध्यें त्याचा सुस्वभाव, मनमोकळेपणा, अंतःकरणांतील उदार भावना व तळमळ, दिलदारपणा, सार्वजनिक कल्याणाची खरी कळकळ व तन्निमित्त कधीं कधीं उत्पन्न होणारा मनःक्षोभ इत्यादि गोष्टी ठळकपणें नजरेस येतात. या सर्वांहूनहि अत्यंत महत्त्वाची अशी जी आणखी एक गोष्ट ह्या पत्रव्यवहारावरून लक्षांत येण्यासारखी आहे ती त्याच्या **हेतूंचा शुद्धपणा** ही होय. त्याच्या राष्ट्रोद्धाराच्या कल्पनेला अगर हेतूला त्याच्या **वैयक्तिक हिताहिताचा लेशमात्रहि संपर्क** झालेला आढळून येत नाहीं. काव्हूरसारख्या राजकारणी व सत्ताभिलाषी पुरुषाच्या ठिकाणीं हा गुण विशेष होता; म्हणूनच अनेक प्रकारच्या गैरसमजुतीच्या वाता-

वरणांतून ९।१० वर्षांच्या अल्पशा काळांत त्याला इटॅलियन राष्ट्राची इमारत उभारतां आली! जगतामध्यें आजपर्यंत अनेक महत्त्वाकांक्षी थोर व कर्ते पुरुष होऊन गेलेले आहेत. परंतु त्यांच्या चारित्र्याचें निरीक्षण केल्यास त्यांपैकीं बहुतेकांचीं ध्येयें अथवा कार्यें त्यांच्या वैयक्तिक महत्त्वाच्या अथवा अशाच प्रकारच्या अन्य भावनेनें थोडीबहुत तरी लिप्त झालेलीं आढळून येतील. काव्हूरच्या समकालीन व त्याच्याशीं अनेक बाबतींत सादृश्य असणाऱ्या बिस्मार्कचें जरी उदाहरण घेतलें तरी वरील विधानाचा प्रत्यय येण्याजोगा आहे. आधुनिक काळांतील ऐतिहासिक थोर पुरुषांत अशा प्रकारचा गुणविशेष आमच्या देशांत फक्त समर्थ रामदासांच्या ठायीं मात्र असलेला दिसून येतो. युरोपांतील थोर पुरुषांतहि काव्हूरशिवाय तो अन्यत्र कोठेंच आढळून येत नाहीं. आणि याकरितांच त्या सर्वांपेक्षां त्याची योग्यता श्रेष्ठ मानली जाते व ती तशी मानिली पाहिजेहि!

---

# प्रकरण १० वें

## प्लाँबियरचें कारस्थान

काव्हूरनें जें कार्य करण्याचें योजिलें होतें तें कार्य सिद्ध होण्यास त्यास प्रथमदर्शनीं तरी एखाद्या बलिष्ठ राष्ट्राचें साहाय्य घेणें जरूर होतें. कारण, ऑस्ट्रियासारख्या प्रबल राष्ट्राशीं झुंझण्याचें सामर्थ्य एकट्या पीडमॉन्टच्या अंगीं नव्हतें; इतर इटॅलियन संस्थानांतून त्यास मदत मिळण्याचा संभव होता. परंतु ती मदत लष्करीदृष्ट्या उपयुक्त व महत्त्वाची अशी नव्हती. शिवाय जोंपर्यंत ऑस्ट्रियाचा पराभव झाला नाहीं तोंपर्यंत त्या मदतीवर अवलंबून रहाणें इष्ट नव्हतें. लष्करीदृष्ट्या ह्या मदतीची किंमत बाजारबुणग्यांच्या योग्यतेची होती. नैतिक दृष्ट्या तिचें महत्त्व फार मोठें होतें. पण त्याचा उपयोग करून घेण्यापूर्वी ऑस्ट्रियाचा रणांगणावर पराभव करणें जरूर होतें. त्या कामीं फक्त फ्रान्सचीच मदत मिळण्याचा कायतो संभव होता. कारण, पॅरिसच्या परिषदेनंतर इंग्लंड ऑस्ट्रियाशीं सलोखा करण्याच्या प्रयत्नास लागलें होतें. फ्रान्सचा बादशाहा तिसरा नेपोलियन हा सुद्धां कांहींसा थंडावला होता. परंतु काव्हूरनें हळुहळू त्यास पुनः आपल्यास मदत करण्याविषयीं उत्सुक केलें. इतक्यांत त्याचा मनोभंग करणारा एक अनिष्ट प्रकार घडून आला. फेलिस ऑरसिनी नांवाच्या एका इटॅलियन देशभक्तानें इ० स० १८५८ च्या जानेवारी महिन्यांत नेपोलियनचा खून करण्याचा प्रयत्न केला. नेपोलियन व ऑरसिनी हे तरुणपणीं एकात्र ठिकाणीं वागलेले व राहिलेले होते. ऑरसिनी हा इटलींतील एका क्रांतिकारक गुप्त संस्थेचा सभासद होता व नेपोलियनची त्या वेळीं सदर संस्थेच्या चळवळीबद्दल पूर्ण सहानुभूति होती इतकेंच नव्हे, तर एका प्रसंगीं त्यानें त्यांत उघडपणें भागहि घेतला होता. पुढें दैववशात् नेपो-

लियन फ्रान्सचा बादशाहा झाला व ऑरसिनी हा आत्मसंरक्षणार्थ पॅरिस येथें येऊन राहिला. इटलीला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कामीं नेपोलियननें पुढाकार घ्यावा अशी ऑरसिनी व त्याचा कंपू यांची इच्छा होती. त्या कामीं नेपोलियन धरसोडीचें वर्तन करीत असल्याचें पाहून त्वेषानें ऑरसिनीनें त्याचा खून करण्याचा यत्न केला असावा असें दिसतें. काव्हूरला या क्रांतिकारक लोकांचीं कृत्यें मुळींच आवडत नसत. त्यामुळें तो त्यांच्यापासून नेहमीं अलिप्त असे. तथापि या खुनाच्या कृत्यामुळें नेपोलियनची आपल्या कार्याविषयींची सहानुभूति नष्ट होते कीं काय अशी त्यास भीति उत्पन्न झाली व ती कांहीं अंशीं खरीहि ठरली. ऑरसिनीच्या कटाशीं संबंध अगर सहानुभूति असणाऱ्या लोकांना पीडमॉन्टच्या हद्दींत न येऊं देण्याची व्यवस्था काव्हूरनें सावधपणें अगोदरच केली होती. परंतु तेवढ्यानें नेपोलियनचें समाधान झालें नाहीं. ह्या अनिष्ट प्रसंगांतून तो बचावल्याबद्दल त्याचें अभिनंदन करण्याकरितां व्हिक्टर इमॅन्युअलनें स्वदस्तूरचें पत्र देऊन मुद्दाम एक सरदार त्याजकडे पाठविला होता. त्याजजवळ नेपोलियननें काव्हूरची योजना अपूर्ण व दौर्बल्यद्योतक असल्याविषयीं तक्रार करून पीडमॉन्टच्या सरकारानें याहून तीव्र उपाय योजले नाहींत तर आपण ऑस्ट्रियाशीं समेट करूं असें ध्वनित केलें. परंतु या वेळीं व्हिक्टर इमॅन्युअलनें धारिष्ट करून नेपोलियनला असा खडखडीत जबाब पाठविला कीं, "आपल्या विश्वासूक मित्राशीं अशा तऱ्हेनें वागणें आपणांस योग्य नाहीं. मीं आजपर्यंत कोणाच्याहि धमकीस भीक घातली नाहीं. माझ्या राष्ट्रीय इभ्रतीचें—ज्याच्याविषयीं मला लोक व देव यांच्यापुढें जाब देणें भाग आहे—संरक्षण करणें हा माझा धर्म आहे. आज सुमारें ८५० वर्षेपर्यंत आम्ही उजळ माथ्यानें तिचें रक्षण करीत आलों आहों व आज मजवर कोणी खालीं पहाण्याचा प्रसंग आणील तर मी त्याचेपुढें आपलें शिर नमविणार नाहीं. आणि असें असूनहि मी आपला खरा मित्र रहाण्याची इच्छा बाळगतों आहें." नेपोलियन हा मनोविकारवश मनुष्य होता म्हणून मागें सांगितलेंच आहे. वरील उत्तराचा त्याच्या मनावर

तत्काळ परिणाम झाला व त्यानें व्हिक्टर इमॅन्युअल यास एक गोडी-गुलाबीचें पत्र लिहिलें. इकडे ऑरसिनी यानें तुरुंगांत असतांना नेपोलियनला उद्देशून एक अत्यंत हृदयद्रावक व मनोवृत्त्युद्दीपक पत्र लिहिलें; त्यांत त्यानें त्यास इटलीला राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कामीं मदत करण्याची आर्तस्वरानें विनंती केली होती.* तिचाहि त्याचे मनावर इष्ट असा परिणाम घडून इटॅलियन कार्याबद्दल त्याची सहानुभूति पुन: जागृत झाली. ऑरसिनीला देहान्त शासन दिल्यानंतर सुमारें एक दोन महिन्यांच्या आंत नेपोलियननें त्याचें उपर्युक्त शेवटचें पत्र छापण्यास परवानगी दिली व तो काव्हूरला कोणत्या रीतीनें व कशी मदत करावयाची याचा विचार करूं लागला. याप्रमाणें काव्हूरच्या मार्गांतील एक अडचण दूर झाली. परंतु अद्याप त्याला दुसऱ्या एका अडचणींतून पार पडावयाचें होतें. पीडमॉन्टमधल्या पुरोगामी पक्षाच्या बऱ्याच लोकांचा नेपोलियनविषयीं प्रतिकूल ग्रह होता. त्याच्याबरोबर सख्य करून त्याची मदत घेण्याची कल्पना त्यांना पसंत नव्हती. त्याची मदत घेतल्यास पुढेंमागें इटलीवर त्याचें कदाचित् वर्चस्व होईल अशी त्यांस भीति वाटत होती. ही भीति खुद्द काव्हूरलाहि वाटत होती. परंतु त्या वेळीं त्यास स्वकार्य साधण्याकरितां ह्या सख्यावांचून दुसरा मार्ग नव्हता; शिवाय नेपोलियन वरचढ होऊं लागल्यास इंग्लंडशीं कारस्थान करून त्याचें पारडें समतोल राखूं असा त्यास आत्मविश्वास वाटत होता. परंतु तो जाहीरपणें प्रकट करणें अप्रयोजक असल्यामुळें त्याविषयीं वाच्यता करणें अशक्य होतें. तथापि त्यानें आपल्या परिस्थितीचें उद्घाटन करून त्या स्थितींत फ्रेंच राष्ट्राची मदत मिळविणें अवश्य आहे अशी पार्लमेंटची खात्री करून देण्याची अगदीं शिकस्त केली. तो म्हणाला:—

“ आपल्याहून निराळे हितसंबंध असणाऱ्या दुसऱ्या राष्ट्रास क्षुब्ध न

---

* “ माझ्या देशाला स्वातंत्र्य मिळवून दे, म्हणजे तुला अडीच कोट इटॅलियनांचे आशीर्वाद मिळतील. ” हे त्याचे विशेष महत्त्वाचे शब्द होते.

करितां प्रागतिक धोरण स्वीकारावें अशी जी माजी राजेसाहेबांची सदिच्छा होती ती पाळणें आतां अशक्य झालें आहे. ××× ही परिस्थिति फार विकट व भीतिजनक झाली आहे हें लपवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. सरकार व राष्ट्र या दोघांनींहि तिचा गंभीरपणें विचार करणें जरूर आहे. आणि तसें केल्यास, सभ्य गृहस्थहो ! तुम्हांस असें आढळून येईल कीं, ज्या राष्ट्राचा मी उल्लेख करीत आहें त्याच्या सामर्थ्याशीं आपल्या सामर्थ्याची तुलना केल्यास आपली स्थिति खरोखर मोठी धोक्याची आहे. ××× हा धोका टाळण्याची अथवा त्यास तोंड देण्याची तयारी आपणांस कशी करितां येईल हाच काय तो मुख्य महत्त्वाचा प्रश्न सध्यां आपल्यापुढें आहे. हा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोड- विण्याकरितां आम्हीं ज्या पश्चिमेकडील राष्ट्रांचे हितसंबंध आमच्या हितसंबंधाविरुद्ध नाहींत त्यांच्याशीं स्नेह संपादन करण्याचा उपक्रम केला आहे. ××× राजकारणाचे प्रश्न जरी सामान्यत: मुत्सद्दी- वर्गाकडून कायदा, बुद्धिवाद व लेखनचातुर्य यांच्या द्वारां सोडविले जात असले तरी त्यांचा अखेर निर्णय करण्याचें काम निरनिराळ्या राष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्यावर अवलंबून असतें. आणि अशा वेळीं दैव हें न्याय्य- पक्षास—सत्पक्षास—अनुकूल असतेंच असें नाहीं. परंतु ज्याचें लष्करी सामर्थ्य मोठें असेल त्यास तें अनुकूल होण्याचा पुष्कळच संभव असतो. अर्थात् जेव्हां संकटप्रसंगीं एखाद्या राष्ट्राला रणांगणावर पुरेसें सैन्य उभें करण्याचें सामर्थ्य नसेल तेव्हां त्यानें आपल्या मित्रांचें सैन्य आपल्या मदतीस आणणें जरूर आहे. त्यावांचून दुसरें गत्यन्तर नाहीं.''

वरील आशयाचें भाषण त्यानें इ० स० १८५८ च्या एप्रिल महिन्यांत केलें. व त्यानंतर सुमारें दीड महिन्यानें नेपोलियनचा वैद्य डॉ० कॉन्यू (ह्याची हकीकत मागें आलीच आहे) हा नेपोलियनचा गुप्त संदेश घेऊन सहज प्रवासाच्या निमित्तानें ट्यूरिन येथें आला. त्यानें काव्हूर व व्हिक्टर इमॅन्युअल या दोघांचीहि गुप्तपणें भेट घेतली व नेपोलियनचा गुप्त संदेश त्यांस कळविला. काव्हूरनें लवकरच कांहीं तरी निमित्तानें प्लोंबियर्स येथें अकस्मात् जाऊन नेपोलियनची भेट

घ्यावी असें ठरलें. नेपोलियन त्या ठिकाणीं हवा खाण्याकरितां जाऊन राहिला होता. ठरलेल्या संकेताप्रमाणें काव्हूर अगदीं गुप्तपणें प्रवास करीत ता० २० जुलई (१८५८) रोजीं प्लोंबियर्स येथें येऊन पोंचला. दुसरे दिवशीं सकाळीं त्याची व नेपोलियनची मुलाखत झाली. शिष्टाचाराचे कुशलप्रश्न झाल्यावर नेपोलियननें काव्हूरला सांगितलें कीं, ऑस्ट्रियाशीं जर पीडमॉन्टचें युद्ध सुरू झालें तर पीडमॉन्टला मदत करण्याचा माझा निश्चय ठरला आहे. मात्र युद्धास कारण—युद्धाची प्रथम उठावणी—ऑस्ट्रियाकडून झाली पाहिजे. तसेंच युद्धाचा प्रसंग सर्व युरोपियन राष्ट्रांस मान्य—त्यांच्या दृष्टीनें युद्धाचें समर्थन होण्याजोगा—असा असला पाहिजे. व तो क्रांतिकारक पक्षाच्या कार्यसिद्धीकरितां जुळवून आणला आहे असें वाटतां कामा नये. इतक्या अटी ठरल्यानंतर त्या कशा पाळतां येतील याबद्दल त्या उभयतांमध्यें बरीच चर्चा झाली. अखेर लढाईचें कारण त्यांना हवें तसें मिळण्याजोगी स्थिति मोडेनाच्या संस्थानांत असल्याचें त्यांस दिसून आलें. मोडेना व पार्मा हीं जहागीरिवजा असलेलीं छोटीं संस्थानें पीडमॉन्टच्या पूर्वसरहद्दीस लागून होतीं. त्या संस्थानांतील मासा व कॅरेरा येथील रहिवाशी तेथील ड्यूकच्या जुलमी अंमलामुळें अत्यंत त्रस्त झाले होते. त्यांना व्हिक्टर इमॅन्युअलची मदत मागण्यास प्रवृत्त करावें; नंतर त्यानें त्यांची दाद घेण्याबद्दल मोडेनाच्या ड्यूकला एक खरमरीत खलिता पाठवावा. ऑस्ट्रियाचा पाठिंबा असल्यामुळें त्या खलित्यास तो उर्मटपणाचें उत्तर देईल असें गृहीत धरण्यांत आलें आणि तसें झाल्यास व्हिक्टर इमॅन्युअलनें मासा शहराचा कबजा घ्यावा म्हणजे अर्थातच ऑस्ट्रिया युद्धास तयार होईल. पण अशा प्रकारें लढाई सुरू झाल्यास नेपल्स व रोम येथील सत्ताधाऱ्यांच्या मनोवृत्तींची काय वाट लावावयाची याचें नेपोलियनला मोठें कोडें पडलें. कारण, त्यांपैकीं एकाला झारची सहानुभूति असल्यामुळें व दुसऱ्यास फ्रान्सांतील कॅथोलिक लोकांची सहानुभूति असल्यामुळें त्यांचें वैषम्य संपादण्यास तो तयार नव्हता. परंतु काव्हूरनें त्याचें हें कोडें सोडविलें. इटलींतून

ऑस्ट्रियाला हाकून लावण्याचा प्रश्न सुटला म्हणजे बाकीचे सर्व प्रश्न आपोआप सुटतील असें त्यानें त्यास सांगितलें. “इ० स० १८४९ पासून रोम् येथें जें फ्रेंच सैन्य ठेवण्यांत आलें आहे त्याच्या साहाय्यानें बादशहास पोपच्या मुलखांत शांतता ठेवतां येईल. मात्र ऑस्ट्रियानें व्यापलेल्या रोमाग्ना परगण्यांतील लोकांना बंड करण्याची आपण मुभा द्यावी म्हणजे झालें. नेपल्सच्या बाबतींत मौन धरण्यापलीकडे बादशहास कांहींच करावयास नको. तेथील प्रजा परिस्थितीचा योग्य रीतीनें फायदा घेण्यास समर्थ आहे.” काव्हूरचें हें म्हणणें नेपोलियनला मानवलें. नंतर त्या युद्धाचें स्वरूप व कार्य यांबद्दल त्या उभयतांची वाटाघाट झाली. ऑस्ट्रियाला इटलींतून पार हाकून काढण्याची अवश्यकता नेपोलियननें मान्य केली. त्यानंतर रोमाग्नासह इटलीच्या उत्तर* प्रदेशाचें एकच स्वतंत्र राज्य व्हिक्टर इमॅन्युअलनें स्थापन करावें व सॅव्हाय परगणा फ्रान्सला देण्यांत यावा असें ठरलें. नेपोलियनच्या मनांतून नीस शहरहि फ्रान्सला मिळावें असें होतें. परंतु तसें करणें इटॅलियन राष्ट्रीयत्वास विघातक असल्याचें काव्हूरनें त्याच्या मनावर ठसविल्यामुळें त्यानें तूर्त त्याविषयींचा आग्रह सोडून दिला. नंतर युद्धाच्या साधनांविषयीं विचार सुरू झाला. ह्या युद्धांत ऑस्ट्रियाला इतर कोणत्याहि राष्ट्रांची मदत न मिळूं देण्याची तजवीज होणें जरूर आहे असें सांगून त्या बाबतींत रशिया, इंग्लंड व प्रशिया यांच्या तटस्थपणाचा आपणांस पूर्ण विश्वास वाटतो असेंहि त्यानें बोलून दाखविलें. तथापि ऑस्ट्रियाचें लष्करी सामर्थ्य व चिकाटी हीं फार दांडगीं असल्यामुळें प्रत्यक्ष व्हियेन्नावर चाल केल्यावांचून ऑस्ट्रियाचें इटलींतील वर्चस्व नाहींसें करणें दुर्घट आहे; म्हणून या युद्धांत निदान तीन लक्ष तरी सैन्य गुंतविलें पाहिजे असें सांगून त्यांपैकीं दोन लक्ष आपण देण्यास तयार असल्याचें

* यास ‘ किंग्डम ऑफ अपर इटली ’ हें नांव मिळावयाचें ठरून त्यांत पीडमॉन्ट, जिनोआ, मोडेना, पार्मा, रोमाग्ना, लांबर्डी—व्हेनिशिया मार्चेस ऑफ अनेकानो इतक्या संस्थानांचा समावेश व्हावयाचा होता.

त्यानें कळविलें. बाकीचें एक लाख सैन्य इटॅलियन लोकांचें बनवावें असें त्यानें काव्हूरला सुचविलें. ही सर्व वाटाघाट सकाळीं ११ वाजल्यापासून दुपारीं ३ वाजेपर्यंत सारखी चालली होती. तीन वाजल्यानंतर नेपोलियननें काव्हूरला रजा दिली व पुनः चार वाजतां फिरावयास जाण्याच्या निमित्तानें त्यास परत बोलाविलें.

ठरल्याप्रमाणें बरोबर चार वाजतां काव्हूर व नेपोलियन हे एका सुंदर फैटणमध्यें बसून फिरावयास निघाले. या वेळेस सारथ्याचें काम स्वतः नेपोलियन करीत होता. त्याच्याबरोबर फक्त एकच हुजऱ्या होता. प्लोंबियर्सच्या बाहेर पडतांच नेपोलियननें आपला पुतण्या प्रिन्स जेरोम नेपोलियन याचें व्हिक्टर इमॅन्युअलच्या मुलीशीं (क्लाटिल्डि हें तिचें नांव) लग्न जुळवून आणण्याची गोष्ट काव्हूरजवळ काढली. परंतु प्रिन्स नेपोलियनचें कुलशील व्हिक्टर इमॅन्युअलच्या कुलशीलापेक्षां कमी दर्जाचें असल्यामुळें त्याला आपली मुलगी देण्याची कल्पना व्हिक्टर इमॅन्युअलच्या मनास किती झोंबेल याची काव्हूरला बरोबर कल्पना असल्यामुळें त्यानें ह्या बाबतींत बादशहास निश्चयात्मक असें कांहींच सांगितलें नाहीं. तथापि ह्यासंबंधीं त्यांचें जें संभाषण झालें त्यावरून नेपोलियनचा ह्या मुद्दयावर विशेष जोर आहे, म्हणून त्याची सदर इच्छा सफल न झाल्यास मागें सांगितलेल्या राजकारणास व्यत्यय येण्याचा संभव आहे असें त्यास आढळून आलें. सबब त्यानें ह्यासंबंधानें आपल्या राजाचें मन वळविण्याचा निश्चय केला. तो सुमारें दोन दिवस प्लोंबियर्स येथें राहून नंतर जर्मनींत गेला. तेथील निरनिराळे राजे व मुत्सद्दी, तसेंच तेथें असलेले रशियन प्रतिनिधि ऊर्फ वकील यांच्यांशीं संभाषण करण्याचा त्यास योग आला, त्यावरून भावी युद्धांत त्या दोन्ही राष्ट्रांचें ऑस्ट्रियास साहाय्य होणार नाहीं अशी त्याची बालंबाल खात्री झाली. जर्मन संस्थानांत असतांनाच बोडेन येथून त्यानें व्हिक्टर इमॅन्युअल यास एक हृदयद्रावक पत्र लिहून आपली मुलगी प्रिन्स नेपोलियनला देण्याविषयीं त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. इटॅलियन राष्ट्राच्या भावी कल्याणाकरितां

हा अत्यंत दुःसह असा स्वार्थत्याग करणें जरूर आहे, त्यावांचून नेपोलियन बादशहाचें समाधान होणार नाहीं व त्याचें समाधान झाल्यावांचून त्याच्या मदतीवर रचलेला आपला राजकीय व्यूह सिद्धीस जाणार नाहीं, वगैरे गोष्टी त्याच्या मनावर ठसवून अखेर, राजकन्यांचीं लग्नें कितीहि दक्षतेनें केलीं तरी तीं त्यांस सुखावह होतातच असा नेम नाहीं ही गोष्टहि त्यानें व्हिक्टर इमॅन्युअल याच्या चार मुलींच्या उदाहरणांवरून त्यास स्पष्ट करून दाखविली. याखेरीज ला मार्मोरा यासहि काव्हूरनें वरील आशयाचें पत्र पाठवून त्यांत राजानें ह्यासंबंधीं तुमची सल्ला घेतल्यास, तो माझ्या विनंतीस रुकार देईल असें करावें अशी सूचना केली.*

व्हिक्टर इमॅन्युअलला आपल्या मुलीच्या लग्नासंबंधीं काव्हूरनें केलेली सूचना व विनंति मनापासून आवडणें शक्यच नव्हतें. त्याला तो एक मोठा बिकट पेंच वाटला. परंतु वैयक्तिक मनोवृत्ति व हिताहित यांपेक्षां राष्ट्रीय मनोवृत्ति व राष्ट्राचें हित यांकडे विशेष लक्ष देण्याइतकें मनौदार्य व मानसिक सामर्थ्य त्याच्या ठायीं वसत असल्यानें पितृवात्सल्यामुळें होणारी मनाची तळमळ बाजूस सारून पुढें कांहीं काळानें त्यानें त्या गोष्टीस आपली संमति दिली. असो. जर्मनींतून काव्हूर लवकरच परत स्वदेशीं आला. त्या वेळेपासून तों ऑस्ट्रियाशीं युद्ध सुरू होईपर्यंत गेलेला काळ हा त्याच्या कारकीर्दींतील अत्यंत महत्त्वाचा काल होय. ह्या काळांत काव्हूरचें मन निरनिराळ्या प्रकारच्या विचारांनीं व काळजीनें अत्यंत व्याप्त झालेलें होतें. त्यानें योजलेल्या

---

* ह्या विषयासंबंधानें काव्हूरच्या मनाची स्थिति किती चमत्कारिक व घाबरल्यासारखी झाली होती, हें त्याच्या सदर पत्रांतील पुढील मजकुरावरून वाचकांच्या लक्षांत येईलः—

" बादशहाशीं सख्य करणें आणि त्याच वेळीं तो कधींहि विसरणार नाहीं अशा प्रकारें त्याचा अपमान करणें ही चूक भयंकर होईल. मीं राजाला कळवळीचें पत्र

[ पुढें चालू ]

महत्कार्याची सिद्धि या भावी युद्धाच्या परिणामावर सर्वस्वीं अवलंबून असल्यामुळें तो परिणाम आपणांस अनुकूल असा होण्याबद्दल शक्य तेवढे सर्व उपाय योजण्याचा त्यानें निर्धार केला. नेपोलियननें जरी त्यास सैन्याची मोठी कुमक करण्याचें आश्वासन दिलें होतें तरी तेवढ्यावर समाधान मानण्यास तो तयार नव्हता. कारण, एक तर नेपोलियनची वृत्ति चंचल असल्यामुळें सर्वस्वीं त्याच्यावर अवलंबून रहाणें त्यास धोक्याचें वाटत होतें. शिवाय दुसरी गोष्ट अशी कीं, जर सर्व कार्य त्याच्याच मदतीनें पार पडलें तर इटलींत, न जाणों, तो ऑस्ट्रियाप्रमाणेंच वरचढ होऊन बसण्याचा संभव त्यास दिसत होता. अशा स्थितींत पीडमॉन्टच्या सैन्याच्या मदतीस इटलींतील देशभक्त स्वयंसैनिकांचीहि मदत घेण्याचें त्यानें ठरविलें. ही मदत त्यास गॅरिबाल्डीकडून होण्याजोगी होती. म्हणून त्यानें तत्काळ त्यास बोलावून आणून तयार असण्याबद्दल इशारत दिली. गॅरिबाल्डीचें यावेळपर्यंतचें आयुष्य इटलींतील क्रांतिकारक पक्षास मदत करण्यांत गेलें असल्यामुळें त्याच्याशीं उघड संबंध ठेवल्याबद्दल पीडमॉन्ट व इतर प्रांतांतील सनदशीर चळवळीचे पुरस्कर्ते यांनी पुष्कळ तक्रार केली. परंतु त्यानें तिकडे बिलकुल लक्ष दिलें नाहीं. वस्तुतः त्याला शाब्दिक वाद करण्यास आतां मुळींच वेळ नव्हता. ज्या ज्या गोष्टींनें आपल्या कार्याला बळकटी येईल ती ती गोष्ट तो एकसारखा करीत सुटला. त्याबद्दल त्यानें पार्लमेंटच्या मंजुरीचीहि वाट पाहिली नाहीं. त्याचें ह्या वेळचें काम अगदीं स्वेच्छेप्रमाणें

---

लिहून त्याला विनंति केली आहे कीं, ' सध्यांची ही साहसाची उत्कृष्ट संधि कुलीनपणाच्या कल्पनेच्या भरीस पडून दवडूं नका.' जेव्हां राजा तुमचा सल्ला घेईल तेव्हां तुम्ही माझ्या म्हणण्यास दुजोरा द्या अशी माझी तुम्हांस प्रार्थना आहे. ज्यामुळें आपल्या राजाचा मुकुट व आमच्या लोकांची भवितव्यता हीं धोक्यांत पडण्यासारखीं आहेत अशा ह्या कामास आपण मुळींच हात तरी घालतां नये, किंवा जर हात घालावयाचाच असेल, तर मग ह्या झगड्यांत अखेर विजय मिळण्यास जी जी गोष्ट साह्यकारी होईल ती ती करण्यांत आपणाकडून बिलकुल हयगय होतां कामा नये. "

चालू होतें. मात्र त्यास व्हिक्टर इमॅन्युअलचा पूर्ण पाठिंबा होता. ऑस्ट्रियाशीं युद्ध करण्याची ह्या राजाची उत्सुकता काव्हूरपेक्षांहि तीव्र होती व राजकीय धोरण (Diplomacy) संभाळण्याकरितां केव्हां केव्हां काव्हूरला राजाच्या ह्या उत्सुकतेला आळा घालावा लागत होता. त्याला आणखी एक महत्त्वाची गोष्ट या वेळीं साधावयाची होती व ती साधण्याकरितां त्यास आपल्या डोक्याला अतिशय शीण द्यावा लागत होता. ती गोष्ट म्हटली म्हणजे ऑस्ट्रियाला युद्धास प्रवृत्त करणें ही होय. ऑस्ट्रियानें आपण होऊन पीडमॉन्टशीं औद्धत्यपूर्वक युद्ध सुरू केलें तरच नेपोलियनची मदत व इतर राष्ट्रांची सहानुभूति त्यास मिळणार होती. आणि ऑस्ट्रिया तर तसें करण्यास तयार नव्हता व तयार होण्याचाहि संभव नव्हता. परंतु काव्हूर आपल्या शहाणपणाच्या जोरावर त्यास तसें करण्यास भाग पाडणार होता. मात्र त्यांत त्यास यश येईल असें कोणाहि तत्कालीन मुत्सद्द्यास वाटत नव्हतें. प्रसिद्ध इंग्लिश मुत्सद्दी मि० ओडो रसेल या वेळीं ट्यूरिन येथें आला होता; त्याचें व काव्हूरचें जेव्हां या विषयावर संभाषण झालें तेव्हां ऑस्ट्रिया कांहीं केलें तरी युद्धास प्रवृत्त होणार नाहीं, असें तो म्हणाला असतां, त्यास काव्हूरनें, "परंतु मी त्यास आमच्याविरुद्ध युद्ध जाहीर करण्यास भाग पाडीन" असें उत्तर दिलें. काव्हूरचें हें धाष्ट्यांचें उत्तर ऐकून रसेलचें समाधान झालें नाहीं. त्यास ती गोष्ट असंभाव्य वाटून काव्हूरची थट्टा करण्याच्या हेतूनें, 'तुम्ही हा बनाव केव्हां बनवून आणणार?' म्हणून त्यानें प्रश्न केला; त्यास काव्हूरनें 'सुमारें मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत' असें शांतपणें उत्तर दिलें. रसेलनें या संभाषणाची नोंद आपल्या रोजनिशींत करून ठेवली व पुढें जेव्हां वरील ठराविक वेळेच्या पूर्वींच ऑस्ट्रियानें पीडमॉन्टशीं युद्ध सुरू केल्याचें जाहीर केलें तेव्हां त्याला व त्याच्याप्रमाणेंच इतर राष्ट्रांतील मुत्सद्द्यांसहि आश्चर्य वाटलें व काव्हूरच्या मुत्सद्देगिरीची त्यांनीं मोठी तारीफ केली. कित्येकांच्या तोंडून 'याचें नांव राजकारणपटुत्वं' असेहि उद्गार निघाले! काव्हूरनें या वेळीं चालविलेले परिश्रम पाहून

त्याच्याशीं अनेक बाबतींत मतभेद असलेला माजी प्रधान **मासिमो डि आझेग्लिओ** हाहि त्याजवर अगदीं प्रसन्न झाला; व त्यानें त्यास प्रोत्साहनपर असें एक पत्र पाठवून कळविलें कीं, "**तुमचें धोरण कसें आहे याबद्दल चर्चा करण्याची इत:पर अवश्यकता उरली नसून तें कसें यशस्वी करितां येईल याचाच काय तो सध्यां विचार कर्तव्य आहे.**' **मासिमो डि आझेग्लिओचें** हें पत्र पाहून **काव्हूरला** अत्यंत संतोष वाटला. एकेकाळीं आपला प्रतिस्पर्धी असलेल्या थोर, विचारी व वजनदार माणसाचें मत ऐनप्रसंगीं आपणांस अत्यंत अनुकूल झालेलें पाहून क्षणभर तरी कोणास धन्यता व आनंद वाटणार नाहीं? त्या वेळीं ज्या कांहीं घडामोडी चालू होत्या त्या इतक्या सावधपणें व गुप्तपणें चालल्या होत्या कीं, सामान्य लोकांना त्यांची मुळींच माहिती होत नसे. परंतु लोकांचा **काव्हूरवर** पूर्ण विश्वास बसलेला होता; इतका कीं, ते नुसते त्याच्या चेहऱ्यावरून परिस्थितीचें अनुमान करण्यास राजी असत! यासंबंधीं एक मौजेची आख्यायिका उपलब्ध आहे, ती अशी:—एकदां **ट्यूरिन** येथील रशियन वकिलाची बायको ह्या धांदलीच्या काळांत एका दुकानांत गेली असतां तेथील दुकानदार तिच्या हातीं माल देतां देतां रस्त्याकडे पळत गेला व थोड्या वेळानें परत आला. त्याच्या ह्या गडबडीचें कारण विचारतां तो त्या बाईस म्हणाला कीं, "**काऊंट काव्हूर** आत्तां या रस्त्यानें गेला, तेव्हां सध्यां आपल्या देशाची स्थिति कशी काय आहे हें समजून घेण्याकरितां मी त्याची मुद्रा पहाण्याकरितां गेलों होतों. त्याची मुद्रा तरतरीत व उत्साहाची दिसली. त्यावरून सर्व कांहीं ठीक चाललें आहे असें म्हणण्यास चिंता नाहीं." देशांतील ज्या कर्त्या पुरुषावर जनतेचा इतका दृढ विश्वास बसलेला असेल तो कोणती अघटित गोष्ट करूं शकणार नाहीं? स्वत:चें कर्तृत्व* व लोकांचा विश्वास आणि प्रेम

---

* **काव्हूरच्या** कर्तृत्वाबद्दल त्याच्या शत्रुपक्षाकडील म्हणजे ऑस्ट्रियन मुत्सद्दी

[ पुढें चालू ]

ह्या अमोघ साधनांच्या साहाय्यानेंच काव्हूरनें, त्याच्या पिढीस अशक्य वाटणारी गोष्ट पुढील दोनतीन वर्षांत शक्य करून दाखविली. ती कशी? तो रम्य कथाभाग पुढें येईलच.

---

वृद्ध मेटर्निच ( ह्यानें पहिल्या नेपोलियनला सुद्धां चकाविलें होतें. ) यानेंहि पुढील-प्रमाणें आदर व्यक्त केलेला आहे. तो एकदां म्हणाला कीं, " There is only one diplomatist left in Europe, and he, unfortunately, is against us; I mean Count Cavour. "

*Cavour,s life by pietro orsi. p. 246,*

# प्रकरण ११ वें

## ऑस्ट्रियाशीं युद्ध !

### ( सन १८५९ )

**काऊंटेस मार्टिनेंगो** हिनें **काव्हूरच्या** कारकीर्दीतील ऑस्ट्रियन युद्धापूर्वीच्या काळासंबंधानें लिहितांना असें म्हटलें आहे कीं, हा काळ म्हणजे **काव्हूरच्या** कर्तबगारीची एक कसोटीच होती व तो त्या कसोटीस उतरला खरा. परंतु जिवापाड श्रम करावे लागल्यामुळें त्यास अकालीं मृत्युमुखीं पडावें लागलें. इच्छित हेतु सिद्धीस नेण्याकरितां त्यानें शक्य तितके डावपेंच लढविले. **नेपोलियनबरोबर प्लोंबियर्स** येथें त्यानें केलेलें कारस्थान अगदीं गुप्त असल्यामुळें (तें **नेपोलियनच्या** परराष्ट्रीय खात्याच्या प्रधानासहि माहीत नव्हतें.) व **नेपोलियनची** चंचलवृत्ति त्यास पूर्णपणें माहीत असल्यामुळें त्या कारस्थानांतील करार लेखनिविष्ट करण्याची खटपट त्यानें प्रथम सुरू केली. यानंतर थोडेच दिवसांनीं नवीन वर्ष लागणार होतें व त्याच्या प्रारंभीं **प्रिन्स नेपोलियनचें व्हिक्टर इमॅन्युअलच्या** मुलीशीं लग्न व्हावयाचें ठरलें होतें. ह्या लग्नानिमित्त तो **ट्यूरिन** येथें यावयाचा होता; ही संधि साधून **काव्हूरनें** त्याच्यामार्फत वरील कार्य करून घेतलें. हा तहनामा अगदीं गुप्त ठेवण्यांत आला होता. तथापि **नेपोलियन** व **काव्हूर** यांच्या दरम्यान कांहींतरी गुप्त तह झाल्याची दाट वदंता **माझिनी** व युरोपांतील इतर मुत्सद्दी—मंडळें यांच्यांत लवकरच पसरली, आणि प्रत्येकजण त्यांतील कलमांविषयीं आपापल्या समजुतीप्रमाणें तर्कवितर्क करूं लागला. परंतु खरी स्थिति मात्र अखेरपर्यंत कोणासहि कळली नाहीं. मागें उल्लेखिलेल्या राष्ट्रीय मंडळाच्याद्वारें इटलीतील इतर प्रांतांत **ऑस्ट्रियाविरुद्ध** जी जोराची चळवळ सुरू

झाली होती ती आतां फारच बळावली. पीडमॉन्टमध्यें तर युद्धाची सर्वतोपरी तयारी चालू होती. नवीन वर्षाच्या प्रारंभीं पीडमॉन्टच्या पार्लमेंटपुढें राजाचें जें भाषण* झालें त्यावरून तो देश लढाईस अगदीं उत्सुक असल्याचें स्पष्ट दिसत होतें. तसेंच पॅरिस येथें नूतन वर्षा-निमित्त भरलेल्या दरबारांत नेपोलियन बादशहानें ऑस्ट्रियन वकिलास उद्देशून 'तुमच्या सरकारचे व आमचे संबंध समाधानकारक नाहींत; तथापि तुमच्या राजाबद्दलची माझी आदरबुद्धि कमी झालेली नाहीं' अशा आशयाचे जे शब्द उच्चारले त्यांवरूनहि ऑस्ट्रियन व इतर युरो-पियन राष्ट्रांतील मुत्सद्द्यांचीं मनें साशंक झालीं. तशांत प्रिन्स नेपोलि-यनचें व्हिक्टर इमॅन्युअलच्या मुलीशीं लग्न झालें (जानेवारी ३०–१८५९); त्यामुळें तर ऑस्ट्रियास युद्धाचें स्वप्नच पडूं लागलें. अर्थात् त्यानें प्रसंग पडल्यास उपयोगी पडावें म्हणून आपल्या ताब्यांतील लांबर्डी प्रांतांत जास्त सैन्य पाठविलें व तें पीडमॉन्टच्या सरहद्दीवर ठेवलें. ऑस्ट्रियाचें हें कृत्य पहातांच काव्हूर अधिक धिटाईनें वागूं

---

* ह्या भाषणासंबंधीं अशी माहिती मिळते कीं, त्याचा मसुदा काव्हूरनें तयार करून जेव्हां आपल्या इतर सल्लागारांस–प्रधानांस–दाखविला तेव्हां तो त्यांस फार धार्ष्ट्याचा वाटल्यावरून त्यांनीं त्याबद्दल कुरकूर केली. तेव्हां काव्हूरनें तो पॅरिस येथें नेपोलियनकडे पाठविला. नेपोलियननें त्यांत थोडीशी सुधारणा केली; पण कांहीं वाक्यें मुळापेक्षांहि अधिक धिटाईचीं घातलीं. त्याच्या पसंतीनें अखेर कायम ठरलेला मसुदा पुढीलप्रमाणें होता:—

"गतकालीन अनुभवानें हुरूप (उत्साह) येत असल्यामुळें भविष्यकाळीं येणाऱ्या प्रसंगांना निश्चयानें तोंड देण्यास आम्हीं तयार आहों. तो भविष्यकाळ आनंदमय होईल. कारण, आम्ही आपलें धोरण, न्याय, स्वातंत्र्यप्रेम व देशप्रेम यांस अनुसरून आंखलेलें आहे. आमचा देश आकारानें लहान असूनहि त्याला युरोपांतील राजदर-बारांमध्यें जो मान मिळत आहे त्याचें कारण तो ज्या तत्त्वांचा वाली आहे, व त्यानें जी सहानुभूति संपादन केली आहे त्यामुळें त्याला महत्त्व प्राप्त झालें आहे हें

[ पुढें चालू ]

लागला! त्यानें विशेष खर्चाकरितां म्हणून ५ कोट लायर्सची* मागणी पार्लमेंटला केली. ती तिनें तत्काळ मंजूर केली इतकेंच नव्हे, तर शहरांतील पुढारी लोकांनीं त्यास खासगी रीतीनेंहि द्रव्यसाहाय्य करण्याचें कबूल केलें. वरील रक्कम कर्जाच्या रूपानें मिळवावयाची होती व त्याकरितां काव्हूरनें काढलेल्या सरकारी रोख्यांवर लोकांच्या एकसारख्या उड्या पडत होत्या! यावरून त्याचा कार्यक्रम लोकांस किती पसंत पडला होता व त्यांचा त्याजवर कसा पूर्ण विश्वास बसला होता हें चांगलें प्रत्ययास येतें. याप्रमाणें पैशाची तजवीज होतांच त्यानें गॅरिबाल्डीला बोलावून त्यास आपलें स्वयंसैनिकांचें पथक तयार करण्यास सांगितलें. तसेंच भावी युद्धाला राष्ट्रीय स्वरूप देण्याच्या हेतूनें त्यानें मागें उल्लेखिलेल्या राष्ट्रीयमंडळाच्या द्वारें इटलीच्या निरनिराळ्या भागांतून स्वयंसैनिक मिळविण्याची खटपट गुप्तपणें चालू ठेविली. तीस यश येऊन इटलीच्या बहुतेक संस्थानांतून स्वयंसैनिकांच्या झुंडीच्या झुंडी पीडमॉन्टमध्यें जमा होऊं लागल्या. ह्या स्वयंसैनिकांचा उपयोग करण्याचे बाबतींत पीडमॉन्टचे लष्करी व मुलकी अधिकारी यांचें मत प्रतिकूल होतें व त्यांनीं त्यासंबंधीं कायदेशीर अशा कांहीं अडचणी काव्हूरच्या नजरेस आणल्या. परंतु काव्हूरनें त्यांकडे लक्ष न देतां स्वयंसैनिकांची सेना तयार करण्याचें काम स्वतःकडेच घेतलें. अर्थात् इतर अधिकाऱ्यांना त्याच्या कलानुसार वागणें भाग पडलें.

---

होय. ही स्थिति म्हणजे संकटरहित आहे असें नाहीं. कारण, आम्ही तह करण्यास तयार असलों तरी इटलीच्या अनेक भागांतून जो दुःखाचा आक्रोश आमच्या कानीं पडत आहे त्याचा परिणाम आमच्या मनावर झाल्याशिवाय रहाणार नाहीं. ऐकमत्याच्या जोरावर व आमच्या कार्याच्या न्याय्यपणावर भरंवसा ठेवून दूरदर्शीपणानें व निश्चयानें ईश्वरी योजना होईल त्याप्रमाणें वागण्यास आम्ही आनंदानें तयार आहों."

* एक रुप्याचें नाणें=आठ पूर्णांक तीन चतुर्थांश पेन्स किंवा आणे. त्या काळीं सुमारें सहा आणे.

इतर प्रांतांतील स्वयंसैनिकांचा या युद्धांत उपयोग करूं नये अशी **नेपोलियन**नेंहि प्रथम आपल्या गुप्त करारांत शर्त घातली होती. परंतु **काव्हूर**नें त्या बाबतींत आग्रह धरून ती त्याच्याकडून मागून रद्द करविली. स्वयंसैनिकांच्या बाबतींत त्यानें एवढा आग्रह धरण्यांत त्याचा अंतस्थ हेतु असा होता कीं, युद्धांत जय मिळाल्यास 'तो केवळ आमच्याच मदतीमुळें मिळाला' अशी फुशारकी मारण्यास **नेपोलियन**ला जागा राहूं नये. याखेरीज खात्रीपूर्वक जय मिळावा म्हणून शक्य तितकें लष्करी सामर्थ्य तयार करणें व त्याच वेळीं **इटली**तील सर्व प्रांतांमध्यें एकराष्ट्रीयत्वाची भावना जागृत करणें हे आणखी दोन हेतु ह्या स्वयंसैनिकांच्या योजनेच्या मुळाशीं होते व ते अखेरीस सफळ झाले. याप्रमाणें **काव्हूर** भावी युद्धाची तयारी आपलेकडून करीत होता खरा; परंतु हें युद्ध कसें घडून येणार हा प्रश्न त्याच्या मनास एकसारखा अस्वस्थ करीत होता. **ऑस्ट्रिया** आगळिक करील तरच **फ्रान्स**ची मदत मिळणार. पण **ऑस्ट्रिया** तसें करील काय? **इंग्लंड** मध्यें पडून त्यास माघार घ्यावयास लावणार नाहीं काय? तसेंच **पीडमॉन्ट**करितां **ऑस्ट्रिया**शीं युद्ध करण्याची कल्पना **नेपोलियन**च्या दरबारी* लोकांस अप्रिय असल्यामुळें व **नेपोलियन**चें मन चंचल असल्यामुळें आयत्या-वेळीं तो अवसानघातकीपणा करील काय? वगैरे शंकांचें निराकरण झाल्यावांचून त्याचे मनोरथ सफळ होण्याचा संभव नव्हता. अर्थात् त्याकरितां या वेळीं परराष्ट्रांच्या कारस्थानाकडे काकदृष्टि लावून बसणें त्यास भाग होते. **इंग्लंड**चीं राज्यसूत्रें या वेळीं **लॉर्ड डर्बी**च्या स्वाधीन होतीं. तो स्थापितसत्तावादी असल्यामुळें **इटली**च्या आकांक्षेस त्याची फारशी अनुकूलता नव्हती. त्यानें आपला **पॅरिस** येथील वकील **लॉर्ड**

---

* **नेपोलियन** स्वतः जरी **ऑस्ट्रिया**शीं युद्ध करण्यास तयार होता तरी त्याच्या दरबारची मंडळी—खुद्द त्याच्या परराष्ट्रखात्याचा प्रधान—तसें करण्यास तयार नव्हता. शिवाय **पीडमॉन्ट**नें वर्चस्व वाढण्यास **पोप**च्या सत्तेस बाध येईल म्हणून **फ्रान्सां**तील कॅथोलिक पंथाचे पुढारीहि या युद्धास प्रतिकूल होते.

काऊली याला मुद्दाम व्हियेन्ना येथें पाठवून त्याच्यामार्फत ऑस्ट्रियास युद्धापासून परावृत्त करण्याची खटपट सुरू केली. नेपोलियनचें मन वळविण्याचाहि त्यानें यत्न केला. नेपोलियनच्या मनांतून इंग्लंडला दुखवावयाचें नव्हतें; म्हणून त्यानेंहि बाह्यात्कारें इंग्रज प्रधानमंडळाच्या इच्छेस मान तुकविली. पण ऑस्ट्रियाचा ह्या शांतिपाठावर फारसा भरंवसा नसल्यामुळें त्यानें एकीकडे शांतता राखण्याची वाटाघाट सुरू ठेवून दुसरीकडे सैन्याची तयारीहि चालू ठेविली. ह्या संधीचा फायदा घेऊन ता० ८ मार्च रोजीं काव्हूरनेंहि "ऑस्ट्रियाच्या तयारीकडे लक्ष न देतां आम्हांस इत:पर स्वस्थ बसणें शक्य नाहीं" असें जाहीर करून आपल्या लष्करी अधिकाऱ्यांस सैन्याची जमवाजमव करण्याबद्दल उघडपणें हुकूम केला. इतका प्रकार घडून येईपर्यंत इकडे इटलीच्या इतर प्रांतांतील पुरोगामी पक्षाची चळवळ अशा थरास येऊन पोंचली कीं, आतां तिला आळा घालणें शक्य नव्हतें. इतकी तयारी झाली तरीहि नेपोलियन अद्याप मागें घेत होताच. नेपोलियनचें या वेळचें वर्तन व मन:स्थिति कांहीं अंशीं शेक्सपियरच्या हॅम्लेट नाटकांतील नायक हॅम्लेट याच्यासारखी बनली होती. 'करूं कीं नको' ह्या मंत्राचा जप तो अद्याप करीतच होता. इतक्यांत रशियानें मध्यस्थी करून वादविषयक प्रश्नांचा निकाल लावण्याकरितां सर्व युरोपियन राष्ट्रांची एक परिषद भरवावी अशी सूचना केली. ह्या परिषदेपुढें पुढील प्रश्नांची चर्चा व्हावी असें त्यानें सुचविलें. ते प्रश्न हे:—

(१) ऑस्ट्रिया व पीडमॉन्ट (सार्डिनिया) यांच्यामध्यें शांतता राखण्याचे उपाय ठरविणें.

(२) रोमन संस्थानांतून ऑस्ट्रियन व फ्रेंच सैन्य योग्य रीतीनें कसें काढून नेतां येईल याचा विचार करणें.

(३) इटलींतील संस्थानांच्या कारभारांत करावयाच्या सुधारणांची चौकशी करणें.

(४) इटलीच्या सर्व संस्थानांचा परस्परसाहाय्यक असा

एक संघ तयार करून पोपला त्याचा सन्मान्य (ऑनररी) अध्यक्ष नेमणें.

या परिषदेमधून **पीडमॉन्ट**ला वगळल्यास व ती भरण्यापूर्वीं त्या राष्ट्रानें आपली लष्करी हालचाल बंद केल्यास सदर सूचना आपणांस मान्य असल्याचें ऑस्ट्रियानें जाहीर केलें (ता० १९ मार्च १८५९). तसेंच पीडमॉन्टवर आपण हल्ला करणार नाहीं असेंहि त्यानें कळविलें. इंग्रजी राष्ट्रानें ह्या अटी मान्य केल्या व त्यांस मान्यता देण्याविषयीं त्यानें फ्रेंच बादशहाचें मन वळविलें. शांततापरिषदेची ही कल्पना **नेपोलियन**ला मनांतून पसंत नव्हती. परंतु त्याची युद्धाची तयारी अद्याप पूर्ण झालेली नसल्यामुळें व त्याच्या दरबारीं युद्धाच्या विरुद्ध असा एक प्रबल पक्ष असल्यामुळें कालहरण करण्याकरितां त्यानें त्या गोष्टीस आपली संमति दिली व **काव्हूर**चें मन वळविण्याकरितां त्यानें त्यास एकदम **पॅरिस**ला बोलाविलें. त्याप्रमाणें २६ मार्च रोजीं **काव्हूर** **पॅरिस** येथें येऊन दाखल झाला. **नेपोलियन**चा परराष्ट्रीय खात्याचा प्रधान **वेल्वेस्की** हा ह्या युद्धाच्या विरुद्ध होता. त्याला **प्लोंबीयर्स**चें कारस्थान ठाऊक नव्हतें. यामुळें या वेळच्या वाटाघाटींत त्यानें युद्ध टाळण्याकरितां शक्य तितक्या सर्व नडी—अडचणी—**नेपोलियन**-पुढें मांडल्या व त्यानें **काव्हूर**ला सदर परिषदेमार्फत आपल्या लढ्याचा निकाल लावून घेण्याची सूचना केली. परंतु असल्या अपमानास्पद अटी कबूल करण्याचें त्यानें साफ नाकारलें. **नेपोलियन**ची एकान्तीं भेट घेऊन **काव्हूर**नें त्याची बरीच कानउघाडणी केली व जर **नेपोलियन**नें आपला शब्द पाळला नाहीं तर आपण राजीनामा देऊन ह्या प्रकरणांतील सर्व गुप्त पत्रव्यवहार प्रसिद्ध करूं असा **काव्हूर**नें **नेपोलियन**ास धाकहि घातला. तेव्हां **नेपोलियन**नें त्याची समजूत करून त्यास आणखी एकदोन महिने दम धरण्याबद्दल सांगितलें. **नेपोलियन**च्या संभाषणावरून तो आपणाबरोबर **ऑस्ट्रिया**शीं युद्ध करणार याबद्दल **काव्हूर**ची खात्री झाली. परंतु त्याच्याकडून होत असलेला उशीर अपायकारक आहे असें त्याचे मनानें घेतल्यामुळें तो

अंमळ रंजीस होऊन **ट्यूरिन**ला परत आला (११ एप्रिल १८५९). तो परत येतांच लोकांनीं त्याच्या वाड्याभोंवतीं जमून त्याचा मोठा जय-जयकार केला. परंतु त्यापासून आनंद अगर समाधान वाटण्यासारखी त्याच्या मनाची स्थिति नव्हती. तो कांहींसा खिन्न व उदास बन-लेला होता. तथापि त्यानें आपल्या इच्छित कार्याची पाठ सोडली नाहीं. **ऑस्ट्रिया**ला चिडवून युद्धास प्रवृत्त करण्याचीं गुप्त कारस्थानें त्यानें चालविलींच होतीं, व इकडे युरोपियन शांततापरिषदेच्या वाटा-घाटींतहि तो सामील झाला होता.

**काव्हूर** रंजीस होऊन परत गेला ही गोष्ट **पॅरिस** येथील ऑस्ट्रि-यन वकिलाच्या नजरेस आली होती. तसेंच तो गेल्यानंतर **पॅरिस**च्या दरबारीं जिकडे तिकडे शांततेच्या गोष्टी चालू होत्या. अर्थात् अशा स्थितींत युद्ध जुंपल्यास **फ्रान्स**ची मदत **पीडमॉन्ट**ला मिळणार नाहीं अशा प्रकारची बातमी त्यानें आपल्या सरकारास कळविली. ऑस्ट्रियन दरबारांत या वेळीं युद्धास अनुकूल असलेला पक्ष प्रबळ होता. खुद्द ऑस्ट्रियन बादशहा **फ्रान्सिस जोसेफ** (आज १९१५ मध्येंहि तोच **ऑस्ट्रिया**चा बादशहा आहे.) हा या वेळीं ऐन तारुण्याच्या भरांत अस-ल्यामुळें **पीडमॉन्ट**सारख्या भिकार (त्याच्या दृष्टीनें) संस्थानच्या वारं-वार होणाऱ्या धडपडीचा शेवट लावण्यास तो अगदीं उत्सुक झालेला होता. त्याचा परराष्ट्रीय खात्याचा प्रधान **काऊन्ट फॉन ब्यूओल** हाहि उन्मत्त वृत्तीचाच माणूस होता. शिवाय **काव्हूर**नें अनेक युक्त्या योजून त्याचा मतिभ्रम केलेला होता. या सर्व कारणांमुळें ऑस्ट्रियन दरबारांत शांततेचें वातावरण फार वेळ टिकणें शक्य नव्हतें. शांतता-परिषदेच्या अटींची चर्चा करण्यांतच **काव्हूर**नें बरेंच कालहरण केलेलें पाहून ऑस्ट्रियन सरकारचें मन अस्वस्थ झालें व त्यांनीं एप्रिल महिन्याच्या प्रारंभीं **इटली**तील आपल्या सैन्याच्या अधिपतीस युद्धाची पूर्वसूचना दिली. अर्थात् त्यास अनुसरून ऑस्ट्रियन सेनापती **जन-रल ग्युले** यानें युद्धास जाण्याचा आवेशपूर्ण भाषेत लिहिलेला हुकूम आपल्या शिपायांस वाचून दाखविला. दुसऱ्याच दिवशीं **पीडमॉन्ट**च्या

वर्तमानपत्रांनीं **ऑस्ट्रियाच्या** आगळिकीचा पुरावा म्हणून तो हुकूम शब्दशः छापून प्रसिद्ध केला. तो वाचतांच **व्हिक्टर इमॅन्युअलच्या** अंगाची लाही होऊन गेली! त्यानें तो तावडतोब **पॅरिस** येथें **प्रिन्स नेपोलियन**कडे पाठविला व **काव्हूरला**हि एक पत्र लिहून लढाईची पहिली तोफ आज रात्रीं डागावी असें माझ्या मनांत येतें असें कळविलें! हा इतका प्रकार होतांच इतर युरोपियन राष्ट्रांनीं शांतता राखण्याचे प्रयत्न फारच नेटानें चालविले. **इंग्लंडनें** अशी उपसूचना पुढें आणली कीं, सदर परिषदेस **इटलींतील** सर्व संस्थानांचे प्रतिनिधि बोलवावेत व ती भरण्यापूर्वी **ऑस्ट्रिया** आणि **पीडमॉन्ट** या दोघांनींहि आपल्या लष्करी हालचाली बंद कराव्यात. **इंग्लंडच्या** आग्रहामुळें **फ्रान्सनें** ती मान्य केली. तेव्हां ता० १८ एप्रिल रोजीं रात्रीं **ट्यूरिन** येथील फ्रेंच वकिलास तशा आशयाची तार आली व त्यांतच **पीडमॉन्टच्या** लष्करी हालचाली बंद करण्याविषयीं **काव्हूरची** संमति तावडतोब मिळवावी अशी सूचना करण्यांत आली होती. ही तार येतांच फ्रेंच वकिलानें तत्काल ती आपल्या सेक्रेटरीबरोबर **काव्हूरकडे** पाठविली. **काव्हूर** या वेळीं निजला होता. परंतु ह्या सेक्रेटरीच्या आगमनाची वर्दी मिळतांच त्यानें त्यास आंत बोलाविलें. फ्रेंच सेक्रेटरीनें त्याच्या हातीं ती तार दिली. **काव्हूरनें** बिछान्यावर बसून ती वाचली मात्र, तावडतोब त्याचा चेहरा लाल व उद्विग्न झाला! **फ्रान्सनें** जणुकाय आयत्यावेळीं आपणांस दगा दिला व त्याच्या विश्वासावर राहून आपण आपल्या देशाचा नाश करून घेणार असें त्यास वाटलें! सदर सेक्रेटरी निघून गेल्यावर दुःखाच्या भरांत "आतां कपाळमोक्ष करून घेण्यावांचून दुसरा मार्ग नाहीं," असेंहि तो बोलून गेला! त्या रात्रीं त्याला क्षणभरहि झोंप आली नाहीं. पहाट होईपर्यंत तो सारखा तळमळत अंथरुणावर पडला होता. दुसरे दिवशी सकाळ होतांच फ्रेंच वकील स्वतः **काव्हूरला** भेटण्यास आला. तेव्हां फारशी वाटाघाट न करितां त्यानें पुढील आशयाचा खलिता त्याच्या स्वाधीन केलाः—

"ज्या अर्थी **फ्रान्स** आणि **इंग्लंड** मिळून, युद्धप्रसंग टाळण्यासाठीं **पीडमॉन्टनें** लोकांकडून शस्त्रें काढून घ्यावींत अशी मागणी करीत आहेत, त्या अर्थी राजाच्या प्रधानमंडळाला ही अट **इटली**च्या अंतःस्थ शांततेला अत्यन्त हानिकारक होईल असें जरी दिसत आहे तरी तें ती मान्य करण्यास तयार आहे."

हे शब्द लिहितांना **काव्हूरचें** अंतःकरण तिळतिळ तुटत होतें ! कारण, त्यामुळें आपल्या आयुष्यांतील सर्व कामगिरी विफल होऊन आपले हेतु फसतात कीं काय अशी त्यास भीति वाटत होती ! हा दिवस **काव्हूरच्या** आयुष्यांतील अत्यन्त दुःसह, दुःखद व करुणास्पद असा होता ! वरील खलिता घेऊन फ्रेंच प्रधान गेल्यानंतर त्यानें आपल्या कचेरींतील खोलींत आपणांस कोंडून घेतलें व आंत कोणासहि न येऊं देण्याबद्दल पहारेकऱ्यास ताकीद दिली. त्याचें हें वर्तन पाहून त्याचे नोकर व मित्र यांना त्याच्याबद्दल फार काळजी उत्पन्न झाली; व जरी आंत कोणी येऊं नये असा त्याचा हुकूम होता तरी त्याचा जुना मित्र **कॅस्टेली** हा त्याच्या खोलीचा दरवाजा उघडून आंत शिरला आणि पहातां तों **काव्हूर** कांहीं कागदपत्र फाडण्याच्या कामांत गुंतलेला असून कांहीं कागदपत्र जवळच असलेल्या भट्टींत 'अग्नये स्वाहाः' झालेले आहेत ! तो आंत येतांच **काव्हूरनें** स्तब्धपणें त्याच्याकडे पाहिलें; तेव्हां डोळ्यांत आसवें येऊन तो अगदीं आर्त स्वरानें म्हणाला, 'ऐनवेळीं **काऊंट काव्हूर** आम्हांस सोडून जाणार असें समजावयाचें काय ?' त्याचे हे शब्द ऐकतांच **काव्हूरला** आपलें मन आवरून धरवेना ! तो त्यास कडकडून भेटला व गहिंवरलेल्या आवाजानें हळूच त्यानें "शांत व्हा; सर्व कांहीं आपण धिम्मेपणानें व सर्वजण मिळून सहन करूं" असे शब्द उच्चारले. तेव्हां **कॅस्टेली** यास धीर येऊन तो तेथून निघून गेला.

**काव्हूरच्या** मनाची स्थिति वरीलप्रमाणें झाली होती. इतक्यांत **ऑस्ट्रियानें पीडमॉन्ट** एकटें आहे तोंच त्याचा पराभव करण्याचा व नंतर जर्मनीच्या साहाय्यानें **फ्रान्सचा** समाचार घेण्याचा बेत करून

पीडमॉन्टला निर्वाणीचा खलिता पाठविला. इंग्लंडनें ऑस्ट्रियाचें मन वळविण्याची अखेरपर्यंत पुष्कळ खटपट केली. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ऑस्ट्रियाचा निकराचा खलिता एका मुद्दाम पाठविलेल्या अधिकाऱ्यामार्फत यावयाचा होता, व तो अधिकारी २३ एप्रिल रोजीं ट्यूरिन येथें येऊन पोंचणार असल्याची बातमी काव्हूरला समजली. ती ऐकून त्यास किती आनंद झाला असेल याची कल्पना करण्याचें काम आम्ही वाचकांवरच सोपवितों! त्याच तारखेस काव्हूरनें पार्लमेंटच्या चेंबरची एक विशिष्ट सभा बोलाविली (कारण त्या वेळीं ईस्टरच्या सुटीमुळें पार्लमेंट बंद होती.) व युद्धाचा प्रसंग आल्यास सर्व प्रकारचे अधिकार राजाच्या हातीं देण्याचा ठराव त्या सभेकडून त्यानें पास करून घेतला. संध्याकाळीं ५॥ वाजतां ऑस्ट्रियन अधिकारी निकराचा खलिता घेऊन काव्हूरकडे आला. त्यांत—

"पीडमॉन्टनें तावडतोब आपली लष्करी हालचाल बंद करावी व तसें करण्यास तें तयार आहे कीं नाहीं याचें उत्तर तीन दिवसांचे आंत 'होय' किंवा 'नाहीं' या शब्दांत द्यावें. 'नाहीं' असें उत्तर आल्यास अगर मुळींच उत्तर न आल्यास त्यास तसें करण्यास भाग पडावें म्हणून आम्हांस जबरीचा उपाय योजावा लागेल."

अशा आशयाचा मजकूर होता. तो वाचल्यावर काव्हूरचा आनंद जास्तच दुणावला. कारण, ऑस्ट्रियाकडून आगळीक होण्याची जी अट नेपोलियननें घातली होती ती या खलित्यांतील शब्दप्रयोगावरून सहज पूर्ण होण्यासारखी होती. तो खलिता म्हणजे एकप्रकारें युद्धाचा जाहीरनामाच होय. त्यानें लागलींच तो सरकारी रीतीनें नेपोलियनकडे तारेनें कळविला व राजाच्यातर्फे त्यास सैन्याची मदत मागितली. नेपोलियनला आतां माघार घेण्याची सोय नव्हती. त्याला जी स्थिति पाहिजे होती ती सदर खलित्यामुळें आपोआप उत्पन्न झाली. अर्थात् त्यानें ह्या खेपेस आपली चंचलवृत्ति टाकून देऊन आपल्या सैनिकांस पीडमॉन्टमध्यें जाण्याचा हुकूम केला.

वरील खलिता वाचून झाल्यानंतर त्यांत लिहिल्याप्रमाणें ती नदिव-

सांनीं त्याचें उत्तर मिळेल असें सांगून काव्हूरनें ऑस्ट्रियन अधिकाऱ्यास निरोप दिला. नंतर ता० २५ रोजीं पार्लमेंटच्या सेनेटकडूनहि त्यानें सर्व अधिकार राजाच्या हातीं देण्याचा ठराव पास करून घेतला व दुसरे दिवशीं ठरल्याप्रमाणें ऑस्ट्रियन खलित्यास त्यानें " इंग्लंड व फ्रान्स यांच्याशीं या बाबतींत केलेल्या अखेरच्या वाटाघाटीपलीकडे आम्हांस जास्त कांहीं कर्तव्य नाहीं " असें उत्तर दिलें. लागलींच दुसरे दिवशीं दोन्ही राष्ट्रांत युद्ध जाहीर झालें. या युद्धांत ऑस्ट्रियातर्फे १ लक्ष ७० हजार सैन्य होतें, व पीडमॉन्टतर्फे, खुद्द पीडमॉन्टचें ६० हजार व नेपोलियनचें १ लक्ष २० हजार मिळून १ लक्ष ८० हजार सैन्य होतें. नेपोलियनचें सैन्य येण्यापूर्वी जर ऑस्ट्रियानें ट्यूरिनवर हल्ला केला असता तर पीडमॉन्टची फार त्रेधा उडाली असती. परंतु ऑस्ट्रियन सेनापतीनें हें धाडस केलें नाहीं. २९ एप्रिलच्या सुमारास ऑस्ट्रियन सैन्य टिकिनो नदी उतरून सेसिया प्रांतांत येऊन थबकलें. ह्या प्रांतांत कालवे पुष्कळ असल्यामुळें पीडमॉन्टच्या अधिकाऱ्यांनीं ते फोडून जिकडेतिकडे पाणीच पाणी करून दिल्यामुळें ऑस्ट्रियन लष्कराच्या हालचालीस व्यत्यय येऊं लागला. तशांत आणखी पाऊस पडला; मग काय विचारतां ? ऑस्ट्रियन सैन्यास पुढें पाऊल टाकतांच येईना ! पेडिमॉन्टिज सैन्य पोनदीच्या उजव्या बाजूस फ्रेंच सैन्याची मार्गप्रतीक्षा करीत स्वस्थ होतें. फ्रेंच सैन्य खूप वेगानें येत होतें. ऑस्ट्रियन सेनापतीस प्रथम आपण ट्यूरिन सहज गांठूं असें वाटत होतें. पण जसजसें फ्रेंच सैन्य पीडमॉन्टच्या सैन्यास येऊन मिळत गेलें तसतशी त्याची स्थिति बिकट होऊन त्यास आपली पहिली योजना ( Plan ) सोडून देऊन दक्षिणभागाकडे वळावें लागलें. याच सुमारास नेपोलियन स्वत: रणक्षेत्रावर येऊन पोंचला होता. त्यानें एक उत्तम प्रकारचा डावपेंच लढवून ऑस्ट्रियन सैन्याचा पराभव करून त्यास पिछेहाट करावयास लावलें. या वेळीं त्याच्या सैन्याच्या हालचाली शत्रूच्या लक्षांत न येऊं देण्याचें म्हणजे शत्रूस चकविण्याचें काम त्यानें पीडमॉन्टच्या सैन्याकडे सोंपविलें होतें तें त्या

सैन्यानें अत्यंत कुशलतेनें बजावल्यामुळें विशेष सुलभ रीतीनें नेपोलियनला विजय मिळवितां आला. ह्या विजयानंतर लवकरच ( ८ जून १८५९ ) नेपोलियन व व्हिक्टर इमॅन्युअल यांनीं लांबर्डी प्रांताची राजधानी मिलान येथें प्रवेश केला. ह्या शहरांत आतां ऑस्ट्रियन सैन्य बिलकुल उरलें नव्हतें. इकडे गॅरिबाल्डीनेंहि पूर्वेकडील एका ऑस्ट्रियन सेनेचा पराभव करून त्यास उत्तरेकडे हाकून दिलें व कोमो शहर काबीज करून तो बर्गेमोकडे त्यांच्या पिछाडीचें दळणवळण तोडण्याकरितां चाल करून जात होता. मध्यंतरीं ज्या ज्या ठिकाणांहून ऑस्ट्रियन ठाणीं उठलीं होतीं तेथील लोक व्हिक्टर इमॅन्युअलच्या अधिकाऱ्यांचें स्वागत करून त्यांच्या स्वाधीन होत होते ! ह्या पराभवाची वार्ता ऑस्ट्रियन बादशहास समजतांच त्यानें आपला सेनापति ग्युले यास कामावरून दूर केलें व आपण स्वतः सेनेचें धुरीणत्व पत्करून तो रणक्षेत्रावर आला. त्यानंतर सालफेरिनो आणि सान मार्टिनो या दोन प्रख्यात लढाया झाल्या. पहिल्या ठिकाणीं फ्रेंच व दुसऱ्या ठिकाणीं पीडमॉन्टिज सैन्यानें ऑस्ट्रियाशीं सुमारें १२ तास निकराची लढाई करून अखेर विजय संपादन केला. ह्या विजयानंतर फ्रेंच व पीडमॉन्टिज सैन्याला, ऑस्ट्रियास इटलींतून हांकून लावणें इतःपर फार सोपें आहे, असें वाटूं लागलें व त्यांनीं त्याप्रीत्यर्थ नवीन व्यूह रचण्यास सुरुवात केली.

लढाईचें काम वरीलप्रमाणें चालू असतां इकडे काव्हूरलाहि ट्यूरिनमध्यें पुष्कळ काम करावें लागत होतें. युद्धमंत्री ला मार्मोरा हा रणभूमीवर गेला असल्यानें त्याचें कामहि काव्हूरलाच करावें लागत होतें. त्याशिवाय परराष्ट्रीयखात्याचें काम, अंतःस्थ कारभाऱ्याचें काम, दर्यावर्दीखात्याचें काम हीं सर्व कामें करून आणखी इटलींतील इतर प्रांतांत चालू असलेल्या चळवळींचें गुप्तपणें नियमन करण्याचें कामहि त्यास करावें लागत होतें ! रणक्षेत्रावर गेलेल्या सैन्यास अन्नवस्त्र, दारूगोळा, माणसें यांचा मुबलक पुरवठा करण्याची जबाबदारीहि त्याजवरच होती. या बाबतींत त्यानें इतकी दक्षता ठेवली होती कीं,

फ्रेंच सैनिकांनीं त्यांस एकदोन वेळ प्रखर कसोटीस लावण्याचा प्रयत्न केला असतांहि तो त्यास हार गेला नाहीं. त्यांच्या मागणीपेक्षां थोडेंसें अधिकच सामान त्यानें त्यांस पुरविलें; पण कमी नाहीं ! इतकीं सर्व कामें एकाच वेळीं त्यानें कशी संभाळलीं असतील याची नुसती कल्पना करणेंहि अशक्य आहे.* सामान्य मनुष्यास नुसती कल्पनाहि बरोबर करतां येणार नाहीं.

युद्ध सुरू होतांच **टस्कनी, बोलोग्ना, मोडेना, पार्मा** वगैरे इटॅलियन संस्थानांतील लोकांनीं क्रांति करून तीं संस्थानें **पीडमॉन्ट**मध्यें सामील केलीं. हें सर्व कार्य राष्ट्रीयमंडळामार्फत झालें. अर्थात् त्यांत **काव्हूर**चेंहि अंग होतेंच. ह्या संस्थानांचें उदाहरण पाहून मध्य-इटलींतील इतर संस्थानेंहि तशाच प्रकारची चळवळ करूं लागलीं होतीं. त्यांसहि उत्तेजन देण्याचें काम **काव्हूर**नें गुप्तपणें चालविलेंच होतें. परंतु **इटली**मध्यें हा जो नवीन डाव **काव्हूर**नें मांडला होता तो **नेपोलियन**ला पसंत नव्हता. **इटली**ला **ऑस्ट्रिया**च्या जुलमापासून मुक्त करण्याची त्याची तयारी होती; परंतु तेथें स्थानिक राजाचें एकछत्री राज्य स्थापन व्हावें अशी **नेपोलियन**ची बिलकुल इच्छा नव्हती. **मोडेना, पार्मा, बोलोग्ना** वगैरे छोटीं संस्थानें **पीडमॉन्ट**मध्यें सामील होऊं देण्यास तो कबूल होता. परंतु **टस्कनी**नें त्यांत सामील व्हावें हें त्यास पसंत नव्हतें. **मध्यइटलीं**तील संस्थानांची चळवळ तर त्यास बिलकुल आवडत नव्हती. परंतु ती बंद करणें त्याच्या हातीं नव्हतें, व

---

* या वेळीं त्याच्या मज्जातंतूंवर केवढा ताण पडत असे याचें वर्णन त्याच्या एका सेक्रेटरीनें पुढीलप्रमाणें केलें आहे:—

"इ० स० १८५९ च्या एप्रिल, मे व जून महिन्यांमध्ये प्रत्यक्ष त्याच्याजवळ बसलेल्या कोणाहि गृहस्थास त्याच्या काम करण्याच्या सामर्थ्याची पूर्ण कल्पना येणें शक्य नाहीं. त्याचा बिछाना युद्धखात्याच्या कचेरींत तयार ठेवलेला असे. आणि रात्रीच्या वेळीं झुबला अंगांत घालून आतां तोफखान्यासंबंधीं तर घटकेंत परराष्ट्रांशीं पत्रव्यवहारासंबंधीं आणि लगेच पोलिसांसंबंधीं हुकूम सोडीत तो एका खात्यांतून दुसऱ्या खात्याकडे त्वरेनें जातांना दृष्टीस पडे."

त्याबद्दल काव्हूरलाहि उघडपणें दोष देण्याइतका पुरावा त्याच्याजवळ नव्हता. या कारणांमुळें लढाईचे प्रारंभीं त्याचे ठिकाणीं जो उत्साह दिसत होता तो आतां कमी झाला. याखेरीज त्याच्या विजयामुळें जर्मनीला त्याची भीति उत्पन्न होऊन ती ऑस्ट्रियास येऊन मिळण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं, व फ्रान्सांतील पाद्री लोकांचा वर्गहि युद्धासंबंधानें लोकमत प्रतिकूल करीत होता. तसेंच चालू युद्धांत फ्रेंच सैन्याच्या रचनेंतील कांहीं महान् दोष त्याच्या नजरेस आले होते, व त्याच स्थितींत जर्मनी व ऑस्ट्रिया यांच्याबरोबर सामना देण्याची वेळ आल्यास आपली स्थिति फार बिकट होईल हेंहि त्याच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. या सर्व कारणांमुळें त्यानें सान मार्टिनोच्या लढाईनंतर तहाचें बोलणें सुरू करून ऑस्ट्रियन बादशहास लढाई तहकूब करण्याची सूचना केली. त्या बादशहानें ती मान्य केली. त्यानंतर तिन्ही सैन्यांच्या सेनापतींची मुलाखत होऊन १५ आगस्टपर्यंत लढाई तहकूब ठेवण्याचा करार ठरला. नंतर २ दिवसांनीं नेपोलियन व फ्रान्सिस जोसेफ यांची व्हिलाफ्रांका येथें मुलाखत झाली. त्या मुलाखतींत तहाच्या पुढील अटी ठरल्या:—

(१) ऑस्ट्रियन बादशहानें लांबर्डीप्रांत नेपोलियनच्या स्वाधीन करावा व तो मग त्यानें व्हिक्टर इमॅन्युअल यास द्यावा.

(२) पोपच्या अध्यक्षत्वाखालीं इटॅलियन संस्थानांचा संघ बनवावा व व्हेनिशिया-मँचुआसुद्धां-हा त्या संघांतील एक भाग ऑस्ट्रियाचे ताब्यांत रहावा.

(३) टस्कनी व मोडेना येथें पूर्वींचीं राजघराणीं स्थापन करण्यांत यावींत.

(४) पार्मा व पायसेंझा ह्या जहागिरी पीडमॉन्टमध्यें सामील करण्यास ऑस्ट्रियानें हरकत घेऊं नये.

ह्या तहाची बातमी काव्हूरला समजतांच तो वायुवेगानें रणक्षेत्रावर आला व त्यानें व्हिक्टर इमॅन्युअलची गांठ घेऊन त्यास ह्या तहापासून अलिप्त

रहाण्यास सांगितलें. **व्हिक्टर इमॅन्युअल** यानें जेव्हां वरील अटी काव्हूरला कळविल्या तेव्हां तर त्याचें मस्तक संतापानें भ्रमिष्ट झालें. इतक्या परिश्रमानें ऑस्ट्रियाचा पराभव करून इटलीचें स्वतंत्र राष्ट्र बनण्याची आणलेली सुसंधि ह्या भिकार तहनाम्यामुळें वाया जाऊन त्याच्या आयुष्याचें सर्व कार्य विफल होण्याचा संभव दिसूं लागतांच त्याची मनोवृत्ति भडकून जावी हें अगदींच साहजिक आहे. त्यानें ह्या वेळपर्यंत पुष्कळ शांतपणा व धिम्मेपणा दाखविला होता. परंतु आपल्या श्रमाचें फळ परिपक्व होऊन आतां आपल्या मुखांत पडणार तोंच त्याजवर वरील तहामुळें एकाएकीं झडप पडलेली पाहून आजपर्यंत कोंडून ठेवलेल्या त्याच्या मनोवृत्ति एकदम उसळल्या व त्या भरांत तो **व्हिक्टर इमॅन्युअल** यास कांहींसा टाकून बोलला. **व्हिक्टर इमॅन्युअल**नें त्यास शांत करण्याचा पुष्कळ यत्न केला; पण तो सर्व फुकट गेला. खुद्द **व्हिक्टर इमॅन्युअल** यास देखील सदर अटींवर तह करणें मनापासून आवडत नव्हतें. आयत्यावेळीं **नेपोलियन**नें जो अवसानघातकीपणा केला त्याचा त्यालाहि राग आला होता. परंतु तो तह न केल्यास सर्व युरोपियन राष्ट्रांची सहानुभूति नष्ट होऊन आपण एकटे पडूं व मग ऑस्ट्रियाचा पाडाव करण्यास आपणांस जड जाईल, अशा विचारानें तो निरुपायास्तव कांहीं काळ लोटेपर्यंत तरी तो तह स्वीकारावा असें म्हणत होता. परंतु **काव्हूर**चें मन या वेळीं अत्यंत विकारवश झालेलें असल्यामुळें त्याला तें म्हणणें रुचेना. जन्मभर नानाप्रकारचे कष्ट करून उभारलेली इमारत पुरी होण्याचा समय आला असतां ती अशा प्रकारें एकदम कोसळून पडणार ही कल्पना त्याला फारच दुःसह वाटल्यामुळें त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला! **व्हिक्टर इमॅन्युअल**ला त्यामुळें फार दुःख झालें. परंतु राजकारण हें अत्यंत कठोर असल्यामुळें त्याला तें दुःख गिळून तहावर सही करणें भाग होतें, व त्यानें 'माझ्यापुरती मी संमति देतों' ह्या वाक्याची पुरवणी जोडून मोठ्या कष्टानें त्यावर सही केली!

---

# प्रकरण १२ वें

## आणीबाणीचा प्रसंग

**व्हिलाफ्रांका** येथें ठरलेला तह **इटलीं**तील कोणाहि विचारी देशभक्तास पसंत पडला नाहीं. **ऑस्ट्रियन** लोकांच्या जुलमी सत्तेपासून **इटलीस** मुक्त करण्याची हातीं आलेली संधि त्यामुळें नष्ट होण्याचा समय प्राप्त झालेला पाहून बहुतेकजण फार खिन्न झाले. **नेपोलियननें** आयत्या-वेळीं अवसानघातकीपणा करून दगा दिला—फसविलें—असें त्यांस वाटूं लागलें व ते त्याच्यावर संतप्त झाले. **काव्हूरनें** तर **एम्. पेत्री** नामक **नेपोलियन**च्या अधिकाऱ्याजवळ रागानें 'तुमच्या बादशहानें माझी बदनामी केली' असे स्पष्ट उद्गार काढले. **व्हिक्टर इमॅन्युअलनें** मात्र या वेळीं आपल्या मनाचा समतोलपणा बिघडूं दिला नाहीं. **काव्हूरनें** सात्त्विक त्वेषाच्या भरांत आपली निर्भर्त्सना करून राजीनामा दिला, याबद्दल **व्हिक्टर इमॅन्युअल** यास मनांतून फार वाईट वाटलें; परंतु त्यानें ह्या प्रसंगीं आपले मनोविकार आवरून धरून राज्यशकट हाक-ण्याचा संकल्प केला व तदनुसार त्यानें **राटेझी** यास मुख्य प्रधानाची जागा दिली. **राटेझी**ची नेमणूक झाल्यावर त्यास नवीन प्रधानमंडळ बन-विण्यास सुमारें एक आठवडा लागला. तेवढ्या अवधींत **काव्हूर** यासच मुख्य प्रधानाचें काम करणें भाग पडल्यामुळें **व्हिलाफ्रांका**च्या तहानुसार **टस्कनी, रोमाग्ना, मोडेना**, वगैरे ठिकाणीं **व्हिक्टर इमॅ-न्युअल**च्या नांवानें राज्यकारभार पहाणाऱ्या कमिशनरास तीं तीं राज्यें त्यांच्या पूर्वीच्या राजांच्या स्वाधीन करण्याचा हुकूम पाठविणें त्याच्या नशिबीं आलें! त्यानें मोठ्या दुःखानें ते हुकूम तयार करून पाठविले; पण त्याबरोबरच त्यानें सदर अधिकाऱ्यांस खासगी रीतीनें आपलें काम (इटॅलियनांच्या राष्ट्रीकरणाचें) पूर्ववत् चालू ठेवण्याचा आग्रह केला. त्याचा सरकारी हुकूम पोंचतांच **मोडेना** येथील कमिशनर **फारिनी**

यानें त्यास तारेनें असें कळविलें कीं, " ज्यांची मला कांहींएक माहिती नाहीं अशा नवीन तहाच्या अटींमुळें जर मोडेनाचा ड्यूक पुनः परत येईल तर मी त्यास राजाचा व देशाचा शत्रू समजून चालेन." यावर काव्हूरनें त्यास, "प्रधान मरण पावला आहे. मित्र या नात्यानें तो तुमच्या निश्चयाचा जयजयकार करीत आहे." असा उलट तारेनें जबाब पाठविला. या वेळीं काव्हूरच्या अंगांत माझिनीचा संचार झाला होता असें एका विचारी इटॅलियन राजकारणी पुरुषानें म्हटलेलें आहे व तें कांहीं अंशीं खरेंहि आहे. इटलीची उन्नति करण्याकरितां काव्हूरनें यावेळपर्यंत अत्यंत सावधपणें व शांतपणें जिवापाड मेहनत केली होती. परंतु त्याच्या श्रमाचें फळ त्याच्या पदरांत पडण्याच्या अगदीं बेतांत आलें असतां व्हिलाफ्रांकाच्या तहानें तें एकदम हिरावून नेण्याचा घाट घातलेला पहातांच तो कांहीं काळ अगदीं बेहोष व्हावा हें मानवी स्वभावास अनुसरूनच आहे. कांहीं वेळ जरी त्याची अशी वृत्ति झाली तरी लवकरच त्याच्या विवेकशक्तीनें त्यास पुनः आपल्या भानावर आणलें. तेव्हां प्राप्त स्थितींत आपलें कार्य कसें सिद्धीस नेतां येईल याचा विचार करण्याकरितां तो आपल्या विश्रांतिस्थानाकडे लेरी येथें निघून गेला.

व्हिलाफ्रांका येथें ठरलेल्या कच्चया तहानुसार पार्मा, मोडेना, बोलोग्ना व फ्लॉरेन्स येथील आपल्या गव्हर्नरांस ऊर्फ कमिशनरांस पीडमॉन्टच्या सरकारानें परत बोलाविलें खरें; पण तेथील जनतेचा कल व्हिक्टर इमॅन्युअलच्या छत्राखालीं येण्याचा असल्यामुळें ते सहजच लोकांचा हेतु पूर्ण करण्याकरितां तेथें राहिले. त्यांनीं सरकारी रीतीनें आपला अधिकार सोडला; पण लोकांच्या वतीनें तो पुनः आपल्या हातीं घेतला. उदाहरणार्थ, मोडेनाच्या गव्हर्नरानें पीडमॉन्टच्या राजाचा प्रतिनिधि ह्या नात्यानें आपली सत्ता नष्ट झाल्याचें जाहीर केलें. परंतु त्याच वेळीं त्या शहरांतील लोकांतर्फे आपण 'सर्वसत्ताधारी' बनल्याची द्वाही त्यानें फिरविली. यासच पुढें अनुक्रमें पार्मा व रोमाग्ना येथील लोकांनींहि आपापल्या संस्थानांचा 'सर्वसत्ताधारी' (dictator)

बनविलें. ह्या सर्व छोट्या संस्थानांचा इटलींतील 'एमिलिया' नामक प्रांतांत समावेश होत होता. तो सर्व प्रांत वरीलप्रमाणें इटलीचें एकराष्ट्र बनविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या व तत्कालीन नाजुक परिस्थितीस तोंड देण्यास समर्थ असलेल्या **फारिनी**च्या ताब्यांत आल्यामुळें **काव्हूर**चें ध्येय साध्य होण्याचा मार्ग सहजच सुलभ झाला. **टस्कनी**ची राजधानी **फ्लॉरेन्स** येथेंहि **पीडमॉन्ट**च्या सरकारी कमिशनराची सत्ता नष्ट झाल्यावर तेथील राज्यसूत्रें लोकांनीं **बॅरन रिकाझोली** नामक धैर्यवान् पुरुषाच्या हातीं दिलीं. हाहि **व्हिक्टर इमॅन्युअल**च्या सत्तेखालीं सर्व **इटली** देश आणण्याचें ध्येय बाळगणाराच असल्यामुळें यानें तत्काल **फारिनी**शीं संगनमत करून वरील चार संस्थानांचें मिळून सुमारें ४० हजार लोकांचें एक संयुक्त लष्करहि तयार केलें. ह्या लष्कराचें आधिपत्य त्यांनीं जनरल **मानफ्रेदो फांती** नामक एका शूर देशाभिमानी लढवय्याकडे दिलें. मध्यंतरीं वरील चारी संस्थानांच्या लोकनियुक्त सभांनीं आपापल्या संस्थानाच्या मुख्य शहरीं* आपल्या बैठकी करून फिरून एकवार जुन्या राजघराण्यांतील राजसत्तेची 'इतिश्री' झाल्याचे व आपलीं संस्थानें **व्हिक्टर इमॅन्युअल**च्या राज्यांत सामील झाल्याचे ठराव जाहीरपणें पास केले.

**इटली**च्या मध्यभागांत घडून आलेला वरील प्रकार **ऑस्ट्रियास** आवडण्यासारखा नव्हता. अर्थात् त्यानें त्याबद्दल तक्रार करून, **व्हिलिफ्रांका** येथें ठरलेल्या शर्तींवर तहाचें काम पूर्ण करण्याकरितां **झ्यूरिच** येथें भरलेली परिषद मोडून टाकण्याची धमकी दिली. खुद्द फ्रान्सचा बादशहा **तिसरा नेपोलियन** यास देखील वरील प्रकार पसंत नव्हता. **मोडेना**, **पार्मा** वगैरे छोट्या संस्थानांसंबंधीं त्याची तक्रार नव्हती. परंतु **टस्कनी**सारख्या मोठ्या संस्थानानें **पीडमॉन्ट**च्या राज्यांत सामील होणें त्यास बिलकुल पसंत नव्हतें. तथापि या वेळीं **इंग्लंड**मध्यें पुनः

---

* **फ्लॉरेन्स**, **बोलोग्ना**, **मोडेना**, व **पार्मा** हीं तीं शहरें असून तीं अनुक्रमें **टस्कनी रोमाग्ना**, **मोडेना** व **पार्मा** या संस्थानांचीं राजधानीचीं शहरें होतीं.

सुधारणावादी पक्ष अधिकारारूढ होऊन इटलीच्या आकांक्षांविषयीं सहानुभूति बाळगणारा **लॉर्ड पाल्मर्स्टन** हा मुख्य प्रधानाच्या जागीं असल्यामुळें इंग्रज सरकारची व राष्ट्राची मध्यइटलींतील संस्थानांच्या उपर्युक्त कृत्यांविषयीं पूर्ण सहानुभूति किंबहुना अनुमति होती. या कारणामुळें **ऑस्ट्रिया** व **फ्रान्स** यांस इटॅलियन लोकांच्या सदर कृत्यांचा तीव्र निषेध करून त्यांचा उघडपणें प्रतिकार करितां येईना. **ऑस्ट्रियानें** एकट्यानें हें कृत्य करूं म्हटल्यास, **नेपोलियनचें** सैन्य अद्याप **लांबर्डी** प्रांतांत असल्यामुळें, त्यास तसें करण्याची सोय नव्हती. अशा स्थितींत इंग्रज राष्ट्राच्या व सरकारच्या मनोवृत्तीचा फायदा घेऊन इटलींतील चार संस्थानच्या लोकांच्या विनंतीप्रमाणें तीं आपल्या राज्यांत सामील करून घेण्याचें धारिष्ट **व्हिक्टर इमॅन्युअलच्या** नवीन प्रधानमंडळानें करावयास हवें होतें. परंतु ह्या प्रधानमंडळांतील अग्रणी जे **राटेझी** व **ला मार्मोरा** यांच्याठायीं इतकें धैर्य अथवा त्या प्रसंगास अनुरूप असें राजकारणपटुत्व नसल्यामुळें त्यांच्या हातून धरसोडीचें वर्तन होऊं लागलें. खुद्द **व्हिक्टर इमॅन्युअल** याची तीं संस्थानें आपल्या राज्यांत सामील करण्याची इच्छा होती व तसें त्यानें बोलूनहि दाखविलें होतें. परंतु त्याच्या प्रधानमंडळाच्या दौर्बल्यामुळें ती गोष्ट अंमलांत येऊं शकेना. ह्या प्रश्नाचें घोंगडें याप्रमाणें भिजत ठेवून सदर प्रधानमंडळानें **झ्यूरिच** येथें **व्हिलाफ्रांकाचा** तह पक्का करून टाकला. मात्र "वरील चार संस्थानें पुनः त्यांच्या पूर्वीच्या अधिपतींच्या स्वाधीन करावींत कीं नाहीं" ह्या प्रश्नाचा निर्णय एक दुसरी स्वतंत्र परिषद भरवून करावा असें सर्वांनीं ठरविलें. परिषदेची ही कल्पना **नेपोलियननें** काढली. याचें कारण असें कीं, **व्हिलाफ्रांका** येथील तहाचें बोलणें झाल्यावर त्यानें, **प्लोंबियर्स** येथें **सॅव्हॉय** प्रांत देण्याची **काव्हूरनें** कबूल केलेली शर्त आपण स्वसंतोषानें सोडून दिली आहे असें **व्हिक्टर इमॅन्युअल** यास कळविलें होतें. परंतु मध्य-इटलींतील चार संस्थानें त्याच्या राज्यांत सामील होऊं पहात आहेत व त्यास इंग्लंडचेंहि पाठबळ आहे असें दिसून येतांच **नेपोलियनला**

स्वतःच्या राष्ट्रास संतुष्ट करण्याकरितां त्याच्याकडून सॅव्हॉय व नीस हे छोटेखानी प्रांत मिळविण्याची लालसा उत्पन्न झाली. पण ही लालसा सदर तहाच्या वेळीं किंबहुना ती पूर्ण होईपर्यंत जाहीरपणें व्यक्त करण्याची त्याची इच्छा नव्हती. म्हणून त्यानें सदर संस्थानांचा प्रश्न वरील परिषदेच्या मिषानें पुढें ढकलला. वास्तविक ही परिषद भगावी अशी त्याची मुळींच इच्छा नव्हती. पीडमॉन्टच्या सरकाराशीं वरील प्रांत मिळविण्याची गुप्त वाटाघाट करण्यास अवकाश मिळावा म्हणूनच त्यानें ही परिषदेची शकल काढली होती. असो. व्हिक्टर इमॅन्युअलचें प्रधानमंडळ आपल्या अंगच्या दौर्बल्यामुळें दिवसानुदिवस लोकांत अप्रिय होत चाललें होतें; तशांत वरील परिषदेची वाटाघाट सुरू झाली, तेव्हां लोकांनीं ह्या परिषदेस इटलीतर्फे काव्हूरला पाठवावें म्हणून आग्रह सुरू केला. लोकमताचा प्रवाह या वेळीं काव्हूरच्या बाजूस इतका जोरानें वळला होता कीं, त्यास प्रतिबंध करण्याचें धार्ष्ट्य प्रधानमंडळास करितां येईना. म्हणून त्यांनीं लोकमतास मान देऊन त्या कामीं त्याची नेमणूक केली. इटलीतर्फे काव्हूरच सदर परिषदेंत यावा अशी इंग्लंडचीहि उत्कट इच्छा होती. यामुळें नेपोलियननेंहि त्याच्या नेमणुकीस हरकत केली नाहीं. परंतु होतां होईतोंपर्यंत ही परिषद न भरवितांच योजलेल्या प्रश्नाचा निर्णय करण्याचा त्याचा बेत असल्यामुळें त्यानें त्या बाबतींत गुप्त कारस्थानें करण्यास सुरवात केली. राटेझीच्या प्रधानमंडळानें वरीलप्रमाणें काव्हूरची नेमणूक केली खरी; पण त्याच्या हाताखालीं काम करणें काव्हूरला पसंत नव्हतें. हें दुर्बल प्रधानमंडळ मोडून टाकण्याचे व आपला कार्यक्रम शेवटास नेण्याचे त्याचे प्रयत्न सारखे चालू होते. तथापि राटेझीशीं उघडपणें विरोध करून भावी कार्यास अपायकारक अशी दुही देशांत उत्पन्न करण्याचें टाळण्याकरितां त्यानें सदर नेमणुकीस आपली संमति दिली. पण ह्या संमतिपत्राच्या बाबतींत ला मार्मोरा याचा कांहीं गैरसमज झाल्यावरून त्यानें राजीनामा दिला. तेव्हां व्हिक्टर इमॅन्युअल यानें, देशाच्या भावी कल्याणाकडे नजर देऊन काव्हूरचें मागील

कोपाविष्ट वर्तन पोटांत घालून पुनः त्यास आपला मुख्य प्रधान केलें. **काव्हूर** अशा प्रकारच्या संधीची वाटच पहात होता. ती त्यास याप्रमाणें अनायासें लाभल्यामुळें त्यानें तत्काळ नवीन प्रधानमंडळ बनविलें व मध्यइटलींतील **मोडेना, पार्मा, रोमाग्ना** व **टस्कनी** हीं संस्थानें आपल्या राज्यांत सामील करण्याच्या उद्योगास तो लागला. त्यानें प्रथम ह्यासंबंधानें प्रमुख युरोपियन राष्ट्रांस एका जाहीरपत्रकाच्या द्वारें असें कळविलें कीं, वरील चारी संस्थानांतील लोकांच्या विनंतीचा अव्हेर करणें आतां आपल्या राजास अशक्य होत चाललें आहे. **काव्हूरनें** हें धाडस इंग्लंडच्या उत्कट सहानुभूतीमुळें केलें. नूतन इटॅलियन राष्ट्र तयार करण्यास **फ्रान्सच्या** तिसऱ्या **नेपोलियननें** सैन्याची मदत केली असल्यामुळें त्या राष्ट्रांत त्याचें विशेष वजन वाढण्याचा संभव होता. परंतु **इंग्लंडला** ती गोष्ट स्वतःच्या राजकारणाच्या दृष्टीनें अनिष्ट वाटत होती. **इंग्लंडांतील** उदारमतवादी पक्षास तर ती फारच अनिष्ट वाटत होती. अर्थात् **व्हिलाफ्रांका** येथील तहामुळें कतें इटॅलियन लोक जेव्हां **नेपोलियनवर** नाराज झाले तेव्हां **इंग्लंडनें नेपोलियनचें** वजन कमी करून आपलें वजन तेथें वाढविण्याकरितां त्यांच्या एकराष्ट्रीयत्वाच्या प्रयत्नास होईल तितकी मदत करण्याचें धोरण स्वीकारलें. **इंग्लंडचें** हें धोरण **काव्हूरच्या** स्पष्टपणें नजरेस येतांच त्यानें ह्या दोन राष्ट्रांतील परस्परांविषयींच्या स्पर्धाबुद्धीचा स्वदेशाच्या हितार्थ शक्य तितका उपयोग करून घेण्याचा संकल्प केला इतकेंच नव्हे, तर या दोन राष्ट्रांतील ह्या स्पर्धेचें उद्दीपन करण्याचाहि त्याचा उद्देश होता, असें त्याच्या त्या वेळच्या कित्येक उद्गारांवरून दिसून येतें.* **इंग्लंडांतील** मुत्सद्दी व **काव्हूर** यांचें धोरण लक्षांत घेऊन

---

* यासंबंधानें **पेत्रो ओर्सी** नामक चरित्रकारानें **काव्हूरचे** उद्गार व त्यांचा खुलासा पुढीलप्रमाणें केला आहे:—

" आम्ही ज्या एका मार्गाचें अवलंबन केलें होतें तो मार्ग आतां बंद झाला आहे.

[ पुढें चालू ]

**नेपोलियन** बादशहानेंहि इटॅलियन राष्ट्रास संतुष्ट ठेवून त्याच्यावर असलेलें आपलें वजन कायम ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला व हें कार्य सुकर व्हावें म्हणून इटॅलियन आकांक्षेस विरोध करणारा आपला परराष्ट्रीयखात्याचा प्रधान **वेल्वेस्की** यास कामावरून दूर करून त्याच्या जागीं त्यानें **दोव्हेनेल** नामक मुत्सद्द्याची नेमणूक केली. याच्यामार्फत त्यानें पीडमॉन्टच्या दरबाराशीं गोडीगुलाबीचें धोरण सुरु केलें. **व्हिक्टर इमॅन्युअल** यानें पूर्वोक्त चार संस्थानें जर आपल्या राज्यास जोडलीं तर त्याचा राज्यविस्तार होणार; अर्थात् अशा स्थितींत **फ्रान्सला** संतुष्ट करण्याकरितां **सॅव्हॉय** व **नीस** हे प्रांत आपणांस मिळणें जरूर आहे असें त्यानें बोलणें लावलें. **नेपोलियन** अशा तऱ्हेची कांहीं तरी मागणी करील हें **काव्हूर** जाणून होता व **प्लॉंबियर्स** येथें ठरल्याप्रमाणें **सॅव्हॉय** प्रांत त्यास देण्यास तो तयारहि होता. परंतु **नेपोलियननें** **नीसचीहि** मागणी केल्यामुळें क्षणभर त्याची वृत्ति क्षुब्ध झाली. **नेपोलियनचा** हा पेंच त्यास मोठा दुःसह व जबरदस्तीचा वाटूं लागला. परंतु त्याचें सैन्य अद्याप **इटलींत** असल्यामुळें व **नीसची** मागणी अमान्य झाल्यास **बोलोग्ना** व **फ्लॉरेन्स** हीं शहरें हस्तगत करून घेण्याचा त्या सैन्यास **नेपोलियनचा** गुप्त हुकूम असल्यामुळें हें अरिष्ट टाळण्याकरितां त्यानें नाइलाज म्हणून **नेपोलियनची** सदर मागणी मान्य केली. **काव्हूरच्या** मनांतून हें सर्व प्रकरण आपल्या पार्लमेन्टपुढें मांडून तिच्याकडून सदर प्रांत देण्याचा करार मंजूर करवून घ्यावयाचा होता. पण येथेंहि **नेपोलियनचा** हट्टच आडवा आला. हा करार संपूर्णपणें पक्का ( Accomplished fact ) सिद्ध झाल्याशिवाय तो जाहीर करावयाचा नाहीं असा **नेपोलियनचा** आग्रह पडला व तोहि **काव्हूरला** कबूल करणें भाग पडलें! पण हें

---

कांहीं हरकत नाहीं; आपण दुसरा मार्ग स्वीकारूं. हा नवीन मार्ग म्हटला म्हणजे इंग्लंडवर भिस्त ठेवून फ्रान्स व इंग्लंड या दोन राष्ट्रांमधील स्पर्धेचा उपयोग करून घेणें हा होय.

सर्व कारस्थान चालू असतां काव्हूरचें मन त्यास बिलकुल चैन पडूं देत नव्हतें. पार्लमेन्टला न विचारतां आपल्या देशाचा भाग आपण एका जबरदस्त लुटारूस, नाइलाजास्तव कां होईना, देण्यांत एकप्रकारचें पातक करीत आहों असें त्यास वाटत होतें. तसेंच पुढें ह्या कृत्याचें पार्लमेन्टपुढें समर्थन करणें किती बिकट व धाडसाचें काम आहे हा विचारहि त्याच्या मनांत अस्वस्थता उत्पन्न करीत होता. परंतु नेपोलियनशीं उघड वैर मांडणें स्वदेशाच्या हितास अत्यन्त विघातक (कारण तसें झाल्यास ऑस्ट्रियाचें व त्याचें ऐक्य होण्याचा संभव होता) असल्याविषयीं त्याची खात्री होती. म्हणूनच त्यानें ह्या गोष्टीची सर्व जबाबदारी आपल्या–अर्थात् आपल्या प्रधानमंडळाच्या–शिरावर घेतली. त्याची सर्व भिस्त इंग्लंडच्या सहानुभूतीवर होती. पण वरील दोन प्रांतांची मागणी आपण करणार असें फ्रेंच परराष्ट्रीय प्रधानानें इंग्लंडच्या दरबारास कळविलें असूनहि जेव्हां त्या दरबारानें त्यास हरकत केली नाहीं तेव्हां इंग्लंडच्या सहानुभूतीचा या बाबतींत फारसा उपयोग होणार नाहीं अशी काव्हूरची समजूत झाल्यास त्यांत कांहीं त्याची चूक नाहीं. या बाबतींत काव्हूरनें केलेल्या वर्तनाच्या योग्यायोग्यतेसंबंधानें युरोपियन इतिहासकारांत बराच मतभेद आहे व खुद्द काव्हूरच्या मनांतहि स्वतःचें हें कृत्य अखेरपर्यंत डांचत राहून केव्हांना केव्हां तरी सदर प्रांत पुनः परत मिळविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती; परंतु त्याच्या अकालीं मरणामुळें ती जागच्या जागींच राहिली. या बाबतींतील काव्हूरच्या वर्तनासंबंधीं जरी कोणाचा मतभेद असला तरी त्याच्या सद्धेतूसंबंधीं मात्र कोणाचाहि मतभेद झालेला नाहीं व होणें शक्यहि नाहीं. प्रत्येक कर्त्या पुरुषाच्या आयुष्यक्रमांत अशा प्रकारचे कांहीं अगदीं आणीबाणीचे प्रसंग येत असतात व त्या वेळीं त्यांना इच्छित ध्येयाच्या प्राप्तीकरितां कधीं कधीं न्यायाला सोडून असलेला व अप्रिय पण परिणामीं पथ्यकर असा मार्ग धैर्यानें काढावा लागतो. तो काढून त्यानें कार्यसिद्धि केल्यावर शिळोप्याचे वेळीं गप्पागोष्टी सांगणारे वावदूक टीकाकार त्याच्या कृतीची आपल्या खोलींत बसून

मीमांसा करीत असतात. ह्या मीमांसेचाहि जगाच्या कल्याणास उपयोग होतो. परंतु त्यांच्या डोळ्यांपुढें सदर कर्त्या पुरुषाच्या वेळची परिस्थिति हुबेहुब उभी नसल्यामुळें महत्त्वाच्या मुद्दयांसंबंधीं त्यांचे निर्णय कधीं कधीं चुकीचेहि असूं शकतात. **काव्हूर**च्या वरील कृत्यासंबंधानें मतभेद व्यक्त करणाऱ्यांची अशीच चूक झालेली असावी असें वाटतें. त्याचे स्वतःचे उद्गार व त्याच्या भोंवतालच्या परिस्थितीची जी कांहीं माहिती उपलब्ध आहे त्यावरून त्यानें आपल्या परिस्थितींत शक्य तेवढा निर्दोष व उत्तम मार्ग स्वीकारला असें म्हणणें भाग पडतें.*

---

**काऊंतेस मार्तिनेंगो सिझारेस्को**कृत चरित्रांतील पुढील मजकुरानें काव्हूरच्या ह्या कारस्थानावर जास्त स्पष्ट प्रकाश पडण्यासारखा आहे:—

" मिस्टर **थूव्हेनेल**नें स्पष्टपणें म्हटलें आहे कीं, जर **पीडमॉन्ट**ने आपल्या राज्यास आणखी अधिक प्रदेश जोडला तर **सॅव्हॉय** व **नीस** या प्रांतांवर आपला हक्क सांगण्याचा फ्रेंच बादशहाचा उद्देश असल्याचें इंग्लिश प्रधानमंडळास या वेळीं कळविण्यांत आलें होतें. प्रत्यक्ष **नेपोलियन**शींच सौदा करणें हाच या प्रश्नाचा निकाल लावण्याचा एक मार्ग आहे अशी **काव्हूर**ची खात्री झाली होती. त्याला आपण योजलेल्या प्रांत तोडून देण्याच्या कल्पनेचा **प्लॉंबियर्स** येथें जितका तिटकारा वाटला होता त्यापेक्षां अधिकच तिटकारा वाटूं लागला. 'फ्रेंच सैन्य **इटली**मध्ये आणविण्याच्या कामीं मी पुनः कधींहि साह्यकारी होणार नाहीं' असे उद्गार गेल्या सहा महिन्यांत एकसारख्या चाललेल्या ज्या वाटाघाटींमुळें त्याच्या तोंडून निघाले त्या वाटाघाटींचा त्याच्या मनावर कायमचा परिणाम झाला. हे दोन प्रांत तोडून देणें म्हणजे मित्रावर उपकार करण्यासारखें नसून एखाद्या वाटमाऱ्याला संतुष्ट करण्यासारखें आहे असें आतां त्याला वाटूं लागलें. परंतु तसें करण्यावांचून गत्यंतर नाहीं अशी त्याची खात्री झाली होती.

काउंट **व्हिटझ्थूम** नांवाच्या स्पष्टदृष्टि परराष्ट्रराजकारस्थानी पुरुषानें आपलें असें मत दिलें आहे कीं, ज्या तहाच्या अन्वयें फ्रेंच सहाय्याच्या मोबदला **सॅव्हॉय** व **नीस** हे प्रांत देण्याचें वचन दिलें होतें, तो जानेवारी १८५९ चा गुप्त तह जर

[ पुढें चालू ]

फ्रेंच राष्ट्राचें व नेपोलियनचें सख्य कायम राखण्याकरितां व मध्य-इटलींतील पूर्वोक्त चार संस्थानें आपल्या राज्यांत सामील करण्याच्या बाबतींत त्यांनीं अडचण उत्पन्न करूं नये म्हणून त्यानें मोठ्या खिन्नतेनें व निरुपायास्तव ता० २४ मार्च ( १८६० ) रोजीं सॅव्हॉय व नीस प्रांत नेपोलियनच्या हवालीं करणाऱ्या गुप्त तहावर सही केली ! सुदैवानें व्हिक्टर इमॅन्युअल त्यानेंहि फारसे आढेवेढे न घेतां परिस्थिति लक्षांत घेऊन काव्हूरच्या सदर कृत्यास

---

काव्हूरनें फोडला असता तर नेपोलियन हा इतका पेंचांत सांपडला असता कीं, त्यानें आपलें मागणें एकदम सोडून दिलें असतें. परंतु अशा वर्तनानें फ्रान्स व त्याचप्रमाणें बादशहा यांचीं मनें अत्यंत दुखविलीं गेलीं असतीं. फ्रेंच राष्ट्राचें ' उदार अंतःकरण ' आपल्या बाजूस आहे असा जो इटॅलियन जनतेला भ्रम होता त्या भ्रमाला काव्हूरच्या मनांत मुळीच जागा नव्हता. ' जर फ्रान्स हा लोकसत्ताक झाला तर त्यापासून इटलीला यत्किंचितहि फायदा होणार नाहीं; तर त्याच्या उलट होईल' असें तो एकदां म्हणाला होता. अजून अनेक वादग्रस्त प्रश्नांचा निकाल लागावयाचा असता व विशेषकरून जेथ फ्रेंचांचें वर्चस्व असून त्यांचें सैन्यहि आहे अशा रोमचा बिकट प्रश्न पुढें असतां फ्रेंच लोकांच्या मनांत धुमसणाऱ्या द्वेषाग्नीला भडकूं देण्यास तो भीत होता. काव्हूरला आपण नीस वांचवूं, जाऊं देणार नाहीं, अशी अजून आशा वाटत होती. इतक्यांत काऊंट बेनिडेटी हा पॅरिसहून आला व सांगूं लागला कीं, जर संपूर्ण गुप्त तहावर सही करण्यांत आली नाहीं तर बादशहा आपलें सैन्य लांबर्डीमधून परत नेईल. ' जितकें लवकर नेईल तितकें चांगलेंच ' असें काव्हूरनें उत्तर दिलें म्हणतात. त्यावर लगेच बेनिडेटी बादशहाच्या खासगी हुकुमाचें असलेलें पत्र खिशांतून काढून म्हणाला, ' हें पहा मला सैन्य परत नेण्याचा हुकूम आहे; पण तें फ्रान्सला नव्हे, तर बोलोग्ना व फ्लॉरेन्स येथें नेऊन तेथें ठाणें देण्याचा आहे.' तहाचा गुप्तपणा राखणें न राखणें हा त्याच्या इच्छेचा प्रश्न नव्हता. नियमबद्ध शासनपद्धतीच्या शिरस्त्याप्रमाणें सही करण्यापूर्वीं तो तह पार्लमेंटपुढें मांडूं देण्याबद्दल नेपोलियनचें मन वळविण्याची त्यानें शिकस्त केली होती; परंतु तो तह सही होऊन पक्का झाल्यावरच पार्लमेंटला व यूरोपला कळावा असा बादशहाचा आग्रह होता.

आपली संमति दिली. परंतु एवढ्यानें या प्रकरणाचा निकाल लागण्या-सारखा नव्हता. त्यास कायदेशीरपणाचें स्वरूप प्राप्त होण्याकरितां तें पार्लमेन्टच्या चेंबरपुढें मांडणें भाग होतें, व तेथें त्यास विरोध होण्याचा फार संभव होता. तथापि नवीन भरणाऱ्या पार्लमेंटमध्यें वरील चार संस्थानांतील प्रतिनिधि यावयाचे असल्यामुळें त्यांच्या आधारावर आपण हा गुप्त तह पार्लमेंटमध्यें पास करून घेऊं अशी काव्हूरला हिंमत वाटत होती. असो. वरील गुप्त तहाचें काम पूर्ण झाल्यावर सदर चारहि संस्थानें स्वराज्यास जोडण्याचें काम प्रमुख युरोपियन राष्ट्रांस आक्षेपार्ह वाटूं नये म्हणून त्यासंबंधीं तेथील जनतेचीं मतें घेण्याची शक्कल काव्हूरनें काढली. 'स्वतंत्र शासनपद्धति पाहिजे कीं, व्हिक्टर इमॅन्युअलच्या राज्यांत सामील व्हावयास पाहिजे?' या दोन प्रश्नांवर सदर चार संस्थानांतील लोकांचीं मतें घेतलीं. तेव्हां ⅔ पेक्षां अधिक मतें दुसऱ्या प्रश्नास अनुकूल पडलीं.* त्यावरून त्यांस व्हिक्टर इमॅन्युअलच्या राज्यांत सामील करण्यांत आलें. सॅव्हॉय व नीस हे प्रांतहि वरील शक्कल लढवूनच नेपोलियनच्या हवालीं करावयाचें ठरलें होतें. पैकीं सॅव्हॉय प्रांत मूळचाच फ्रेंचांच्या वतीचा होता. नीसमध्यें मात्र तशा प्रकारचें कृत्रिम लोकमत काव्हूरला बनवावें लागलें! असो; वरील चार संस्थानें पीडमॉन्टच्या राज्यांत सामील केल्यानंतर त्या सर्वांची मिळून बनलेली पहिली पार्लमेंटची सभा ता० २ एप्रिल १८६० रोजीं भरली. प्रारंभीं शिष्टाचारास अनुसरून राजानें सर्व प्रांतांतील प्रतिनिधींचें स्वागत केलें व नंतर तो निघून गेला. त्यानंतर नेपोलियनशीं ठरलेला वरील गुप्त तह काव्हूरनें सदर सभेपुढें मांडला. त्याचें वाचन चालू असतां सभेंत पूर्ण स्तब्धता होती; व सर्वांचें लक्ष त्या तहनाम्यांतील मजकुराकडे वेधलेलें होतें. तो देखावा अत्यंत गंभीर स्वरूपाचा दिसत होता. काव्हूरवर तर हा

* टस्कनी संस्थानांत ३,६६,५७१ मतें पीडमान्टच्या राज्यांत सामील होण्यास्तव व १४,९२५ स्वतंत्र शासनपद्धतीच्या बाजूचीं पडलीं. पार्मा, मोडेना व रोमाग्ना यांत वरील अनुक्रमानें ४,२६,००६ व ७५६ अशीं मतें पडलीं.

मोठाच आणीबाणीचा प्रसंग होता. सभेंत सदर तह मंजूर झाला तरच त्याची इभ्रत कायम राहून जीविताचें साफल्य होणारें होतें. याच्या उलट प्रकार झाल्यास त्याला वर तोंड काढण्यास जागा नव्हती इतकेंच नव्हे, तर त्याजवर देशद्रोहाचा आरोप येण्याचाहि संभव होता, व ती गोष्ट त्यानें स्वतःच खुद्द राजाजवळहि बोलून दाखविली होती. अशा स्थितींत तो केवळ सात्त्विक तेजाच्या जोरावर आपल्या कृत्याचें समर्थन करण्यास उभा राहिला असतां त्याच्या चेहऱ्यावर कोणकोणत्या मनोविकारांची छटा उमटत असेल हें निश्चितपणें सांगणें कठिण आहे. तथापि एवढें खास कीं, त्याचें धैर्य तिळमात्रहि ढळलें नव्हतें, व त्याचा आत्मविश्वास वरचेवर त्याचे ठायीं उत्साह भरीत होता ! सदर तहाचें पाहिलें वाचन झाल्यावर त्यावर वादविवाद सुरू झाला तो सुमारें १० दिवस चालला होता ! त्यांत सरकारच्या प्रतिपक्षाकडून जोराचा विरोध होऊं लागला. नीस ही गॅरिबाल्डीची जन्मभूमि असल्यामुळें ती परक्यांच्या हवालीं केल्याचें पाहून त्याला फारच संताप आला व त्या संतापाच्या भरांत त्यानें काव्हूर-वर कठोर शब्दांचा सारखा वर्षाव सुरू केला. ऑस्ट्रियाशीं नुकत्याच झालेल्या युद्धांत गॅरिबाल्डीनें आपल्या स्वयंसैनिकांच्या साहाय्यानें इटॅ-लियन लोकांतर्फे समरांगणावर अनेक मर्दुमकीचीं कृत्यें करून इटॅलियन देशभक्तांस उपकारबद्ध केलें होतें. यामुळें त्यांच्यावर त्याचें फार मोठें वजन होतें. नीस फ्रान्सास दिल्यामुळें त्याची मनोवृत्ति दुखावण्यास सबळ कारण आहेसें पाहून पुष्कळ सभासदांस त्याच्याविषयीं सहानुभूति वाटूं लागली. त्यांपैकीं कित्येक तर काव्हूरची निर्भर्त्सना करण्यासहि तयार झाले. यांपैकीं एकानें त्याची इंग्लंडचा प्रधान अर्ल ऑफ क्लॅरेंडन याच्याशीं दोषैक दृष्टीनें तुलना केली. तेव्हां काव्हूरनेंहि अखेरीस आपल्या प्रतिपक्षास उत्तर देतांना क्लॅरेंडनचें उदाहरण घेऊन त्याच्या शत्रूंच्या रूपानें स्वतःच्या शत्रूंचें व त्यांच्या घातुक स्वभावाचें व्याजोक्तीनें फार सुंदर चित्र रेखाटलें. सभेंतील समंजस लोकांस उद्देशून त्यानें पुढील उद्गार काढले:—

ज्या राजकीय धोरणामुळें इतक्या अल्प काळांत **मिलान, फ्लोरेन्स, बोलोग्ना** हे प्रांत आपणास प्राप्त झाले तें धोरण तडीस नेण्यास **सॅव्हॉय** व **नीस** हे प्रांत तोडून देणें अत्यंत अवश्यक होतें. लोकप्रियता ही आम्हांस नेहमींप्रमाणेंच प्रिय आहे; आणि पुष्कळ प्रसंगीं माझ्या सहकाऱ्यांना व मला त्या लोकप्रियतारूपी कधीं कधीं मादक असणाऱ्या पेयाचा आस्वाद घेण्याचा योग आला आहे. परंतु जेव्हां आमच्या कर्तव्यामुळें तिचा त्याग करावा लागतो तेव्हां तो कसा करावा हें आम्हांस ठाऊक आहे. ह्या तहावर सही करतेवेळीं आमची पक्की खात्री होती कीं, आमच्यावर लोकनिंदेचा भडिमार होईल; परंतु आम्हीं तीस तोंड दिलें; कारण, या कृत्यानें आम्ही **इटलीचें** हितच साधीत आहों असें आम्हांस वाटलें.

याप्रमाणें खुलासा करून प्रतिपक्षाच्या आरोपांचें यथास्थित खंडन केल्यानंतर सदर तहाबद्दल जरी पुष्कळ समंजस सभासदांना फार वाईट वाटलें तरी त्यांनीं अखेरीस तो मंजूर करण्याविषयींच आपलें मत दिलें. **काव्हूरच्या** भाषणाचा सभासदांच्या मनावर बराच इष्ट असा परिणाम घडून आल्यामुळें व त्याच्या देशभक्तीविषयीं त्यांचीं मनें निःसंशय झाल्यामुळें अंदाजापेक्षांहि जास्त बहुमतानें सदर तह एकदांचा मंजूर झाला (ता० १२ एप्रिल सन १८६०). याप्रमाणें ह्या प्रकरणांत जरी **काव्हूरनें** यश संपादन केलें तरी सदरप्रमाणें आपला मुलुख दुसऱ्यास दिल्याची ही गोष्ट अखेरपर्यंत त्याच्या मनाला सारखी खात होती. त्याच्या भावी आयुष्यक्रमांत जेव्हां जेव्हां या गोष्टीची त्याला आठवण होई तेव्हां त्याला अत्यंत मानसिक वेदना होत असत. आणि यामुळें पुढें पुढें समंजस लोकांनीं त्याच्यापुढें ही गोष्ट काढण्याचें बंदहि केलें होतें!

# प्रकरण १३ वें

## काव्हूरची मुत्सद्देगिरी व गॅरिबाल्डीचें शौर्य

मध्य इटलींतील चार संस्थानें व्हिक्टर इमॅन्युअलच्या राज्यांत सामील झाल्यानंतर लवकरच दक्षिण इटलींतील जनतेच्या मनांतहि त्या राज्यांत सामील होण्याची इच्छा अत्यंत प्रबल झाली. दक्षिण इटलींतील **सिसली** व **नेपल्स** हीं दोन संस्थानें प्रमुख असून तीं **फ्रान्सां**तील प्रसिद्ध **बोरबन** राजघराण्यांतील वंशजांकडे होतीं; अर्थात् त्यांना **नेपो-लियन**चा आश्रय होता. तेव्हां या संस्थानांतील लोकांच्या इच्छेस मान दिल्यास **नेपोलियन**ची मर्जी खप्पा होण्याचा व **ऑस्ट्रिया**, **रशिया** वगैरे इतर राष्ट्रांशींहि भानगडी उपस्थित होण्याचा संभव असल्यामुळें **काव्हूर**च्या मनांतून कांहीं दिवस या लोकांच्या इच्छेकडे दुर्लक्ष करा-वयाचें होतें. जीं चार संस्थानें नुकतींच सामील करण्यांत आलीं होतीं त्यांसह तीं धरून स्वराज्यांत (उत्तर इटलींत) स्थैर्य उत्पन्न करण्या-करितां त्यास आणखी एक वर्षभर नवीन भानगडींत न पडतां स्वस्थ रहाण्याची अवश्यकता वाटत होती. परंतु इटॅलियन लोकांच्या अंगांत एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचें वारें आतां इतक्या जोरानें खेळूं लागलें होतें कीं, **काव्हूर**ला त्यांच्या चळवळीकडे लक्ष देऊन तिचें नियमन कर-ण्याचें काम अंगावर घेणें भाग पडलें. मागील प्रकरणांत उल्लेखिलेल्या पहिल्या पार्लमेंटची बैठक **ट्यूरिन** येथें चालू असतांच **सिसली**मध्यें क्रांतिकारक चळवळीस ऊत येऊन राहिला होता. तेथील मुख्य शहर व बंदर **पालेर्मो** येथील लोकांनीं ता० ४ एप्रिल १८६० रोजीं बंड केलें. परंतु राजपक्षीय सैन्यानें तें मोडून टाकलें. तथापि त्यानंतर बंडाच्या ज्वाळा प्रत्येक जिल्ह्यांतून पसरत चालल्या व **मेसिना** आणि **कॅटनिया** या शहरीं दंगे सुरू झाले. या बंडाळीची बातमी उत्तर इटलींत येतांच

तेथील लोकांनीं सदर बंडवाल्यांस मदत करण्याकरितां स्वयंसैनिकांचें सैन्य पाठविण्याचा बेत करून त्या कामीं पुढाकार घेण्याविषयीं ते **गॅरिबाल्डीची** प्रार्थना करूं लागले. परंतु अशा प्रकारें **सिसलीवर** स्वारी केल्यास ती यशस्वी होईल कीं नाहीं याची **गॅरिबाल्डीस** शंका वाटत असल्यामुळें तो ती गोष्ट कबूल करण्यास आढेवेढे घेऊं लागला. इतक्यांत **सिसलींतील** माहितगार व देशभक्त पुढारी **फ्रान्सिस्को क्रिस्पी** व शूर लढवय्या **निनो बिक्झो** यांनीं त्यास तेथील परिस्थिति सर्वस्वीं अनुकूल असल्याची खालीलायक माहिती दिल्यावरून त्यानें त्या गोष्टीस आपला रुकार दिला. **सिसलींतील** बंडवाल्यांस गुप्तपणें मदत करण्याची **काव्हूरची** इच्छा होती. परंतु **गॅरीबाल्डीनें** उघडपणें जाऊन **सिसलीवर** स्वारी करणें त्यास प्रथम पसंत नव्हतें. कारण, त्यामुळें बलाढ्य युरोपियन राष्ट्रांचीं मनें प्रक्षुब्ध होऊन इटॅलियन राष्ट्राच्या भावी ऐक्यास अपाय होण्याचा संभव होता. तथापि **गॅरिबाल्डीच्या** सदर मोहिमेस **व्हिक्टर इमॅन्युअलचें** मत अनुकूल होतें. तेव्हां या विषयासंबंधीं त्याच्याशीं **काव्हूरचा** खडाजंगी वाद झाला. पण अखेरीस **गॅरिबाल्डीची** योग्यता व महत्त्व आणि राजाची इच्छा हीं लक्षांत घेऊन **काव्हूरनें** या मोहिमेस विरोध करण्याचें सोडून दिलें इतकेंच नव्हे, तर त्यानें शक्य त्या रीतीनें त्यास गुप्तपणें मदत करून त्या स्वारीचा आपल्या राज्यास होईल तितका फायदा करून घेण्याचा बेत केला. तथापि युरोपियन राष्ट्रांना तक्रार करण्यास जागा मिळूं नये म्हणून त्यानें बाह्यात्कारें आपण या स्वारीच्या विरुद्ध असल्याचा आविर्भाव आणला. **गॅरिबाल्डीच्या** खटाटोपाची आपणांस कांहीं माहिती नाहीं असें सांगतां यावें म्हणून या वेळीं तो मुद्दाम आपली राजधानी सोडून **व्हिक्टर इमॅन्युअलबरोबर मोडेना** शहरीं गेला. मात्र त्यानें **पालेर्मो** येथील आपल्या अधिकाऱ्यांस, **गॅरिबाल्डीस** कैद करण्याचा एक व त्यास गुप्तपणें मदत करण्याचा एक असे दुहेरी हुकूम देऊन ठेवले. पहिला हुकूम केवळ औपचारिक असून **गॅरिबाल्डीस** अपयश येऊन बाजू अंगावर आली तरच तो अंमलांत यावयाचा होता. याप्रमाणें **काव्हू-**

रचें कारस्थान सुरू असतां इकडे ता० ५ मे १८६० या दिवशीं संध्याकाळीं गॅरिबाल्डीनें रुबाटिनो कंपनीच्या जिनोआ बंदरांतील दोन आगबोटी वेठीस धरल्या व त्या कार्टो नामक खेड्यास आणविल्या. ह्या ठिकाणीं त्याच्या विनंतीस मान देऊन सुमारें १२०० स्वयंसैनिक सिसलीवर चालून जाण्यास जमले होते. ह्या स्वारीवर जाण्याचा गॅरिबाल्डीचा निश्चय झाल्यावर काव्हूरनें त्यास न कळत आपल्यातर्फे ला फारिना व ला मासा हे दोन प्रसिद्ध देशभक्त व कर्ते पुरुष त्याजकडे पाठविले होते. त्यांनीं काव्हूरच्या इच्छेवरून ह्या स्वयंसैनिकांच्या पथकांत आपला प्रवेश करून घेऊन तेंहि गॅरिबाल्डीस मदत करण्याच्या हेतूनें त्याच्याबरोबर निघाले. ह्या स्वारीस निघालेल्या स्वयंसैनिकांत सुमारें ४०० लोक घरंदाज कुटुंबांतील असून बाकीचे सामान्य रयतेपैकीं होते. परंतु ते सर्व परस्परांतील भेदाभेद विसरून एकदिलानें वागण्यास प्रवृत्त झालेले होते. उत्कट देशाभिमान व स्वातंत्र्यप्रेम या दोन उदात्त भावनांनीं त्यांचीं मनें पूर्णपणें भारून गेलीं असल्यामुळें त्यांच्या अंगांत विलक्षण अवसान उत्पन्न झालें होतें व त्या सर्वांच्या मनाची तंद्री ठरलेल्या कार्याकडे एकसारखी लागून राहिलेली होती. त्यांचा तो विलक्षण उत्साह, स्फूर्ति व चैतन्य पाहून पृथ्वीवरील गुलामगिरी नष्ट करण्याकरितां जणूं काय हे देवदूतच आकाशांतून खालीं आले आहेत कीं काय असा भास होत होता! असो; कार्टो येथून निघून गॅरिबाल्डी प्रथम पोंबिनोच्या सामुद्रधुनीजवळ आला. तेथें त्यास टस्कनींतील कांहीं स्वयंसैनिक येऊन मिळाले. तेथून निघून ता० ७ मे १८६० रोजीं तो टालमोना बेटापासून कांहीं अंतरावर येऊन थांबला. तेथें त्यानें हंगेरियन कर्नल टर ( हा त्याच्या स्वारींत होता ) याच्या मार्फत जवळच्या ऑर्बेटेलो नामक किल्ल्यांतील पीडमॉन्टच्या सेनापतीपासून मिळेल तेवढा दारूगोळा व कांहीं जुनाट झालेल्या लहान तोफा पैदा केल्या. येथून त्यानें सुमारें ६० लोकांची एक टोळी पोपच्या संस्थानांवर पाठविली. हेतु हा कीं, त्यामुळें युरोपियन राष्ट्रांचें लक्ष सिसलीच्या स्वारीवरून निघून

पोपच्या संस्थानांकडे लागावें व त्यांस सदर स्वारीचा रोंख पोपवर आहे असें वाटावें. सुमारें १० दिवसांच्या अवधींत सदर टोळीनें पोपची सरहद्द ओलांडली. परंतु पोपच्या सैनिकांनीं तिच्यावर हल्ला केल्यामुळें तीस टस्कनींत पळून यावें लागलें. तेथें पीडमॉन्टच्या सरकारनें त्यांचीं हत्यारें काढून घेतलीं व पुढें त्यांपैकीं कांहींजण पुनः गॅरिबाल्डीस जाऊन मिळाले. असो; ता० ९ मे रोजीं गॅरिबाल्डी टालमोना बंदरांत आला व तेथून त्यानें बोरबोन सरकारच्या आरमारी जहाजांची दृष्टि चुकविण्याकरितां आडमार्गानें प्रयाण केलें. ता० ११ मे रोजीं तो सिसलींतील मार्साला बंदरांत येऊन पोंचला. त्या वेळीं सुदैवानें तेथें दोन इंग्लिश लष्करी जहाजें स्वराष्ट्राच्या हितसंबंधाचें रक्षण करण्याकरितां येऊन राहिलीं होतीं. तसेंच नेपल्सच्या राजाचीं दोन जहाजें नुकतींच तेथून किनाऱ्यावर टेहळणी करण्याकरितां निघून गेलीं होतीं. ह्या अनुकूल संधीचा फायदा घेऊन गॅरिबाल्डीनें आपले ते इतिहासप्रसिद्ध देशभक्त स्वयंसैनिक त्यांच्या सामानासह किनाऱ्यावर उतरविले. इतक्यांत टेहळणी करणाऱ्या वरील जहाजांस त्याच्या हालचालीची चाहूल लागतांच त्यांनीं समुद्रांतून त्याच्या जहाजावर भडिमार सुरू केला. तेव्हां इंग्लिश जहाजावरील कप्तानानें भडिमार करणाऱ्या जहाजावर जाऊन त्यास मार्साला येथील इंग्रजी राष्ट्राच्या इमारतीस धक्का न पोंचविण्याची इषारत दिल्यामुळें तो भडिमार आपोआप थंडावला. एवढ्या अवकाशांत गॅरिबाल्डीनें आपलें सर्व सामान व लोक बंदरांत नेले व आपल्या जहाजास त्यानें आग लावून दिली. दुसरे दिवशीं सकाळीं गॅरिबाल्डी आपल्या लोकांसह सालेमी शहरास निघून गेला. तेथें त्यास सिसलींतील बंडवाले लोक येऊन मिळाले. या शहरीं येतांच त्यानें व्हिक्टर इमॅन्युअलच्या नांवाची द्वाही फिरवून त्याचा प्रतिनिधि ह्या नात्यानें सिसलीची सर्व राजकीय सत्ता आपल्या हातीं घेतल्याचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. तथापि अद्याप त्यास सिसलीचें मुख्य शहर पालेर्मो हें गांठावयाचें असून त्याच्या मार्गांत नेपल्सच्या राजाचें सैन्य त्यास प्रतिकार करण्याकरितां सज्ज

होऊन राहिलें होतें. या सैन्याची व त्याची प्रथम भेट **कॅलटॅफिमी** या नांवाच्या घांटाच्या पायथ्याशीं झाली. येथें उभय सैन्यांची निकराची लढाई होऊन त्यांत **गॅरिबाल्डी**चा मुलगा **मेनॉटी** हा जखमी झाला व त्यास अपयश येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां **निनोबिक्झो** नामक **गॅरिबाल्डी**इतकाच शूर व धाडसी असलेला त्याचा दुय्यम सेनापति त्यास खिन्नतेनें म्हणाला, 'मला वाटतें आपणांस पळ काढणें भाग पडेल.' यावर **गॅरिबाल्डीनें** त्यास आवेशानें असें उत्तर दिलें कीं, 'येथें आपण इटॅलियन राष्ट्र निर्माण करणार अथवा मरणार!' असे निर्वाणीचे उद्गार काढण्याचें कारण असें होतें कीं, **गॅरिबाल्डी**च्या स्वारीचें यशापयश मुख्यत: त्याच्या इभ्रतीवर अवलंबून होतें. अशा आणीबाणीच्या वेळीं माघार घेतल्यास त्या इभ्रतीची हानि होऊन त्याच्याभोंवतीं जमलेल्या लोकांचा दम खचण्याचा संभव होता; म्हणून त्यानें प्राणाचीहि परवा न करितां यश येईपर्यंत सारखें लढत राहण्याचा निश्चय केला, व तुकारामाच्या उक्तीप्रमाणें अखेर या निश्चयरूपी बळाच्या जोरावरच त्यास विजय मिळाला! हा विजय संपादल्यानंतर त्यानें तत्काल **पालेर्मो** शहरावर चाल केली, व संगिनीचा मारा करून ता० २७ मे रोजीं त्यानें त्या शहरांत प्रवेश केला. **नेपल्स**च्या राजाच्या सैन्यानें त्याच्याशीं तेथें आणखी कांहीं दिवस युद्ध केलें. पण अखेर त्यास हार खावी लागून **पालेर्मो** शहर सोडून जावें लागलें (ता० ७ मे स० १८६०). **गॅरिबाल्डी** याप्रमाणें विजय संपादण्याचें काम करीत असतां तिकडे **काव्हूर** परराष्ट्रीय क्षुब्धतेच्या ढगांचें निवारण करण्यांत गुंतला होता. इतका वेळ तो **गॅरिबाल्डी**च्या स्वारीसंबंधीं 'नरो वा कुंजरो वा' म्हणून आपली बाजू संभाळीत होता. परंतु **गॅरिबाल्डीनें सिसली** बेट काबीज करून **पालेर्मो** शहरीं प्रवेश केल्यानंतर तो त्यास मदत करण्याचे बाबतींत जास्त धिटाई करूं लागला. त्यानें **जिनोआ** येथून त्याच्या मदतीकरितां **मेदिकी** नामक सेनापतीच्या हाताखालीं ३ हजार लोक देऊन त्यास **सिसली**कडे पाठविलें. तसेंच **पालेर्मो** येथील आपल्या आरमारी सेनापतीस त्यानें **गॅरिबाल्डी**चा सन्मान करण्याचीहि

इषारत दिली. त्याप्रमाणें गॅरिबाल्डी त्यास भेटण्यास गेला असतां त्यानें त्यास १९ तोफांची सलामी देऊन सिसलीवरील आधिपत्य मान्य केलें. गॅरिबाल्डी हा जरी अत्यंत शूर व उत्कट देशाभिमानी पुरुष होता तरी तो कांहीं मुत्सद्दी नव्हता. शिवाय त्याचा स्वभाव कांहींसा उच्छृंखल व विकारवश होता. त्याच्याभोंवतालीं लोकसत्तावादी उच्छृंखल लोक फार जमलेले होते. अशा स्थितींत सिसलीची सर्व राजकीय सत्ता त्याच्या हातीं राहूं देणें भावी इटॅलियन स्वातंत्र्याच्या व राष्ट्रघटनेच्या कार्यास अपायकारक होईल अशी काव्हूरची प्रामाणिक समजूत असल्यामुळें त्यानें तो प्रांत व्हिक्टर इमॅन्युअलच्या राज्यास तावडतोब जोडण्याविषयीं आग्रह सुरू केला. परंतु गॅरिबाल्डी तसें करण्यास तयार नव्हता. गॅरिबाल्डीवर माझिनीच्या अनुयायांचें विशेष वजन आहे अशी समजूत असल्यामुळें त्याची वृत्ति बावरली होती. वस्तुतः माझिनीनें या प्रसंगीं आपलीं मतें बाजूस ठेवून इटॅलियन राष्ट्राचें ऐक्य—मग तें कोणत्या कां उपायानें होईना—घडवून आणण्याच्या ध्येयाकडेच आपलें लक्ष लाविलें होतें. पण त्याची ही नूतन मनोवृत्ति काव्हूरच्या लक्षांत येण्याचा संभव नव्हता. कारण, हीं दोन्ही थोर माणसें परस्परांविषयीं गैरसमज करून घेणारींच होतीं. गॅरिबाल्डीस राज्यकारभाराचा अनुभव नसल्यामुळें तो भोंवतालच्या उच्छृंखल लोकांच्या जाळ्यांत सांपडून कांहीं तरी चुका करून युरोपियन राष्ट्रांच्या पेंचांत सांपडेल व त्याचा परिणाम कदाचित पीडमॉन्टच्या राज्यासहि भोगावा लागेल असें त्यास वाटत होतें. म्हणून तो त्याच्या हातीं एकसूत्री अंमल (dictatorship) फार दिवस ठेवण्यास तयार नव्हता. उलटपक्षीं गॅरिबाल्डीला, संपूर्ण इटलीस स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां, अशा प्रकारची सर्व सत्ता आपल्या हातीं असणें जरूर वाटत होतें. यामुळें या उभयतांमध्यें बराच मतभेद किंबहुना बेबनाव उत्पन्न झाला. परंतु गॅरिबाल्डीला दुखवून राष्ट्रकार्याची हानि करण्यापेक्षां थोडीशी माघार घेऊन युक्तिप्रयुक्तीनें आपला बेत सफळ करण्याचें काव्हूरनें ठरविलें व सिसली आपल्या राज्यास जोडण्याचा

प्रश्न पार्लमेंटपुढें मांडण्याची कल्पना त्यानें सोडून दिली. त्यानें तसें केलें असतें तर त्याची इभ्रत वाढून त्यास गॅरिबाल्डीस शह देतां आला असता. परंतु स्वतःच्या इभ्रतीपेक्षां स्वदेशाच्या हिताकडे त्याचें विशेष लक्ष असल्यामुळें त्यानें गॅरिबाल्डीस वरीलप्रमाणें विरोध न करितां त्यास कांहीं काल स्वेच्छेप्रमाणें वागूं देण्याचें ठरविलें.

सिसलीची राजधानी पालेर्मो हातीं येतांच गॅरिबाल्डीची सत्ता त्या बेटांत सर्वत्र मान्य करण्यांत आली. तथापि मिलाझो नामक शहराजवळ नेपल्सच्या राजाचें एक बरेंच मोठें सैन्य त्याचा पाडाव करण्यास टपून बसलें होतें. गॅरिबाल्डीला या वेळीं पुष्कळ नवीन सैनिक येऊन मिळाले असल्यामुळें त्यानें ह्या सैन्यावर चाल केली, व ता० २० जुलई सन १८६० च्या सुमारास त्याचा पराभव करून टाकला. सिसलीमध्यें चालू असलेली ही घडामोड फक्त इंग्लंडला तेवढी पसंत वाटत होती. कारण, तेथील राज्यपद्धति अत्यंत रानटी व जुलमी असल्याबद्दल खुद्द ग्लॅडस्टनसाहेबांनींच कांहीं वर्षांमागें बोलून दाखविलें होतें. त्यावरून इंग्लंडच्या प्रधानमंडळानें गॅरिबाल्डीस स्वेच्छेप्रमाणें वागूं देण्याविषयीं काव्हूरला सल्ला दिली. परंतु फ्रान्स, रशिया व ऑस्ट्रिया ह्यांना सिसलीचें हें स्थित्यंतर रुचत नव्हतें. त्यांनीं त्याविरुद्ध तक्रार करण्यास सुरुवात केली. तथापि या तिन्ही राष्ट्रांत ऐक्यभाव नसल्यामुळें व रशिया आणि ऑस्ट्रिया यांस त्या भानगडींत पडण्यास तूर्त सवड नसल्यामुळें ते नुसते तक्रार करूनच थांबले. पण फ्रान्सचा बादशहा तिसरा नेपोलियन याचा पोपशीं व बोरबोन वंशांतील राजाशीं निकट राजकीय संबंध असल्यामुळें त्यानें गॅरिबाल्डीच्या कृतीचा जोरानें निषेध करण्याचे बाबतींत इंग्लंडचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. इंग्लंडनें या वेळीं त्याचें म्हणणे ऐकलें नाहीं. तथापि वरील राष्ट्रांनीं त्यास या बाबतींत स्वतःच्या इच्छेप्रमाणें वागण्याची मुखत्यारी दिली. म्हणजे नेपोलियननें जर गॅरिबाल्डीचा प्रतिकार केला तर आपण तटस्थ राहूं असें अभिवचन दिलें. परराष्ट्रांची वृत्ति अशा प्रकारची असतांना इकडे सिसली व नेपल्सचा राजा दुसरा फ्रान्सिस याचें धाबें दणाणून त्यानें व्हिक्टर

इमॅन्युअलची करुणा भाकली व पीडमॉन्टशीं सख्य करून नियमबद्ध शासनपद्धति ( Constitution ) सुरू करण्याचें कबूल केलें. व्हिक्टर इमॅन्युअल यानें तीन महिन्यांपूर्वींच या राजास वरील गोष्टी करण्याविषयीं पत्र लिहिलें होतें; परंतु त्या वेळीं तें त्यानें मान्य केलें नाहीं. अर्थात् आतां त्याच्या विनंतीकडे लक्ष देणें व्हिक्टर इमॅन्युअल यास शक्य नव्हतें. तथापि त्याची ही विनंती अमान्य केल्यास नेपोलियनची मर्जी रुष्ट होण्याचा रंग दिसूं लागला. म्हणून बाह्यतः गॅरिबाल्डीस यापुढें नेपल्सच्या राजाचा मुलूख जिंकण्याची मनाई करणारें पत्र लिहिणें त्यास भाग पडलें. हें पत्र सरकारी रीतीनें त्याजकडे जातांच काव्हूरनें पालेर्मो येथील आपल्या आरमारी अधिकाऱ्यामार्फत ( पर्सानो ) त्यास आपल्या स्वारीचें काम पूर्ण करण्याविषयीं गुप्तपणें निरोप पाठविला. नेपल्सच्या राजानें पीडमॉन्टच्या राजघराण्याशीं वारंवार विरोध करून त्या संस्थानच्या राष्ट्रीय आकांक्षेच्या वाढीस प्रतिबंध केलेला होता. तेव्हां असलें हें कांट्याप्रमाणें असलेलें राजघराणें होईल तितकें लवकर नष्ट करण्याची काव्हूरची इच्छा होती; म्हणून त्यानें वरीलप्रमाणें गॅरिबाल्डीस गुप्तपणें निरोप पाठविला इतकेंच नव्हे, तर गॅरिबाल्डी मेसिनाची सामुद्रधुनी ओलांडून नेपल्सच्या राजाच्या मुलखांत येण्यापूर्वींच त्यानें तेथें बंडें उद्भूत करण्याचीहि योजना केली! व्हिक्टर इमॅन्युअलचें सरकारीरीत्या आलेलें पत्र अर्थात्च गॅरिबाल्डीनें मानलें नाहीं. परंतु तसें करण्यांत आपण त्याचा उपमर्द करीत आहों अशी मात्र त्यानें त्याची समजूत होऊं दिली नाहीं. त्यानें राजाच्या पत्रास पुढीलप्रमाणें उत्तर दिलें:—

"महाराज! सरकारचे पायांबद्दल मी हृदयांत किती आदरपूर्वक भक्ति बाळगतों हें सरकारास माहित आहेच. आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे; तथापि इटालीची स्थिति पहातां या क्षणीं ती मला सर्वथा पाळतां येत नाहीं. नेपल्सवर मीं जावें अशाबद्दल तेथील लोकांनीं मला आव्हान केलें आहे इतकेंच नव्हे, तर त्यांचा माझ्या पाठीमागें सारखा तगादा सुरू आहे. याहून अधिक अनुकूल प्रसंग येईतों त्यांनीं धीर

धरावा अशाविषयीं मीं आपली पराकाष्ठा केली; परंतु सर्व व्यर्थ! या वेळीं मी जर माघार घेईन तर मातृभूमीसंबंधानें माझें कर्तव्य करण्यास मी चुकलों असें होऊन तिच्या स्वातन्त्र्याच्या महत्कार्यास धोका येईल. यास्तव महाराजांनीं या क्षणीं एक वेळ आपली आज्ञा अमान्य करण्याची मेहरबानीनें मला परवानगी द्यावी. जुलमानें गांजलेल्या माझ्या बंधुवर्गाच्या इच्छेमुळें प्राप्त झालेलें कार्य हातावेगळें झाल्याबरोबर मी आपली तरवार महाराजांचे चरणांवर वाहून पुढें आमरणान्त आपल्या आज्ञेचा बंदा गुलाम होऊन राहीन.''* आपला

गॅरिबाल्डी

याप्रमाणें राजाज्ञेचा अव्हेर करून गॅरिबाल्डी नेपल्सवर चाल करण्यास सिद्ध झाला. त्यानें ता० १९ आगष्ट रोजीं रात्रीं मेसिनाची सामुद्रधुनी ओलांडून कॅलाब्रिया प्रांतांत प्रवेश केला. ह्या सुमारास राज्यक्रांतीची चळवळ नेपल्सच्या शेजारीं असलेल्या बॅसालिकाटा नामक प्रांतापर्यंत जाऊन पसरली होती. अर्थात् गॅरिबाल्डीचा प्रवेश होतांच आसपासच्या सर्व लोकांच्या अंगांत स्वातंत्र्यदेवतेचा संचार सुरू झाला. गॅरिबाल्डी हा कोणी तरी देवदूत असून आपली सुटका करण्याकरितां आला आहे अशा श्रद्धेनें ते भराभर त्याच्याभोंवतीं जमून त्याचें स्वागत करूं लागले. जाणत्या लोकांनीं नेपल्सच्या पूर्वीच्या राजाची सत्ता नष्ट झाल्याचे जाहिरनामे काढून ठिकठिकाणीं क्रांतिकारक कमिट्या नेमून राज्यकारभार चालविण्याची तजवीज केली. नेपल्सच्या राजानें त्याचा मोड करण्याकरितां जें सैन्य पाठविलें होतें तेंहि तिथरून त्यास सामील झालें! आणि अशा रीतीनें ग्लॅडस्टनसाहेबांनीं वर्णिलेल्या जुलमी राजकीय अंमलाची हां हां म्हणतां इतिश्री झाली! तेव्हां गॅरिबाल्डी आपलें सैन्य मागें ठेवून कांहीं निवडक लष्करी अधिकाऱ्यांस बरोबर घेऊन त्वरेनें नेपल्स शहराकडे निघाला; वाटेंत

* सदरहू उतारा रा. नरसोपंत केळकर यांच्या गॅरीबाल्डीच्या चरित्रांतून घेतला आहे (पृ. १६४).

लोक त्याचा सारखा जयजयकार करीत होते. तो नेपल्सच्या नजीक आल्याचें वर्तमान समजतांच तेथील राजा दुसरा फ्रॅन्सिस् याचें धाबें दणाणलें. तेव्हां त्यानें तें शहर सोडून गेटा नामक तटबंदीच्या बंदराचा आश्रय केला. दुसऱ्या दिवशीं दुपारीं ( ता० ७ सप्टेंबर सन १८६० ) गॅरिबाल्डीनें मोठ्या थाटानें नेपल्स शहरांत प्रवेश केला. राजा तेथून अगोदरच निघून गेलेला असल्यामुळें सर्व सरकारी इमारती तावडतोब गॅरिबाल्डीच्या ताब्यांत आल्या व त्यावर त्यानें व्हिक्टर इमॅन्युअलचीं निशाणें लावून सर्व शहरभर त्याच्या नांवाची द्वाही फिरविली, आणि सिसली व नेपल्स या दोन्ही राज्यांचा कारभार चालविण्याची सर्व सत्ता ( dictatorship ) आपल्या हातीं घेतल्याचें जाहीर केलें.

# प्रकरण १४ वें

## इटॅलियन राष्ट्राची प्राणप्रतिष्ठा !

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें गॅरिबाल्डीनें सिसली व नेपल्स हीं राज्यें संपादन करून दक्षिण इटली आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें सर्व इटॅलियन राष्ट्राचा एकजीव करण्याचा योग अगदीं नजीक आला आहे असें समजून काव्हूरनें तीं राज्यें तत्काल व्हिक्टर इमॅन्युअलच्या राज्यास जोडण्याची खटपट सुरू केली. तसेंच मार्चेस व उंब्रिया हे जे दोन पोपच्या सत्तेखालीं असलेले, परंतु त्या सत्तेच्या अंमलास कंटाळलेले प्रांत त्यांजवर स्वारी करून तेहि स्वराज्यास जोडण्याचें त्यानें ठरविलें. या प्रांतांतील लोकांनींहि कांहीं दिवसांपूर्वीं व्हिक्टर इमॅन्युअलच्या नांवाचा जयजयकार करून बंड केलें होतें. परंतु पोपनें तें मोडून टाकून त्यांना दहशत बसण्याकरितां त्यांच्यावर परदेशस्थ लोकांचें एक मोठें सैन्य लादलें. ह्या सैन्याचें आधिपत्य त्यानें लामोरिसियर नामक फ्रेंच सरदाराकडे दिलें होतें. ह्या सैन्यानें सदर प्रांतांत बरेच अत्याचार मांडले होते. त्यांचा फायदा घेऊन काव्हूरनें व्हिक्टर इमॅन्युअलतर्फे पोपकडे ता० ७ सप्टेंबर रोजीं एक वकील पाठविला व त्यास कळविलें कीं, 'मार्चेस प्रांतांत परदेशी सैन्याकडून होत असलेल्या प्राणहानीकडे लक्ष देऊन तें सैन्य तेथून हलविण्याची तजवीज न केल्यास व्हिक्टर इमॅन्युअल यास त्या प्रांतांतील लोकांच्या रक्षणाची तजवीज करणें भाग पडेल.' काव्हूरचा हा निरोप म्हणजे केवळ एक डावपेंच होता. कारण, कांहीं तरी निमित्त काढून त्या प्रांतावर स्वारी करण्याचा त्याचा निश्चय पूर्वींच ठाम ठरला होता. याचें कारण असें कीं, त्यानें तसें न केलें तर गॅरिबाल्डीची त्या प्रांतावर स्वारी होण्याचा संभव होता. गॅरिबाल्डी मोठा धाडसी

व शूर होता. परंतु त्याच्याजवळ फ्रेंच सेनापति **लामोरिसियर** याचा पराभव करण्याइतकें सैन्य नव्हतें. अशा स्थितींत जर कदाचित् त्याचा पराभव झाला तर त्यानें आजपर्यंत केलेली कर्तबगारी व्यर्थ जाऊन **फ्रान्स**ला मध्यें हात घालण्यास सवड मिळण्याचा संभव होता. शिवाय गॅरिबाल्डीनें ते प्रांत जिंकल्यानंतर मग ते **व्हिक्टर इमॅन्युअल**च्या राज्यास जोडण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां खुद्द **व्हिक्टर इमॅन्युअल**च्या सैन्यानेंच ते जिंकून स्वराज्यांत सामील करणें राजकारणाच्या दृष्टीनें अधिक इष्ट होतें. **काव्हूर, व्हिक्टर इमॅन्युअल** व त्याची लोकसभा ह्यांवर **पोप**नें आपला '**रोमाग्ना**' प्रांत खालसा केल्यावरून बहिष्कार घातला होता. अर्थात् त्याची खोड मोडण्यास त्यांना हें एक सबळ कारण होतें. ह्या स्वारीपूर्वी जमल्यास तिजबद्दल **नेपोलियन**ची अनुमति मिळवावी म्हणून **काव्हूर**नें त्याजकडे आपले दोन प्रतिनिधि पाठविले. **नेपोलियन** हा त्या वेळीं नवीन संपादन केलेल्या **सॅव्हॉय** प्रांतांत फिरत होता. प्रांतांतील **चेंब्रे** नामक गांवांत **काव्हूर**च्या प्रतिनिधींशीं त्याचें गुप्त खलबत झालें व तें अखेरपर्यंत इतकें गुप्त ठेवण्यांत आलें होतें कीं, त्याची नक्की तारीखहि कळण्यास सांप्रत मार्ग नाहीं! तथापि **नेपोलियन**नें त्या वेळीं उडत उडत आपली संमति देऊन **काव्हूर**ला सर्व कांहीं स्वतःच्या जबाबदारीवर करण्याची मोकळीक दिल्याची बोलवा आहे. ह्या खलबतानंतर आपल्या कृतीस **नेपोलियन** निदान प्रतिबंध तरी करणार नाहीं असें गृहीत धरून **काव्हूर**नें जनरल **काल्डिनी** याच्या हाताखालीं बरीच मोठी फौज देऊन त्यास **मार्चेस** व **उंब्रिया** प्रांतांवर पाठविलें. तसेंच ह्या स्वारीचें आधिपत्य स्वतःकडे घेण्याबद्दल त्यानें राजास सुचविलें. **व्हिक्टर इमॅन्युअल**ला त्याची सूचना पसंत पडली, व तो स्वतः त्या स्वारीबरोबर जाण्यास निघाला. ह्या स्वारींतील सैन्यानें ता० ११ सप्टेंबर रोजीं **पोप**च्या सरहद्दींत प्रवेश केला. त्या वेळीं फक्त **इंग्लंड** व **स्वीडन** या दोन राष्ट्रांखेरीज बाकी सर्व युरोपियन राष्ट्रांनीं **काव्हूर**च्या कृत्याबद्दल नापसंती व्यक्त करून **व्हिक्टर इमॅन्युअल**च्या दरबारीं असलेले आपले वकील परत बोला-

वळे. नेपोलियन या वेळीं मार्सेल्स येथें होता. त्याच्या प्रधानमंडळानें त्यास ' काय करावें ? ' म्हणून तारेनें विचारलें. पण त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तेव्हां फ्रेंच प्रधानमंडळानें रोम येथील आपल्या वकिलामार्फत सदर स्वारीबद्दल निषेध व्यक्त करून तिचा प्रतिकार करण्याविषयीं आपण हुकूम सोडले असल्याचें कळविलें. परंतु नेपोलियनचें वर्तन ह्या बाबतींत धरसोडीचें असल्यामुळें त्याच्या प्रधानमंडळाची योजना योग्य वेळीं अंमलांत येऊं शकली नाहीं. तथापि पोपचा फ्रेंच सेनापति लामोरिसियर यानें कार्लिडनीच्या सैन्याशीं निकराची लढाई दिली. पण कार्लिडनीनें अखेर कॅस्तेलफिदारोच्या टेंकडीवर त्याचा पराभव केला (ता० १८ सप्टेंबर); तेव्हां तो आंकोना शहरांत शिरला. परंतु येथेंहि सार्डिनियन सैन्यानें जमिनीवरून व पाण्यावरून त्यास वेढा दिल्यामुळें लवकरच (ता० २९ सप्टेंबर) तें शहर त्यांच्या स्वाधीन करणें त्यास भाग पडलें. मध्यंतरीं व्हिक्टर इमॅन्युअलचा दुसरा सेनापति जनरल फांटा यानें उंब्रिया प्रांतांतील पेरुगिया शहरावर चाल केली व तो व्हिटर्बो शहरानजीक येऊन ठेपतो तोंच रोम येथील फ्रेंच सैन्याच्या एका तुकडीनें तें शहर काबीज केल्याचें वर्तमान त्यास समजलें. नेपोलियनच्या अर्धवट धोरणाचा हा परिणाम होता. परंतु अर्धवट कृतीचें कार्य कधींहि यशस्वी होत नसतें, या नियमाचा प्रत्यय येण्याकरितांच कीं काय कोण जाणे फ्रेंच सैन्याचा फांटीकडून येथें पराजय झाला व त्यानें तें शहर घेतलें. ह्या पराभवानंतर लामोरिसियर खिन्न होऊन स्वदेशीं परत गेला. अर्थात् सर्व मार्चेस प्रांत व्हिक्टर इमॅन्युअलच्या ताब्यांत आला. तेथून तो आपल्या सैन्यासह नजीकच्या अब्रूझी प्रांतांत प्रयाण करीत असतां इकडे नेपल्सच्या राज्यांत व्होल्टर्नो नदीच्या कांठीं गॅरिबाल्डीची व नेपल्सच्या राजाच्या सैन्याची अखेरची आणि निकराची लढाई चालू होती (आक्टोबर १–२). गॅरिबाल्डीजवळ या वेळीं सुमारें २४ हजार सैनिक जमले होते. परंतु राजसैन्याची संख्या त्यांच्याहून दुप्पट होती. तथापि गॅरिबाल्डीचे लोक एकदिलानें व जिवावर उदार होऊन

सानें लढत असल्यामुळें अखेर त्यांसच विजय प्राप्त झाला. त्यानंतर राजाच्या सैन्यानें फिरून त्याचें नांव काढलें नाहीं. व तो सिसली आणि नेपल्स येथील सर्व राज्यकारभार स्वेच्छेनुसार चालवूं लागला.

गॅरिबाल्डीच्या धाडसी कृत्यांनीं अस्वस्थ झालेलीं युरोपियन राष्ट्रें, खुद्द व्हिक्टर इमॅन्युअलनें पोपच्या प्रांतावर केलेली स्वारी पाहून जास्तच क्रुद्ध झालीं. त्यांनीं काव्हूरवर निषेधात्मक खलित्यांचा भडिमार सुरू केला व ऑस्ट्रियानें तर युद्ध पुकारण्याचीहि तयारी सुरू केली. युरोपियन राष्ट्रांनीं उत्पन्न केलेलें हें वावटळ मोठ्या कुशलतेनें नष्ट करण्याच्या उद्योगास काव्हूर लागला. त्यानें नेपोलियनची अर्धवट संमति पूर्वींच मिळविलेली होती व ब्रिटिश वकील सर जेम्स हडसन याच्या साह्यानें त्यानें इंग्लंडचीहि सहानुभूति किंबहुना संमति मिळविली. इंग्लंडचा परराष्ट्रीय प्रधान लॉर्ड जॉन रसेल हा काव्हूरच्या बाजूचाच होता. त्याच्या मार्फत त्यानें प्रशियाच्या राजाचें मनहि तटस्थ वृत्ति धारण करण्याकडे वळविलें. आतां काय तो रशियाचा झार तेवढा उरला. त्यास अनुकूल करून घेण्याकरितां ऑस्ट्रियाचा बादशाहा मुद्दाम वार्सा येथें गेला होता. परंतु तेथील लोकांनीं त्याचें चांगलेंसें आदरातिथ्य केलें नाहीं, व झारनेंहि पोपकरितां इटलीच्या भानगडींत पडण्याचें नाकारलें; तेव्हां ऑस्ट्रियासहि गप्प बसणें भाग पडलें. कारण, त्यानें एकट्यानें इटलीशीं युद्ध पुकारल्यास त्याचें पारिपत्य करण्याइतकें सामर्थ्य आतां व्हिक्टर इमॅन्युअलच्या अंगीं उत्पन्न झालेलें होतें; शिवाय नेपोलियन मध्येंच कांहीं तरी ढवळाढवळ करील कीं काय अशीहि त्यास ( ऑस्ट्रियास ) भीति वाटत होती. याप्रमाणें हें वावटळ आपोआप शांत होण्याचा रंग दिसत होता. इतक्यांत नेपोलियननें व्हिक्टर इमॅन्युअलच्या कृतीचा विचार करण्याकरितां प्रमुख युरोपियन राष्ट्रांची परिषद भरविण्याची सूचना पुढें आणिली. परंतु या वेळीं इंग्लंडचा परराष्ट्रीय प्रधान लार्ड जॉन रसेल यानें व्हिक्टर इमॅन्युअलच्या दरबारनें केलेल्या सर्व कृत्यांचें स्पष्ट शब्दांनीं मंडण करून नेपोलियनचें तोंड बंद केलें. त्यानें ह्या बाबतींत इटलींतील आपला वकील सर

**जेमस्स हडसन** यास खलिता पाठवून असें स्पष्ट कळविलें कीं, " इटलींत झालेली व चालू असलेली राज्यक्रांति फार शहाणपणानें व धिम्मेपणानें चालली आहे. त्यांत कोठेंहि अत्याचार अथवा बेकायदेशीरपणा झालेला नाहीं. तसेंच ह्या क्रांतीमध्यें सनदशीर राज्यपद्धतीचीं तत्त्वें झुगारून दिलेलीं नसून उलट त्यांना एका वैभवशाली राजघराण्यांतील राजपुरुषाची जोड देण्यांत आली आहे. ×××× ह्या क्रांतीच्या मुळाशीं असलेलीं कारणें व तिच्या भोंवतालची परिस्थिति यांचें निरीक्षण केल्यावर **ऑस्ट्रिया, फ्रान्स, रशिया, प्रशिया** यांच्याप्रमाणें **सार्डिनियाच्या** राजाच्या कृतीसंबंधानें निषेध व्यक्त करण्याचें राणीसरकारास कांहीं कारण दिसत नाहीं. उलट इटालियन लोक युरोपियन राष्ट्रांच्या सहानुभूतीनें आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याची इमारत उभारीत असल्याचें पाहून राणीसरकारास समाधानच वाटेल. " इंग्रजी राष्ट्राचें याप्रमाणें स्पष्ट धोरण पाहून **नेपोलियनलाहि** मूग गिळावे लागले! यानंतर थोड्याच दिवसांनीं **काव्हूरनें नेपल्स** व **मार्चेस** यांच्यासंबंधींचे प्रश्न केवळ **इटलीसंबंधींचेच** असल्यामुळें त्यांचा निकाल लावण्याचा हक्क आपणांसच असून त्या बाबतींत परराष्ट्रानें ढवळाढवळ करण्याचें प्रयोजन नाहीं, असें सरकारी रीतीनें जाहीर केलें. परराष्ट्रांमध्यें **इटलीबद्दल** अशी वाटाघाट चालली असतांना **व्हिक्टर इमॅन्युअल नेपल्सवर** जाण्याकरितां निघाला होता. **काव्हूरच्या** मनांतून तें राज्य लवकर स्वराज्यास जोडून टाकावयाचें होतें. परंतु **गॅरिबाल्डी** तसें करण्यास तयार नव्हता. तेव्हां त्यास न दुखवितां हें कार्य साधण्याचा तो प्रयत्न करूं लागला. **नीस** शहर **नेपोलियनला** दिल्यापासून **गॅरिबाल्डी काव्हूरवर** फार रुष्ट झालेला होता. तथापि **काव्हूरच्या** मनांत त्याच्यासंबंधानें पूर्ण आदर होता, व त्यानें केलेली महत्त्वाची देशसेवा तो जाणून होता. म्हणून त्यानें **व्हिक्टर इमॅन्युअल** यास " त्याची भेट घेतांना मोठ्या बहुमानानें वागवावें " असें मुद्दाम लिहिलें होतें.* तसेंच त्याच्या स्वयंसैनिकांनीं बजावलेल्या

* तो लिहितो:—**गॅरीबाल्डी** हा माझा तीव्र शत्रु बनला आहे; परंतु ( त्यानें

[ पुढें चालू ]

देशसेवेबद्दल कृतज्ञतापूर्वक त्यांचा योग्य परामर्ष घेण्याकरितां त्यानें आपल्या लष्करी अधिकाऱ्यांशीं खडाजंगीचे वादहि केले. परंतु गॅरिबाल्डीला काव्हूरची ही मनोवृत्ति व तिचें रहस्य कळलेलें नव्हतें. यामुळें तो त्याच्याविरुद्ध सारख्या तक्रारी करीत होता. सिसली व नेपल्स हीं व्हिक्टर इमॅन्युअलच्या राज्यास लवकर जोडण्याचा त्याचा उपदेश तो ऐकेना. तेव्हां काव्हूरच्या कांहीं मित्रांनीं त्यास ह्या बाबतींतील गॅरिबाल्डीची इच्छा तृप्त करण्याकरितां कांहीं कालपर्यंत पार्लमेंटपासून एकसूत्री अंमल गाजविण्याची परवानगी मिळवावी अशी सल्ला दिली. परंतु काव्हूरनें तसें करण्याचें साफ नाकारलें. तो म्हणाला, " मी आपल्या शीलाचा भंग करणार नाहीं व जन्मभर ज्या तत्त्वांनुसार आचरण केलें त्यांच्या विरुद्ध वर्तन करणार नाहीं. मी स्वतंत्रतेचा भोक्ता आहें आणि तिच्या पुरस्कारामुळेंच मला सध्यांची स्थिति ( महती ) प्राप्त झाली आहे. तेव्हां स्वातंत्र्याला विघातक असें कृत्य माझ्या हातून होणार नाहीं." त्याच्या ह्या उद्गारांवरून कायदेशीर नियमबद्ध राजकीय स्वातंत्र्याचा तो किती कट्टा अभिमानी होता याची वाचकांस चांगली कल्पना करितां येईल.* असो; इकडे ठरल्याप्रमाणें व्हिक्टर इमॅ-

---

पूर्णपणें संतुष्ट होऊन जावें हें ) इटलीच्या कल्याणाच्या दृष्टीनें व महाराजांच्या इभ्रतीच्या दृष्टीनें इष्ट आहे.

* लोकनियंत्रित राज्यपद्धतीचा (पार्लमेंटरी गव्हर्मेंटचा) काव्हूर हा मोठा भोक्ता व कट्टा अभिमानी होता. "प्रामाणिक व उद्योगी–कर्तृत्ववान्–प्रधानमंडळास ह्या पद्धतीस भिण्याचें मुळींच कारण नाहीं. उलट कोणत्याहि पक्षांतील मूलगामी लोकांच्या धमकीस झुगारून देऊन राज्यकारभाराचें काम सुयंत्रितपणें चालविण्यास ह्या पद्धतीचा फार नामी उपयोग होतो असें १३ वर्षांच्या अनुभवानें स्वतःचें मत बनलें ' असल्याचें त्यानें एकदां बोलून दाखविलें होतें. जोसेफ मासारी नामक ग्रंथकारानें काव्हूरच्या एतद्विषयक भाषणांतील दिलेल्या उद्गारांची प्रतिमा पेत्रो ओर्सी नामक काव्हूरच्या चरित्रकारानें पुढीलप्रमाणें काढली आहे:—

[ पुढें चालू ]

न्युअल नेपल्स येथें येऊन दाखल झाला. तेव्हां गॅरिबाल्डीनें आदर-पूर्वक त्याची भेट घेतली व त्यानेंहि त्याचा सत्कार केला. परंतु राज-कारणासंबंधीं बोलणें सुरू होतांच गॅरिबाल्डीनें काव्हूरला कामावरून दूर करण्याची उघडपणें त्यास विनंती केली. गॅरिबाल्डीसारख्यानें अशा प्रकारें जाहीररीतीनें काव्हूरसंबंधीं अनादर व अविश्वास प्रगट केल्यावर काव्हूरला इत:पर केवळ स्वस्थ बसणें शक्य नव्हतें. त्यानें तत्काल पार्लमेंटची बैठक बोलावून त्यास कळविलें कीं, ' गॅरिबाल्डीसारख्या प्रख्यात देशभक्तानें आमच्या कार्यकर्तृत्वासंबंधानें अविश्वास प्रगट केलेला आहे. तेव्हां आम्हीं आपलें काम पुढें चालवावें कीं राजीनामा द्यावा याचा निर्णय होणें जरूर आहे.' यावर पार्लमेंटनें त्याच्यावर आपला पूर्ण विश्वास असल्याचें जाहीर केलें. नंतर त्यानें दाक्षिण व मध्य इटलींतील जीं संस्थानें बहुमतानें व्हिक्टर इमॅन्युअलच्या राज्यांत सामील होण्यास तयार असतील त्यांस तत्काळ आपल्या राज्यांत सामील करून घेण्याचा ठराव सदर सभेपुढें मांडला व तोहि त्या सभेनें मंजूर केला ( आक्टोबर ११ ). काव्हूरनें आपल्यावर केलेली ही मात पाहून गॅरिबाल्डीहि उमजला व त्यानें आपल्या सल्लागारांस बोलावून त्यांचें या विषयासंबंधीं मत ऐकून घेतल्यावर त्यानें स्वतःच्या हातानें सदर प्रांत व्हिक्टर इमॅन्युअलच्या राज्यास जोडल्याचा खलिता

---

" इतर राज्यपद्धतींप्रमाणेंच लोकनियंत्रित राज्यपद्धतीमध्येंसुद्धां अडचणी व भानगडी असतात. परंतु त्या अडचणी असल्या तरी दुसऱ्या कोणत्याहि राज्यपद्ध-तीपेक्षां ती श्रेष्ठ आहे. कांहीं प्रकारचा विरोध मला बिलकुल खपत नाहीं, व त्याचा मी जोरानें प्रतिकार करतों ( तो मी जोरानें हाणून पाडतों); परंतु तो माझ्या पथ्यावरच पडतो असें विचारांतीं दिसून येतें. कारण, त्यामुळें मला माझे विचार अधिक स्पष्टपणें मांडण्यास व बहुजनांची संमति मिळविण्यास दुप्पट जोराचे प्रयत्न करणें भाग पडतें. अनियंत्रित प्रधान हुकूम सोडतो; नियंत्रित प्रधानाला लोकांचीं मनें वळवावीं लागतात आणि मार्ग बरोबर आहेत अशी खात्री पटवून दुसऱ्यांचीं मनें वळविण्याची माझी इच्छा असते."

लिहून टाकला ! अशा रीतीनें, त्यानें अत्यंत साहस व श्रम करून मिळविलेले दोन प्रांत लेखणीच्या एका फटकाऱ्यानें एका क्षणांत निरपेक्षबुद्धीनें **व्हिक्टर इमॅन्युअल** यास अर्पण केले ! **व्हिक्टर इमॅन्युअलनें** त्यास मोठी पदवी, जहागीर, जहाज व संपत्ति देऊं केली; परंतु त्यानें त्यांपैकीं कशाचाहि स्वीकार केला नाहीं ! तो जसा आला तसा परत आपल्या घरीं निघून गेला ! इतकी निस्सीम देशभक्ति व स्वार्थत्याग क्वचितच आढळून येतात. **गॅरिबाल्डीच्या** ह्या निरपेक्ष देशसेवेमुळें त्याची कीर्ति सर्व युरोपखंडांत पसरली व त्याचें नांव त्याच्या मृत्यूनंतरहि अजरामर होऊन राहिलें. **गॅरिबाल्डीची** मनोवृत्ति **काव्हूरला** पूर्णपणें माहित होती. व ती ओळखूनच त्यानें त्यास आपलें म्हणणें ऐकण्यास भाग पाडण्याची वरीलप्रमाणें युक्ति काढली. ती उत्तम प्रकारें सफळ झाल्यामुळें **काव्हूरलाहि** समाधान वाटलें हें सांगावयास नकोच. **गॅरिबाल्डी** स्वस्थानीं ( कॅप्रेराबेटांत ) गेल्यावर पार्लमेंटच्या ठरावास अनुसरून **सिसली** व **नेपल्स** येथील लोकमत घेण्याकरितां **काव्हूर** कांहीं दिवस **नेपल्स** येथें येऊन राहिला. तेव्हां तेथील लोकांनीं त्याचा मोठा सत्कार केला. पुढें लवकरच **मार्चेस**, **उंब्रिया**, **सिसली**, **नेपल्स** येथील लोकांचीं मतं घेण्यांत आलीं व त्या चारी प्रांतांतील बहुमत **व्हिक्टर इमॅन्युअलच्या** राज्यांत सामील होण्यास अनुकूल पडल्यामुळें तीं कायदेशीर रीतीनें त्या राज्यांत सामील करण्यांत आलीं ( नोव्हेंबर १८६० ). याप्रमाणें **काव्हूरच्या** इच्छेनुसार त्याच्याच हातून इटॅलियन राष्ट्रांचें एकीकरण झालें ! इटॅलियन राष्ट्र **काव्हूरनें** आपल्या कल्पनेप्रमाणें बनविलें खरें; पण अद्याप त्यांत दोन तीन शल्यें कायम होतीं व तीं काढून टाकल्यावांचून राष्ट्रसंघटनेचें हें कार्य संपूर्ण झाल्यासारखें त्यास वाटत नव्हतें. ह्या शल्यांपैकीं पहिलें शल्य **पोपचें**. याच्या ताब्यांत **रोम** व त्याच्या आसपासचा बराच प्रदेश उरलेला होता. दुसरें शल्य **नेपल्सच्या** राजाचें. तो अद्याप **गेटा** बंदरांत **नेपोलियनच्या** आश्रयानें राहिला होता. त्यास तसेंच तेथें राहूं दिल्यास **नेपोलियनच्या** साहाय्यानें तो

फिरून केव्हां उचल करील याचा नेम नव्हता. तेव्हां प्रथम त्याचा पाडाव करण्याच्या उद्योगास काव्हूर लागला. त्यानें आपल्या सैन्याच्या-मार्फत ह्या बंदरास समुद्र व जमीन ह्या दोहोंबाजूंनीं वेढा घालून तें शहर पाडण्याचा प्रयत्न सुरू केला. तेव्हां ब्रिटिश सरकारनें नेपोलियनचें मन वळवून त्यास इत:पर इटॅलियन लोकांच्या मार्गांत नसतीं विघ्नें उपस्थित न करण्याविषयीं उपदेश केला. तेव्हां नेपोलियननें नेपल्सच्या राजाच्या संरक्षणार्थ गेटा बंदरांत ठेवलेलें आपलें आरमार परत बोलावलें; व नंतर लवकरच नेपोलियनच्या सल्ल्यावरून नेपल्सचा राजा फॅन्सीस हा एका फ्रेंच बोटींत बसून पोपच्या संस्थानांत निघून गेला. आणि अशा रीतीनें त्याचें शल्य नाहींसें होऊन गेटा बंदर व्हिक्टर इमॅन्युअलच्या स्वाधीन झालें (१३ फेब्रुवारी १८६१). लष्करीदृष्ट्या हें बंदर फार महत्त्वाचें होतें. तें हातीं आल्यामुळें काव्हूरची एक चिंता दूर झाली. तिसरें शल्य व्हेनिशिया प्रांताचें होतें. तो प्रांत अद्याप ऑस्ट्रियाच्याच ताब्यांत होता. रोम व व्हेनिशिया या दोन प्रांतांच्या प्रश्नांचा झटकन् निकाल लागण्यासारखा नसल्यामुळें त्यांचा निकाल लावण्याचें काम कालावधीवर टाकून त्यांखेरीजकरून बाकीच्या इटॅलियन राष्ट्रांची नवीन पार्लमेंट बनविण्याच्या उद्योगास तो लागला.

इटलीचा नकाशा जर काढून पाहिला तर त्याच्या पश्चिम अंगास रोम शहर असून त्याभोंवतालीं एक छोटासा प्रांत आहे. तो प्रांत[१] व उत्तरेकडे ऑस्ट्रियन सरहद्दीस लागून असलेला व्हेनिशिया ऊर्फ व्हेनिसचा प्रांत,[२] हे दोन छोटेसे भाग खेरीजकरून बाकी सर्व इटली देश आतां व्हिक्टर इमॅन्युअलच्या छत्राखालीं आला होता. व त्या सर्व राज्यास 'इटलीचें राज्य' ही संज्ञा देऊन तें राज्य व्हिक्टर इमॅन्युअलच्या अंमलाखालीं आल्याचें जाहीर करण्याकरितां सर्व इटॅलियन राष्ट्रांची पहिली पार्लमेंटसभा ता० १८ फेब्रुवारी सन १८६१ रोजीं ट्यूरिन येथें भरली. या सभेंतील सभा-

१ हा पोपच्या ताब्यांत होता. २ हा ऑस्ट्रियाच्या ताब्यांत होता.

सदांची संख्या आतां ४४३* पर्यंत वाढलेली असून त्यांत इटलींतील बहुतेक सर्व प्रख्यात पुरुषांचा समावेश झालेला होता. सभेच्या कामास सुरुवात होण्यापूर्वी प्रथम व्हिक्टर इमॅन्युअल याचें प्रास्ताविक भाषण झालें. त्यांत त्यानें आजपर्यंत घडलेल्या गोष्टींचें थोडक्यांत सिंहावलोकन करून अखेरीस इटॅलियन राष्ट्राची भव्य इमारत उभारण्याचें काम आपल्या हयातींत झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला व या कामीं ज्यांचे परिश्रम आणि मदत झाली त्यांचे त्यानें कृतज्ञतापूर्वक आभार मानले. त्यांतल्या त्यांत इंग्लंडसंबंधानें त्यानें विशेष आदराचे व कृतज्ञतेचे उद्गार काढले.+

व्हिक्टर इमॅन्युअल यास 'सार्डिनियाचा राजा' ही साधी पदवी आजपर्यंत लावण्यांत येत असे. त्याला यापुढें 'इटलीचा राजा' ही पदवी लावणें जरूर होतें. सबब तशा अर्थाचें बिल ऊर्फ कायदा सदर सभेपुढें मांडण्यांत आला. त्यांतच इटॅलियन राष्ट्रांचें एकीकरण झाल्याचा उल्लेख केलेला होता. हा कायदा सर्व प्रमुख इटॅलियन लोकांच्या इच्छेवरूनच पुढें आणलेला असल्यामुळें त्यावर कांहीं शब्दप्रयोगाचे बाबतींत थोडीशी वाटाघाट होऊन ता० १४ मार्च रोजीं तो एकमतानें सेनेट व चेंबर ह्या दोन्ही सभांत पास झाला. ता० १७ मार्च रोजीं त्यावर राजाची सही झाली व त्यास पूर्णपणें कायदेशीर स्वरूप प्राप्त झालें. व्हिक्टर इमॅन्युअलनें नोव्हेरा येथील पराभवानंतर खिन्न स्थितींत पीडमॉन्टच्या गादीचा स्वीकार केल्यास आज सुमारें १२ वर्षे होऊन गेलीं होतीं. एवढ्या अवधींत आपण संबंध

* सेनेट व चेंबर ह्या दोन्ही शाखांची मिळून ही संख्या असावीसें वाटतें.

+ "स्वातंत्र्याचें माहेरघर जें इंग्लड तेथील सरकार व लोक या दोघांनींहि Arbiter of one's fate स्वतःची उन्नति स्वतःच करून घेण्याचा हक्क मोठ्या nobly औदायानें कबूल केला आहे व आम्हांला उपयोगी पडण्यांतहि त्यांनीं औदार्य दाखविलें आहे. याबद्दलची आमची कृतज्ञताबुद्धि अव्याहत कायम राहील."

—पीट्रो ओर्सीकृत काव्हूरचें चरित्र, पृ० ३२७.

इटॅलियन राष्ट्राचे स्वामी होऊं अशी कल्पनाहि त्याच्या मनांत आली नसेल. इटॅलियन राष्ट्रांचें एकीकरण करावें अशी त्याची इच्छा व महत्त्वाकांक्षा होती. परंतु तो गादीवर आल्यावेळीं त्याच्याभोंवतीं जी निराशाजनक बिकट परिस्थिति होती तींतून पार पडून आजचा आनंदाचा दिवस आपल्याच हयातींत प्राप्त होईल अशी खात्री वाटण्यासारखी त्याच्या मनाची स्थिति खचित नव्हती. खुद्द काव्हूरलाहि हा योग इतक्या लवकर जमून येईल असें वाटत नव्हतें. परंतु त्याच्यासारख्या हुषार मुत्सद्द्याचे परिश्रम व दैवाची अनुकूलता ह्या दोहोंची जोड व्हिक्टर इमॅन्युअल यास एकसमयावच्छेदेंकरून लाभल्यामुळें त्यास आपल्या हयातींत आपली महत्त्वाकांक्षा सफळ झाल्याचा योग पहावयास मिळाला. असो; इटॅलियन राष्ट्राचें स्वतंत्र राज्य झाल्याचें पाहून ऑस्ट्रियाचा बादशहा व पोप यांस फार संताप झाला! ऑस्ट्रियन पत्रांनीं तर उपमर्दकारक भाषा वापरून आपल्या द्वेषाचे फूत्कार बाहेर टाकले. परंतु पोपच्या प्रांतांतील व व्हेनिस परगण्यांतील लोकांनीं ह्या नूतन इटॅलियन राष्ट्राचें मन:पूर्वक अभिनंदन केलें. मध्यंतरीं इंग्लंडनें हें नवीन स्थापन झालेलें राज्य मान्य केलें व त्याच्यामागून लवकरच अमेरिका आणि स्वित्झर्लंड यांनींहि तें मान्य केलें.

नवीन राज्याची स्थापना झाल्यावर सनदशीर राज्यपद्धतीच्या शिष्टाचारास अनुसरून काव्हूरनें आपल्यासह आपल्या प्रधानमंडळाचा राजीनामा दिला. व्हिक्टर इमॅन्युअल यास काव्हूरचा दर्प सहन होत नसे. म्हणून त्यानें केवळ शिष्टाचारामुळें तात्पुरता दिलेला काव्हूरचा राजीनामा कायमचा मंजूर करून बॅरन रिकाझोली यास मुख्य प्रधानाची जागा देऊं केली. परंतु त्यानें काव्हूरलाच पुन: मुख्य प्रधान करण्याविषयीं राजाला उपदेश केला. तेव्हां त्यानें काव्हूरलाच पुनः नवीन प्रधानमंडळाची रचना करण्यास सांगितलें. काव्हूरनें त्यापूर्वींच नवीन प्रधानमंडळ तयार करून ठेवलें होतें. या खेपेस आपल्याकडे त्यानें परराष्ट्रीय खातें व आरमार खातें या दोहोंचा कारभार घेतला होता. त्याच्या उद्दिष्ट कार्यांतील अत्यंत बिकट व आणीबाणीचा काल निघून गेला होता.

तसेंच कृतकार्यामुळें सर्व युरोपखंडांत मुत्सद्दी या नात्यानें त्याची इभ्रत व महत्त्व हीं फार वाढलीं होतीं. त्याच्या कार्यकर्तृत्वावर त्याच्या देशबंधूंचा अपरिमित विश्वास बसला होता; व त्याला स्वतःलाहि स्वतःच्या बौद्धिक सामर्थ्यासंबंधीं पूर्वीपेक्षां आतां जास्त विश्वास वाटूं लागला होता. अशा स्थितींत व्हेनिशिया व रोम ह्या प्रश्नांचा निकाल तो सहज लावील अशी त्याच्या देशबांधवांची समजूत बनली होती व खुद्द त्यालाहि तसें वाटत होतें. कोसुथ नामक हंगेरियन देशभक्ताजवळ बोलतांना तो एकदां असें म्हणाला कीं, ' आमच्या व राजाच्या इच्छेप्रमाणें जर परमेश्वराची इच्छा असेल तर पुढील हिवाळ्यांत—निदान एक वर्षाच्या आंत—खास व्हेनिशिया आमचे ताब्यांत येऊन हंगेरी स्वतंत्र होईल.' हें संभाषण झाल्यानंतर लवकरच, व्हेनिशियन लोकांकडे आपलें लक्ष आहे हें दर्शविण्याकरितां व्हेनिशियन देशभक्त डॅनियल मानिन याच्या स्मारकाप्रीत्यर्थ टयूरिन येथें झालेल्या समारंभास तो हजर राहिला. तसेंच ह्या प्रांताची ऑस्ट्रियाच्या कचाटींतून सुटका करण्याकरितां त्यानें प्रशियाच्या बादशहाशींहि कांहीं कारस्थान सुरू केलें होतें. रोमन प्रश्नाचा निकाल लावण्याचें काम तर त्यानें ह्याहूनहि विशेष धिटाईनें सुरू केलें. परंतु दुर्दैवानें त्याचा ह्याच वर्षांत अंत झाल्यामुळें ह्या प्रश्नांचा अखेर निकाल त्याच्या हातून होऊं शकला नाहीं !

---

# प्रकरण १५ वें

## काव्हूरचें अखेरचें धाडस व अंत !

रोमचा प्रश्न जरी बिकट असला तरी तो सोडविल्यावांचून इटॅलियन राष्ट्राच्या संघटनेस स्थैर्य प्राप्त होण्याजोगें नव्हतें. दक्षिण इटलींतील संस्थानें व्हिक्टर इमॅन्युअलच्या ताब्यांत येण्यापूर्वींच त्यानें ट्यूरिन येथील पार्लमेंटपुढें रोम संपादन करण्याची आवश्यकता स्पष्ट शब्दांनीं व्यक्त केली होती व इटॅलियन राष्ट्राच्या पहिल्या पार्लमेंटनेंहि ह्याच गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावें म्हणून त्यानें, रोम शहर इटॅलियन राष्ट्राची भावी राजधानी करण्याचा ठराव त्या सभेच्या चेंबरपुढें मांडला. ह्या ठरावावर त्यानें केलेलें भाषण देशांत अतिप्रख्यात होऊन बसलें आहे. काव्हूर हा कांहीं श्रोतृवृंदाची कल्पनाशक्ति प्रज्वलित करून त्यांच्याकडून टाळ्या मिळविणारा वक्ता नव्हता. त्याचीं भाषणें नेहमीं विचारपरिप्लुत, उदात्त व गंभीर आणि तर्कशास्त्राच्या पद्धतीस अनुसरून होत असत. यामुळें विचारी लोकांच्या मनावर त्यांचा एकंदरींत फार विलक्षण परिणाम होऊन त्यांचीं मनें त्याच्या बाजूकडे सहज झुकत असत. त्याची भाषासरणी अलंकारिक नसे; परंतु आत्मप्रत्यय व आत्मविश्वास यांच्या जोमानें मुसमुसलेली असे. प्रत्येक मुद्द्याचें विवेचन कार्यकारणपरंपरेस अनुसरून अगदीं व्यवस्थित रीतीनें केलेलें असे. त्यामुळें त्याच्या भाषणांचा होणारा परिणाम क्षणिक नसून दीर्घकाल टिकणारा असे. आपल्या ह्या पद्धतीस अनुसरून त्यानें, ‘ रोम शहर इटलीची राजधानी केल्यावांचून इटॅलियन राष्ट्राचें ऐक्य स्थैर्य पावणार नाहीं ’ असें पार्लमेंटच्या नजरेस आणून दिलें. व्यक्तिदृष्ट्या ट्यूरिन ( स्वतःची जन्मभूमि ) सोडून रोमला येणें त्यास पसंत वाटत नव्हतें; परंतु ‘ रोम ’ ह्या दोन अक्षरी शब्दामध्यें २५००

[stamp]

वर्षांचा जो देदिप्यमान इतिहास होता त्याचा. इटॅलियन राष्ट्राशी अत्यंत निकट संबंध असल्यामुळें नैतिक व राजकीयदृष्ट्या तेंच शहर त्या राष्ट्राची राजधानी होणें त्यास जरूर वाटत होतें. ' रोम ' ह्या शब्दामध्यें भरलेली जादू अथवा तत्संबंधीं इटॅलियन लोकांची किंबहुना सर्व जगाची बनलेली विशिष्ट मनोभावना हा जणु काय इटॅलियन राष्ट्राचा प्राण होता. अर्थात् रोमवांचून इटॅलियन राष्ट्र हें निर्जीव वस्तूप्रमाणें असल्यामुळें तें सजीव करून त्यास कायमचें स्थैर्य प्राप्त करून देण्याकरितां रोम शहर त्याची राजधानी करणें अत्यंत जरूरीचें आहे असें त्यानें पार्लमेंटच्या लक्षांत आणून दिलें. रोम हस्तगत करून घ्यावयाचें म्हणजे त्याजवरील पोपची सत्ता नष्ट करणें जरूर होतें व ती नष्ट करण्याचा त्याचा विचार फार दिवसांचा होता. धर्मसत्ता व राजसत्ता ह्या परस्परांपासून अलग असाव्यात असें त्याचें म्हणणें असे. धर्माच्या बाबतींत लोकांना स्वातंत्र्य दिल्यास धर्माचें कार्य अधिक चांगलें चालेल अशी त्याची समजूत होती व या सर्व बाबींचा स्पष्ट खुलासा त्यानें आपल्या या वेळच्या भाषणांतून केलेला आहे. अखेर रोम शहर राजधानी करण्यासंबंधींच्या त्याच्या ठरावावर बराच वादविवाद होऊन ता० २७ मार्च १८६१ रोजीं पार्लमेंटच्या चेंबरनें तो बहुतेक एकमतानें पास केला.

पार्लमेंटपुढें वरील ठराव मांडण्याच्या पूर्वींच त्यानें ह्या प्रश्नाचा निकाल लावण्याकरितां पोप व नेपोलियन यांच्याशीं गुप्तरीतीनें मसलती चाल चालविल्या होत्या व त्यांत अखेर आपण यश मिळवूं अशी त्यास खात्री वाटत होती. परंतु भवितव्यता निराळी असल्यामुळें हें यश संपादन करण्याचा योग त्यास लाभला नाहीं. असो; याच सुमारास त्याच्या मनाला त्रस्त करून टाकणारी एक गोष्ट पार्लमेंटपुढें विचारासाठीं आलेली होती. गॅरिबाल्डीच्या ज्या स्वयंसैनिकांनीं इटॅलियन राष्ट्राची संघटना करण्याप्रीत्यर्थ आपलें रक्त खर्चीं घातलें होतें, त्यांची योग्य प्रकारें संभावना करून त्यांपैकीं शक्य तितक्या लोकांस सरकारी लष्करांत जागा देण्यासंबंधीं वाटाघाट चालू होती. या

बाबतींत काव्हूरच्या मनांतून फार उदारपणाचें वर्तन करावयाचें होतें. परंतु त्याचे लष्करी सल्लागार ह्या स्वयंसैनिकांस लष्करांत घेण्यास कबूल नव्हते. यामुळें ह्या प्रश्नावर प्रधानमंडळांत तीव्र मतभेद उत्पन्न झाला होता. तथापि त्याची परिस्फुटता होऊं देणें राजकीयदृष्ट्या काव्हूरला इष्ट वाटत नव्हतें, सबब तो आपल्या विरोधी मित्रांचें खासगी रीतीनें मन वळविण्याचा शक्य तो प्रयत्न करीत होता. इतक्यांत प्रधान-मंडळाच्या धोरणामुळें असंतुष्ट झालेल्या कांहीं स्वयंसैनिकांनीं गॅरिबाल्डी-जवळ तक्रार करून त्याचें मन काव्हूरविषयीं जास्त कलुषित केलें. तेव्हां गॅरिबाल्डी संतापून ट्यूरिन येथें आला व त्यानें पार्लमेंटच्या चेंबरपुढें येऊन काव्हूरचा व त्याच्या प्रधानमंडळाच्या धोरणाचा भरसभेंत तीव्र शब्दांनीं निषेध केला. "काव्हूर हा देशांत यादवी माजविण्याचा प्रयत्न करीत आहे" असेहि उद्गार त्यानें काढले. व्यक्तिविषयक निंदा काव्हूरनें शांतपणें सहन केली. परंतु त्याजवर देशांत यादवी माजविण्याचा आरोप जेव्हां करण्यांत आला तेव्हां त्याच्यानें गप्प बसवेना. कारण, तोहि कांहीं कमी तापट नव्हता. तो तत्काळ या आरोपाबद्दल निषेध व्यक्त करण्यास उभा राहिला. त्या वेळीं सर्व सभासदांचीं मनें अगदीं गोंधळून गेलीं. ह्या दोन थोर देशभक्तांमध्यें लठ्ठालठ्ठी सुरू होते कीं काय अशी त्यांस भीति वाटली. परंतु गॅरिबाल्डीशीं अखेरचा प्रसंग आणल्यास त्याचा परिणाम इट-लीस अपायकारक होईल हें काव्हूर पूर्णपणें जाणत असल्यामुळें तो फक्त त्यानें केलेल्या सदर आरोपाचा निषेध करून शांतपणें खालीं बसला. काव्हूरचा स्वभाव जरी तापट होता तरी तो मुत्सद्दी अस-ल्यामुळें त्याला आपला क्रोध आवरून धरण्याची कला बरीच साध्य झालेली होती. यामुळें त्यानें या वेळीं पूर्ण सहनशीलपणा दाखवून गॅरिबाल्डीस हवें तसें बोलूं दिलें. गॅरिबाल्डीचें भाषण संपल्यावर मोठ्या शांत व गंभीर मुद्रेनें त्यानें त्यास उत्तर दिलें. प्रारंभीं चेंबरच्या सभासदांस अनुलक्षून तो म्हणाला:—"एका विशिष्ट कृत्यामुळें गॅरि-बाल्डी व मी यांच्यामध्यें तेढ उत्पन्न झाल्याचें मला माहित आहे.

परंतु ज्या गोष्टीवरून ही तेढ उत्पन्न झाली आहे ती गोष्ट—म्हणजे **सॅव्हॉय** व **नीस** प्रांत फ्रान्सला देण्याची राजास व पार्लमेंटसभेस सल्ला देणें—एक अत्यंत खेदजनक कर्तव्य म्हणून मीं केली. त्यापासून मला स्वत:ला जें दु:ख झालें त्यावरून **गॅरिबाल्डीला** तत्संबंधीं होत असलेल्या दु:खाची कल्पना मला करितां येते; त्याबद्दल जर त्यानें मला क्षमा करण्याचें नाकारिलें तर मी त्यास दोष देणार नाहीं." अशी प्रस्तावना करून पुढें त्यानें **गॅरिबाल्डीच्या** टीकेचें समर्पक खंडण केलें.

**गॅरिबाल्डी** व **काव्हूर** यांच्यामध्यें उत्पन्न झालेली ही तेढ पाहून **व्हिक्टर इमॅन्युअल** यास फार वाईट वाटत होतें. म्हणून ती दूर करण्याकरितां ह्या दोघांहि थोर माणसांस आपल्या राजवाड्यांत बोलावून त्यानें त्यांची मुलाखत घडवून आणली. ह्या मुलाखतींत **काव्हूरनें** **ऑस्ट्रिया** व **फ्रान्स** यांच्याशीं ठेवलेल्या व ठेवावयाच्या राजकीय धोरणाचा खुलासा **गॅरिबाल्डीजवळ** खुल्या दिलानें केला. व **गॅरिबाल्डीस** तो पटून त्यानें त्याचा कार्यक्रम पसंत केला. अशा रीतीनें **व्हिक्टर इमॅन्युअलच्या** प्रयत्नास यश येऊन ह्या दोन प्रख्यात व कर्त्या देशभक्तांच्या मनांतील परस्पर गैरसमज दूर झाला. ही मुलाखत झाल्यावर थोड्याच दिवसांनीं **गॅरिबाल्डीनें** **काव्हूरला** पुढील आशयाचें पत्र लिहिलें ( मे १८, सन १८६१ ):—

> **व्हिक्टर इमॅन्युअल** हा **इटलीचा** बाहु व तुम्ही **इटलीचें** डोकें व्हावें. तुमच्या अंगच्या श्रेष्ठ सामर्थ्यावर व देशाचें हित साधण्याच्या तुमच्या दृढ इच्छेवर भरंवसा ठेवून मला पुन: रणांगणावर केव्हां बोलावण्यांत येतें याची मी वाट पहात राहीन.

याप्रमाणें **काव्हूर** व **गॅरिबाल्डी** यांची दिलजमाई झाली खरी. परंतु तिचा देशहितार्थ फायदा करून घेण्यास **काव्हूर** फार दिवस जगला नाहीं. इटॅलियन राष्ट्राची संघटना करून त्याचें एकछत्री राज्य बनविण्याकरितां गेल्या बारा वर्षांत त्यानें जी जिवापाड मेहनत केली तिचा त्याच्या शरीरप्रकृतीवर अनिष्ट परिणाम घडल्याचीं चिन्हें स्पष्टपणें त्याच्या चेहऱ्यावर दिसूं लागलीं होतीं. तथापि त्यास आपण इत-

त्यांतच मरूं असें वाटत नव्हतें. त्यानें हातीं घेतलेलें काम, रोम शहर इटलीची राजधानी झाल्यावर संपूर्ण होणारें होतें व तें कार्य आपल्या हातून होईल—तितकें आयुष्य आपणांस लाभेल—असें त्यास वाटत होतें. तथापि त्याची प्रकृति दिवसानुदिवस जास्त खालावत चालली. त्याला व्यायाम अथवा करमणूक करून घेण्याची संवय नव्हती. तसेंच मनाला क्षणभर रमविणाऱ्या वाङ्मयाचीहि त्यास फारशी अभिरुचि नव्हती. यामुळें त्याचें सर्व लक्ष केवळ एका इटॅलियन कार्याकडेच नेहमीं वेधलेलें असे. अहोरात्र त्याच्या डोक्यांत त्या कार्यासंबंधींचे विचार घोळत असत व तें सिद्धीस नेण्याकरितां तो काया-वाचा-मनेंकरून सारखा उद्योग करीत असे. त्याच्या मनाला स्वस्थता कधींहि मिळाली नाहीं. त्याचा स्वभाव अंमळ तापट असल्यामुळें त्याला प्रत्येक गोष्ट पटापट करून टाकण्याची संवय लागली होती. यामुळें त्याच्या मानसिक शक्तीला फार ताण पडत असे. अतिशय काम पडल्यामुळें त्याच्या मेंदूला विशेष त्रास होऊन पुढें पुढें त्याला रात्रीं गाढ झोंप येईनाशी झाली होती. तो झोंपी गेला असतांहि त्याच्या डोक्यांत कित्येक विचारांचें परिभ्रमण सारखें चालू असे. ह्या स्थितीपासून आपली सुटका व्हावी म्हणून त्यानें झोंप येईनाशी झाली कीं कांहीं वेळ उठून आपल्या खोलींत फिरत असावें, व कांहीं काळानें फिरून निजण्याचा प्रयत्न करावा. परंतु या तोडग्याचा फारसा उपयोग होत नसे. क्षणभर डोळा लागतो न लागतो तोंच फिरून त्याच्या डोक्यांत विचारांचें काहूर सुरू होई. आपल्या डोक्याची स्थिति बरोबर नाहीं हें तो जाणत होता; व त्यानें 'माझें डोकें आतां माझ्या ताब्यांत राहिनासें झालें आहे' अशा प्रकारचे उद्गारहि आपला मित्र कॅस्टेली याच्याजवळ काढले. परंतु त्यानें विश्रांति घेतली नाहीं. किंबहुना ती घेण्यास त्यास सवडच नव्हती असें म्हटलें तरी चालेल. दक्षिण इटलींतील संस्थानें त्याच्या सत्तेखालीं आल्यावर त्याचा व्याप फार वाढला होता व रोज कांहींना कांहीं तरी नवीन प्रश्न उत्पन्न होऊन त्याचें मन व्यग्र होत होतें. अर्थात् अशा वेळीं विश्रांति घेण्याची

कल्पना त्यास कशी रुचणार ? पार्लमेंटच्या बैठकी सुरू असतां तो कधींहि गैरहजर रहात नसे; तसेंच महत्त्वाचीं कामें तो आपल्या हस्तकांकडे ( Subordinates कडे ) केव्हांहि सोंपवित नसे. झोंपेच्या अभावीं त्याच्या मेंदूला विलक्षण ताण पडत असतांहि त्यानें त्या स्थितींत सुमारें चार महिने तसेच रेटून काढले. पण पुढें—मे महिन्याच्या उत्त-रार्धांत—त्याच्या स्वभावांत व वर्तनांत फरक पडूं लागला. त्याच्या चेहऱ्यावर क्षीणतेची छाया पूर्वींच पडलेली होती. आतां त्याची वृत्ति चिरडखोर व उतावळी बनली. त्याला विरुद्ध पक्षाची टीका सहन होइनाशी झाली. पार्लमेंटांतील वादविवादानें त्याचें डोकें फिरूं लागलें. अखेर एके दिवशीं सदर सभेंतील आपल्या स्थानावर बसला असतां तो म्हणाला कीं, ' इटॅलियन राष्ट्र बनविण्याचें कार्य पूर्ण झाल्यावर देशांतील अलंकारशास्त्राच्या अध्यापकांच्या सर्व जागा नाहींशा करणारें बिल ऊर्फ कायदा आपण पार्लमेंटपुढें आणणार आहों.' हे उद्गार त्यानें ज्या दिवशीं काढले त्याच दिवशीं ( २९ मे ) संध्याकाळीं त्याला जोराचा ताप आला. त्याचा स्वतःचा वैद्य तेथें हजर नसल्यामुळें दुसरा एक डाक्टर बोलावण्यांत आला व त्यास काव्हूरनें विवक्षित प्रकारें आप-णास औषधोपचार करण्यास सांगितलें. त्यावरून सुमारें चार दिवसांत पांच वेळ त्याच्या अंगांतून रक्त काढण्यांत आलें. तेव्हां त्यास अंमळ बरें वाटलें. म्हणून त्यानें सरकारी कामकाज पहाण्याची इच्छा प्रदर्शित केली व आपल्या बिछान्याभोंवतीं आपलें कौन्सिल बोलाविलें. कौन्सि-लच्या सभासदांसहि त्याची प्रकृति बरीशी दिसली म्हणून त्यांनींहि त्यास अडथळा केला नाहीं. कित्येक तासपर्यंत त्यांच्याशीं कामकाज व संभाषण केल्यामुळें काव्हूरला पुनः शीण आला व दुसरे दिवशीं त्यास पहिल्यापेक्षांहि अधिक जोराचा ताप आला. नंतर एकदोन दिवसांत त्याची प्रकृति फारच बिघडली. त्यास मधूनमधून वायूची लहर येऊं लागली. त्या लहरींत तो एकदम ' राजाला कळवा ' असें ओर-डला. त्याच्याजवळ येणाऱ्या लोकांस तो प्रथम ओळखी; पण पुढें ती ओळख मंदावत असे. त्याच्या अत्यवस्थपणाची ही बातमी ताब-

डतोब सर्व शहरांत पसरली. त्याबरोबर लोकांचे थवेच्या थवे खिन्न व उदास मुद्रेनें त्याच्या राजवाड्यासभोंवतीं व आसपास जमा होऊन त्याच्या प्रकृतीची बातमी ऐकण्यास उत्सुक होऊन राहिले होते. त्याची स्थिति कठिण आहे असें दिसून येतांच त्याच्या कुटुंबांतील माणसांनीं त्यास अखेरचे धर्मसंस्कार करण्याकरितां **फ्रा गायकोमो**नामक धर्मोपदेशकास बोलावून आणलें. त्याच दिवशीं संध्याकाळीं (जून ५) **व्हिक्टर इमॅन्युअल** हाहि त्याची अखेरची भेट घेण्याकरितां त्याच्या बिछान्याजवळ आला. त्याला ओळखून "O Maesta!" (धनीसाहेब) असें **काव्हूर** ओरडला. परंतु पुढें त्याची ओळख तो विसरत गेला. राजा त्याच्याशीं चार समाधानाचे शब्द बोलत होता. परंतु मध्येंच एकदम त्यास थांबवून तो म्हणाला, 'हें **नेपोलियन**चें सैन्य येथून घालवून दिलें पाहिजे.'* इतकें म्हणून त्यानें दुसऱ्या दिवशीं सकाळीं पांच वाजतां आपल्या सेक्रेटरीनें आपल्याजवळ कामकाज करण्यास हजर असावें असा हुकूम केला, व म्हणाला, 'वेळ गमावून सोय नाहीं.' याप्रमाणें तो सारखा बरळत होता. त्यानें आपल्या आयुष्यांत ज्या ज्या गोष्टी केल्या व ज्या पुढें करण्याचें त्याच्या मनांत घोळत होतें त्यासंबंधींच त्याचें बरळणें चाललें होतें. दुसऱ्या दिवशीं पहाटेस (ता० ६ जून १८६१) तो जणूं काय पार्लमेंटसभेंत आपण प्रधान या नात्यानें भाषण करीत आहों अशा कल्पनेनें बरळत असतां एकाएकीं बेशुद्ध होऊन त्याची वाचा बंद झाली व पुढें सुमारें दोन तासांनीं त्याचें प्राणोत्क्रमण झालें! **व्हिक्टर इमॅन्युअल**च्या मनांतून **काव्हूर**चा दफनविधि आपल्या राजघराण्यांतील पुरुष जेथें पुरतात त्या ठिकाणीं करावा असें होतें. परंतु **काव्हूर**नें आपल्या अस्थि आपल्या घराण्यांतील पुरुष ज्या ठिकाणीं

---

* इ. स. १८४८ च्या क्रांतिकारक चळवळीनंतर **नेपोलियन**चें बरेंच सैन्य **रोम** शहरांत **पोप**च्या रक्षणार्थ येऊन राहिलें होतें. तें काढून नेण्याबद्दल **काव्हूर**नें त्याच्याशीं बोलणें सुरू केलें होतें त्यास अनुसरून वरील उद्गार होते.

पुरतात त्या ठिकाणीं ( सँटेना गांवीं ) पुरण्याची इच्छा दर्शविली होती. तीं राजास कळल्यावरून त्यानें काव्हूरच्याच इच्छेस मान दिला.

काव्हूरच्या अकालीं मृत्यूनें इटॅलियन राष्ट्राची फार मोठी हानि झाली. त्यानें योजलेलें कार्य जरी बहुतेक पुरें होत आलें होतें तरी अद्याप रोम व व्हेनिस हे दोन प्रांत स्वराज्याबाहेर असल्यामुळें त्याची अगदीं पूर्तता झालेली नव्हती. ती पूर्तता करण्यास तो जगता तर मोठी बहार झाली असती. त्याच्या मृत्यूनंतर त्याचें राहिलेलें कार्य त्याच्या देशबांधवांनीं परिपूर्ण केलें. पण तसें करण्यास त्यांस आणखी दहा वर्षे लागलीं ! तो जिवंत असता, तर त्यानें तें कार्य अधिक लवकर व विशेष कुशलतेनें केलें असतें हें सांगावयास नकोच. सुमारें एक वर्षाच्या आंत व्हेनिस स्वराज्यास जोडण्याची त्याची हिंमत होती व तसें त्यानें बोलून दाखविल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. तसेंच रोमचा प्रश्नहि त्यानें अनेक डावपेंच लढवून लवकर सोडविला असता, व त्याच्या मागून येणाऱ्या प्रधानमंडळानें कांहीं दिवस फ्लॉरेन्स शहरांत इटलीची राजधानी नेली तसें न करितां तो एकदम रोममध्यें शिरला असता, असा त्याच्या चारित्राचें परिशीलन करणारांचा अभिप्राय आहे. तें कसेंहि असो; मुत्सद्दी व कर्ता पुरुष ह्या नात्यानें काव्हूरची योग्यता तत्कालीन सर्व मुत्सद्द्यांपेक्षां विशेष थोर होती यांत शंका नाहीं. त्याच्या शत्रुपक्षांकडील वृद्ध व अनुभविक मुत्सद्दी प्रिन्स मेटर्निच ( ऑस्ट्रियन प्रधान ) यानें तर त्या वेळीं युरोपखंडांत त्याच्या बरोबरीचा दुसरा मुत्सद्दी नसल्याचें एकवार बोलून दाखविलें होतें. तसेंच त्याच्या मृत्यूनंतर इंग्लिश पार्लमेंटमध्यें त्याच्याविषयीं बोलतांना इंग्लंडचा प्रधान लॉर्ड पामर्स्टन यानेंहि त्याच्या अंगच्या गुणांचें एक स्तोत्र गाइलें. शीलदृष्ट्याहि काव्हूरची योग्यता फार मोठी होती. त्याच्या हातीं अपरंपार सत्ता होती. परंतु तिचा त्यानें कधींहि दुरुपयोग केला नाहीं इतकेंच नव्हे, तर आत्मप्रशंसा अथवा प्रौढी वाढविण्याकडेहि तिचा त्यानें उपयोग केला नाहीं. त्याचा देशाभिमान व कर्तव्यनिष्ठा हीं अत्यन्त शुद्ध व उज्ज्वल होतीं. त्यांत

स्वार्थपर मनोवृत्तीचा लेशहि नव्हता. जें जें काय त्यानें केलें तें सर्व शुद्ध हेतूनें इटॅलियन कार्याच्या सिद्धीकडे दृष्टि ठेवून केलें. शिवाय त्यानें ज्या विपरीत परिस्थितींत इटॅलियन राष्ट्राची भव्य इमारत उभी केली त्या परिस्थितीचा विचार केल्यास त्यानें केलेलें कृत्य अद्भुत अथवा अतिमानुष कोटींत गणण्यासारखें होतें यांत शंका नाहीं. आणखी त्यानें ही गोष्ट एकतंत्री अधिकाराच्या–अंमलाच्या–जोरावर घडवून न आणतां लोकस्वातंत्र्याचें तत्त्व शाबूत ठेवून त्याच्या साहाय्यानें लोकांचीं मनें वळवून त्यांच्या संतोषयुक्त संमतीनें घडवून आणली, हें लक्षांत घेतल्यास त्याच्या कृतीस जवळजवळ दैवी स्वरूप प्राप्त होतें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. निरनिराळ्या विषम परंतु जोमदार शक्तींचें आपल्या विशिष्ट ध्येयाच्या सिद्धीकरितां एकीकरण करून त्यांच्याकडून मनाप्रमाणें कार्य करून घेण्याची कला त्यास उत्तम प्रकारें साधली असल्यामुळेंच त्याच्या हातून इतक्या प्रतिकूल परिस्थितींत व साधनें फार थोडीं असूनहि वरील कार्य केवळ बारा वर्षांच्या अवधींत सिद्ध झालें. काव्हूरचें हें उदाहरण पाहून पुढें प्रशियाचा प्रधान बिस्मार्क यानेंहि जर्मन राष्ट्रांचें असेंच एकीकरण केलें. अशा रीतीनें त्याचें उदाहरण मागें दुसऱ्यांस आदर्शभूत झालेलें आहे व पुढेंहि होण्याजोगें आहे. असले पुरुष कोणत्याहि राष्ट्रांत जरी जन्मले तरी सर्व जगाला ते वंद्य होऊन राहतात; व जगांतील प्रत्येक राष्ट्र ऊर्फ मानवसमाज त्यांकडे सदैव सादर दृष्टीनें पहात असतो.

# प्रकरण १६ वें

## उपसंहार

काव्हूरचें वैय्यक्तिक चरित्र मागील प्रकरणांत संपलें; परंतु त्याच्या चरित्राचें जें सार्वजनिक अंग त्याची पूर्तता त्यांत झाली नसल्यामुळें हें सोळावें प्रकरण लिहून त्यांत ती पूर्तता करण्याचें योजलें आहे. इटॅलियन राष्ट्रांचें स्वतंत्र एकराष्ट्र बनवून तेथें लोकनियंत्रित अशा एकाच राजसत्तेची स्थापना करावयाची हें काव्हूरच्या आयुष्यक्रमांतील मुख्य कार्य होतें व तें त्यानें बहुतेक पुरें करीत आणलें होतें. त्याच्या मरणसमयीं व्हेनिशिया व रोम हे दोनच इटॅलियन प्रांत निराळ्या राजसत्तेखालीं होते. रोम हें इटलीची राजधानी करण्याचा ठराव त्यानें जिवंत असतांनाच ट्यूरिनच्या ( अर्थात् इटलीच्या ) पार्लमेंटमध्यें पास करून पुढील कार्याची दिशा आंखून ठेविली होती. अर्थात् त्याच्या पश्चात् त्याच्या जागेवर येणाऱ्या मुत्सद्दी लोकांस हें कार्य पुरें केल्यावांचून गत्यंतर नव्हतें. परंतु त्याच्या मागून त्याच्या जागीं येणाऱ्या दोनतीन प्रधानांच्या अंगीं त्याच्याइतकें शहाणपण व कर्तृत्व-शक्ति नसल्यामुळें आणि त्यांचा बहुतेक वेळ संपादन केलेल्या मुलखांत अबादानी व स्वस्थता उत्पन्न करण्यांत गेल्यामुळें त्यांच्या हातून सदर कार्याची पूर्तता झाली नाहीं. तथापि रिकाझोली व मिंघेति नामक प्रधानांनीं त्या कार्याची प्रगति व्हावी म्हणून आपापल्या कारकीर्दींत थोडीबहुत खटपट केली. रॅटेझीच्या हातून मात्र या बाबतींत समाधान-कारक प्रयत्न झाले नाहींत. त्यामुळें गॅरिबाल्डीला संताप येऊन त्यानें स्वत: आपले स्वयंसैनिक बरोबर घेऊन रोमवर स्वारी केली; परंतु त्याच्या ह्या कृत्यामुळें फ्रान्सचा बादशहा तिसरा नेपोलियन यास राग आला व त्यानें, "गॅरिबाल्डीला आंवरून धरा, नाहीं तर युद्ध सुरू करीन" अशा अर्थाची इटॅलियन सरकारास धमकी दिली. तेव्हां गॅरिबाल्डीस प्रतिबंध करण्याकरितां रॅटेझीला त्यावर सैन्य पाठवावें

लागलें. त्याच्या सैन्यानें गॅरिबाल्डीच्या स्वयंसैनिकांवर गोळीबार सुरू करितांच आपापसांतलें हें युद्ध बंद करण्याकरितां गॅरिबाल्डी उभय दळांच्यामध्यें शिरला, तेव्हां चुकून त्यास दोन गोळ्या लागून तो जखमी झाला. तो जखमी झाल्यावर त्यास एका किल्ल्यांत नेऊन ठेवण्यांत आलें व त्याचे सेनापति व शिपाई यांस लढाईचे कैदी म्हणून धरून अडकवून ठेवण्यांत आलें. पण पुढें एकदोन महिन्यांनीं व्हिक्टर् इमॅन्युअलच्या मुलीचें लग्न उभें राहिलें तेव्हां त्या संधीचा फायदा घेऊन इटॅलियन सरकारनें ह्या सर्व देशभक्तांस माफी देऊन बंधमुक्त केलें. या सुमारास माझिनीनें व्हेनिशिया प्रांत स्वतंत्र करण्याकरितां तेथें बंडें उपस्थित केलीं. परंतु त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. गॅरिबाल्डीच्या मनांतहि व्हेनिशिया प्रांत स्वतंत्र करण्याचें येऊन त्या बाबतींत इंग्लंडची मदत मिळविण्याकरितां तो इंग्लंडला गेला ( मार्च इ० स० १८६४ ). तेथें त्याचें अश्रुतपूर्व स्वागत करण्यांत आलें. परंतु फ्रान्स व इंग्लंड यांच्या विशिष्ट राजकीय संबंधामुळें त्याचा हेतु सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां तो निराश होऊन परत आला. मध्यंतरीं इटॅलियन प्रधान मिंघेति यानें रोममध्यें असलेलें फ्रेंच सैन्य काढून नेण्याबद्दल बोलणें सुरू केलें. इटलीची राजधानी फ्लॉरेन्स शहर करून पोपच्या प्रांतास धक्का न लावण्याची शर्त घालून नेपोलियननें तें कबूल केलें. उभयपक्षीं त्याप्रमाणें करार झाल्यावर इ० स० १८६५ त फ्लॉरेन्स येथें इटॅलियन सरकारचें ठाणें नेण्यांत आलें व नेपोलियननेंहि रोम शहरांतून आपलें सैन्य परत नेण्यास सुरवात केली. इ० स० १८६२ त जर्मनीमध्यें बिस्मार्कची कारकीर्द सुरू झाली होती. फ्रान्स व ऑस्ट्रिया हीं दोन्हीं राष्ट्रें इटलीप्रमाणेंच जर्मनीचीं शत्रू होतीं. जर्मनीशीं सख्य करण्याचें कारस्थान काव्हूर जिवंत असतांना त्यानें सुरू केलेलें होतेंच. त्याच धोरणानें इ० स० १८६६ त जर्मनीबरोबर इटॅलियन राष्ट्राचा तुल्यारिमित्रत्वाचा तह झाला. पुढें लागलीच जर्मनी व ऑस्ट्रिया यांच्या दरम्यान युद्ध सुरू झालें. त्यांत जर्मनीच्या वतीनें इटलीस युद्ध करावें लागलें. ह्या युद्धांत इटलीस फारसे जय मिळाले नाहींत; तथापि

युद्धाच्या अखेरीस व्हेनिशिया प्रांत त्यास मिळाला. ता० ७ नोव्हेंबर स० १८६६ रोजीं व्हेनिस शहरांत व्हिक्टर इमॅन्युअल यानें सरकारी रीतीनें प्रवेश केला, तेव्हां लोकांनीं त्याचें फार थाटानें स्वागत करून आपला आनंद व्यक्त केला. या वेळेपर्यंत नेपोलियननें आपलें सर्व सैन्य रोममधून नेलें होतें. इटॅलियन प्रधानमंडळाचा रॅटेझी हा पुनः मुख्य सूत्रधार बनला होता. गॅरिबाल्डीवर मागें सैन्य पाठविल्यामुळें त्याजवर त्या वेळीं लोकपक्षाकडून टीकेचा भयंकर भडिमार झालेला होता. अशा स्थितींत फिरून तो आपल्या वाटेस जाणार नाहीं अशा कल्पनेनें गॅरिबाल्डीनें पुनः एकवार रोमवर हल्ला केला. तें पाहून नेपोलियननें इटॅलियन सरकारास पुनः युद्धाची धमकी दिली. तेव्हां रॅटेझीनें गॅरिबाल्डीस पकडून कॅप्रेरा बेटांत नजरकैदेंत ठेवलें. तथापि त्याच्या पश्चात् त्याच्या स्वयंसैनिकांनीं रोमच्या हद्दींत शिरून दांडगाई सुरू केली. खुद्द रोम शहरांत एक बंड त्यांनीं करविलें. परंतु तें क्रूरपणें मोडून टाकण्यांत आलें. ह्या बंडास मदत करण्याकरितां गॅरिबाल्डीचे सुमारें ७० लोक टैबर नदीजवळ आले होते. त्यांस पोपच्या सैन्यानें कापून काढलें! इतक्यांत गॅरिबाल्डीहि नजरकैदेंतून निसटून रोमन प्रांतांत आला व त्यानें एके ठिकाणीं पोपच्या सैन्याचा पूर्ण पराभव केला; परंतु पुढें त्याच्या मदतीस फ्रेंच सैन्य आल्यामुळें गॅरिबाल्डीस परत माघार घ्यावी लागली. याप्रमाणें त्याचा रोमवरील दुसरा हल्ला फुकट गेला (स० १८६७); तथापि आतां रोम काबीज करण्याची इटॅलियन लोकांची उत्सुकता फार वाढली व तें शहर काय पाहिजे तें करून मिळविलेंच पाहिजे असें त्यांस वाटूं लागलें. या सुमारास काव्हूरच्या धोरणाचें रहस्य ज्यास अभ्यासानें चांगलें कळलें होतें व जो शीलानें तत्कालीन सर्व इटॅलियन मुत्सद्द्यांत श्रेष्ठ होता, अशा गियोव्हानी लांझा नामक हुषार, तरुण व कर्त्या पुरुषाचे हातीं इटलीचीं राज्यसूत्रें आलीं (स० १८६९). तो मुख्य प्रधान होतांच फ्रान्स व प्रशिया ऊर्फ जर्मनी यांच्यामध्यें लढाई उद्भवण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. या संधीचा फायदा घेऊन रोमचें कारस्थान पूर्ण करा-

वयाचें असा त्यानें विचार केला व नेपोलियननें जेव्हां त्याजपाशीं गोडीचें बोलणें सुरू केलें तेव्हां त्यास त्यानें रोम शहरांत १८६७ सालीं आणलेलें सैन्य परत नेण्यास सांगितलें. नेपोलियननें त्या वेळीं तसें करण्याचें नाकारिलें. परंतु पुढें फ्रँको-जर्मन युद्धांत त्याचे पराभव सुरू होतांच त्यानें सहजच रोममधून आपलें सैन्य काढून नेलें. सेडन येथें नेपोलियनचा पूर्ण पराभव झाल्यावर व्हिक्टर इमॅन्युअलनें पोपला सामोपचाराचें पत्र लिहून रोमवरील मुलकी सत्ता सोडून देण्याची विनंती केली. परंतु ती त्यानें ऐकली नाहीं. त्यावरून इटॅलियन सरकारनें रोमवर सैन्य पाठाविलें. ह्या सैन्यानें ता० २० सप्टेंबर १८७० च्या सुमारास त्या शहरावर भडिमार करून त्याच्या भिंतीस खिंडार पाडलें व त्यांतून विजयी इटॅलियन सैन्यानें शहरांत प्रवेश केला. तेव्हां पोपनें स्वत:स आपल्या राजवाड्यांत कोंडून घेतलें. ता० २ आक्टोबर रोजीं रोमन प्रांतांतील लोकांचीं, "स्वतंत्र शासनसंस्था स्थापावी कीं व्हिक्टर इमॅन्युअलच्या राज्यांत सामील व्हावें" या दोन प्रश्नांवर मतें घेण्यांत आलीं. १,३३,६८१ मतें वरीलपैकीं दुसऱ्या प्रश्नाच्यातर्फेनें पडल्यामुळें (पहिल्या प्रश्नास फक्त १,५०७ मतें अनुकूल पडलीं) तो प्रांत व्हिक्टर इमॅन्युअलच्या राज्यास जोडल्याचें जाहीर करण्यांत आलें. याप्रमाणें भूगोलाच्या व लोकवस्तीच्या दृष्टीनें 'इटॅलियन' या शब्दांत ज्यांचा समावेश करितां येईल ते सर्व प्रांत एका शासनसंस्थेच्या अंमलाखालीं आणून त्यांचें ऐक्य बनविण्याचें काव्हूरनें आरंभिलेलें कार्य संपूर्णपणें शेवटास नेण्यांत आलें! रोमन प्रांताचा इटॅलियन सरकारनें कायदेशीर रीतीनें कबजा घेतल्यानंतर त्यांनीं पोपला धर्माचे बाबतींत त्याचे असलेले सर्व अधिकार देऊन त्याच्या तैनातीप्रीत्यर्थ कांहीं मुलख व बरीच मोठी नक्त नेमणूक त्यास करून दिली. पुढें लवकरच म्हणजे १८७१ च्या जुलई महिन्यांत रोम शहरांत इटॅलियन सरकारचें ठाणें नेण्यांत येऊन तेव्हांपासून तें शहर इटलीची राजधानी करण्यांत आलें. ही व्यवस्था अद्याप तशीच कायम आहे.

# धि प्रिंटिंग एजन्सी, पुणें

## कामकाजाचें स्वरूप

छापखान्यास लागणारें सर्व सामान पुरविलें जातें.

---

कसल्याहि प्रकारच्या छपाईच्या कामाविषयीं
सल्ला दिला जातो.

---

कसल्याहि प्रकारचें छपाईचें काम करून दिलें जातें.

---

लोकोपयुक्त विषयावरील लिहिलेले ग्रंथ 'वाङ्मय-
भूषणग्रंथावली'चे द्वारें प्रसिद्ध केले जातात.

---

निवडक ग्रंथांची अडतीनें विक्री केली जाते.

---

कोणतींहि पुस्तकें कसोशीनें व शोधपूर्वक खरेदी
करून पाठविलीं जातात.

---

विशेष माहितीसाठीं म्यानेजर यांजकडे पत्रव्यवहार
केला असतां त्वरित उत्तर मिळतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ११२५

# मुलांचा महाराष्ट्र

म्हणजेच

मराठ्यांच्या मर्दुमकीचें हृदयंगम व स्फूर्तिदायक चित्र.

गोष्टींच्या रूपानें संगतवार इतिहास.

अनेक ऐतिहासिक प्रसंगांचें चटकदार वर्णन.

इतिहाससंशोधकांच्या माहितीचा समावेश.

अनेक भ्रामक ग्रहांचें निरसन.

मुलांस तसाच थोरांसहि अपूर्व.

मुद्दाम तयार केलेला ऐतिहासिक नकाशा.

चारशें पृष्ठांच्या ग्रंथाची किंमत अवघी १ रु.

अशा अनेक गुणांनीं ... झाला असल्यामुळें पालकांनीं आपल्या ... ची अवश्य जोड करून द्यावी.

RFFBK-0001121

पत्ता:—व्यवस्थापक, लोकशिक्षण सदाशिव पेठ, पुणें शहर.

# राष्ट्रीयशिक्षणमाला

१ संस्कृतप्रवेश (२ री आवृत्ति)—सुभाषितें व सुंदर वेचे.
सोप्या मराठींत व्याकरणाचे नियम.
घरच्याघरीं संस्कृत शिकण्यास उत्तम साधन.
संस्कृत व्याकरणाचा बागुलबोवा वाटण्याचें कारण नाहीं. किं. ८८.

२ इंग्रजीप्रवेश ( ३ री आवृत्ति )—संवादपद्धतीनें इंग्रजी शिकविण्याचें पुस्तक.
शिक्षकानें या पद्धतीनें कसें शिकवावें ह्याबद्दल विस्तृत प्रस्तावना.
प्रत्येक धड्याखालीं सविस्तर सूचना दिल्या आहेत. किं. ८८

३ प्रथमगुच्छ—संस्कृत वाचनपुस्तक.
रामायण, भारत, पंचतंत्र व हितोपदेश यांतील उत्कृष्ट वेंचे.
मराठी स्पष्टीकरण व कोश.
संस्कृत वाङ्मयांत उत्तम प्रवेश करून देईल.
किं. १ रु.

व्यवस्थापक 'लोकशिक्षण'
सदाशिवपेठ, पुणें.